दखनी भाषा

म्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार

श्रीधर रंगनाथ कुलकर्णी

राज्य मराठी विकास संस्था

दखनी भाषा

मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार

श्रीधर रंगनाथ कुलकर्णी

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

अनुक्रमणिका

दखनी भाषा :

मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार

DAKHANI BHASHA :

MARHATI SANSKRUTICHA AVISHKAR

आय. एस.बी.एन. क्रमांक : ९७८-९३-८५८०१-०

संगणकीय आवृत्ती : २७ फेब्रुवारी, २०१५

पहिली आवृत्ती : २६ सप्टेंबर १९९८

© राज्य मराठी विकास संस्था

प्रकाशक

राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,

३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : ०२२-२२६३१३२५, फॅक्स : ०२२-२२६५३९६६

ई-मेल : rmvs_mumbai@yahoo.com

संकेतस्थळ : rmvs.maharashtra.gov.in

अक्षरजुळणी व मांडणी

कुमार कॉम्प्युटर्स

'अनुष्का' सर्वे नं.१३/४/१, लेन नं.३०-३१,

धायरी, मुक्ताई गार्डनजवळ, सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.

ई-मेल : nandu@kumarcomputers.in

संकेतस्थळ : www.kumarcomputers.in

इ-पुस्तक रुपांतर

सीडॅक, पुणे

सीडॅक-प्रगत संगणक विकास केंद्र,

वेस्टएण्ड सेंटर-III, स.नं. १६९/१, सेक्टर – II

औंध, पुणे – ४११ ००७.

विनामूल्य वितरणासाठी

अनुक्रमणिका

ह्या इ-पुस्तकाचे सर्व अधिकार राज्य मराठी विकास संस्थेच्या अधीन असून हे पुस्तक जनतेसाठी विनामूल्य स्वरुपात संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. हे पुस्तक आपण स्वतःसाठी विनामूल्य उतरवून घेऊ शकता. परंतु त्याची प्रत करताना अथवा दुवा इतरांना देताना पैसे आकारणे, ह्या पुस्तकाची नक्कल करून त्याची विक्री करणे, किंवा या इ-पुस्तकाची प्रत आपल्या संकेतस्थळावर घालणे इ. गोष्टी करणाऱ्या व्यक्ती व संस्था आढळलयास त्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

अनुक्रमणिका

दखनी भाषेच्या संशोधनाची ‘दीक्षा’ मला देणारे,
ख्यातनाम कवी, कथाकार, समीक्षक,
भाषाविज्ञानक्षेत्रातील पंडित आणि दखनी भाषेच्या
संशोधनसंपादनात उभी हयात वेचणारे
गुरुवर्य पै. डॉ. सय्यद मोहिउद्दीन कादरी ‘जोर’
यांच्या स्मृतीस कृतज्ञतापूर्वक

अनुक्रमणिका

निवेदन

प्राचीन मराठी साहित्याचे एक ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांचे दोन महत्त्वाचे ग्रंथ, एकाचवेळी प्रकाशित करताना राज्य मराठी विकास संस्थेला विशेष आनंद होत आहे.' साहित्यसेतू' आणि 'दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार' हे त्यांचे दोन्ही ग्रंथ स्वतंत्रपणाने स्वयंपूर्ण असेल तरी आशयदृष्टया एकमेकांशी जवळून संबंधितही आहेत. संत नामदेवांच्या तेराव्या शतकातील हिंदी सदृश भाषेतील रचनांचा, त्यांच्या पूर्वकाळात-म्हणजे आठव्या शतकापासून-आणि त्यांच्या उत्तरकाळात-म्हणजे अठराव्या शतकापर्यंत-मागोवा घेताना डॉ. कुलकर्णी यांना जे उत्तर-दक्षिणेमधील सामाजिक-सांस्कृतिक भाषिक आदान-प्रदानाचे चित्र दिसले तेच ह्या दोन्ही ग्रंथांत त्यांनी विस्तृतपणे रेखाटलेले आहे.

डॉ. कुलकर्णी बहुभाषिक आहेत. ह्या संशोधनामध्ये त्यांच्या वाचन-चिंतनाला जसे महत्त्व आहे, तसेच त्यांच्या साहित्य-संगीतादी ललित-कलांसंबंधीच्या अस्सल अशा रसिकतेलाही आहे.

'महाराष्ट्र सारस्वत 'या वि. ल. भावे यांनी लिहिलेल्या प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहास-ग्रंथाची यंदा जन्मशताब्दी आहे. गेल्या शंभर वर्षांत कै. भावे यांच्या नंतरच्या संशोधकांनी प्राचीन साहित्याच्या संशोधन-लेखनात पुष्कळच मौलिक भर घालून ते दालन संपन्न केले आहे. डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांचे 'साहित्यसेतू' आणि 'दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार' हे दोन्ही ग्रंथ आजवर झालेल्या संशोधन क्षेत्रातील त्या वाटचालीच्या संदर्भातही निश्चितपणेच वैशिष्ट्यपूर्ण ठरावेत असे आहेत; गतकाळाच्या अंधारात दडून राहिलेल्या बऱ्याच गोष्टींवर त्यांतून प्रकाशझोत टाकला जात आहे.

शिवाय राज्य मराठी विकास संस्थेने चार वर्षांपूर्वी हाती घेतलेल्या 'दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास' या संशोधन प्रकल्पाशीही या दोन्ही ग्रंथांतील अभिमानास्पद निष्कर्षांचा घनिष्ठ संबंध आहेच.

मराठीचे अभ्यासक या ग्रंथांची योग्य ती दखल घेतील असा विश्वास मला वाटतो.

डॉ. कुलकर्णी यांचे मन:पूर्वक आभार.

मुंबई — **सरोजिनी वैद्य**

२६ सप्टेंबर १९९८ — संचालक, राज्य मराठी विकास संस्था

अनुक्रमणिका

स्वगत

१९५० साली अमलात आलेल्या स्वतंत्र भारताच्या घटनेने या देशातील जनतेला मूलभूत हक्क बहाल केले; त्याचप्रमाणे या देशाच्या इतिहासात प्रथमच या खंडतुल्य आणि बहुभाषी राष्ट्राला हिंदी ही संघराज्याची राजभाषा म्हणून प्रदान केली. या घटनेला मोठेच ऐतिहासिक महत्त्व आहे.

इतिहासात डोकावून पाहिले असता असे दिसून येते की, महाराष्ट्राने १९३५ पूर्वीच हिंदीचा राष्ट्रभाषा या नात्याने स्वीकार केला होता. इतकेच नव्हे तर आजच्या हिंदीचा उद्भव आणि विकास महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वातावरणात झालेला होता. संत नामदेवांपासून तुकाराम —रामदास यांच्या पर्यंत होऊन गेलेल्या संतांनी मराठी बरोबरच हिंदी भाषा आणि साहित्य यांचे संगोपन एखाद्या कुलधर्माप्रमाणे केले याची साक्ष महाराष्ट्रातील संत साहित्य आजही समर्थपणे देत आहे. संत नामदेव यांना हिंदी भाषेचे आद्य कवी या नात्याने मान्यताही मिळालेली आहे.

या पार्श्वभूमीवर स्वतंत्र भारताने आपल्या संघराज्याची राजभाषा म्हणून हिंदीला दिलेली मान्यता अत्यंत अर्थपूर्ण ठरते. महाराष्ट्रात नांदणाऱ्या संस्कृतीचा हा एकापरीने गौरवच म्हटला पाहिजे. दखनी भाषेच्या उद्‌गमाचा शोध घेत असताना हे गौरवास्पद सत्य माझ्या निदर्शनास आले. महाराष्ट्रातील सांस्कृतिक घडामोडीच्या संदर्भात दखनी भाषेचा उद्भव आणि विकास यांचा मागोवा घेऊन दखनी भाषेच्या मराठी पिंडाचा परामर्श घेणे हा प्रस्तुत ग्रंथाचा विषय आहे.

पूर्वसूरींना ‘वाट पुसतु’ आणि आधुनिक संशोधकांचे बोट धरून झालेले हे संशोधन सादर करताना कित्येक स्थळी प्रस्थापित सिद्धांतांचा पुनर्विचार करावा लागला आहे. तो पूर्वसूरींचा अधिक्षेप आहे असे समजण्याचे कारण नाही. संशोधनाच्या वाटचालीत उपलब्ध झालेली नवी साधने अगोदरच्या सिद्धांतांस कधी दृढ करतात तर कधी असे सिद्धांत बादही ठरवीत असतात.

दखनी भाषेच्या अभ्यासाची ‘दीक्षा’ मला मिळाली ती या भाषेचे थोर पंडित आणि नामवंत संशोधक पै.डॉ.मोहिउद्दीन कादरी ‘जोर’ यांच्याकडून. त्यांच्याकडून मिळालेल्या प्रेरणेने या अभ्यासात मला चार दशके गुंतवून ठेवले. त्यांचे ऋण शब्दातीत आहे.

फारसी भाषेचे ज्ञान दखनी भाषेच्या सर्वांगीण अभ्यासास आवश्यक आहे. माझ्या तुटपुंज्या फारसी ज्ञानाची उणीव माझे स्नेही डॉ. गुलाम उमरखान यांनी भरून काढली. निरपेक्षपणे सहकार्य करणाऱ्या या स्नेह्याचे आभार मानले तर तो त्यांच्या सौहार्दाचा उपमर्द ठरेल म्हणून इथे त्यांच्या सहकार्याचा उल्लेख तेवढा करीत आहे.

लेखन पूर्ण होईपर्यंत असा ग्रंथ प्रकाशात कसा येईल याची चिंता मनास शिवली नाही. लेखन पूर्ण झाल्यानंतर मात्र या चिंतेने घेरले. प्रयत्नाचा एक भाग या नात्याने राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालिका डॉ. सौ. सरोजिनी वैद्य यांच्याकडे प्रकाशनाची गोष्ट काढली. त्यांनी माझी चिंता स्वतःवर ओढवून घेतली. त्यांच्या प्रयत्नामुळे भारत सरकारच्या म्हैसूर सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस या संस्थेने ग्रंथाच्या प्रकाशनार्थ भरीव अर्थसाहाय्य केले. नंतर राज्य मराठी विकास संस्थेने प्रकाशनाची जबाबदारी घेतली. अशा रीतीने भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या अर्थसाहाय्यामुळे हा ग्रंथ प्रकाशात येत आहे. या दोन्ही

संस्थांचा मी ऋणी आहे. डॉ. सौ. सरोजिनी वैद्य यांचे आभार मानण्यास पुरेसे शब्द मजजवळ नाहीत. त्यांनी दर्शविलेल्या आस्थेचा मात्र आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

अनेक भाषांशी संबंधित असलेले लिखाण मुद्रित करणे हे आव्हानात्मक कार्य 'स्वयम्' या अक्षरजुळणी करणाऱ्या संस्थेने नेटकेपणाने केले आहे. 'स्वयम्' चा मी अत्यंत आभारी आहे.

मऱ्हाटी संस्कृती बहुरंगी आहे. तिच्या एका अंगाचे दर्शन यथाशक्ती घडविण्याचा प्रयत्न या ग्रंथात केला आहे. दखनी भाषेचा सर्वांगीण आणि मऱ्हाटी संस्कृतीच्या संदर्भात झालेला हा पहिलाच अभ्यास असल्याने तो परिपूर्ण आहे असा लेखकाचा दावा नाही. मऱ्हाटी संस्कृतीच्या अन्य उपेक्षित अंगांचे अध्ययन-संशोधन यांस चालना मिळावी ही माफक अपेक्षा मनी बाळगून ग्रंथ मराठी वाचकांच्या स्वाधीन करीत आहे.

२-१-५१२-४ नल्ला कुंटा,
हैदराबाद ५०० ०४४

श्रीधर रंगनाथ कुलकर्णी

अनुक्रमणिका

Dakhani Language:
Expression of Marathi Culture

we are happy to publish this work of Dr. Shridhar Ranganath Kulkarni focused on a comprehensive study of the Marathi Culture in the context of the Dakhani language. In fact, despite its close affinity with the Marathi language, the scholars in Maharashtra – with rare exception - have regrettedly preferred to ignore Dakhani. Otherwise, the glorious national achievement of the Marathi language ane culture would have come in light much earlier.

Dakhani is a unique language. its present status is comparable to a prince reduced to an ordinary civilian after the dissolution of the princely states ! There was a period when Dakhani could boast of a rich literary heritage. It enjoyed glamour and recognition in the courts of the Adilshahi and Kutubshahi dynasties of Bijapur and Golkonda. Today, however, it barely survives as a dialect of some communities in South India.

For the last half a century or so, research has been in progress on Dakhani leterature in persian script without due consideration to its origin. Most Urdu and HIndi scholars have preconceived Dakhani either as a premeval stage of Urdu or considered it a regional variation of Hindi. Consefquently, the entire research on Dakhani is biased and prejudiced.

Dakhani has its origin much before Urdu and Hindi came into existence. In fact, literature is available in Dakhani from the time of Namdev (thirteenth century). If modern scholars had prudently studied the literatures of Saint Namdev, Eknath, Dasopant and Ramdas, their studies would have a totally different connotation.

Most scholars acknoledge that Dakhani has a predoninence of Marathi vocabulary. Yet, due to lack of perspective, they failed to comprehend the truth that tha core of Dakhani was Marathi.

In the present work, with the help of political history, cultural developments and literary traditions, the author has conclusively established how the characteristic atmosphere in Maharashtra was responsible for the origin of Dakhani.

The work has three parts. The first part discusses Dakhani literature and the origin and development of the Dakhani language. While the second part deals with the linguistic studies of Dakhani, and the third part includes about one thousand words and pharases evolved from Marathi.

A study of this work will irrefutably prove that Dakhani was evolved and developed under the influence of a homogeneous environment then prevalent in Maharashtra.

Languanges, is regarded as vehicle of culture. But if language is studied ignoring its cultural dimension, such a research often proves to be one sided and partial- a fact well demonstrated in this work.

It is olnly appropriate that the Central Institute of Indian Languages, Mysore and the Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai, have jointly sponsored the publication of this volume dealing with corresponding relationship between language and culture.

Sarojini Vaidya
Director
Rajya Marathi Vikas Sanstha

डॉ. श्रीधर रंगनाथ कुलकर्णी

जन्म : ८ डिसेंबर १९१६

शिक्षण : एम्. ए. पीएच. डी.

ग्रंथसंपदा :

१) रसकौमोदी. (संपादन) १९५८
२) नाथांचा भागवतधर्म १९५८ (न. चिं. केळकर पुरस्कार, केसरी ट्रस्ट.)
३) सुगमबोध १९६६
४) प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा १९७१, १९९० (महाराष्ट्र राज्य पुरस्कार)
५) नवरात्र संपले! १९७३, १९९४
६) तेलंगणातील अरे मराठा समाज : भाषा आणि संस्कृती १९८७ (महाराष्ट्र राज्य पुरस्कार)
७) संगीत दर्पण. १९८७
८) शिवकालीन, राजनीती आणि रणनीती १९९४ (लोकमान्य सेवासंघ, पार्ले या संस्थेचा पुरस्कार.)
९) मध्ययुगीन मराठी साहित्य : एक पुनर्विचार १९९४ (कै.मार्तंडराव मोहरीर पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषद)
१०) प्राचीन मराठी हस्तलिखिते : संशोधन आणि संपादन १९९४
११) ओवी ते लावणी १९९४
१२) नाथपंथी ज्ञानेश्वरी आणि वारकरी ज्ञानदेव १९९६
१३) साहित्यसेतू १९९८
१४) दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक अविष्कार १९९८

पुरस्कार :

१) जेष्ठ साहितियिक पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे १९९०
२) कै.अ. का. प्रियोळकर संशोधन पुरस्कार, मुंबई विद्यापीठ. १९९४
३) गौरववृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ १९९८

व्यवसाय :

- सहसंपादक, ‘लोकशक्ती’
- कार्यकारी संपादक, ‘मराठवाडा’
- संस्थापक कार्यकारी संपादक, ‘प्रतिष्ठान’
- संस्थापक संपादक, ‘पंचधारा’
- मराठी विभाग प्रमुख, उस्मानिया विद्यापीठ

सहभाग : १९४२ च्या चलेजाव चळवळीत सहभाग आणि तुरुंगवास
१९४७ च्या हैद्राबाद मुक्तिसंग्रामात सहभाग आणि तुरुंगवास

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

१. विषयाचे स्वरूप १४

२. दखनी भाषा आणि साहित्य २४

३. दखनी साहित्याचे अंतरंग ३७

४. शोध उगमस्थानाचा ४५

५. दखनी भाषेचा उद्भव ६०

६. दखनी भाषेचा विकास ७४

७. गोदा मिळाली गंगेला ! ८२

८. अंतिम पर्व ८९

९. दखनीचे भाषिक विशेष ९७

१०. अरबी-फारसी शब्दांची उसनवारी १०६

११. ध्वनिव्यवस्था आणि वर्णविचार १११

१२. व्याकरणव्यवस्था ११५

१३. प्रयोगव्यवस्था १३९

१४. दखनी भाषेतील वाक्प्रचार आणि म्हणी १४६

१५. मऱ्हाटी संस्कृतीची राष्ट्रीय कामगिरी १५१

परिशिष्ट १ .... १५५

शब्दकोश १६८

दखनी भाषा मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार

अनुक्रमणिका

१. विषयाचे स्वरूप

दखनी : एक दुर्लक्षित आणि विलक्षण भाषा

महाराष्ट्राची संस्कृती आणि भाषा व साहित्य यांच्या विषयीचे संशोधन महाराष्ट्राच्या चतु:सीमा आणि मराठी वाङ्मय यांच्याच परिघात फेर धरीत असल्याकारणाने मऱ्हाटी संस्कृती आणि मराठी भाषा यांच्या द्वारे काही महत्त्वाचे कार्य राष्ट्रीय पातळीवर घडले आहे याची जाणीव मराठी साहित्यात तरी प्रतिबिंबित झालेली दिसून येत नाही. या देशाच्या सांस्कृतिक इतिहासात या कार्यांची नोंद असली तरी इतिहास डोळसपणे पाहण्याचे व तो कथन करण्याचे प्रयत्न फारसे झाले नसल्याने मराठी माणसाला अभिमानास्पद वाटाव्या अशा कितीतरी बाबी अज्ञात राहिल्या आहेत. दखनी भाषा आणि साहित्य या विषयाची गणना त्यात करता येईल.

दखनी भाषा आणि या भाषेतील साहित्य यांचा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाशी निकटचा संबंध असूनही मराठी संशोधकांनी या विशेषाकडे फारसे लक्ष दिले नाही असे खेदाने नमूद करावेसे वाटते. फारसी लिपीत निबद्ध असलेले दखनी साहित्य प्रकाशात येण्यास प्रारंभ झाला त्याला साठ वर्षांचा कालावधी लोटलेला आहे. या साहित्याच्या निर्मितीस पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रारंभ झालेला असून अठराव्या शतकाच्या प्रारंभकालापर्यंत या भाषेत साहित्यनिर्मिती होत गेली. त्यांची दखल जर मराठी संशोधकांनी योग्य वेळी घेतली असती तर राष्ट्रीय स्तरावर मऱ्हाटी संस्कृतीने केलेल्या एका महान कार्याचा परिचय मराठी भाषिकांना आजवर झाला असता. आजही श्री.देविसिंग चौहान यांचा अपवाद वगळता इतर मराठी विद्वानांनी या भाषेची दखल घेतली आहे असे दिसून येत नाही.

दखनी भाषा तशी विलक्षणच वाटते. सामान्यत: प्रथम बोली आणि नंतर साहित्याची भाषा असा कोणत्याही भाषेचा विकास घडत असतो. परंतु, दखनी भाषेचे भाग्य असे विलक्षण, की समृद्ध अशा साहित्याची निर्मिती करूनही ही भाषा आज तग धरून आहे ती बोलीच्या स्वरुपात. असे सहसा घडत नाही. साहित्याची उंची गाठल्यानंतर कोणतीही भाषा एकतर या उंचीवर कायम राहते अथवा अन्य भाषेस जन्म देऊन स्वत: काळाच्या पडद्याआड अंतर्धान पावते. दखनीच्या बाबतीत थोडेसे निराळे घडले आहे. शिष्ट समाजाची बोली या नात्याने ती आज अस्तित्वात नाही, तर एका मर्यादित क्षेत्रातील मागासलेल्या समाजाची बोली म्हणून ती वावरत आहे. गुजरातपासून कन्याकुमारी—पर्यंत आणि बंगलोर पासून मछलीपट्टण बंदराच्या टापूत वास्तव्य करणाऱ्या मुसलमान मागासवर्गीयांची बोली या नात्याने दखनी आज आपले अस्तित्व टिकवून आहे. आपल्या बोलीत एके काळी श्रेष्ठ साहित्य अस्तित्वात होते याची जाणीवही या समाजास नाही.

फारसी लिपीत निबद्ध असलेल्या दखनी साहित्याचा 'निजामी' हा पहिला कवी मानला जातो. इ. स. १४६० ते १४६२ या कालावधीत रचण्यात आलेली 'पद्मराव कदम'ही या भाषेतील पहिली कृती. गोवळकोंडयाच्या कुतुबशाही घराण्याच्या राजवटीत आणि विजापूरच्या आदिलशाहीच्या काळात या भाषेतील साहित्याला आणि भाषेला राजाश्रय मिळाला आणि साहित्याने प्रगतीचे शिखर गाठले. या दोन्ही घराण्यांतील काही सुलतान स्वत: दखनी भाषेचे कवी होते. अठराव्या शतकाच्या प्रारंभी औरंगजेबाने ही दोन्ही घराणी बुडविली. दखनी भाषेचा केवळ राजाश्रयच त्यामुळे तुटला असे नसून एकंदरीत साहित्यालाच त्यायोगे अवकळा आली. तेव्हापासून दखनी भाषा ही केवळ बोलीच्या रुपात नांदत आहे.

सुमारे साठ वर्षांपूर्वी मौलाना अब्दुल हक यांच्या प्रयत्नाने प्रथम हे साहित्य प्रकाशात आले तेव्हा काही समिक्षकांना (आश्चर्याचा) धक्का बसला. तिच्यातील कवी, लेखक धर्माने मुसलमान असून साहित्यातील वातावरण मात्र भारताच्या सांस्कृतिक परंपरेशी एकात्म असलेले आणि भाषा उर्दू भाषेपेक्षा कितीतरी निराळी! अगदी थेट मराठी वळणाची ! त्यामुळे या भाषेच्या स्वरूपाचे कौतुक अधिक झाले. तिच्या या स्वरुपाची अधिक मीमांसा न करता संशोधक केवळ तिचे हे वर्णनच एकमेकांना सांगत गेले. दखनी भाषेच्या उत्पत्तीचा शोध लावण्याचे प्रयत्न योग्य दिशेने न झाल्याकारणाने या भाषेच्या कित्येक विशेषांचा समाधानकारक उलगडा अद्याप झालेला नाही. समिक्षकांनी केलेल्या चर्चेत सत्यसंशोधनापेक्षा भाषिक अभिनिवेशच अधिक आढळून येतो. उर्दू भाषेचे पंडित या भाषेला प्राचीन उर्दू मानतात तर हिंदी भाषेच्या पंडितांच्या दृष्टीने ती हिंदी भाषेचा दाक्षिणात्य भेद आहे असे मानण्यात येते.

या दोन्ही मतांत निखळ सत्य आढळत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की हिंदी आणि उर्दू या दोन्ही भाषा अस्तित्वात येण्यापूर्वी दखनी साहित्य अस्तित्वात होते. म्हणूनच या दोन्ही भाषांच्या परंपरांच्या बाहेरच दखनी भाषेत मूळ शोधावे लागते. दखनी भाषेला स्वतःचे कुलगोत्र नाही असा मात्र त्याचा अर्थ घेता येत नाही. या भाषेला वर्तमानकालीन भूगोल आहे, तसाच भूतकालीन इतिहास आणि संस्कृतीही आहे. महाराष्ट्राने काटिखांद्यावर वाढविल्याकारणाने दखनी भाषेवर मराठी भाषेचे संस्कारही झालेले आहेत.

दखनी भाषेचे मराठी भाषेशी असलेले नाते कोणत्या प्रकारचे आहे याचा शोध घेण्यापूर्वी हिंदी व उर्दू या भाषांशी दखनीचा संबंध कसा पोचत नाही या स्पष्ट केले पाहिजे.

उर्दू हा शब्द मूळ तुर्की भाषेतला असून 'लष्कर' वा 'बाजार' असा या शब्दाचा अर्थ आहे. त्यावरून लष्करात आणि बाजारात रुढ असलेली भिन्न भाषिकांची बोधभाषा असा संकेत या शब्दातून मिळतो. इस्लामी आक्रमणानंतर पंजाबात या भाषेचा उदय झाला असे सांगण्यात येते.[१] दक्षिणेवर मुसलमानांचे आक्रमण झाल्यानंतर ही भाषा आक्रमकांबरोबर दक्षिणेत आली आणि याच भाषेत सूफींनी साहित्य–रचना केली. असे एक मत आहे. म्हणून या साहित्याची भाषा 'उर्दू' असून 'कदीम उर्दू' (प्राचीन उर्दू) हे दखनी भाषेचे स्वरूप आहे असे म्हटले जाते.[२]

ही उपपत्ती तर्कसंगत वाटत नाही. या भाषेचा जन्म पंजाबात झालेला असेल तर साहित्य – निर्मिती पंजाबात–मूळ स्थानी न होता दक्षिणेत का व्हावी याचा उलगडा या मताने होत नाही. शिवाय इसवी सनाच्या दहाव्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंत उत्तरेत उर्दू वा हिंदी भाषेच्या कोणत्याही प्रादेशिक भेदात साहित्य–निर्मिती झाल्याची नोंद इतिहासात आढळत नाही.[३] स्थलांतर करणाऱ्या समाजाची बोली त्या त्या समाजाबरोबर स्थलांतर करते हे समजण्यासारखे आहे. परंतु, या बोलीत जन्मस्थानी साहित्य–निर्मिती न होता ती दूरवरच्या प्रदेशात व्हावी हे भाषाविकासाच्या प्रकृतिधर्माशी सुसंगत वाटत नाही. तंजावरच्या परिसरातील मराठी साहित्याचा दाखला या संदर्भात देता येण्यासारखा आहे.

फारसी लिपीत निबद्ध असलेले दखनी साहित्य, प्रारंभकाळात तरी, परदेशातून आलेल्या सूफी संतांनी रचलेले आहे. या संताची ती मातृभाषा नव्हती. तुर्की, अरबी वा फारसी मातृभाषा असलेल्या संतांनी या साहित्याची रचना केली आहे. मूळ सूफी साहित्य त्या काळात फारसी भाषेतून रचण्यात आलेले होते. भारतात आलेल्या मुसलमान राज्यकर्त्यांनी राजभाषा म्हणून फारसीचा स्वीकार केलेला असला तरी बहुजन समाजाची भाषा उत्तरेत आणि दक्षिणेत निराळी होती. या समाजात सूफी संप्रदायाचा प्रसार करावयाचा

अनुक्रमणिका

असेल तर बहुजन समाजास समजणाऱ्या भाषेतूनच तो झाला पाहिजे हे लक्षात घेऊन उत्तर भारतात सूफींनी ‘अवधी’ या हिंदी भाषेच्या प्रादेशिक बोलीत ग्रंथरचना केली.[४] कारण संत कबीर यांच्या साहित्याने अवधीस साहित्याची प्रतिष्ठा अगोदरच प्राप्त करून दिलेली होती. दक्षिण भारतात संप्रदायाचा प्रसार करण्याची आवश्यकता निर्माण झाली तेव्हा मात्र सूफींनी दखनी भाषेचा आश्रय घेतला.

याचे कारण स्पष्ट आहे. ही भाषा त्या काळात दक्षिणेत प्रचलित असली पाहिजे. किमानपक्षी साधुसंतांच्या अध्यात्मचर्चेची भाषा या नात्याने तरी तिला मान्यता लाभलेली असावी. या भाषेचे लेखन फक्त सूफींनी फारसी लिपीतून केले. सूफींनी पंजाबातून ही भाषा दक्षिणेत आणली हे मत ऐतिहासिक सत्याच्या कसोटीवर टिकत नाही.[५] फारसी लिपीतील दखनी साहित्य अस्तित्वात आले त्या काळात आणि या साहित्याचा विकास थांबला त्या काळात देखील (इ. स. १४०० ते १७००) खडी बोलीवर आधारलेली वर्तमान हिंदी भाषा अस्तित्वातही नव्हती हेही विसरता येत नाही.

आज हिंदी भाषेचे प्रादेशिक भेद या नात्याने वावरणाऱ्या व्रज, अवधी आणि मैथिली या बोलींमध्ये एकेकाळी श्रेष्ठ साहित्याची निर्मिती झालेली आहे. या बोलीपैकी मैथिलीतील साहित्याचा प्रारंभ चौदाव्या शतकाच्या आसपास झालेला आहे. पंधराव्या शतकापासून अवधीतील साहित्य- परंपरा आढळते तर व्रज बोलीतील साहित्यरचनेस प्रारंभ झालेला आहे तो पंधराव्या शतकाच्या शेवटी. डिंगली बोलीतील ‘पृथ्वीराज रासो’ (तेरावे शतक) हे काव्य हिंदी भाषेतला पहिला ग्रंथ मानण्यात येत असला तरी तो सोळाव्या शतकाच्या पूर्वीचा नाही असे मत विद्वानांनी दिले आहे.[६] हे सर्व नमूद करण्याचा हेतू एवढाच की हिंदी भाषेच्या वर्तमान प्रादेशिक बोलीतून साहित्य निर्माण होण्यापूर्वी दखनी भाषेतील साहित्य अस्तित्वात होते; या बोलींचा दखनी भाषेशी कोठेही संबंध पोचत नाही हे ध्यानात यावे.

वर्तमान नागरी हिंदी भाषेचा इतिहास तर या बोलींच्या मानाने बराच अर्वाचीन आहे. खडी बोली बाराव्या शतकाइतकी पुरातन असल्याचे डॉ. बाबूराम सक्सेना यांचे मत असले तरी हे मत अमीर खुसरो यांच्या साहित्याच्या आधाराने मांडण्यात येत असते. परंतु, अमीर खुसरो यांचे साहित्य विश्वसनीय नाही असेही तेच सांगतात.[७] हे संशयातीत नसलेले साहित्य वगळले तर एकोणीसाव्या शतकापर्यंत खडी बोलीत हिंदी भाषेतील साहित्य आढळत नाही ही वस्तुस्थिती आहे.[८] ब्रिटीश राजवटीच्या प्रारंभकाळात खडी बोलीवर आधारलेल्या आजच्या हिंदी भाषेस महत्त्व आले. या भाषेत एकोणिसाव्या शतकापर्यंत साहित्य – निर्मिती झालेली नव्हती ही वस्तुस्थिती आहे.

अरबी – फारसी वर्णोच्चारांचा अपवाद वगळता उर्दू भाषेने आपला संसार खडी बोलीवर उभा केला आहे. आजची नागरी हिंदी याचा खडीबोलीवर आधारलेली आहे. त्यामुळे एका विशिष्ट मर्यादेत उर्दू आणि हिंदी या भाषांचे व्याकरणही अभिन्न आहे.[९] इ.स. १७०० च्या पूर्वी उर्दू या नावाची भाषा अस्तित्वात नव्हती तशीच आजची नागरी हिंदी भाषादेखील.[१०] त्यामुळे दखनी भाषेचे उगमस्थान शोधताना वर्तमान हिंदी आणि उर्दू या दोन्ही भाषांच्या इतिहासाचा उपयोग होणे शक्य नाही. ते अन्यत्रच शोधावे लागते. म्हणून ‘कदीम उर्दू’ व ‘दक्खिनी हिंदी’ हे अनुक्रमे उर्दू व हिंदी विद्वानांचे मत दखनीच्या संदर्भात विचारात घेता येत नाही.

दाक्षिणात्य भाषा वगळता अर्वाचीन देशी भाषांचा उद्भव सामान्यपणे आठव्या शतकाच्या आसपास मानण्यात येतो. या सिद्धांत दखनी भाषेस लागू केला तर दोन अडचणी येतात. एक फारसी लिपीची आणि दुसरी या भाषेत रूढ असलेल्या अरबी–फारसी शब्दांची. सातव्या–आठव्या शतकात भारतात इस्लामी

संस्कृतीशी संबंध आलेला नव्हता. त्यामुळे इतर आधुनिक भारतीय देशी भाषांबरोबरच दखनीचा उद्भव झाला हे मानता येत नाही. शिवाय, या भाषेत असलेले विपुल मराठी शब्द आणि व्याकरणाची रूपे यांची संगती कशी लावावयाची हा प्रश्न पडतोच.

नाथसंप्रदाय आणि त्याची "बैरागी" भाषा

भारतीय संस्कृतीच्या आधाराने हा प्रश्न सोडविता येतो; तसाच दखनी भाषेचा उद्भवकाळही निश्चित करता येतो.

काही अपवाद वगळले तर आधुनिक भारतीय भाषांतील साहित्याचा प्रारंभ साधुसंतांच्या कवनांनी झालेला आहे असे दिसून येईल. धर्म आणि अध्यात्मज्ञान यांचा प्रसार वर्णनिरपेक्ष अशा समाजाच्या सर्व थरांतून व्हावा या हेतूने साधुसंतांनी संस्कृत साहित्याची मर्यादा आदराने ओलांडून देशी भाषांतून साहित्य—निर्मिती केली. तत्पूर्वी निरनिराळ्या सिद्ध- संतांनीदेखील प्राकृतांच्या भाषेतून इसवी सनाच्या आठव्या शतकापासून कवने रचली. इतकेच नव्हे तर लोकगीतांत रूढ असलेले छंद आणि नागर व अनागर संगीताची जोड देऊन सिद्धांनी आपले साहित्य लोकाभिमुख केले. या साहित्याने सदाचाराचा प्रसार करण्याचे फार मोठे कार्य त्या त्या काळात केलेले आहे.

सिद्धांच्या परंपरेतून भारतभर विस्तार पावलेला नाथसंप्रदाय उदयास आला. देशी भाषांच्या उदयकालात नाथसंप्रदाय आसेतुहिमाचल कार्यप्रवण होता. इ.स.६०० ते ११०० हा नाथसंप्रदायाचा प्रभाव काळ मानण्यात येतो. गोरखनाथांसारखा प्रभावी नेता या कालावधीतच नाथसंप्रदायास लाभला.[११] अवैदिक, तांत्रिक, क्षुद्र देवतांचे उपासक इत्यादिकांच्या प्रभावामुळे मलीन झालेल्या वैदिक परंपरेस उजाळा देण्याचे कार्य नाथसंप्रदायाने केले. या संप्रदायाने कर्मठतेचा निषेध केलेला असून चित्तशुद्धी आणि सदाचार यांवर विशेष भर दिलेला आहे. नाथसंप्रदायाचा प्रभावकाळ आणि आधुनिक देशी भाषांतील साहित्याचा उद्भव यांचा काळ समांतर असावा हा केवळ योगायोग समजता येत नाही. नाथसंप्रदायाने घडवून आणलेल्या लोकजागृतीचा तो एक परिपाक आहे असे म्हणता येईल.

मध्ययुगीन सांस्कृतिक जीवन आणि भारतीय भाषांत घडणारे संक्रमण या दोन्ही दृष्टींनी नाथसंप्रदायाचे साहित्य ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरते. प्राकृतांना त्यांच्या भाषेतून अध्यात्मोपदेश केला पाहिजे हे नाथसंप्रदायाचे ब्रीदच आधुनिक भारतीय भाषांतील साधुसंतांनी पुढे चालवलेले आहे. तत्पूर्वीच्या सिद्धांच्या साहित्यात भाषेच्या दोन निश्चित अवस्था दिसून येतात. संस्कृत व प्राकृत यांच्या कालिक विकासातून उद्भवलेली अपभ्रंश भाषा काही सिद्धांच्या साहित्यात आढळते तर याच अवस्थेचे पुढचे संक्रमण उत्तरकालीन सिद्धांच्या साहित्यात आढळून येते. काही विद्वानांनी या संक्रमणकालीन भाषेस 'संधा भाषा' अथवा 'सधुकूडी' (साधूंच्या साहित्यात योजली जाणारी) असे नाव दिले आहे.[१३] याच 'संधा भाषे'ची उत्तरावस्था संत नामदेवांच्या हिंदी कवनात आढळते. सिद्धांनी भारतभर संचार करताना लोकभाषांचे माध्यम योजल्याकारणाने कित्येक प्रादेशिक भाषांतील शब्द सिद्धांच्या वाणीत रूढ झालेले आहेत. [१४] परंतु अन्य प्रादेशिक भाषांच्या तुलनेने नाथसिद्धांच्या विशेषत: गोरखनाथांच्या वाणीत, फडिका, निरुता, उंद्र (उंदीर) या सारखी नामे येतात; त्याचप्रमाणे मराठी आख्यात प्रत्यय लागून झालेली क्रियापदे आणि विभक्तिप्रत्ययान्त नामेही आढळतात. केवळ परभाषा — संपर्कातून हे मराठी शब्द रूढ झाले आहेत असे मानता येत नाही. या संस्काराचा अधिक खोलात जाऊन विचार केला पाहिजे.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र, मराठी साहित्य आणि या प्रदेशातील सांस्कृतिक परंपरा यांचा नाथसंप्रदायाशी अत्यंत जवळचा संबंध आहे हे प्राचीन मराठी साहित्याच्या अभ्यासकांस सांगण्याचे कारण नाही. मराठी भाषेचे आद्य कवी मुकुंदराज आणि वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक संत ज्ञानेश्वर हे दोघेही नाथसंप्रदायाचे अनुयायी होते. महाराष्ट्र आणि नाथसंप्रदाय यांचे संबंध दीर्घकालीन असल्याचे इतरही अनेक पुरावे उपलब्ध आहेत. परंतु, अलीकडे पं. राहुल सांकृत्यायन यांनी केलेल्या संशोधनातून तर या संबंधाना निश्चित आधार मिळालेला आहे.

सिद्धसाहित्याचा शोध राहुलजींनी या देशात आणि शेजारी राष्ट्रांतही घेतला आणि बरीच सामग्री संपादन केली. आदिसिध्द सरहपा (८ वे शतक)यांचा 'दोहाकोश' त्यांनी संपादित केला तो याच सामग्रीच्या साहाय्याने. संशोधनसाधनांची माहिती देताना राहुलजींनी एक महत्त्वाचे तथ्य नोंदविले आहे. सिद्ध सरहपा हे मूळ बौद्ध वज्रयानी पंथातले असले तरी त्यांना 'ज्ञानप्राप्ती' होऊन ते नाथपंथी बनले ते महाराष्ट्रात. त्यांनी आपली शिष्यशाखा वाढविण्याचा प्रारंभ केला तोही याचा परिसरात. इतकेच नव्हे तर सरहपांपासून ते ज्ञानेश्वरांपर्यंतची होऊन गेलेली गुरुशिष्यपरंपराही समग्रपणे त्यांना उपलब्ध झाली. त्यावरून संत ज्ञानेश्वरांच्या गुरुपरंपरेला ८ व्या शतकापासूनचा इतिहास आहे हे तर प्रस्थापित होतेच, शिवाय किमान आठव्या शतकापासून महाराष्ट्रात नाथसंप्रदाय नांदत होता हेही सिद्ध होते. संत नामदेवांच्या काळापासून नाथवाणीस जवळची असलेली वाणी महाराष्ट्रातील संतांच्या साहित्यात आढळून येते, त्याचे कारणही महाराष्ट्राचे नाथसंप्रदायाशी असलेले दीर्घकालीन साहचर्य हेच देता येईल.

'लीळाचरित्र' या आद्य मराठी चरित्रग्रंथात असलेल्या उल्लेखावरून या निष्कर्षास पुष्टीच मिळते. [१५] गोरखनाथादी सिद्ध आणि त्यांची 'बैरागी' भाषा यांचे उल्लेख 'लीळाचरित्रात' कित्येक स्थळी येतात. श्रीचक्रधरांनी नाथजोग्याचा वेष घेऊन त्यांच्या बैरागी भाषेत एक चौपदी रचल्याची नोंदही लीळाचरित्रात आली आहे. या चौपदीची भाषा अपभ्रंशाच्या सरहद्दीवर असलेल्या भाषेशी आणि गोरखवाणीतील भाषेशी बरीच मिळती – जुळती आहे. तेराव्या शतकातील महाराष्ट्रातल्या साधुसंतांना तरी ही बैरागी भाषा परिचित होती असा त्याचा अर्थ होतो. श्रीचक्रधरांचे शिष्य नागदेवाचार्य यांनी नाथपंथाचे खंडन करण्याची आज्ञा दामोदर पंडितास केली असताना या पंडिताने ६० चौपद्या रचल्या. त्यांपैकी किमान २५ चौपद्या तरी बैरागी भाषेत आहेत. भाषिक परंपरा आणि सातत्य यांच्या दृष्टीने गोरखनाथ, नामदेव आणि दामोदर पंडित यांची कवने तुलनात्मक अभ्यासास आवाहन करणारी आहेत.

१. *ऐसा रे उपदेस राषै श्री गोरखराया, जि नि जग चतुरवरन रह लाया ॥*
पढिलै संसवेद । करिलै विधिनिषेद । जाणीलै भेदांनभेद
-पुरिलै आसा उमैद ॥१॥

विषमी संधि मंझारि । संशया पंचै वषत तारि ।
राहिबा दसवै दुवारि । सोइबा परम निराकार ॥
-गोरखनाथ, पृ. १२७

२. *आनीलै कुंभ भराईलै उदक । ठाकूर कउ इसनान करऊ*
बयालिस लक्ष जी जलमहि होते । बीठलु भैला काइ करऊ
जत्र जाऊ तत्र बीठलु भैला। महा आनंद करै सद केला ॥
-पंजाबातील नामदेव, पृ. ८६

अनुक्रमणिका

३. *तनुमनु पवना जिये अधिनु । तीयेसि नव्हे जब भीन्नु ।*
नालिका बंध शुक तैसा रे भया करनी ते होए बंधन ।
दिगंबर धूसरा । जटाधारा बनवासा ॥ ज्ञानवेष धरिता न तुटति भवपाश ॥
दास को पुतली प्रणियली हो । बेटा कही न प्रसवे । देहिको मारग
साधिता भया । आप न मुगता होये ॥२॥

-मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका, अंक १ (१९६६), पृ. २

वरील तिन्ही उतारे बरेच बोलके आहेत. तेराव्या शतकात निदान साधुसंतांच्या समाजात मराठीखेरीज एक निराळी भाषा प्रचलित होती याचा बोध या उताऱ्यांवरून सहज होण्यासारखा आहे. नाथ संप्रदायामुळे परिचित झालेल्या ह्याच भाषेच्या परंपरेतून हिंदी भाषेचा आद्य कवी संत नामदेव उदयास आलेला आहे हे तथ्य आता दूरान्वित वाटण्याचे कारण नाही. [१६]

मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार

हिंदीभाषी प्रदेशातील कवींना विशेषतः खडी बोलीत लिहिणाऱ्या निर्गुण संप्रदायी संताना, काव्यरचनेची प्रेरणा संत नामदेवांपासून मिळालेली आहे. म्हणजे खडी बोलीला साहित्याची प्रतिष्ठा प्रथम महाराष्ट्रातून लाभावी [१७] या घटनेचे मूळ महाराष्ट्रातील नामदेवांच्या म्हणून उल्लेखिल्या जाणाऱ्या 'हिंदी' काव्यात दाखविले जाते.

तेराव्या शतकापासून साधुसंतांना परिचित असलेल्या व अध्यात्मचर्चेची भाषा या नात्याने महाराष्ट्रात रूढ असलेल्या भाषेचेच माध्यम सूफी संतांनी आपल्या पंथाच्या प्रचारार्थ स्वीकारले. साहित्याचे लेखन करताना मात्र सूफी संतांनी परिचित असलेल्या फारसी लिपीतून केले. पुढे दखनी भाषा या नावाने ख्याती पावलेली भाषा महाराष्ट्रात रूढ असलेल्या बैरागी भाषेतून परिणत झालेली आहे. सिद्ध साहित्यात आढळणारी, मराठी संतांनी वाढविलेली आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेमुळे बाळसेदार झालेली दखनी भाषा हा अशा रीतीने मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार ठरतो. या भाषेला लाभलेले मराठी वळण उपरे नसून ते कर्णाच्या कवचकुंडलांप्रमाणे जन्मसिद्ध आहे.

मऱ्हाटी संस्कृतीने बजावलेल्या या महनीय राष्ट्रीय कामगिरीकडे दुर्दैवाने आजवर दुर्लक्ष झाले आहे.

रानभूल ही संशोधनाच्या क्षेत्रात अपवादात्मक घटना नसते. चांगली रुळलेली वाट देखील एखाद्या निबिड अरण्याच्या तोंडाशी पार पुसलेली आढळते, त्यामुळे पुढे वाट कशी काढावी असा प्रश्न पडतो. भाषेच्या संशोधनाच्या वाटेवर असे अनुभव फार येतात. फारसी लिपीतील दखनी साहित्याच्या भाषेच्या उत्पत्तीची चर्चा करताना संशोधकांची अशीच अवस्था झालेली आहे. 'प्राचीन उर्दू' आणि 'दक्खिनी हिंदी' या टप्प्यांवरच संशोधन थांबलेले आहे. हे दोन्ही मुक्काम अर्ध्या वाटेवरचे आहेत. या मुक्कामांच्या पुढे जाऊन दखनी भाषेच्या उद्भव –विकासाचा शोध घेता आला पाहिजे.

शोधाच्या या वाटेवर प्रथम आपली भेट होते ती संत नामदेवांशी. त्यांनी रचलेली तथाकथित 'हिंदी' कवनांची भाषा एकीकडे पुढील काळातील कबीरांशी नाते सांगते तर दुसरीकडे भूतकाळात अधिक डोकावून पाहण्यास प्रवृत्त करते. नामदेवांच्या साहित्यावरून एक गोष्ट निश्चित होते ती म्हणजे सूफींनी आपल्या

अनुक्रमणिका

साहित्यात योजलेली भाषा पंधराव्या शतकात उदयास आलेली नसून तिला किमान तेराव्या शतकाइतका पूर्वेतिहास आहे. या भाषेला 'बैरागी भाषा' या नावाने महाराष्ट्रातील समाज ओळखत असे आणि सामान्य समाजास ती भाषा फारशी अपरिचित नसे. या वैशिष्ट्यामुळे सूफींनीं याच भाषामाध्यमाचा उपयोग आपल्या संप्रदायाच्या प्रसारार्थ केला. संत नामदेवांचा संचार उत्तर भारतात झालेला होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने आणि साहित्याने उत्तर भारतात कित्येक सिद्ध-संतांना प्रेरणा मिळालेली आहे हे साहित्यांतर्गत पुराव्यावरून स्पष्ट होते.राजस्थानात नामदेवांच्या साहित्याचा प्रसार इ.स. १५५० पासून होत असल्याचे पुरावे मिळतात. अनंतदास या राजस्थानी कवीने इ.स. १५८८ मध्ये संत नामदेवाची 'परचाई' (चरित्र कथा) रचली, ही एकच बाब नामदेवांच्या तथाकथित 'हिंदी' साहित्याच्या महाराष्ट्राबाहेरील प्रसाराची निदर्शक आहे. [१८] दुसरी परिचित साक्ष गुरु ग्रंथसाहेबाची. या ग्रंथात नामदेवांची कित्येक पदे संगृहीत करण्यात आलेली आहेत.

दखनी भाषेच्या उगमाचा शोध अशा रीतीने नामदेवांच्या काळापूर्वी घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे हे या आधारावरून निष्पन्न होते. या भाषेचे मराठी वळण लक्षात घेता महाराष्ट्रातील सांस्कृतिक घडामोडींच्या आधारानेच दखनी भाषेच्या उगम – स्थानाचा माग काढणे अपरिहार्य ठरते. हिंदी भक्तिसाहित्याचा उगम महाराष्ट्रात झाल्याचे संशोधकांनी मान्य केलेले असल्यामुळेही आपल्या शोधाचे क्षेत्र महाराष्ट्रापुरते मर्यादित ठेवावे लागते. [१९] स्वाभाविकच 'दखनी भाषा म्हणजे दाक्षिणात्य हिंदी' हे मत निर्मूळ ठरते. 'कदीम उर्दू' हा सिद्धांत दखनीच्या बाबतीत असाच निराधार ठरतो.

पूर्वपरंपरेव्यतिरिक्त ध्वनिव्यवस्था हे देखील या संबंधात महत्त्वाचे कारण आहे. हिंदी आणि उर्दू या दोन्ही भाषांची ध्वनिव्यवस्था दखनी भाषेच्या ध्वनिव्यवस्थेहून भिन्न आहे. दखनी भाषेची ध्वनिव्यवस्था मराठी भाषेच्या ध्वनिव्यवस्थेस अधिक जवळची आहे. भिन्न ध्वनिव्यवस्था असलेल्या भाषेवर कोणत्याही अन्य भाषेला आपली पूर्ववर्ती भाषा या नात्याने हक्क सांगता येत नाही. दखनी भाषेच्या वैशिष्ट्यपूर्ण ध्वनिव्यवस्थेमुळे आणि या भाषेत आढळणारे मराठी वळणाचे शब्द ध्यानात घेऊन दखनी भाषेचे उगमस्थान महाराष्ट्रातील भाषा आणि संस्कृती यांच्या परिसरातच शोधणे क्रमप्राप्त ठरते.

ध्वनिव्यवस्थेइतकेच क्रियावाचक शब्द कोणत्याही भाषेचे कुलगोत्र निर्धारित करण्याच्या बाबतीत निर्णायक ठरतात. कोणतीही भाषा परभाषेतील शब्द उसनवारीने घेत असली तरी क्रियावाचक शब्दांच्या बाबतीत उसनवारी सहसा होत नसते. दखनी भाषेतील क्रियावाचक शब्द खडी बोलीशी साधर्म्य दर्शविणारे नाहीत.[२०] दखनी क्रियापदांचे नाते एका बाजूने मराठी क्रियापदांशी आहे तर दुसऱ्या अंगाने गोरखवाणीत येणाऱ्या रूपांशी आहे.

क्रियावाचक शब्दांप्रमाणे दुसराही एक विशेष या संदर्भात ध्यानात ठेवावा लागतो. मराठी शिलालेखात आणि यादवकालीन मराठी साहित्यात रूढ असलेले कितीतरी शब्द फारसी लिपीतील दखनी साहित्यात आणि बोलीत प्रचलित आहेत.क्रियापदांप्रमाणेच विभक्तिदर्शक मराठी प्रत्ययांचाही वापर दखनी साहित्याने व बोलीने मोकळेपणाने केलेला आहे. (परिशिष्ट १ मध्ये त्याची उदाहरणे दिली आहेत.)

या सर्व सामग्रीचा विचार केला असता दखनी भाषेचा परामर्श महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वातावरणाच्या अनुषंगाने आणि तेराव्या शतकातील मराठी साहित्याच्या अनुषंगाने घ्यावा लागतो. या दिशेने केलेल्या अध्ययनातून दखनी भाषेची उत्पत्ती, उत्पत्तिकाळ आणि विकास यांचा मागोवा योग्य प्रकारे घेता येतो; आणि या वाटचालीतूनच दखनी भाषा मऱ्हाटी संस्कृतीचे अपत्य आहे हा निष्कर्ष प्रस्थापित होतो.

अनुक्रमणिका

ही पार्श्वभूमी ध्यानात घेऊनच पुढील पंधरा प्रकरणांतून विषयाची मांडणी करण्यात आलेली आहे. सुरुवातीस दखनी भाषेची उत्पत्ती आणि विकास यांचे विवेचन करण्यात आले असून त्यानंतर दखनीची भाषिक – व्याकरणिक – मीमांसा देण्यात आलेली आहे. दखनी साहित्यात आणि बोलीत प्रचलित असलेल्या मराठी वळणाच्या शब्दांचा आणि वाक्प्रचारांचा कोश शेवटी देण्यात आला आहे. हा कोश केवळ प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे.

भाषेचा उद्भव आणि विकास शोधण्याच्या दृष्टीने भाषा–विज्ञानाने काही पद्धती घालून दिलेल्या आहेत. या पद्धतींनुसार एखाद्या भाषेच्या उत्पत्ती–विकासाचा मागोवा शास्त्रीय पद्धतीने सहजगत्या घेता येतो. परंतु दखनी भाषेचे विलक्षण स्वरूप समजून घेण्यासाठी रूढ असलेली पद्धती अपर्याप्त वाटल्यावरून सांस्कृतिक घडामोडींच्या संदर्भात दखनी भाषेच्या स्वरूपाचा शोध घेणे अपरिहार्य ठरले. या दिशेने झालेला हा पहिलाच अभ्यास असल्याने त्याला मर्यादा पडलेली आहे. पुढच्या पिढीतील विद्वान या दिशेने अधिक प्रयत्न करतील अशी अपेक्षा आहे. पुढच्या पिढीत या विषयाच्या संशोधनास अधिक चालना मिळाली तर लेखकास आपल्या परिश्रमाचे सार्थक झाल्याचा आनंद होईल.

अनुक्रमणिका

संदर्भ

१. डॉ.उदय नारायण तिवारी यांनी आपल्या 'हिंदी भाषा: उद्भव और विकास' या ग्रंथात (पृष्ठ. १८५,१८६,१९८) HOBSON JOHONSON यांचे हे मत नोंदविले आहे.

२. '१६ वी १७ वी शताब्दी प्रारंभिक दखनी कविता कि भाषा देखते हुए यह बात स्पष्ट प्रतीत होती है कि १३ वी १६ वी शती तक दक्कन में आकर बसनेवाले उत्तर भारतीय मुसलमान अधिकांश पंजाब, बांगरू प्रदेश तथा जानपद हिंदूस्थानी के क्षेत्र के थे। जो भी हो दक्षिण में प्रतिष्ठित हुई उत्तर भारतीय जानपद भाषा पंजाब एवं उत्तर प्रदेश से होने के कारण यदि बिलकुल हिंदुस्थानी नहीं तो उसकी सहोदरा भाषा अवश्य थी।'- भारतीय आर्यभाषा और हिंदी पृ. २११

३. 'ब्रज भाषा के स्थानपर साहित्य के लिये हिंदी या हिदुस्थानी के प्रयोग का आदर्श उत्तरी भारत के समक्ष सर्व प्रथम दक्कनवालों ने ही रखा' – भारतीय आर्य भाषा और हिन्दी, पृ. २११

४. उत्तरेतील सूफी संतांनी प्रामुख्याने अवधीतून रचलेल्या ग्रंथाचा काळ : 'मृगावत्'- १५०१; मंझनकृत 'मधुमालती' व ज्यायसीचे 'पदुमावत' व 'अखरावट' हे ग्रंथ १५२०-४० या काळातले; उस्मानरचीत 'चित्रावलि' – १६१३; शेख नबीकृत 'ज्ञानदीप'- १६१९; शह बरकतुल्लाकृत 'प्रेमप्रकाश' – १६८८.

५. 'जिस भाषा को मुसलमान सुफियोंने धर्मप्रसार का साधन बनाया और जिसे मुस्लिम साहित्यकारोंने अपने सृजन की भाषा माना वह इस देश में पहिलेसे मौजूद थी। उसे मुसलमान कहीं बाहरसे नही लाए। जिस समय उन्होंने इसे अपनाया उस समय भी इस में प्रचुर कथा साहित्य और गीतिकाव्य मौजूद रहा होगा जो आज मिलता नही, क्योंकी वह लिखा नही गया, पर परंपरासे जानपदी लोकभाषा में चला आ रहा है। मुस्लीम संतोंने और साहित्यकारोंने इस भाषा को इतना सहारा अवश्य दिया कि उसे अपने प्रचार का साधन बनाया' – बाबूराम सक्सेना, दक्खिनी हिन्दी, पृ. ३०

६. सुनीतिकुमार चटर्जी, 'भारतीय आर्यभाषा और हिन्दी', पृ. २०३. बाबूराम सक्सेना, 'दक्खिनी हिन्दी', पृ.३२

७. 'इसकी (अमीर खुसरो) जो कविता मिलती है उसकी भाषा विश्वसनीय नहीं है। तब भी इतना कह सकते है कि हिन्दी बोलचाल की भाषा भी जिसमें खडी के साथ ब्रज का भी पुट था'- दक्खिनी हिन्दी, पृ. ३०

८. 'नागरी हिन्दी या खडी बोली हिन्दी के इतिहास का आरंभ गद्य साहित्य से लेकर (१९ वी शताब्दी के आरंभ में कलकत्ता के अंग्रेजो के छत्रछाया में) उर्दू के साथ साथ हुआ। आरंभ में जिस खडी बोली का उपयोग पद्य के लिए किया गया वह शुद्ध न थी। उसमें स्थानीय बोली का पुट था।' – भारतीय आर्यभाषा और हिन्दी, पृ. १७७; '१९ वी सदी के पूर्व इसे (खडी बोली को) कोई नहीं जानता था'- भोलानाथ तिवारी, हिन्दी भाषा, पृ.२१४

९. हिन्दी साहित्य का इतिहास, पृ. ४०७

अनुक्रमणिका

१०.	भारतीय आर्य भाषा और हिन्दी, पृ.१७३; हिन्दी भाषा, पृ. २२८

११.	रांगेय राघव, गोरखनाथ और उनका युग, पृ.२९

१२.	‘इस प्रकार भारतीय संस्कृती की कडी जो टूटी हुई दिखाई देती है गोरखनाथ उसे जोड देते हैं । गोरखनाथ में तत्कालीन आर्य सामाजिक व्यवस्था के बाहर के समस्त प्रधान संप्रदायों का सारभूत होकर आर्य सामाजिक व्यवस्था के भीतर रहनेवालों के सान्निध्य का, समीप आने का प्रयत्न स्पष्ट दिखाई देता है’- गोरखनाथ और उनका युग, पृ. १५५

१३.	आचार्य रामचंद्र शुक्ल, ‘हिन्दी साहित्य का इतिहास’, पृ. १८
रांगेय राघव, ‘गोरखनाथ और उनका युग’, पृ. २०४

१४.	हजारीप्रसाद द्विवेदी, हिन्दी साहित्य, (द्वितीय खंड), पृ. ८७.

१५.	तुळपुळे संपादित लीळाचरित्र, एकांक, लीळा ४७; पूर्वार्ध (भाग १) लीळा ५६, ५८, १७६, पूर्वार्ध (भाग २) लीळा २९३, ३४६, ३९५.

१६.	विनय मोहन शर्मा, हिंदी को मराठी संतों की देन, भूमिका.

१७.	‘इस प्रकार हम कह सकते है कि भक्तिकाल के आरंभ में ही संत मत की प्रतिष्ठा हो चुकी थी । इस का साहित्यिक रूप पंढरपूर, महाराष्ट्र मे प्रतिष्ठित हुआ । - रामरतन भटनागर, हिन्दी भक्तिकाव्य, पृ. ७६; पाहा: विनय मोहन शर्मा; हिंदी को मराठी संतों की देन, पृ. ७६ Wuiriand Calliwareat, Hindi padavali of Namdev

१८.	Wuiriand Calliwareat, Hindi padavali of Namdev, P. ५, ८४.

१९.	’इस दृष्टी से साहित्य का इतिहास यदि देखा जाय तो यह कहा जा सकता है कि संत साहित्य का प्रारंभ तेरहवी शताब्दी में हो चुका था । इस पूर्वपक्ष में यह महाराष्ट्र में विठ्ठल संप्रदाय के रूप में रहा और पंधरवी शताब्दी में प्रचलित होनेवाले उत्तर पक्ष में वह उत्तर भारत में निर्गुण संप्रदाय का रूप बन गया ।’- डॉ. रामकुमार वर्मा, हिंदी साहित्य (द्वितीय खंड) पृ.१९२

२०.	दक्खिनी हिन्दी बापूराम सक्सेना, पृ. ५६

२. दखनी भाषा आणि साहित्य

अनेक कोडी निर्माण करणारी भाषा

महाराष्ट्राच्या परिसरात आणि लगतच्या तेलुगू आणि कन्नड भाषांच्या प्रांतात प्रचलित असलेली दखनी ही भाषिकदृष्ट्या अल्पसंख्याकांची बोली आहे. भाषा – विज्ञानाच्या दृष्टीने कोड्यात टाकणारी अनेक अंगे या बोलीत आढळतात. विशेष म्हणजे कन्नड आणि तेलुगू या भाषांच्या प्रांतात नांदत असूनही या बोलीचे मराठी वळण आश्चर्यकारक वाटते. महाराष्ट्रात एखाद्या परभाषेला मराठी गंध लाभणे आश्चर्यकारक नसते. पण मराठी भाषेच्या प्रदेशाबाहेर प्रचलित असलेल्या एखाद्या बोलीवर परभाषेच्या क्षेत्रात मराठी भाषेचे संस्कार दिसून यावेत हा केवळ कुतूहलाचा विषय राहात नसून अशा बोलीचे अधिक संशोधन व्हावे याची निकड त्या योगे निर्माण होते.

या बोलीच्या बाबतीत आणखीही एक कोडे पडते. साहित्यात प्रतिष्ठा पावण्यापूर्वी कोणतीही भाषा बोलीच्या रुपात अस्तित्वात असते. बोली साहित्यात परिणत झाल्यानंतर शिष्टांची साहित्यातली भाषा आणि लोकांची व्यवहारातली बोली एकाच वेळी समांतर वावरत असतात. दखनी भाषेच्या बाबतीतही हा स्वाभाविक विकास पंधराव्या शतकाच्या आसपास घडला. सुमारे दोनशे- अडीचशे वर्षे श्रेष्ठ प्रतीचे साहित्यही या भाषेत निर्माण झाले. परंतु अठराव्या शतकाच्या प्रारंभकाळापासून मात्र या भाषेत साहित्य निर्माण झाल्याची नोंद नाही. असे सहसा कोणत्याही भाषेच्या बाबत घडत नाही. दखनी ही भाषा आज बोलीच्या रुपात अस्तित्वात असली तरी ती आता साहित्याची भाषा राहिलेली नाही. बोली, साहित्याची भाषा आणि पुन्हा बोली असे चढउतार या भाषेत आढळतात. भाषाविज्ञानाच्या दृष्टीने हाही एक अभ्यासाचा विषयच आहे.

दखनी बोली आणि साहित्य यावर मराठी भाषेचे गाढे संस्कार असूनही मराठी भाषेचे संशोधन करणाऱ्यांना ही बोली व हे साहित्य आकृष्ट करू शकले नाही. हिन्दी आणि उर्दू या दोन्ही भाषांच्या पंडितांनी आणि संशोधकांनी मात्र दखनी भाषेची दखल घेतली आहे. परंतु, काही चुकीची प्रमेये गृहीत धरून संशोधन झालेले असल्याने या भाषेच्या स्वरुपविशेषांचे कित्येक प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. मुख्य म्हणजे दखनीच्या मराठी वळणाचा हिन्दी- उर्दू भाषांच्या पंडितांनी गांभीर्याने विचारच केलेला नाही. दोन भाषा परस्परांच्या संपर्कात येतात तेव्हा उभयपक्षी शब्दांची देवाणघेवाण होत असते. तेलुगू, कानडी, फारसी आणि इंग्रजी या भाषांतील शब्द मराठीत प्रचलित आहेत. परभाषासंपर्काचा तो एक अपरिहार्य परिणाम असतो. परंतु, अशा उसनवारीमुळे मूळ भाषेच्या प्रकृतिधर्मात काही बदल घडत नसतो. दखनी- मराठीचे संबंध एवढे वरवरचे नाहीत. दखनी भाषेच्या मूळ प्रकृतीवरच मराठी भाषेचे संस्कार झालेले आढळून येतात. त्यामुळे दखनी भाषेच्या उत्पत्ति-विकासाचे मराठी भाषेशी असलेले नाते फार वेगळे ठरते.

या मूलभूत वैशिष्ट्याची दखल आजवरच्या संशोधनात घेण्यात आलेली नाही. त्यामुळे हिन्दी व उर्दू या दोन्ही भाषांतून झालेले दखनीविषयक संशोधन एकांगी आणि अपर्याप्त असल्याचे निदर्शनास येते. हिन्दी भाषेची दाक्षिणात्य बोली असल्याचे गृहीत धरून हिन्दी भाषेत ‘दक्खिनी हिन्दी ‘च्या रुपवैशिष्ट्यांचा विचार झालेला आहे तर उर्दू भाषेची एक प्राचीन अवस्था (कदीम उर्दू) कल्पून दखनीविषयक संशोधन उर्दू भाषेत झाले आहे. ही दोन्ही गृहीते इतिहासाशी विसंगत आहेत. हिन्दी आणि उर्दू या दोन्ही भाषांचा उदय होण्यापूर्वी किमान दोन शतके दखनी भाषेत संपन्न असे साहित्य अस्तित्वात होते. त्यामुळे दखनी भाषा हिन्दी भाषेचा प्रादेशिक भेद ठरत नाही. त्याच प्रमाणे ती उर्दू भाषेची प्राचीन अवस्था होऊ शकत नाही.

ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या तत्कालीन धोरणास अनुसरून उर्दू आणि हिन्दी या दोन्ही भाषा एकोणिसाव्या शतकात अस्तित्वात आल्या. हिन्दीच्या आसपासची खडी बोली हा या दोन्ही भाषांचा मूलाधार. फारसी लिपी ही उर्दूभाषेची लिपी आणि शब्दभांडारही अरबी – फारसी भाषेतले. भारतीय धार्मिक अल्पसंख्यांकांची धार्मिक व सांस्कृतिक अस्मिता अभिव्यक्त करण्याचे माध्यम या नात्याने या भाषेला व तिच्याद्वारे प्रसृत होणाऱ्या विचारसरणीस प्रारंभकाळात राज्यकर्त्यांचे बरेच मार्गदर्शन लाभले. या काळात उत्तर भारतात व्रज, अवधी, भोजपुरी, मैथिली इत्यादी अनेक प्रादेशिक भाषा अस्तित्वात होत्या, काही भाषांतून- उदाहरणार्थ व्रज आणि अवधी – संपन्न साहित्यही निर्माण झालेले होते. या साहित्याची परंपरा धार्मिक स्वरुपाची होती. यांपैकी कोणतीही एक भाषा न पुरस्कारिता हिन्दीच्या परिसरातील खडी बोली आणि नागरी लिपी यांच्या आधारावर हिन्दी भाषा राज्यकर्त्यांनी घडविली. आजच्या हिन्दी साहित्यास आधारभूत असलेली तीच ही हिन्दी. दखनी भाषेच्या उद्भव – विकास काळात ती अस्तित्वात नसल्यामुळे तिच्याशी दखनीचे नाते जोडता येत नाही. केवळ फारसी लिपीमुळे दखनी ही उर्दू भाषेची पूर्वावस्था ठरत नाही त्याचप्रमाणे खडी-बोलीचा तोंडवळा आहे, या कारणास्तव ती हिन्दी भाषेची प्रादेशिक बोली आहे असे मानता येत नाही.

दखनी भाषेची उत्पत्ती आणि स्वरूप यांच्या संबंधीचा हिन्दी –उर्दू भाषांतील पंडितांचा दृष्टीकोनच मुळात अनैतिहासिक असल्याकारणाने त्यांनी मांडलेले निष्कर्ष प्रमाण मानता येत नाहीत.

वस्तुत: मराठी भाषेचा दखनीच्या उत्पत्ती- विकासाशी असलेला संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. दखनी भाषेचा उद्भव ही महाराष्ट्रातल्या सांस्कृतिक जीवनातील एक अत्यंत लक्षणीय अशी घटना आहे. महाराष्ट्राच्या प्रकृतिधर्माचा आणि व्यापक राष्ट्रीय जाणिवेचा तो एक महत्त्वाचा आविष्कार आहे. या भाषेच्या उत्पत्ती – विकासाची दखल न घेता लिहिलेला महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास अपूर्णच ठरेल एवढे या भाषेचे महाराष्ट्राच्या इतिहासात मानाचे स्थान आहे. दखनी भाषेच्या अंगोपांगांवर मराठी भाषेने सावली धरली आहे असे अभ्यासांती निदर्शनास येईल. त्यामुळे या भाषेची उत्पत्ती आणि विकास यांचा उलगडा भाषाविज्ञानाने प्रस्थापित केलेल्या काही गमकांच्या आधाराने पूर्णपणे होऊ शकणार नाही. दखनी भाषेच्या उत्पत्तीचा शोध महाराष्ट्रातील सांस्कृतिक घडामोडी व इतिहास यांच्या पार्श्वभूमीवरच यथार्थपणे घेता येईल.

हा शोध सुरू करण्यापूर्वी दखनी भाषा आणि साहित्य यांचा परिचय करून घेणे उपकारक ठरेल.

भाषा-नाम 'दखनी'

आज 'दखनी' या नावाने संबोधण्यात येणारी भाषा तिच्या उदयकाळापासून दखनी याच नावाने ओळखली जात होती असे नव्हे. फारसी लिपीतील दखनी साहित्यात 'हिन्दी', 'हिन्दुई' आणि 'दखनी' अशा तीन नावांचा उल्लेख आढळतो. आधुनिक युगात हिन्दी साहित्यिक 'दक्खिनी हिन्दी' असा या भाषेचा उल्लेख करतात तर उर्दू साहित्यात 'दखनी' या नावाने या भाषेचा संदर्भ देण्यात येत असतो. 'कदीम उर्दू' या नावानेही उर्दू भाषेचे पंडित या भाषेचा निर्देश करीत असतात. ही मतांतरे लक्षात घेऊन प्रथम भाषा-नाम निश्चित केले पाहिजे.

अश्रफ बियाबानी (१५९४) व इतर काही ग्रंथकारांनी आपली भाषा 'हिन्दुई' असल्याचे सांगितले आहे. शाह मीरांजी (१५६३) बुऱ्हानुद्दीन जानम (१५९९), काजी महमद बुहरी (१७०२) या लेखकांना ही भाषा हिन्दी आहे असे वाटते.बहाउद्दीन बाजम् (१५९७) आणि अब्दुल (१६०४) यांनी हिन्दी आणि हिन्दुई या दोन्ही

नावांचा उल्लेख केला आहे. आज प्रचलित असलेल्या हिन्दी भाषेशी या लेखनातील हिन्दीचा सुतराम संबंध नाही हे अगोदर स्पष्ट करण्यात आले आहे. कारण, आजची हिन्दीच मुळात १९ व्या शतकात जन्मास आली.[१] त्यामुळे या ग्रंथकारांनी उल्लेखलेली हिन्दी वा हिन्दुई भाषा नक्की कोणती याचा शोध घेतला पाहिजे.

आज हिन्दीभाषी प्रदेश या नावाने ओळखल्या जाणाऱ्या उत्तर भारतातील प्रादेशिक बोलींचाही 'हिन्दी' या नावात समावेश केला तरी या प्रादेशिक बोलीत साहित्य-निर्मिती झाली ती पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात. त्यावेळी दखनी साहित्याचा उदय होऊन अर्ध्या शतकाचा कालावधी उलटलेला होता. त्यामुळे दखनी ग्रंथकारांनी उल्लेखलेली हिन्दी वा हिंदुई ही भाषा उत्तर भारतात प्रचलित असलेल्या भाषा/बोली यापैंकी नव्हती हे स्पष्टच आहे. म्हणूनच हिन्दी –हिंदवीचा शोध अन्यत्र करावा लागतो. दखनी साहित्यातील प्रारंभीचे ग्रंथकार परधर्मीच होते, ते परराष्ट्रातून आलेले होते. तसेच ते परभाषा बोलणारे होते. भारतातील प्रचलित असलेली कोणतीही भाषा त्यांची मातृभाषा नव्हती. सूफी पंथाचा प्रसार त्यांना या देशातल्या दक्षिण भारतातील समाजात करावयाचा होता. या हेतू साध्य करण्यासाठी भारतात प्रचलित असलेल्या एखाद्या भाषेची प्रसार- माध्यम या नात्याने निवड करणे त्यांना आवश्यक वाटले. जी भाषा त्यांनी निवडली ती भारतीय भाषा होती. त्यांच्या दृष्टीने ती हिंदवी (हिंदुस्थानची) भाषा होती. म्हणूनच या भाषेचा उल्लेख सूफींनी 'हिंदवी' व 'हिन्दी' असा केला आहे. 'हिंदवी-स्वराज्य' (भारतीयांचे राज्य) या नावाने शिवछत्रपतींचे स्वराज्य ओळखले जातच होते. 'हिन्दुई'चा संकेत हिंदू धर्मीयांच्या भाषेकडे असण्याचाही संभव आहे. सध्या प्रचलित असलेल्या हिंदी भाषेचा उल्लेख सूफी संतांनी केला आहे, असे मात्र कोणत्याही परिस्थितीत गृहीत धरता येत नाही.

हे केवळ अनुमान नाही. साहित्येतिहासात त्याला आधारही सापडतो. 'कुतुब शतक' या नावाचा एक पुरातन ग्रंथ, त्यावरील एका प्राचीन टीकेसह डॉ. माताप्रसाद गुप्त यांनी संपादित केला आहे. या ग्रंथाची मूळ संहिता १५ व्या शतकातली असून टीका (वार्तिक) १६ व्या शतकातली आहे असे संपादकांचे मत आहे. मूळ संहितेत भाषेसंबंधी काही उल्लेख आले आहेत. त्यांचे स्पष्टीकरण टीकेत आढळते. तुर्की व फारसी खेरीज अन्य भाषांना ग्रंथकार 'हिन्दूही', 'ह्यन्दूई', 'ह्यंदगी' या नावांनी संबोधतो. हे सर्व संदर्भ हिंदूंची भाषा या अर्थाने आले आहेत. उदाहरणार्थ –

१. *बाबी बिवानाँ की फारसी। हिन्दुही। चारोंही*
हकीकती। तारीफ वेद की कुरांन की ॥ - कुश, २०३

२. *बडा भाई ह्यंदु, छोटा भाई मुसलमान।*
ह्यंदुही मों पंडित नाम राख्यो। सोही मन मूल।
तब पंडिती आपण सारन देष्या। -कुश, २०४

३. *ह्यंदुगी, तुरकी, कुरांन भी हाजिर हुए।*
अवलि पुरानवाला बोल्या। - कुश, २०५

कुतुबशतक' ही सूफी पद्धतीची प्रेमकथा आहे. दीर्घकाळ विरहव्यथेचा अनुभव घेतल्यानंतर नायक राजकुमाराचे नायिका राजकन्येशी लग्न होते. राजकन्येचे वर्णन करताना वार्तिककार म्हणतो, " राजकन्या केवळ सुंदर नव्हती तर ती सुसंस्कृतही होती. तिला फारसी भाषेचे ज्ञान होतेच शिवाय 'हिंदूही'चे (म्हणजे

भारतीय भाषांचेही) ज्ञान होते. इतकेच नव्हे तर चार वेद आणि कुराण यांचे सत्यस्वरूप तिच्या अंतःकरणात होते. तिने ते जाणले होते." (पृ. २०३).

या स्थळी फारसी भाषेचे ज्ञान होतेच शिवाय 'हिंदुही'चा उल्लेख आल्याने या शब्दाचा अर्थ 'भारतीय भाषा' असा घ्यावा लागतो.

कथेतील या दांपत्यास पुत्र होतो तेव्हा त्याच्या नामकरणाचा विषय निघतो. दरबारात शास्त्री-पंडित आणि मुल्ला – मौलवी यांच्या समवेत बादशहा चर्चा करतो. पंडित बादशहालाच विचारतात 'तुमचे मूळ नाव कोणते व कोणी ठेवले?' बादशहा सांगतो 'आमचा मोठा भाऊ ह्यंदु (हिंदू). धाकटा मुसलमान. आमचे मूळ नाव हिन्दूई (भाषेत) पंडित ठेवण्यात आले. (हे मूळ नाव अद्याप चालू आहे)" (पृ. २०४)

नंतरचा प्रसंग आहे "अन्नप्राशनाचा.' या समारंभास 'ह्यंदूगी', तुर्की आणि कुराण (कुराणाचे उपासक) उपस्थित होते. त्यावेळी पुराणिकाने (पुराणवाला) सांगितले, 'बादशहा, शुभ घडी आली आहे. आता अन्न प्राशन करावे." (पृ. २०५)

वरील पहिल्या उताऱ्यात (पृ. २०४)'हिन्दुई' या शब्दाला भारतीय भाषा असा अर्थ आहे. किंवा हिंदू संस्कृतीप्रमाणे पंडित हे नाव ठेवले असा अर्थ घ्यावा लागतो. दुसऱ्या उताऱ्यात (पृ. २०५) 'ह्यंदूगी'या शब्दाचा अर्थ हिंदू पंडित असा घ्यावा लागतो.

सोळाव्या शतकाच्या आसपास 'हिन्दी' व 'हिंदुई'हे शब्द हिंदू धर्मीयांची भाषा अथवा अरबी, फारसी, तुर्की या भाषांहून भिन्न असलेली भाषा या अर्थाने प्रचलित होते, असा अर्थ वरील संदर्भातून निघतो.

सध्या हिन्दी या नावाने प्रचलित असलेली भाषा त्या काळात अस्तित्वात नसल्याने वर्तमान हिंदी भाषा सूफी ग्रंथकारांना अभिप्रेत नव्हती हे अधिक स्पष्ट करण्याची गरज नसावी. शिवरायांनी स्थापन केलेल्या राज्याला 'हिंदवी' हे विशेषण लागले ते याचमुळे. शिवकाळात असलेल्या राजवटी भारताबाहेरून आलेल्या घराण्यांनी स्थापन केलेल्या होत्या. (मोगल, आदिलशहा, कुतुबशहा). त्यामुळेच एका भारतीयाने स्थापन केलेल्या राज्यास 'हिंदवी' (भारतीय) ही संज्ञा मिळाली.

दक्षिण भारतात सूफी संप्रदायाचा प्रसार करणाऱ्या संतांच्या पहिल्या काही पिढ्या तरी भारताबाहेरून आलेल्या होत्या. अरबस्तान, इराण, तुर्कस्तान हे या संतांचे मूळ देश. भारतात पंथाचा प्रसार करावयाचा असेल तर तो या देशातील भाषांतून झाला पाहिजे अशी भूमिका यांपैकी कित्येक संतांनी घेतली. त्यासाठी या देशाच्या भाषेतून संप्रदायाची विचारसरणी प्रतिपादणाऱ्या ग्रंथांची निर्मिती आवश्यक होती. उत्तर भारतात सूफींनी तत्कालीन साहित्यात प्रतिष्ठित झालेल्या अवधी भाषेची निवड केली आणि तत्पूर्वी दाक्षिणात्य समाजासाठी करावयाच्या ग्रंथनिर्मितीसाठी त्यांनी दखनी भाषेचा प्रयोग केला. या दोन्ही भाषा भारतीय होत्या, तशाच त्या हिंदुधर्मीयांत प्रचलित होत्या. या दोन्ही कारणांमुळे 'हिंदी' वा 'हिन्दुई' असा भाषानामाचा उल्लेख सूफी ग्रंथांतून आढळतो. म्हणूनच वर्तमान हिंदी भाषा सूफी ग्रंथकारांना अभिप्रेत असेल असे समजण्याचे कारण नाही.

कित्येक साहित्यकारांनी 'दखनी', 'दकनी' हे भाषानामही वापरले आहे. दकनी भाषानामाचा प्राचीनतम उल्लेख आढळतो तो कुरेशी या कवीच्या 'भोगबळ' (१४८२-१५२४) या ग्रंथात. फिरोज (पीरीतनामा-१५६४), गवासी (१५८०-१६२४) या ग्रंथकारांनी आपली ग्रंथभाषा 'दकनी' असल्याचे नमूद केले आहे. 'किस्सेबेनजीर' (१६२७), 'सबरस' (१६३६), 'लैला मजनू' (१६३६), रीज्वानशाह – 'रुहेअफजा' (१६८४) या ग्रंथांतही दखनी भाषेत ग्रंथलेखन झाल्याची नोंद आहे. दखनी साहित्याच्या अगदी शेवटच्या कालखंडात होऊन गेलेले वली औरंगाबादी (मृत्यू १७०४) आणि तामिळनाडूतील संत शाहतुराब (१६९५-१७८७) यांनीही आपण दखनी भाषेत ग्रंथरचना करीत आहोत असे स्पष्टपणे सांगितले आहे. [२] सोळाव्या-सतराव्या शतकात दखनी हेच भाषानाम रूढ होते असे जयराम पिंडे याने रचलेल्या 'राधामाधवविलास' या चंपूग्रंथाच्या आधाराने म्हणता येते. या कवीने स्वतःस अवगत असलेल्या बारा भाषांची नावे दिली आहेत. यात यावनी (फारसी) आणि दाक्षिणात्य यावनी (दखनी)अशा दोन भाषांचा निर्देश आहे. [३] दखनी भाषेतले एक पद्यही त्याने ग्रंथात दिले आहे. [४] हा कवी बंगळूरच्या शहाजी महाराजांच्या दरबारात होता.

हे सर्व आधार लक्षात घेता या ग्रंथात 'दखनी' हेच भाषानाम सर्वत्र योजले आहे.

प्रादेशिक अस्मितेचे प्रतिक

दखनी हे भाषानाम समर्पक ठरविण्यास आणखीही एक कारण सापडते. ते साहित्यांतर्गत नसून दक्षिण भारताच्या राजघराण्यातल्या एका दीर्घकालीन अंत:प्रवाहाशी संलग्न आहे. त्यासाठी बहामनीकालीन इतिहासाचा थोडा मागोवा घेतला पाहिजे.

अल्लाउद्दिन खिलजीच्या दक्षिणेतील स्वाऱ्यांनंतर तुघलक घराणे उत्तरेत अधिकारावर आले. महमूद तुघलक राज्यावर असताना दक्षिण आणि उत्तर या दोन्ही भागांवर समर्थपणे राज्य करता यावे यासाठी त्याने आपली राजधानी उत्तरेतून दक्षिणेत दौलताबाद तेथे हालविली. तरीही स्वतःच्या बंडखोर सरदारांचा बंदोबस्त त्याला करता आला नाही. तो उत्तरेत बंडखोरांच्या मोहिमेवर असतानाच दक्षिणेतल्या मुसलमान सरदारांनी बंड केले. त्यातूनच १३४७ मध्य बहामनी राजवट उदयास आली.

सत्ता आणि सत्ताधीश या दोहोंनाही आपल्या मुठीत ठेवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या सरदारांचा वेढा या राजवटीस प्रारंभापासूनच पडलेला होता. हे महत्त्वाकांक्षी सरदार नव्यानेच भारतात आलेले होते. व्यापार व शिपाईगिरी हे त्यांचे व्यवसाय असले तरी दरबारात त्यांनी चांगला जम बसविलेला होता. त्यांनी स्वत:भोवती एक वलयही प्रयत्नपूर्वक निर्माण केले होते. इस्लामी मुलखातून नव्याने आलेले असल्याने शुद्ध स्वरूपातला इस्लाम हा आपणच जाणतो आणि आचरतो अशी त्यांची बढाई होती. इतर बाटलेल्या व दक्षिणेत स्थायी झालेल्या मुसलमानांना ते कमी प्रतीचे (धार्मिकदृष्ट्या) मानत. धर्मवेडे राज्यकर्ते या वलयामुळे व नवागतांच्या आक्रमक वृत्तीमुळे दिपून जात.त्यामुळे सत्तेच्या व मानाच्या जागा बिगर-दखनी मुसलमानांना सहजगत्या मिळत.या भूमीशी कोणत्याही प्रकारचे सोयरसुतक नसलेल्या व सामाजिक प्रतिष्ठा देखील बेताचीच असलेल्या या सरदारांना मानमान्यता मिळावी याचे वैषम्य दखनी सरदारांना वाटे, त्यामुळे दखनी व बिगर दखनी असे दोन गट दरबारात नेहमीच असत. प्रत्येक गट दुसऱ्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करी. परंतु खुद्द राजा बिगर दखनी सरदारांच्या आधीन असल्याने दखनी सरादारांची नेहमीच पीछेहाट होई.

अनुक्रमणिका

अशा रीतीने दखनी — बिगर दखनी तेढ धुमसत असतानाच एका फर्मानाने हा असंतोष उसळून आला. १४८२ साली असे फर्मान निघाले की, दरबारात राजाच्या उजव्या बाजूस बसण्याचा मान बिगर दखनी सरदारांचा असेल. दखनी सरदारांनी संघटित होऊन या अवमानाचा सूड उगविण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात दखनी सरदार अपयशी ठरले. परंतु, या हिंसक उठावाने बहामनी राजवटीची शकले उडाली.

बहामनी राजवटीतून फुटून निघून स्वतःचा सवतासुभा स्थापन करणाऱ्या राज्यांनाही दखनी- बिगर दखनी हा वारसा मिळालेलाच होता. १६७७ साली हैदराबादेहून लिहिलेल्या एका पत्रात स्वतः शिवाजी महाराजांनी विजापूरची आदिलशाही बाहेरून आलेल्या लोकांनी आपल्या मुठीत कशी ठेवली आहे याचे समर्पक चित्र रेखाटले आहे. 'दखनची पातशाही आम्हा दक्षिणियांच्या हाती राहे.' या हेतूने आदिलशाहीच्या विरोधात भागानगरच्या कुतुबशाहाशी आपण बरोबरीच्या नात्याने मैत्रीचा करार केला आहे. असे या पत्रात नमूद करून, 'परकीयांच्या ताब्यात असलेल्या आदिलशाहाची ताबेदारी सोडून विजापूरच्या सरदारांनी कुतुबशाहास मिळावे.' असे आवाहनही या पत्रात आहे. महाराजांचे हे पत्र विजापूरचे मालोजीराजे घोरपडे यांना लिहिलेले आहे. विजापुरात 'पठाण बळावलेला असल्याने तो आम्हा दक्षिणियांना बुडवील' असा इषाराही या पत्रात आहे.

राजकारणातल्या या दक्षिणात्य निष्ठेला पुढे प्रादेशिक अस्मितेचे रूप लाभलेले दिसते. दखनी ही या अस्मितेची भाषा बनली. आदिलशाही व कुतुबशाही राजवटीत दखनी साहित्याने सुवर्णयुगाचा अनुभव घेतला हा केवळ योगायोग म्हणता येणार नाही. या दोन्ही घराण्यांतील राजपुरुषांनी या भाषेत ग्रंथरचना करून दखनी भाषेला प्रतिष्ठा व राजाश्रय दिला आहे. उलट कुतुबशाहीचा उत्तराधिकारी बलेला निजाम तुर्की असल्याकारणाने त्याच्या प्रदीर्घ राजवटीत दखनी भाषेला राजाश्रय कधीच मिळाला नाही. या इतिहासावरून दखनी हे नाम समर्पक का ठरते याचा उलगडा व्हावा.

बोलीचे क्षेत्र

आज केवळ बोलीच्याच स्वरुपात नांदत असलेली दखनी महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि आंध्रप्रदेश या प्रांतांच्या ग्रामीण भागातील अल्पसंख्याकांची बोली आहे. महाराष्ट्रात धर्माने मुसलमान नसलेले व कधीकाळी उत्तर भारतातून आलेले अन्य धर्मीयही हीच बोली बोलतात. एकेकाळी 'परदेसी' या नावाने संबोधली जाणारी जमात हीच बोली महाराष्ट्रात बोलत असे.लष्करातले बाजार- बुणगे व घोड्यांची देखभाल करणारे सईस हीच बोली बोलत असत. कालपरत्वे अनेक जमातींचे व्यवसाय बदलले आहेत. शिक्षणाचा प्रभावही समाजाच्या विविध थरावर जाणवतो आहे. त्यामुळे या जमाती घराबाहेर मराठी बोलत असल्या तरी घराच्या चौदिवारीत जुन्या पिढीने दखनी बोली टिकवून धरली आहे. या समाजातली नवी पिढी मात्र हिंदी व मराठी या भाषांचा उपयोग लोकव्यवहारात करते. त्यामुळे महाराष्ट्रात दखनी बोली किती काळ तग धरू शकेल हा प्रश्नच आहे.

महाराष्ट्राबाहेर कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू व केरळ या प्रांतातील काही भातांत मुसलमानांची बोली या नात्याने दखनी प्रचलित आहे. प्रादेशिक बोलींतील शब्द आणि उच्चार-पद्धती यांची संस्कार या प्रांतांतील दखनी बोलीवर झालेले आहेत. तथापि, बोलीचा मूळ पिंड दखनी साहित्याशी नाते सांगणारा आहे, या भागातल्या बोलीस मात्र नव्या- जुन्या पिढ्यांचा सारखाच आधार आहे. 'च', 'नको', 'लई', 'बेगी' यांसारखे मराठी शब्द सर्वच प्रांतांतील दखनी बोलीत आढळतील. दखनी साहित्यात तर ते प्रचलित होतेच.

या व्यतिरिक्तही दखनी साहित्यावर वारसाहक्क सांगू शकतील असे कितीतरी विशेष, विभिन्न भाषिक प्रांतांतील दखनी बोलीत आजही आढळून येतात.

अभ्यासाची साधने

प्रकाशित दखनी साहित्य, मराठी संतांची हिंदी म्हणून ओळखली जाणारी पण वस्तुतः दखनी भाषेत असलेली कविता आणि निरनिराळ्या भागांत प्रचलित असलेली दखनी बोली या तीन साधनांवर प्रस्तुत अभ्यास आधारलेला आहे.

बोलीची साधने गोळा करीत असताना असे दिसून आले की, विजापूर आणि हैदराबाद या नगरांच्या आसपास दखनी बोली आजही जवळपास शुद्ध स्वरूपात प्रचलित आहे. औरंगाबाद हे एकेकाळी दखनी साहित्याच्या निर्मितीचे एक केंद्र होते. या भाषेचे शेवटचे कवी वली आणि सिराज याच भागातले. परंतु या नगरच्या परिसरात दखनी बोली फारशी प्रचलित नाही. मराठवाड्यात ग्रामीण भागात ती व्यवहारात असली तरी औरंगाबादचा परिसर बोलीच्या दृष्टीने उर्दू भाषेकडे अधिक झुकलेला दिसतो. याची कारणे ऐतिहासिक आहेत.

औरंगाबाद हे दीर्घकाळ मोगलांचे ठाणे होते. देशी भाषा या राजवटीने कधीच आपली मानली नाही. पुढे मोगलांचे सुभेदार असलेल्या निजामाच्या मुलखात हा भाग राहिला. निजामाचे घराणे तुर्कस्तानातून भारतात आलेले. देशी भाषासंबंधाचे निजामाने मोगलांचे धोरण पुढे चालविले. त्यामुळे मोगल आणि निजाम या दोन्ही राजवटीत दखनीस दरबारी प्रोत्साहन नव्हते. दखनी संबंधाने एक प्रकारचा तिरस्कारच या राज्यकर्त्यांना वाटत असे. फारसी भाषेला राज्यव्यवहारात महत्त्व असल्याने शिष्टांनीही राज्यकर्त्यांच्या पावलावर पाऊल टाकून दखनीकडे दुर्लक्ष केले. निजामाच्या सात पिढ्यांनी दक्षिणेच्या काही भागावर राज्य केले असले तरी या घराण्यास दखनी विषयी कधीच आत्मीयता वाटली नाही. फारसी भाषेचा वरचष्मा असलेल्या उर्दूचा पुरस्कार निजामाने अत्यंत हिरीरीने केला.

कोट्यावधी रुपये खर्चून निजामाने उर्दू भाषेचे माध्यम असलेले उस्मानिया विद्यापीठ स्थापन केले. परंतु फारसी लिपीत निबद्ध असलेल्या दखनी भाषेच्या संशोधन- प्रकाशनास सरकारी उत्तेजन कधीच मिळाले नाही. बहामनी राजवटीच्या काळापासून चालत आलेले दखनी –बिगरदखनी संघर्ष निजामाच्या राजवटीतही कायम होता. मुसलमानांनी या भूमिकेवरून निजामाच्या बिगरदखनी मुसलमानांची पाठराखणी करणाऱ्या धोरणाविरुद्ध आंदोलनही एकेकाळी केले होते. सरकारी नोकऱ्यांत बिगरदखनी मुसलमानांना प्राधान्य देण्यात येते, यावरून हा संघर्ष झाला होता. त्याचा परिणाम 'मुलकी' लोकांना सरकारी नोकरीत अग्रहक्क देण्यात झाला. परंतु, दखनी भाषेविषयीच्या धोरणात त्यामुळे फरक पडला नाही. या ऐतिहासिक कारणामुळे औरंगाबादच्या परिसरात दखनीची जागा उर्दूला मिळाली. हैदराबादच्या परिसरात पुढे निजामाने आपली राजधानी केली तरी दखनीची मुळे पार तळागाळापर्यंत पोचलेली असल्याने आजदेखील अशिक्षित जमातीत दखनी बोली कायम आहे. इतकेच नव्हे तर निजामी राजवट संपल्यानंतर केवळ दखनी भाषेत काव्य- रचना करणाऱ्या कवींना उर्दू कविसंमेलनातून मानाचे स्थान देखील प्राप्त झाले आहे. दखनी साहित्याचे प्रकाशनही निजामी राजवट संपल्यानंतर मोठ्या प्रमाणात झाले आहे. उस्मानिया विद्यापीठात दखनी भाषेसंबंधीचे संशोधन होऊ लागले तेही १९५० च्या नंतरच.

दखनी साहित्याचा प्रारंभकाळ

कोणत्याही भाषेचा उत्पत्तीकाळ आणि त्या भाषेत झालेली साहित्यनिर्मिती यांचे काळ समान नसतात. साहित्यनिर्मितीची प्रतिष्ठा प्राप्त होण्यापूर्वी ती भाषा बोलीच्या स्वरूपात वावरत असते. साहित्याचा प्रारंभकाळ प्राचीनतम ग्रंथाच्या आधाराने निश्चित करता येणे शक्य असते. एखाद्या भाषेने साहित्य-निर्मितीपूर्वी बोलीच्याच अवस्थेत किती काळ नांदावे याला निश्चित मर्यादा घालता येत नाही. सामाजिक वा वैचारिक आंदोलनाशी एखादी बोली निगडित असेल तर तिला साहित्याची प्रतिष्ठा प्रमाणतः लवकर प्राप्त होते. दखनी भाषेचा उद्भवकाळ निश्चित करण्यात त्यामुळेच अडचणी येतात. साहित्यनिर्मितीचा काळ मात्र निश्चित करता येतो. तत्पूर्वी बोलीच्या रुपात दखनी किती काळ नांदत होती याचा नेमका अंदाज बांधणे कठीण आहे.

फारसी लिपीत लिहिलेले दखनी भाषेतले पहिले प्रेमाख्यान काव्य या नात्याने ‘कदमराव पदम’ या निजामीच्या काव्यास स्थान देण्यात येते. १४६१ ते १४६३ या कालखंडात या काव्याची रचना झाली आहे. पंधराव्या शतकाचा उत्तरार्ध हा अशा रीतीने दखनी साहित्याचा प्रारंभकाळ ठरतो.

दखनी साहित्यातील प्रारंभकाळातले सर्वच कवी आणि लेखक सूफी पंथाचे होते. त्यांची मातृभाषा दखनी नव्हती. ती त्यांच्या मूळ प्रदेशातील होती. पण सूफी पंथाच्या आचार-विचारांचा प्रसार दक्षिण भारतात व्हावा या हेतूने या साधुसंतांनी दखनी भाषेचे माध्यम स्वीकारले. या भागांतल्या प्रादेशिक भाषांतून ग्रंथरचना न करता सूफींनी ही निराळी भाषा योजली त्या अर्थी पंधराव्या शतकात ती समाजाची बोधभाषा या नात्याने मान्यता पावलेली असावी या स्पष्टच आहे.

पंधराव्या शतकापूर्वी बोलीभाषेच्या रुपात दखनी किती काळ नांदत होती याचा अंदाज दखनी भाषेत उपलब्ध असलेल्या साधनांद्वारे लावता येणे शक्य नाही. ही भाषा सूफींच्या बरोबर दक्षिणेत आली असे म्हणावे तर उत्तर भारतात सूफींची ग्रंथरचना अवधीतून झालेली आहे शिवाय ‘पदुमावत’, ‘मधुमालती’, ‘अखरावट’ (१५६०-४०), ‘चित्रावली’ (१६१३), ‘ज्ञानदीप’ (१६१९), ‘प्रेमप्रकाश’ (१६८८) हे अवधी भाषेतील सूफी ग्रंथ दखनी साहित्यास प्रारंभ झाल्यानंतर रचण्यात आलेले आहेत. मुल्ला दाऊद यांचे ‘चंदायन’ हे मात्र त्यास अपवाद आहे. या ग्रंथाची रचना इ.स. १३७९ मध्ये झालेली आहे. अवधी भाषा देखील सूफींची मातृभाषा नव्हती. परंतु संत कबीरांच्या साहित्यामुळे अवधीस लोकमान्यता लाभली होती. सूफींनी आपल्या कार्यासाठी या भाषेच्या लोकमान्यतेचा उपयोग करून घेतला हे उघड आहे.

गुलबर्गा येथील संत खाजा बंदेनवाज यांचा ‘मेराजुल् आशकीन’ हा दखनी भाषेतला पहिला ग्रंथ आहे असे काही काळ मानण्यात येत असे. हे अध्यात्मपर प्रकरण मुळात शंकास्पद आहे. या प्रकरणास आरंभ व शेवट नाही. त्याप्रमाणे प्रारंभीचे उद्दिष्टकथनही त्यात आढळत नाही. शेवटी येणारी फलश्रुतीदेखील या ग्रंथात नाही. त्यामुळे खाजा बंदेनवाज यांनी लिहिलेल्या एखाद्या अरबी अथवा फारसी ग्रंथाच्या काही भागाचा अनुवाद नंतर त्यांच्या शिष्यांपैकी कोणीतरी केला असावा असे वाटते. खाजा बंदेनवाज १४२२ मध्ये समाधिस्थ झाले. त्यामुळे १४६१-६३ या काळखंडात रचण्यात आलेली ‘कदमराव पदम’ ही दखनी भाषेतली पहिली कृती ठरते.

या ग्रंथापूर्वी बोलीच्या रुपात दखनी कितीकाळ नांदत होती हे निश्चित करणे सोपे नाही. दक्षिण भारतात इ.स. ११४३ मध्ये हाजी रुमी हा सूफी संत येऊन गेल्याची नोंद आहे. तेराव्या शतकाच्या अंतिम

खंडात देवगिरीवर मुसलमानांचे आक्रमण झाले. तेरावे शतक संपल्यानंतर थोड्याच कालावधीत यादवांची राजवट नष्ट झाली आणि देवगिरीवर मुसलमानी अंमल बसला. त्यानंतर सूफींची दक्षिणेत ये-जा मोठ्या प्रमाणावर होणे स्वाभाविक होते. त्या काळात राजव्यवहाराची भाषा फारसी होती. सूफी तत्त्वज्ञानाचे मूळ ग्रंथही फारसी भाषेतच आहेत. लोकसंपर्काच्या दृष्टीने फारसी भाषेचा उपयोग होण्यासारखा नसल्याने सूफींनी पंथप्रसारार्थ दखनी भाषेतून रचना केली. पण सूफी साहित्य निर्माण होण्यापूर्वी ही भाषा महाराष्ट्रात कितीकाळ अस्तित्वात होती? या भाषेत महाराष्ट्रात अगोदर काही साहित्य निर्माण झाले होते काय? मुख्य म्हणजे आदी प्रादेशिक भाषा साहित्याच्या दृष्टीने समृध्द असताना ती तिसरी भाषा महाराष्ट्रात का रूढ झाली? असे कितीतरी प्रश्न दखनी भाषेच्या संदर्भात उद्भवतात.

या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेताना दखनी भाषेची उत्पत्ती कोणत्या काळात झाली याचेही उत्तर सापडू शकेल. हा शोध बराच गुंतागुंतीचा ठरणारा आहे. सध्या उपलब्ध असलेल्या दखनी साहित्याच्या आधाराने या शोधास काही दिशा मिळते काय ते पाहू.

दखनी साहित्य : एक धावता आढावा

फारसी लिपीत निबद्ध असलेले सर्वच दखनी साहित्य अद्याप प्रकाशात आलेले नाही. ठिकठिकाणच्या हस्तलिखित – संग्रहात बरीच ग्रंथसंपत्ती अद्यापही असून ती संशोधन प्रकाशनाची वाट पाहत आहे. आजवर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांच्याच आधाराने या साहित्याचा धावता आढावा पुढे देण्यात येत आहे.

प्रकाशित सामग्रीवरून साहित्याचा प्रारंभ आणि शेवट ही दोन टोके निश्चित होतात. फारसी लिपीतील दखनी साहित्याचा प्रारंभ पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात झालेला असून अठराव्या शतकाच्या प्रारंभकाळानंतर साहित्य-निर्मितीत खंड पडलेला दिसून येतो. प्रथम सूफींना या भाषेत साहित्य निर्माण करण्याची निकड भासली. बहामनी राजवटीनंतर या भाषेच्या सभोवती प्रादेशिक अस्मितेचे वलय निर्माण झाले. त्यामुळे दरबारी वातावरणात या भाषेला प्रतिष्ठा लाभली. काही राज्यकर्त्यांनी या भाषेत काव्यरचना केल्यामुळे या भाषेला राज्यमान्यताही लाभली. त्यायोगे सूफी संतांच्या साहित्यास दरबारी काव्यपरंपरेचीही जोड लाभली. आदिलशाही आणि कुतुबशाही या दोन घराण्यांच्या राजवटीत दखनी साहित्याने समृद्धीचे शिखर गाठले. या दोन्ही राजवटी औरंगजेबाने मृत्यूपूर्वी काही काळ बुडविल्या आणि नंतर मात्र या साहित्यास अवकळा आली. थोड्याच कालावधीत साहित्य-निर्मिती थांबली आणि दखनी उरली ती बोलीच्या रुपात.

'कदमराव पदम' हा फारसी लिपीतील दखनी साहित्याचा पहिला ग्रंथ (१४६१-६३) सूफी पंथाचे तत्त्वज्ञान विषद करण्याच्या हेतूने रचलेले एक आख्यान – काव्य आहे. कवीने प्रचलित लोककथांचा आधार घेऊन सूफींचा आचार-विचार या आख्यानाद्वारे कथन केला आहे. आख्यानाचे मध्यवर्ती तत्त्वज्ञान अभारतीय तत्त्वप्रणालीवर आधारलेले असले तरी वातावरण मात्र पूर्णपणे भारतीय आहे. कथेच्या ओघात अख्खडनाथ या नाथपंथीय जोग्याची कथाही आली आहे. या जोग्याच्या परकाया प्रवेशाचे वर्णन कवी भारतीय परिभाषेत करतो. हाच कथाभाग पुढच्या काळात रचलेल्या 'फूलबन' या काव्याचाही विषय आहे.

सूफी पंथाचे तत्त्वज्ञान आणि आचार विशद करणारे ग्रंथ पद्यात आहेत तसेच गद्यातही. अध्यात्मविवरण सुबोध व्हावे या हेतूने लेखक- कवींनी प्रचलित लोककथांचा मुक्तपणे उपयोग केला आहे.

रूपक – कथाही प्रसंगोपात आल्या आहेत.काही ग्रंथांतून तर रूपकाचे घटकच पात्र रूपाने वावरताना आढळतात. दिल (अंतःकरण), जमीर (सद्सदविवेकबुद्धी), हवास (मनोविकार), हुस्न (सौंदर्य) अशी कित्येक 'पात्रे' काही ग्रंथांतून आढळतील. हे सर्व घटक 'इश्क' (प्रणय) या मध्यवर्ती भावनेच्या भोवती फेर धरताना दिसतात.

सूफी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान असलेल्या 'प्रणया' चे रूप समजून घेतले पाहिजे. शृंगारप्रधान अथवा 'मधुराभक्ती' ही भारतीय भक्तिसंप्रदायातही आढळते. 'परम-प्रेमरूपा' भक्तीचे निरुपण नारद-शाण्डिल्य यांच्या भक्तिसूत्रात आले आहे. कृष्ण-गोपींचा शृंगार भागवतादी पुराणांत वर्णिलेला आहे. 'गीतगोविन्द' व अन्य मान्यताप्राप्त भक्तिकाव्यात राधाकृष्णाच्या शृंगाराचे चित्रण आले आहे. मधुराभक्तिपर साहित्यात जीव स्त्रीरूपाने 'परमपुरुषा'च्या मीलनासाठी तळमळत असतो. सूफी पंथात शृंगार (इष्के हकीकी) आणि मीलनाची तळमळ यांना स्थान आहे. परंतु भक्त आणि परमेश्वर यांचे नाते स्त्री आणि पुरुष असे नसून ते नेमके उलटे आहे. या संप्रदायात भक्त प्रेयसीच्या मीलनासाठी तळमळणाऱ्या पुरुषाची भूमिका घेत असतो. परमेश्वर ही त्याची आराध्य देवता असते. चित्तशुद्धी, अनन्यनिष्ठा आणि सदाचार यांना भारतीय भक्ति-संप्रदायात आणि सूफीपंथात सारखेच महत्त्व आहे. [५]

'सनअती' (१६४६) या कवीचे 'किस्सेबेनजीर', 'मुल्लावजीही'चे (१६१०), 'कुतुबमुशतरी', 'गब्बासी'चे (१६५०) 'मैना संतवती', 'हाशमी'चे (१६८८) 'यूसुफ जुलेखा', 'बहुरी'चे (१७०२) 'मनलगन' ही आख्याने उपरोक्त मध्यवर्ती कल्पनेवर आधारलेली आहेत. काही आख्याने गद्यातही आहेत. संस्कृत साहित्यातील काही कथांवर सूफींनी रचना केलेली आहे. या कथा मूळ संस्कृत कथांवरून आल्या आहेत की या कथांच्या फारसी भाषेतील अनुवादावरून हे समजण्यास मार्ग नाही. 'तोतीनामा' हे गब्बासीचे काव्य संस्कृत 'शुकसत्पतीवर' आधारलेले आहे. सर्वच दखनी कवी आणि लेखक यांना भारतीय तत्त्वज्ञान आणि पुराणकथा यांचे चांगले ज्ञान होते याचा प्रत्यय त्यांच्या साहित्यातून येतो. दखनी काव्यातील मंगलाचरणे अद्वैत वेदांताच्या परिभाषेवर काळजीपूर्वक बेतलेली असतात. हे लेखक-कवी पुराणकथांवर आधारलेले उपमा-दृष्टांत अगदी सहजपणे देतात. अभारतीयांनी रचलेल्या सूफी साहित्यातील वातावरण पूर्णपणे भारतीय असावे याचे नवल वाटते. त्या मानाने उर्दू साहित्यातील सांस्कृतिक वातावरण एवढे भारतीय वाटत नाही. सांस्कृतिकदृष्ट्या दखनी साहित्याचा हा विशेष महत्त्वाचा ठरतो.

दरबारी काव्याची परंपरा

इ.स. १६०० ते १७०० या शतकात दखनी काव्याची वाढ अनेक अंगांनी झाली. या काळात फारसी भाषेतील काही ग्रंथांचे दखनी भाषेत अनुवाद झाले. काही फारसी छंद आणि आकृतिबंध देखील दखनीत रूढ झाले. 'गजल', 'मसनवी' या बंधांप्रमाणेच 'मर्सिया' हा काव्यप्रकार देखील दखनीत रुढ झाला. याच कालावधीत सूफींच्या काव्यधारेला दरबारी काव्याची जोड मिळाली. सामाजिक क्षेत्रास प्रादेशिक अस्मितेची किनार लाभल्याने राज्यकर्ते आणि त्यामुळे दरबारी कवी दखनी भाषेत साहित्य-निर्मिती करू लागले. अशा रीतीने या साहित्याला लोकमान्यतेबरोबरच राजमान्यताही प्राप्त झाली.

या नव्या प्रवाहाने राजप्रशस्तिपर काव्यांची परंपरा निर्माण झाली. 'अश्रफ बियाबानी' याच्या 'नवसरहार' (१५३०) या काव्याने या परंपरेस प्रारंभ झाला. फारसी भाषेत राजप्रशस्तिपर काव्याची प्रदीर्घ परंपरा होती. दखनी राजप्रशस्तिपर काव्यास ही परंपरा प्रेरक ठरली. त्यामुळे फारसी काव्याचे आदर्श

अनुक्रमणिका

दरबारी कवीच्या काव्यात उतरले. 'यूसुफनामा'हे यूसुफ आदिलशाहा (१४९६-१५१०) याचा गुणगौरव कारणाने काव्य, इब्राहीम आदिलशाहाचे पोवाडे गाणारा 'इब्राहीम नामा' (१६०४) अली आदिलशाह दुसरा (१६५७-१६७२) याची प्रशस्ती करणारा नुस्रती या कवीचा 'अलीनामा' व सिकंदर आदिलशाहाचा गुणगौरव करणारे 'तारीखे इस्कंदरी' ही काव्ये या परंपरेतील उदाहरणे म्हणून देता येतील.या काव्यातील युद्धवर्णने आणि प्रसंगाची चित्रणे अत्यंत प्रत्ययकारी वाटतात. सैन्याच्या हालचाली, युद्धाचे डावपेच, व्यूहरचना इत्यादिकांची वर्णने वाचताना तर हे कलमबहाद्दर प्रत्यक्ष रणांगणावर तलवारी गाजवत होते की, काय अशी शंका येऊ लागते. कारण, कित्येक युद्धवर्णने अगदी 'चक्षुर्वै सत्यं' असावीत एवढी बारकाव्याने भरलेली आहेत. स्वपक्षीयांच्या शौर्याप्रमाणेच शत्रुपक्षाच्या बहादुरीची देखील या कवींनी दखल घेतली आहे.

फारसी काव्याचे आदर्श

अतिशयोक्ती हा दरबारी काव्याचा स्थायिभाव आहे. फारसी भाषेतील आदर्शांचा तो परिणाम असावा. या आदर्शांचा दुसराही परिणाम दरबारी काव्यात जाणवतो. सूफी साहित्याच्या तुलनेने दरबारी काव्यांत अरबी- फारसी शब्द व इराणी-अरबी संस्कृतीशी संबद्ध असलेले संकेत अधिक योजलेले आढळतात. निरनिराळ्या रागांतील पदरचना हाही दरबारी काव्याचा एक विशेष आहे. 'किताबे नवरस' हा इब्राहीम आदिलशहाचा (१५८०-१६२७) ग्रंथ पदसाहित्य आणि संगीत- रचना या दोन्ही दृष्टींनी मोलाचा ठरतो. इस्लामी व भारतीय संस्कृतीची एक अपूर्व सरमिसळ या काव्यात आढळते. या काव्याचा प्रारंभ आणि शेवट सरस्वती-वंदनाने झाला आहे हे विशेष. अब्दुल्ला कुतुबशहाच्या काव्यात (१६२५-१६७२) अशाच प्रकारची रागदारीतील पदे आली आहेत.

दखनी साहित्याचा प्रारंभ बहामनी राजवटीत (१३४७-१५२७) झालेला असला तरी या साहित्याचे सुवर्णयुग मात्र आदिलशाही (१४९०-१६८६) व कुतुबशाही (१५१२-१६८७) या दोन राजवटीत रचलेल्या साहित्यात आढळते. इब्राहीम आदिलशाह आणि अब्दुल्ला कुतुबशहा यांच्याप्रमाणेच महमद कुली कुतुबशहा (१५८०-१६१२) यानेही काव्यरचना केली आहे. दरबारी परंपरेतील काव्यात कुली कुतुबशहाचे काव्य श्रेष्ठ प्रतीचे ठरते. या कवीच्या रचनेत फारसी डौलाची कविता आहे तशीच लोकपरंपरेवर आधारलेली गीते आहेत. हिंदू समाजात रूढ असलेल्या सणांवरही त्याने गीते रचली आहेत.त्याची ऋतूवर्णनपर गीते आजही हैदराबादच्या परिसरात प्रसंगविशेषी गाण्यात येत असतात. फारसी गजल या छंदाचा दखनी काव्यात महमद कुली कुतुबशहा यानेच प्रथम उपयोग केला.

साहित्याचे सुवर्णयुग

इ.स. १६०० ते १७०० हे दखनी काव्याचे सुवर्णयुग. सूफींची प्रेमाख्यानपर काव्ये, राजप्रशस्तीपर काव्यग्रंथ, लोकगीतांच्या धाटणीवर रचलेली गीते, रागदारीतील पदे अशा विविध रचनांना या कालावधीत बहर आलेला आहे. मराठी आख्यान कविता आणि संत व पंडित कवींनी केलेली पदरचना यांचा परमोत्कर्ष याच कालखंडात झालेला आहे. हा केवळ योगायोग मानावयाचा की मराठी व दखनी साहित्याच्या सहजीवनाचा परिणाम? लीळाचरित्राची लोककथात्मक शैली आणि एकनाथी भारुडांत आढळणारी लयबद्ध गद्यरचना दखनी साहित्यात या कालखंडात झालेली आहे. हे केवळ अपघाताने घडले असेल काय? मराठी साहित्य आणि समाजजीवन यांच्याशी दखनी साहित्याचा अनुबंध अत्यंत जिव्हाळ्याचा असल्याचे तर हे लक्षण नव्हे?

अनुक्रमणिका

मराठी आणि दखनी या दोन्ही भाषांच्या समकालीन साहित्यात आढळून येणाऱ्या समान प्रवृत्ती आणि प्रवाह व त्याचे अन्वयार्थ हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय असून त्याचे फलित निश्चितच उद्बोधक ठरेल. सध्या आपण दखनी साहित्याच्या वाटचालीचा विचार करीत आहोत. दखनी साहित्याशी संबंधित अशी एक ऐतिहासिक घटना या ठिकाणी नमूद केली पाहिजे. शिवछत्रपतींच्या निधनानंतर सारा दक्षिण काबीज करण्याच्या हेतूने औरंगजेब तब्बल सव्वीस वर्षे आपल्या लष्करासह तळ देऊन बसला होता (१६८१-१७०७). या कालावधीत छत्रपती संभाजी महाराज यांचा वध झाला आणि विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही ही दोन्ही घराणी औरंगजेबाने उध्वस्त केली. दखनी साहित्यावरही हा एक मोठाच आघात ठरला. मोगल राज्यकर्त्यांना दखनी विषयी सोयर-सुतक नव्हते. त्यामुळे पुढच्या काळात दखनी साहित्याची निर्मिती क्षीण होत होत अंतर्धान पावली.

दखनीचा अस्त

औरंगजेबाच्या या आघातामुळे मराठे मात्र खचले नाहीत. त्यांचा पराभव करण्याचे औरंगजेबाचे प्रयत्न पूर्णपणे यशस्वी झाले नाहीत. शेवटच्या काही वर्षात 'मराठा मोडता मोडत नाही' हेच शल्य औरंगजेबाच्या मनी होते. या हृद्यरोगातच त्याचा अंत झाला. मराठ्यांनी आपले स्वराज्य सावरून धरले. परंतु, आदिलशाही आणि कुतुबशाही मात्र इतिहासजमा झाल्या आणि दखनी साहित्यावर अखेरचा पडदा पडला. वली औरंगाबादी हा दखनी भाषेतील शेवटचा नामवंत कवी १७०७ मध्ये निधन पावला. त्याचा समकालीन सिराजी १७६५ पर्यंत वलीचे स्मरण करीत जगला. तरीही दखनी साहित्याचे तेज मावळले ते मावळलेच. वलीचे दखनी भाषेवर आणि दक्षिणेवर विलक्षण प्रेम होते. मराठ्यांवर त्याचा भारी जीव.

आज माशुक लडका मरहटा है। मिठाई बंद शकरसूँ मीठा हैं ॥
सजन हैं साँवला सजका सजीला। कटीवा होर हटीला लटपटा हैं ॥

सुमारे दीडशे वर्षे वाढत्या वैभवाचा काळ भोगल्यानंतर दखनी भाषेच्या निशिबी पुन्हा एकवार सामान्यांच्या बोलीचे जिणे जगणे आले. मराठी मातीचा गंध घेऊन जन्माला आलेल्या साधुसंतांच्या व राजेरजवाड्यांच्या दरबारात सारखीच प्रतिष्ठा लाभलेल्या दखनी भाषेने विपत्काळातही मराठीचा गंध जन्मखुणांप्रमाणे जपून ठेवला आहे हे विशेष.

या विशेषाची अधिक चिकित्सा केली असता दखनी भाषेच्या उद्भावासंबंधी अधिक माहिती मिळण्याचा संभव आहे. तत्पूर्वी या भाषेतील साहित्याच्या अंतरंगाचा शोध घेऊन कोणती फलनिष्पत्ती होते ते पाहू या.

संदर्भ

१. 'नागरी हिन्दी या खडी बोली हिन्दी के इतिहास का आरंभ गद्य साहित्य को लेकर १९ वी शताब्दी के आरंभ में अंग्रेजोंकी छत्रछाया में कोलकत्ता में उर्दू के साथ साथ हुआ' सुनीतकुमार चतर्जी, भारतीय आर्य भाषा और हिन्दी, पृ. १७०. १९ व्या शतकाच्या प्रारंभी होऊन गेलेला मुनशी सदासुख हा या भाषेतील पहिला ग्रंथकार. १९ व्या शतकापूर्वी हिन्दी भाषेला अस्तित्वच नव्हते असे निःसंदिग्ध मत भोलानाथ तिवारी यांनी मांडले आहे- हिन्दी भाषा, पृ. २१४

२. ● दखन में जो दखनी मीठे बात का —सबरस.
● *किया नज्म दकनी सिमे बे-मिसाल-मैना सतवंती.*
● *किया दखनी किस्सा इस आजम सुँ — लैला मजनू*
● *सो इस शाह के दौरे बीदर मुकाम*
यो थीर किया नज्म दखनी तमाम — रीज्वान.
● *दखनी जुबाँमें शेर सब लोग कहते हैं ऐ वली-वली*

३. द्वादशभाषासु संस्कृत —प्राकृत गोमांचलीय, गुर्जर — वक्तर — ढुडार-पंजाब- हिंदूस्थान-वाग्गुल — यावनी- दाक्षिणात्ययावनी —कर्णाटकासू निरर्गल कवयामिती-राधा. पृ.२२७

४. शहाजी राजे यांच्या युद्धकौशल्याचे वर्णन कवीने पुढीलप्रमाणे केले आहे : मोर्तेबे सलासलेगर्र ऐसी उठे। चांदसूरज बुडे, फौज वाँ पे चडे।। सबजमीं खळ माजे (खळबळे)। मोगलां शक धरे, रुमशामी डरे।। बाज जैसा बुडे, दुश्मनां कू लूटे। सिर धरे जोर, जासोस पावे सजा । है खुदा का वली साही सर्जा वली ॥ - राधा, पृ.२७४.

५. सूफियों की प्रेम कहानियों में प्रेमपात्र का स्थान प्रधानतः नारी को ही दिया जाता है। और उसीके द्वारा भरसक उस परमत्मतत्त्व का प्रतिनिधित्व करने की भी चेष्टा की है जो उसके ईश्वरीय प्रेम का लक्ष्य है। नारी ही यहाँपर उस नूर का प्रतीक है जो उनके ईश्वरीय प्रेम का लक्ष्य हैं। नारी ही जहाँपर उस नूर का प्रतीक हैं जो सारे विश्व का मूळ स्रोत हैं ।'- परशराम चतुर्वेदी, सूफी 'प्रेमाख्यानकाव्य', हिन्दी साहित्य, खंड २, २९२.

३. दखनी साहित्याचे अंतरंग

दखनी भाषेचे मूळ शोधावयाचे म्हणजे पंधराव्या शतकात महाराष्ट्राची बोधभाषा असलेल्या ह्या भाषेचा उगम नेमका कोठे व कसा झाला याचा माग काढता आला पाहिजे. मागील प्रकरणात घेतलेल्या साहित्याच्या आढाव्यात या संबंधीचे कोणतेही गमक हाती लागत नाही. तेव्हा साहित्यातील वातावरण आणि संस्कृती यांच्या अनुसंधानाने शोध घेत काही दिशा मिळते किंवा काय हे पाहिले पाहिजे.

भाषेचे मऱ्हाटी वळण

फारसी लिपीतील दखनी साहित्यात दोन प्रवाह असल्याचे मागील प्रकरणी नमूद कण्यात आले आहे. सूफी संत आणि दरबारी कवी यांचे साहित्य एकाच भाषेतले असले तरी आशय आणि अभिव्यक्ती या दोहोंच्याही दृष्टीने या दोन धारांत पृथगात्मता दिसून येते. सूफींनी गद्य आणि पद्य या दोन्ही शैलींचा उपयोग केला आहे. दरबारी कवींचे साहित्य मात्र केवळ पद्यातच आहे.मराठी संतकवींप्रमाणे सूफी संतांनीही काव्यसौंदर्याकडे जाणिवपूर्वक लक्ष दिलेले दिसून येत नाही. सहजगत्या उत्पन्न झाले तेवढेच रचनासौष्ठव सूफी साहित्यात आढळेल. अध्यात्मप्रतिपादनास त्यांच्या दृष्टीने महत्त्व होते. ते परिणामकारक करण्याच्या दृष्टीने या संतांनी लोककथांचा उपयोगही आपल्या साहित्यात करून घेतला आहे. आकृतिबंधाची अकृत्रिमता आणि भाषेची सहजता यांवर त्यांचा कटाक्ष होता.सूफींचे तत्त्वज्ञान फारसी भाषेत असल्याने त्यांच्या साहित्यात अरबी-फारसी शब्द अपरिहार्यपणे येतात. परंतु त्यातही एक प्रकारची शिस्त आढळते. हे संत अरबी-फारसी भाषांचे पंडित असूनही त्यांनी आपल्या साहित्यात अरबी-फारसी शब्दांचे अपभ्रंशच प्रामुख्याने योजले आहेत. हे अपभ्रंश भारतीय वर्णोच्चारपद्धतीस अनुसरून झालेले आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तत्कालीन मराठी भाषेत रूढ असलेल्या अरबी-फारसी शब्दांचेच अपभ्रंश सूफी साहित्यात प्रयुक्त झाले आहेत!

दरबारी परंपरेतील काव्यांचे मूळ आदर्श हेच फारसी काव्याचे असल्याने फारसी छंद व कविसंकेत या साहित्यात उतरले आहेत. दरबारी काव्यात अरबी-फारसी शब्दांचे प्रमाण वाढत गेले आहे. या भाषांतील शब्दांच्या अपभ्रंशाप्रमाणेच मूळ अरबी-फारसी शब्दही या परंपरेत येतात. त्यांचे प्रमाण अपभ्रष्ट शब्दांच्या तुलनेने कमी आहे. दरबारी कवींनी साहित्य- सौंदर्याकडे जाणिवपूर्वक लक्ष दिले आहे. आशय आणि अभिव्यक्ती या दोन स्तरांवर या धारा भिन्न दिसत असल्या तरी दखनी भाषेचे 'मऱ्हाटीपण' दोन्ही परंपरांत सारखेच आहे. दुसरा समान विशेष म्हणजे दख्खन आणि दखनी भाषा यांवरील प्रेम. या दोन्ही परंपरांतील कित्येक साहित्यिक भारताबाहेरून आलेले होते व अनेकांची मातृभाषा देखील दखनी नव्हती. तरीही दख्खन आणि दखनी यांच्याविषयी उभय परंपरांनी दर्शविलेली आत्मीयता विशेषेकरून नजरेत भरते.

दाक्षिणात्य प्रदेशासंबंधी मुल्ला वजीही लिहितो, 'या विश्वात दक्षिणेसारखे दुसरे स्थळ नाही.हा प्रदेश म्हणजे हिरेमोत्यांनी जडविलेली मौल्यवान अंगुठी.' [१] 'या गोड भाषेच्या रंगाने मी वेडा झालो आहे.' अशी कबूलीही हा कवी देतो. [२] इतर अनेक कवींनीही (दोन्ही परंपरेतील) प्रदेशाचे व भाषेचे असेच गोडवे गाईले आहेत. पंथप्रसाराचे माध्यम या नात्याने सूफींनी ही भाषा योजलेली असली तरी कालांतराने सर्वच साहित्यिक या भाषेच्या प्रेमात सापडलेले दिसतात- आरशातल्या स्वतःच्याच प्रतिबिंबावर एखाद्याने मोहित व्हावे त्याप्रमाणे!

साहित्यातील सांस्कृतिक वातावरण

हे सर्वच साहित्यिक धर्माने मुसलमान होते आणि अनेकांचा जन्म भारताबाहेर झालेला होता; तरीही भारताच्या सांस्कृतिक जीवनाशी त्यांनी विलक्षण एकरुपता संपादन केलेली होती. भारताच्या सांस्कृतिक जीवनातील प्रतिमा आणि पुराण-ग्रंथांतील कथा व संकेत दखनी साहित्यात मुक्तपणे संचार करताना आढळतात. सूफी तत्त्वज्ञानाचे विशदीकरण करण्यासाठी योजलेल्या कथांचे वातावरण देखील भारतीय आहे. आजचे उर्दू साहित्य त्या मानाने फारच वेगळे वाटते.

उदाहरण म्हणून 'सबरस' या गद्यग्रंथाचा उल्लेख करता येण्यासारखा आहे. ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांना वासनात्मकतेपासून निवृत्त करून सद्‌तत्वावर प्रेम करण्याचे वळण लावावे असा या रूपक-कथेतून निघणारा ध्वनी आहे. लेखक सूफी आहे तरी रामकथेतील कित्येक प्रसंग त्याने दृष्टांतादाखल उल्लेखिले आहेत. 'रामासारखा धनी असेल तर हुनुमंत पैदा होतो'. [३] किंवा 'रामाने समजून उमजून बिभीषणाला जवळ केले; (या) घरभेदामुळेच त्याला लंका घेता आली'. [४] विषयाचे स्पष्टीकरण करण्यासाठी या लेखकाचे पुराणकथांचाही आधार घेतला आहे. 'वासनाधीन इंद्रिये माणसाला परतंत्र करतात व त्या योगे मनुष्य मोहवश होतो'. हे सांगण्यासाठी त्याने रंभा व उर्वशी यांच्या कथांचा आधार घेतला आहे.[५]

भारताच्या सांस्कृतिक परंपरेचा आधार घेण्यात दरबारी कवी देखील मागे नाहीत. 'अलीनामा'या राजप्रशस्तिपर कामात युद्धाची अनेक वर्णने आली आहेत. या वर्णनांच्या संदर्भात रामायण, महाभारत व पुराणे यांतील अनेक संदर्भ येऊन जातात. शिवाजी राजाने आदिलशाहाशी मैत्री जोडावी अशा अर्थाचा निरोप घेऊन जाणाऱ्या दूताचे वर्णन 'अवतारी रामाचा दूत लंकेला निघाला' (पृ. १३२) अशा शब्दांत कवी करतो. शिवाजी हा या कवीचा शत्रुपक्ष. रामायणाच्या कथेच्या अनुसंधनाने 'रावण'. त्याच्या मुलखावर हल्ला करण्याचा आदिलशाहाने दिलेला आदेश 'सेतुबंधाच्या रोखाने जाऊन लंकेवर हल्ला चढवा' (पृ.७७) अशा शब्दांत वर्णिला आहे. हिंदू संस्कृतीशी संबद्ध असलेले इतरही अनेक संकेत या काव्यात आले आहेत. 'युद्धात वाहणारे रक्ताचे पाट भूमीने आपल्या भांगात सिंदूर भरल्यासारखे वाटतात' अशी कल्पना कवी करतो. [६] आदिलशहाचे विजयी वीर कवीला टिळा लावलेल्या ब्राह्मणांसारखे दिसतात. [७] 'तोतीनामा' या काव्यात सूर्यास्त आणि चंद्रोदय यांचे चित्रण कवीने केले आहे. ते वाचले म्हणजे एका मुसलमान कवीने हे वर्णन केले असेल यावर विश्वास बसत नाही.

'आकाशातला सूर्य हा कोणी ब्राह्मण, पश्चिमेच्या गंगेवर संध्या करण्यासाठी निघाला आहे. त्याच वेळी पूर्वेच्या देवळातून सुंदर चंद्रमा बाहेर पडला'. [८] अशी अनेक उदाहरणे उद्धृत करता येतील. दखनी साहित्यिक भारतातील लोकजीवन आणि सांस्कृतिक परंपरा यांच्याशी समरस झालेले होते. म्हणूनच लोककथा आणि पुराणकथा यांचा उपयोग त्यांना आपल्या साहित्यात अगदी सहजपणे करता आला. हे साहित्यिक भिन्न धर्मांचे अनुयायी होते. कित्येकांची जन्मभूमीही भारताबाहेर होती हे लक्षात घेतले म्हणजे दखनी साहित्यातील भारतीय वातावरणास विशेष महत्त्व प्राप्त होते.

वेदांताची परिभाषा

भारतीय तत्त्वज्ञानाचा गाढा व्यासंग हे दखनी साहित्याचे लक्षात भरणारे आणखी एक वैशिष्ट्य. भारतीय तत्त्वज्ञानाचा पुरस्कार हे काही त्यांच्या साहित्याचे उद्दिष्ट नव्हते. तथापि, समाजास परिचित

असलेल्या अद्वैत वेदांताच्या परिभाषेचा समर्पक उपयोग त्यांनी आपली विचारसरणी विशद करताना केलेला आहे. सूफी काव्यातील मंगलाचरणे वाचताना तर संतांनी केलेल्या निर्गुण परब्रह्माच्या विवरणाचे स्मरण होते. 'कशफुलू वजूद' या काव्याचे हे मंगलचरण पहा. 'परमेश्वर अद्वितीय, विश्वकर्ता आणि विश्वाधार आहे. तो सहजस्वरूपी तसाच आत्मरूप असून विश्वरुप धारण करतो. तो पुरुष नाही आणि नारीही नाही, आई नाही तसाच बापही नाही. त्याला कोणी मित्र नाही की प्रियपात्र' असा या वंदनाचा भावार्थ आहे. ही परिभाषा आपल्या परिचयाची आहे.

अल्ला बाहद सरजनहार, जो जग अलीम तिस के थार
बाहर बातन अपना रूप, जात पंजर सहज सरूप
दायम कायम असे अंग, जो न पुंगडी, न माँ बाप
तन वन नमन जो अंग लेत, ना उस पीत है ना मीत ॥

-कदीम उर्दू (३००)

'तोतीनामा' या काव्याचे मंगलाचरण तर अनुवाद न देता समजण्याजोगे आहे.

न आकार तुज है, निरंकार तूँ
सदाही आपस में खाता तो तूँच
जिव मारता होर जिलाता सो तूँच-

सर्जन आणि विसर्जन ही तुझीच लीला आहे हा भाव इथे आढळतो.

'कोऽहम्' (मी कोण आहे?) हा तत्त्वजिज्ञासेच्या क्षेत्रातल्या सनातन प्रश्न. त्याचे उत्तर दखनी कवीकडून ऐका :

'मातीचे शरीर धरण करणारा तू देहधारी (हे तुझे पहिले रूप). दुसरे रूप म्हणजे अंतरीचे संकल्प-विकल्पात्मक मन. तिसरा अंतरात्मा आणि चौथा **निरंजन**. याची ओळख करून घे'. [९]

'मनसमझावन' या ग्रंथाच्या प्रारंभी पुढील मंगलाचरण येते:

*अलक नाम अल्ला **निरंजन** हरी हैं*
निराकार निरगुन वो परमेश्वरी हैं
सिफत उसकी हर शयमें दामन भरी है
वो गंगा वो जमुना वो गोदावरी हैं [१०]

'अल्ला निरंजन दोऊ नहीं हैं'

निरंजन हा परमात्मवाचक शब्द सूफी काव्यात वारंवार येतो. वर दिलेल्या दोन्ही उदाहरणातही तो आलेला आहे. हा शब्द वारंवार येतो त्या अर्थी त्याच्या मुळाशी काही संकेत अवश्य असला पाहिजे. 'अलख

अनुक्रमणिका

निरंजन' हा नाथपंथाचा उद्‌घोष. या पंथात निरंजनी संप्रदाय या नावाचा एक उपपंथही आहे. या संप्रदायाचे स्वरूप पीतांबरदत्त बडथ्वाल यांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहे:

'निरंजन संप्रदाय नाथपंथ का एक विकसित रूप हैं जिसमें योग पूर्णत: वेदांती प्रभाव में आ चुका है। यह एक प्रकार नाथ-संप्रदाय एवं निर्गुण संप्रदाय का मध्यवर्ती मार्ग है। हमारे सांस्कृतिक विकास की यह (निर्गुण संप्रदाय) एक महत्त्वपूर्ण कडी है लेकिन आज तक यह सो गई सी जान पडती रही।' हिंदी साहित्यातील निर्गुण संप्रदायाचा उगम शोधत असताना श्री. बडथ्वाल यांनी या नाथपंथांतर्गत उपपंथाचा उल्लेख केला आहे. नाथसंप्रदाय आणि कबीर यांना जोडणारा हा उपपंथ आहे असे त्यांचे मत आहे. 'या निरंजन संप्रदायाने सरळ साध्या धर्माचा उपदेश केला.त्यामुळे ही परंपरा धर्मातीत बनली.'असाही त्यांचा अभिप्राय आहे.पुढे ते लिहितात, 'मेरी यह भी धारणा हैं कि निर्गुण संप्रदाय के अंतर्गत प्राय: उन सभी बातों का सुंदर समावेश पाया जाता हैं जो भारतीय सामाजिक विचारों में मूल्यांकन समझी जाती है।'[११] या पंथाने बुद्धपंथ आणि एकांतिक भक्तिधारा यांत योजलेल्या परिभाषांचा प्रयोग आपल्या साहित्यात केला आहे असेही श्री. बडथ्वाल यांचे मत आहे.

श्री. बडथ्वाल यांच्या भूमिकेचा विस्ताराने परामर्श घेण्याचे हे स्थळ नव्हे. तथापि, वैचारिक विकासातील काही टप्पे या भूमिकेतून स्पष्ट होतात.एकांतिक योगसाधना, ब्रह्मोपासना आणि सगुण भक्ती हे मोक्षप्राप्तीचे निरनिराळे मार्ग जवळ येऊन या सर्वांचा समन्वय करणारी विचारधारा आकार घेत असताना लौकिक धर्मोपदेशाच्या पलीकडे असलेला शाश्वत धर्म आणि सदाचार यांवर साधुसंतांचा भर असे. 'निरंजन' ही या संक्रमण कालातील घडामोडींतून लोकप्रिय झालेली परब्रह्मवाचक संज्ञा होय. सिद्ध सरहपा (८ वे शतक) याने 'परमपद' या अर्थाने निरंजन या शब्द योजला आहे. [१२] नाथपंथात या संज्ञेस अगोदरपासूनच महत्त्व होते. संत नामदेव, संत कबीर यांच्या साहित्यात ही संज्ञा वारंवार येते. [१३] 'निरंजन' या शब्दाच्या पाठीशी हा इतिहास असल्याने दखनी काव्यातील मंगलाचरणांतून येणारा 'निरंजन' हा शब्द महत्त्वाचा ठरतो. संप्रदाय भिन्न असले तरी सांस्कृतिकदृष्ट्या एकाच युगधर्माचा प्रसार सूफी साहित्यातून होत असे असा अर्थ निरंजन विषयक संकेतातून निघतो.

नाथपंथ व या पंथात अंतर्भूत असलले इतर उपपंथ, महाराष्ट्रातील वारकरी पंथ विशेषत: या पंथातील संतांची 'हिन्दी' सदृश रचना, उत्तर भारतातील निर्गुणधारा आणि दखनी भाषेतील सूफींनी रचलेले साहित्य यांच्या वैचारिक भूमिकेत बरेच साधर्म्य आढळते. शाश्वत सत्यावर आधारलेल्या धर्म आणि सदाचार यांना या वैचारिक भूमिकेत महत्त्वाचे स्थान होते. लौकिक धर्मभेद आणि कर्मठता यांचा निषेध या विचारधारेने केला आहे. सूफी संतांनी युगधर्माचे अनुसरण आपल्या परीने केले आहे. सूफींच्या दखनी काव्यातील मंगलाचरणांत ही भूमिका सूत्ररूपाने आली आहे. अन्यत्र याचा विचारसरणीचा पुरस्कार झालेला दिसून येतो. 'गुलजारे वहादियत' या प्रकरणात आलेला पुढील आशय या निष्कर्षास पुष्टी देणारा आहे: 'परमेश्वराला कुठे अल्ला, कुठे सोऽहं असे म्हणतात. वस्तुत: हा केवळ भाषेचा भेद आहे. (परमेश्वराचे) नाव कोणतेही असो त्यास प्रणाम करावा. नाम:स्मरण हे महत्त्वाचे. अल्ला, सोऽहं, हरि ही एकाच प्रियपात्राची नावे होत.'[१४]

'मनसमझावन' या काव्यात पुढील विचार येतो: 'वेद, पुराणे, रामायण, भगवद्‌गीता या ग्रंथांतून सहल करीत असताना मला वेगळे असे काहीच आढळले नाही. वेगळी होती ती केवळ परिभाषा.' शाहतुराब हा या काव्याचा कर्ता स्वत:ला 'हुसेनी ब्राह्मण' म्हणवितो. तो तंजाऊरच्या भोसल्यांच्या राजवटीस 'हिंदूराज' समजतो. धर्म आणि प्रांत यांचा भेद त्याला मंजूर नाही. 'साऱ्या देशात माझा संचार आहे. प्रेमाची गहरी संवेदना

माझ्या ठायी आहे.' [१५] अशी त्याची भावना आहे. प्रचलित कर्मठतेचा (उभय धर्मांतील) त्याने निषेध केला आहे. [१६]

धर्म, संप्रदाय आणि जात-पात यांच्या सीमा ओलांडून केवळ सद्धर्म आणि सदाचार यांवर भर देणारा मार्ग आठव्या शतकाच्या सुमारास होऊन गेलेल्या सिद्धांनी रूढ केला. याच परंपरेचे पुनरुज्जीवन नाथपंथाने केले आणि या विचारांचा प्रसार भारतभर केला.मराठी साहित्याच्या प्रारंभ काळात नाथपंथाचे आदर्श संत कवींपुढे होते. त्यामुळे हेच मध्यवर्ती सूत्र त्यांच्या साहित्यात आढळेल. संत एकनाथांच्या काव्यात हीच भूमिका भारुडादिकांच्या रुपात आणि मराठी व 'हिंदी' या दोन्ही भाषांतून मांडण्यात आली आहे. याच सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे पडसाद सूफींच्या दखनी साहित्यात आढळतात. 'सबरस' (१९३६) या ग्रंथातील पुढील विचार उपरोक्त विचारधारेचे निदर्शक वाटतील:

'सद है मुर्शिद है. मुसलमानों में पीर-मुर्शद होएगा.. हिन्दुओं में जेगम
सद होएगा. हम हिन्दू तुज ते बात पाकर मानेंगे. हम मुसलमान तुजे
बडाकर जायेंगे. एक कलमे का फर्क है. बाकी खुदा की वहदियत में
हिंदू मुसलमान गर्क है.' —सबरस, १०

'हिंदू आणि मुसलमान हे दोन धर्म नावांनी भिन्न असले तरी या धर्मांना अभिप्रेत असलेल्या परमात्मा एकच आहे.'- असा वरील उताऱ्याचा भावार्थ आहे. 'परमेश्वर नावाने न ओळखता त्याच्या गुणांवरून तो ओळखावा अशी ओळख ज्यांना पटलेली असते तो उपासकांना, मग तो कोणत्याही धर्ममताचा असो, सहज ओळखू शकतो. असे पुढे तो म्हणतो.

● *आशिक कूँ आशिक जानता। आशिक कूँ पछानता । (सबरस,७)*

संत तुकारामांच्या 'पाईक तो जाणे पाइकीच्या खुणा' या वचनाचे स्मरण वरील वाक्य वाचल्यानंतर सहज होण्यासारखे आहे.

अशीच विचारसरणी 'सबरस'च्या रचनेपूर्वी सुमारे ३७ वर्षे समाधिस्त झालेल्या एकनाथी भारुडांत आढळते. केवळ विचारच नव्हे तर नाथांची लयबद्ध गद्यशैली देखील 'सबरस' मध्ये उतरलेली आहे. एकनाथांची सर्वच 'हिंदी' भारुडे आणि विशेषत: "हिन्दू तुर्क-संवाद' दखनी साहित्यातील विचारसरणी आणि भाषाशैली यांच्याशी तुलना करून पाहता येतील. 'हिन्दू-तुर्क-संवाद' या भारुडाचा प्रारंभच मुळी 'प्राप्ती एक भजन विरुद्ध ।दोहींच्या संवाद परिसावा' असा आहे. या संवादातून 'परमेश्वर सर्वव्यापी आहे एकदेशी नाही' असा निष्कर्ष निघतो'-

● *तुरुक कहे वो बात सही। खुदा कूँ तो जात नहीं*
बंदे खुदा कूँ नहीं जुदाई । ये कहा रसुलिल्ला परदे ॥
-सर्वधर्म ज्याचा निमाला ।मनोधर्म तुरके ऐकिला
आनंद परमा जाहला । मंत्र केला उपदेश ॥
एकनाथ गाथा, क्र. ३९७०

अनुक्रमणिका

या भारुडात 'परमार्थाचा बोध उघडा आहे' असे एकनाथ नमूद करतात.

सर्वधर्म – समन्वय

सर्वधर्म समन्वयाचा उपदेश करणारी भारुडे एकनाथी रचनेत अनेक आहेत. ती बहुतेक तथाकथित हिन्दी भाषेत आहेत. (वस्तुत: या भारुडांची भाषा हिंदी नसून दखनी आहे.) [१७] भाषेच्या दृष्टीनेही ही भारुडे अभ्यासण्याजोगी आहेत. 'गारुडी' या भारुडाच्या आदी-अंती 'निरंजना'चा उल्लेख येतो. तसाच 'नानक'या भारुडातही तो आला आहे. [१८] निरंजनाच्या प्रतीकासंबंधी अगोदर सांगण्यात आलेच आहे. ती पार्श्वभूमी ध्यानात ठेवून एकनाथी भारूडातील काही निष्कर्ष बरेच अर्थपूर्ण वाटतील. तत्कालीन युगधर्माचे ते वाचक आहेत.

- *सब घट सों विराजित महम्मद – हबसी, पृ. ४१०*
- *हजरत मौला, सब दुनिया का पालनवाला*
- *एकाजनार्दनी निजबत अल्ला। असल वोही विटपर खडा।।*

  -फकीर, पृ. ४१०

वर दिलेला उताऱ्यात तर नाथांनी 'अल्ला' ला 'विटेवर' उभे केले आहे; पांडुरंग आणि अल्ला यात अभेद मानला आहे. 'मुंडा' या भारुडात विश्वी विश्वंभर असल्याचे प्रतिपादन आहे-

● *गुरुका मुंडा बडा गुंडा चीप की करे बात ।*
सुननेवाले बहरे बाला हिन की करे रात।।
सोही मुंडा जेणें आपरूप धुंडा ।
और क्या कहूँ ज्यादा चारों वेद मुंडा।।
अपनी अपनी राह चले दिल कूँ करे पाक।
खलक म्याने भरिये खुदा, नही जुदा कोय ।। एकनाथ गाथा, ४१५

एकनाथी भारुडे हिंदीत आहेत असा गैरसमज आहे तसाच ती पद्यबद्ध आहेत ही समजूतदेखील अवास्तव आहे. एकनाथी भारुडे दखनी भाषेत असून ती लयबद्ध गद्यात आहेत. 'सबरस' या दखनी ग्रंथात अशाच प्रकारचे लयबद्ध गद्य आढळते. [१९] सोळाव्या, सतराव्या शतकात अशा प्रकारची गद्यशैली अस्तित्वात असावी. नाथांची दखनी भारुडे या शैलीचे प्रातिनिधिक आहेत. उत्तर काळातील सबरस हा या शैलीचे अनुसरण करणारा ग्रंथ आहे. ग्रंथांच्या शेवटी जोडलेल्या दुसऱ्या परिशिष्टात 'बाजेगरी' या भारुडाचा काही भाग व 'सबरस' मधील एक अवतरण दिले आहे. त्यावरून तुलनात्मक अभ्यास करता येईल. प्रचलित असलेल्या युगधर्माची कल्पना सिद्ध- संतांनी पुरस्कृत केल्याचे सिद्ध करणारी काही अवतरणे तिसऱ्या परिशिष्टात गोरखनाथ ते कबीर आणि समर्थ रामदास यांच्या दखनी साहित्यातून दिली आहेत, त्यावरून या संतांच्या व सिद्धांच्या वैचारिक एकात्मतेची कल्पना करता येईल.

दखनी साहित्यात आलेल्या सर्वधर्मसमभावाच्या आधाराने शोध घेता ही विचारसरणी गोरखनाथांच्या काळापासून चालत आली आहे असे निदर्शनास येते. दुसरी महत्त्वाची बाब या निमित्ताने निदर्शनास येते तीही तितकीच महत्त्वाची आहे. दखनी साहित्य केवळ फारसी लिपीत निबद्ध होते असे नसून मराठी संतांनीही या भाषेत कवने रचली आहेत. त्यासाठी लिपी मात्र नागरी योजलेली आहे. मराठी भाषेव्यतिरिक्त दखनी

भाषेतूनही कवने रचण्याची परंपरा संत नामदेवांच्या काळापासून तुकाराम-रामदासांच्या काळापर्यंत चालत आलेली आहे. तात्पर्य एवढेच की दखनी भाषेतील साहित्य नागरी आणि फारसी या दोन्ही लिप्यांतून रचण्यात येत असे. फारसी लिपीत लिहिण्यात आलेल्या साहित्यापूर्वीच नागरी लिपीतील दखनी साहित्याची रचना झालेली आहे.

संदर्भ

१. दकन का नई ठार संसार में। पंच फाजिलोंका है इस ठार में। दकन हैं नगीना अंगूठी है नग । अंगूठी में हुरमत नगीना हैं। लग दकन मुदक कूँ धन अजब साज हैं। के सब मुल्क सार और दकन ताज हैं । दकन मुल्क मोतीच खासा आहे ।। - कुतुब मुश्तरी

२. दकने में ज्ये दकनी मीठी बात का । अदा नई किया कोइ इस धात का जो आकिल है वो बात माने वही । दिवाना हूँ मैह इस रंगीन बात का ।। -कुतुब मुशतरी, १६

३. राम जैसा साहेब आवे तो हनुमंत पैदा होये – सबरस, १०५

४. राम जो जानकर रावनपर आवे, घर के भेदी ते लंका जाये- सबरस, ५०

५. सद्र बिघाये पाँचे रंबा उर्वसी मेनका पात्राँ नाचे.

६. हर यक लटचली लहू की भरपूर सूँ भरे मांग में भुई के सिंदूर यूँ।।३००

७. गले भा के आँतडियाँ के खुश जात वे टिळे लाके कबे बऱ्हेमन हुवे ।।

८. जो आसमाँ ते सूर का बरमन (ब्राह्मण)। चला गुर्ब गंगा में संद्या करन । बखुबी चंदर निर्मला नामदार । जो मशरिक की देवल ते निकला भार।। - तोती, २०४

९. पहला तूँ ये खाकी तन, हुजा बातिन मुमक्नीन मन तिजा गैबी, चौथा जान, नूर निरंजन करे पछान – कदीम उर्दू, ३१३.

१०. 'अल्ला, निरंजन, हरि, निर्गुण निराकार परमेश्वर हे सर्व एकच असून सर्व वस्तुजातामध्ये त्याचे गुण दाटले आहेत, मग ती गंगा – यमुना असो वा गोदावरी.'

११. हिन्दी काव्य में निर्गुण भक्तीधारा, पृ. ९ ते १२

१२. दोहाकोश, पृ.३०

१३. नाथ निरंजन आरती गाऊं, गुरुदयाल आग्या जो पाहूँ जहाँ अनन्त
सिधां मिले, आरती गाई जहाँ जम की बाव व बैगी आई – गोरखनाथ
देवल देवल फेरी देही । नाम निरंजन कवहुँन लोही ।। - कबीर

संक्षिप्त संत सुधासार, पृ. अनुक्रमे १९,५२

१४. कहीं अल्ला कहीं सोहं कलाया । सरीहन् इस्तला का भेद पाया । गर्ज हरनामसे परनाम कीजिये । बहरसूरत इसी का नाम लिजिये वही अल्ला, वही सोहं हरीनाम ।है यक महबूबके जिस के नाम ॥

१५. मुलक के बीच मेरा है फेरा । पिरीत का है दर्द मुंज में घईरा ॥

१६. कही बांध तागा बऱ्हेमन कलाते । कँही गाय पूजे कँही काट खाते । कँही दार चडकर तो कते 'अनलहक्' । कँही बज्मे सूफां में पाक आशिक।

१७. या विषयीचे अधिक विवेचन पुढे आले आहे. दखनी भाषेचा पहिला कवी संत नामदेव आहे हे पुढच्या एका प्रकरणात प्रस्थापित करण्यात आले आहे.

१८. चल चल चल । निरंजन जंगल का आया
-निरंजन जंगल से बडा बाघ आया है । - एकनाथ गाथा, पृ. ४०९
-अलख निरंजन नानक आया । नेकी करता अच्छा है ॥ एकनाथ गाथा, पृ. ४१२

१९. माझे एक जेष्ठ स्नेही कै. श्री. बंशीधरजी विद्यालंकार यांनी 'सबरस' पद्यबद्ध असल्याचे मत एका परिसंवादात मांडले होते. या ग्रंथाची पद्यमय पुनर्रचना त्यांनी केली होती. त्यातला काही भाग त्यांनी मला वाचून दाखविला होता. हा ग्रंथ प्रकाशित झाला किंवा नाही याची माहिती मिळत नाही.

२०. श्री. देविसिंग चौहान यांनी दखनी भाषेसंबंधी मराठी व हिंदी या दोन्ही भाषांतून लेखन केले आहे. त्यांची सर्वच मते मान्य होण्यासारखी नसली तरी दखनी साहित्यातील (फारसी लिपीतील) वातावरण पूर्णपणे भारतीय आहे असा निर्वाळा त्यांनी दिला आहे. 'दक्खिनी साहित्य प्राचीन भारतीय सांस्कृतिक व धार्मिक परंपरेस धरून निर्माण झाले आहे. त्यामध्ये फारसीची छटा खात्रीने आहे तरीही त्यामुळे या साहित्याच्या भारतीयतेला कसलाही उणेपणा आलेला नाही.' – मराठी आणि दक्खिनी हिन्दी, पृ. २४५

अनुक्रमणिका

४. शोध उगमस्थानाचा

काही शंका

दखनी साहित्याची फारसी लिपी, सूफी संप्रदायाचा या साहित्यातून झालेला प्रसार आणि अरबी-फारसी शब्दांचा या भाषेत असलेला भरणा, शिवाय, धर्माने मुसलमान असलेले लेखक, ही सारी प्रभावळ लक्षात घेता ही भाषा अरबी-फारसी भाषांपासून उत्पन्न झाली असावी असे मानण्याकडे अभ्यासकाच्या मनाचा कल झुकतो.

सूफींच्या दखनी साहित्यात आढळून येणारे भारतीय वातावरण आणि संत – सिद्धांच्या वैचारिक भूमिकेचा दखनी लेखकांनी आपल्यापरीने केलेला पुरस्कार या बाबी लक्षात घेतल्या म्हणजे मात्र भारतीय भाषांपासूनच दखनी भाशा उत्पन्न झाली असली पाहिजे असे त्याला वाटू लागते.

-तरीही लेखनासाठी योजण्यात येणारी फारसी लिपी अरबी –फारसी शब्दांचा भरणा सूफींची अभारतीय तत्त्वप्रणाली अशा बाबी या भाषेच्या उगमासंबंधी काही शंका निर्माण करतातच.

या शंकाचे निराकरण करता येते किंवा नाही हे इथे पाहिले पाहिजे.

अरबी-फारसी शब्दांचा भरणा दखनी भाषेतच आहे असे नाही. सर्वच आधुनिक भारतीय भाषांत कमी-अधिक प्रमाणात अरबी-फारसी शब्द आढळतात. त्याचे कारण राजकीय आहे. भारतात दीर्घ काळ मुसलमानी राजवट होती. या राजवटींची राजभाषा फारसी होती. त्यामुळे सर्वच देशी भाषांवर राजभाषेचा परिणाम कमी-अधिक प्रमाणात होणे अपरिहार्य होते. दक्षिण भारतात त्या मानाने मुसलमानी राजवट फार काळ नव्हती. तरीही आजच्या दाक्षिणात्य भाषांतही अरबी-फारसी शब्द प्रचलित आहेत. सोळाव्या शतकात मराठी किती फारसीमय झालेली होती याची साक्ष संत एकनाथांच्या काही भारुडांतून मिळते. मराठी ऐतिहासिक कागदपत्रांतही फारसी शब्द विपुल प्रमाणात आले आहेत.सूफी तत्त्वज्ञानाचे मूळ ग्रंथ फारसी भाषेत असल्याकारणाने या तत्त्वज्ञानाचा प्रसार करणाऱ्या साहित्यात फारसी शब्द अपरिहार्य ठरतात; तरीही दखनी साहित्यातील अरबी-फारसी शब्दांत एक विशेष आढळतो. तो म्हणजे अरबी व फारसी या दोन्ही भाषांत पारंगत असलेल्या साहित्यिकांनी दखनी भाषेतील लेखनात अरबी-फारसी शब्दांची अपभ्रष्ट रूपे योजली आहेत. लिपी फारसी असल्याने हे शब्द मूळ स्वरुपात लिहिणे अशक्य नव्हते. तथापि, प्रचलित भाषेत अरबी-फारसी शब्दांचे अपभ्रंश रूढ असल्यामुळे त्यांच्याकडून साहित्यातही याच रुपांस स्थान मिळाले असावे.

तरीही काही प्रश्न उद्भवतातच. १. मराठी व अन्य प्रादेशिक भाषा त्या काळात साहित्याच्या दृष्टीने समृद्ध असतानाही तिसऱ्याच एका भाषेचा उपयोग या संतांनी पंथप्रसारार्थ का केला? २. ही तिसरी भाषा समाजाची बोलीभाषा होती काय? असल्यास महाराष्ट्राच्या परिसरात ती केव्हापासून प्रचलित होती? ती का प्रचलित झाली? कोणत्या भाषेतून आणि कोणत्या काळात ती उत्पन्न झाली? ३. ही तिसरी भाषा भारतीय भाषांपैकीच एक होती. म्हणजे तिचे लेखन नागरी लिपीत होत असले पाहिजे. तरीही सूफी साहित्य फारसी लिपीतून निबद्ध का झाले? ४. कोणत्या काळात हे घडले?

या प्रश्नांच्या उत्तरांत दखनी भाषेचे मूळ कळून येण्याचा संभव आहे.

फारसी लिपीतील दखनी साहित्याची भाषा अगदी प्रारंभकाळापासून प्रौढ अवस्थेतील भाषेसारखी वाटते. याचा अर्थ ही भाषा सूफींची ग्रंथभाषा बनण्यापूर्वी प्रचलित असली पाहिजे. सूफी साहित्याचे लेखन होण्यापूर्वी म्हणजे पंधराव्या शतकाच्या अगोदर ती साहित्याची भाषा या नात्याने रूढ असली पाहिजे.

दखनी भाषेच्या सर्वांगावर मराठी भाषेचा दाट प्रभाव असल्यामुळे दखनी भाषा मराठी भाषेच्याच साहचर्याने वाढलेली असावी असे निश्चितपणे सांगता येते. या भाषेचे स्वरूप, तिच्या अस्तित्वाचे कारण आणि तिचा उदय -विकास यांचा मराठी साहित्य आणि संस्कृती यांच्याशी निकटचा संबंध असला पाहिजे.

मराठी साहित्याच्या इतिहासात यासंबंधी काही माहिती मिळते की काय याचा तपास काढला पाहिजे.

दखनी नाथपंथ आणि मराठी साहित्याचा इतिहास

मराठी साहित्याचा प्रारंभ १० व्या शतकाच्या आसपास झालेला असला तरी या साहित्याचे निर्मिती-सातत्य तेराव्या शतकापासून आढळते. संत ज्ञानेश्वरांनी प्रवर्तित केलेला भागवत वा वारकरी संप्रदाय आणि सर्वज्ञ श्रीचक्रधरांनी प्रस्थापित केलेला महानुभाव पंथ या दोन संप्रदायांमुळे मराठी साहित्यास समृद्धी लाभली. संत ज्ञानेश्वर हे नाथपंथाचे दीक्षित होते.त्यांनी भक्तिपर वारकरी संप्रदायाचे प्रवर्तन केलेले असले तरी नाथपंथाच्या अनेक खुणा संत ज्ञानदेवांच्या साहित्यात आणि वारकरी संप्रदायाच्या तत्त्वप्रणालीत आढळतात.गुरुपरंपरेची एक खूण म्हणून असेल कदाचित तेराव्या शतकापासून ते सतराव्या-अठराव्या शतकापर्यंत होऊन गेलेल्या अनेक संतांनी मराठी खेरीज ‘हिन्दी’ सदृश भाषेतून सातत्याने रचना केलेली आहे. तेराव्या शतकातल्या वारकरी संतांच्या रचनांचे ‘गोरखवाणी’च्या भाषेशी या रचनांचे जवळचे नाते असल्याने नामदेवादिकांची रचना सिद्धवाणीतून परिणत झालेल्या भाषेसारखी दिसते. या रचनांत सातत्य असल्याने फारसी लिपीतून सूफींनी ग्रंथरचना केली त्यावेळी ही भाषा अस्तित्वात होती. काही सूफी संतांनी ‘दखनी’ असे या भाषेचे नामकरण केलेले असले तरी मुळात नाथसंप्रदायाच्या प्रभावातून प्रसृत झालेली ही भाषा होय.

या संबंधीचे सविस्तर, सोदाहरण विवेचन ‘साहित्यसेतू’ या माझ्या ग्रंथात आलेले आहे. तथापि विषयाच्या परिपूर्णतेसाठी इथे ते थोडक्यात देतो.

तेराव्या शतकातील महाराष्ट्रात नाथसंप्रदायाचा आणि त्या संप्रदायाच्या वाणीचाही प्रसार केवळ शिष्ट समाज आणि मुमुक्षुवर्ग यांच्यापुरता मर्यादित नव्हता. समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत नाथपंथी जोग्यांसंबधी अत्यंत आदराची भावना होती. ‘लीळाचरित्रात’ आलेल्या अनेक कथांतून या धारणेस पुष्टी मिळते. या ग्रंथाचे संकलन तेराव्या शतकात झाले आहे. श्रीचक्रधरांचा संचार ज्या ज्या भागात झाला त्या त्या भागात हिंडून श्रीचक्रधरांशी ज्या ज्या व्यक्तींचा संबंध आला त्या त्या व्यकीस भेटूल म्हाइंभट्टाने अत्यंत परिश्रमपूर्वक या लीळा गोळा केल्या आहेत. या लीळांचे अध्ययन केले असता असे आढळते की, जनमानसात नाथपंथीय साधुसंतासंबंधी अत्यंत आदर होता. स्वत: श्रीचक्रधरांना नाथपंथीय साधु आदरणीय वाटत. कित्येक नाथपंथीय जोग्यांच्या कथा त्यांनी स्वतः सांगितल्या आहेत. नाथपंथीयांनी लोकजीवनात बरेच महत्त्वाचे स्थान संपादले होते असे या कथांवरून स्पष्ट होते. या बैराग्यांची भाषा मराठी नव्हती. परंतु हे जोगी

जी भाषा बोलत ती लोकांच्या परिचयाची होती, सामान्य माणसांना ती सहजगत्या समजत असली पाहिजे. तसे नसते तर एका व्यापक क्षेत्रात नाथपंथाचा प्रसार करण्यात या साधुसंतांना यश आलेच नसते.

श्रीचक्रधरांनी अनेक सिद्धांच्या कथा आपल्या शिष्यांना सांगितल्या आहेत. लुईपा, कान्हपा, जालंधरी, गोरखनाथ, चौरंगीनाथ [१] इत्यादिकांच्या कथा लीळाचरित्रात आल्या आहेत. या कथा बहुतेक चक्रधरोक्त आहेत. गोरखनाथ आणि त्याची वाणी यांच्या संबंधीचा आदरभाव तर त्यांनी अनेक प्रसंगांच्या निमित्ताने व्यक्त केला आहे. [२] स्वतः एका पंथाचे प्रवर्तक असूनही श्रीचक्रधरांनी एका नाथ जोग्याला अर्ध्या आसनावर बसवून व त्याला स्वहस्ते टीळा लावून त्याचा गौरव केला. [३] एका शिष्याने 'गोरक्षु' म्हणून आपल्या भिक्षापात्राची पूजा केल्याचे श्रीचक्रधर सांगतात. [४] वैराग्य आणि सौंदर्य यांचा आदर्श म्हणजे गोरखनाथ अशी श्रीचक्रधरांची धारणा होती. 'गोरक्षदि अनंत सिधु ते गेले' आता मात्र नाथपंथाला अवकळा आली असून तो लवकरच नष्ट होईल अशी खंतही श्रीचक्रधर व्यक्त करतात. [५] एका नाथपंथी जोग्याचा वेष धारण करून श्रीचक्रधरांनी एक चौपदी गाइल्याची कथा लीळाचरित्रात येते. मूळ लीळा अशी:

- *'तेथ जोगियाची गलकंथा, खापरी, काठी अंधारी होती: ते देखिली:*
गोसावी चौकी वस्त्रे ठेविली: विभूती श्रीमुख माखिले:
भस्म अंगी लाविले: गळकंथा घातिली : एके श्रीकरी खापरी :
एके काठी घेतिली आणि गोसावी उभे ठेले मग म्हणितले :

कर धरि खापर भिक्षापात्र भस्म विधूलित विलसित गात्र :
नित्य चल चित्त मंद मंद मनसो विगलित गात्र :
परमानन्द : परमानन्द : मन भूलि रे मन भूलि रे ॥
सर्वज्ञे भणितले बाई मागील सीध एणें वचनें भिक्षा करिती. [५]

धनाश्री रागातील आणखी एक चौपदी श्रीचक्रधरांनी गाइल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. [६] सिद्धांची वाणी तेराव्या शतकातील महाराष्ट्रात परिचयाची होती असाच अर्थ या उल्लेखांतून निघतो. धनश्री रागातील ही चौपदी अशी:

- *गोरक्षु हो सुखि बंधी स्थीर होइ*
मूळस्थानीं भीडू बांधो हो जोइ
जेवि न कालु कलाइ
गुरुवचनें वाडीएनां बंधो जेवि न चंचल होइ॥धृ॥
पांचै पंचाएन पांचै जन हो : धरंति आतां आनि स्थानीं
उन्मनी कारणें नीज मुनी लीन : ते मारिलें निज स्थानीं
पवनु परी हो मन स्थीर करो हो
चंद्रा मेलाओ भानु : आयागमन ये हुई निवारौ
बुधि राखै आपणां
भाटी जाति निवारो हो : भीडे वायो न जाइ
आखै निरांजनी लो करो हो भाव अभाव न होइ ॥

आणखीही एका प्रसंगाच्या निमित्ताने श्रीचक्रधरांनी चौपदी गाइल्याचे वर्णन लीळाचरित्रात आले आहे. या चौपदीची भाषा देखील मराठी नसून गोरखवाणीच्या भाषेसारखी आहे. [७]

सिद्धांच्या वाणीसंबंधाने श्रीचक्रधरांना किती आदर होता याचे प्रत्यंतर दुसऱ्या एका प्रसंगावरून मिळते. एका शिष्येने श्रीचक्रधरांच्या स्तवनपर चौपद्या रचल्या व ती त्या गाऊ लागली असताना श्रीचक्रधरांनी तिला थांबविले : 'हे नाथवाणी : हे सिद्धवाणी नाथवाणी ते निकी : नाथवाणी गाओए : तैसें येथिंचें गावो नैयै. [८] 'सिद्धांच्या वाणीत सिद्धांचे स्तवन करावे माझ्या सारख्यांचे नव्हे' असा या वचनाचा भावार्थ आहे. [९]

या काळात अनेक सिद्धांनी रचलेल्या चौपद्या आज उपलब्ध नसल्या तरी नाथपंथाचे खंडन करण्यासाठी महानुभाव कवी दामोदर पंडित याने रचलेल्या मराठी भाषेतील व सिद्धवाणीतील चौपद्या उपलब्ध आहेत. त्यावरून नाथसिद्धांची वाणी साहित्याची प्रतिष्ठा पावली होती असा निष्कर्ष निघतो. साधुसंतांच्या उपदेशाची आणि अध्यात्म-विवरणाची भाषा या नात्याने नाथवाणीस तेराव्या शतकातील महाराष्ट्रात साहित्याची प्रतिष्ठा लाभलेली होती. जनसामान्यास या वाणीचा बोध होत असे असा निर्वाळा या विवरणाच्या आधाराने देता येतो.

दामोदर पंडिताने नाथपंथाच्या मताचे खंडन करण्यासाठी चौपद्या रचल्या याचा अर्थ हा पंथ त्याकाळी बराच प्रभावी असला पाहिजे. महानुभाव तत्त्वज्ञानाशी या पंथाचे तत्त्वज्ञान सुसंगत नसल्यामुळे खंडनाची आवश्यकता या पंथास भासली असावी. दामोदर पंडिताने या चौपद्या १२३४ च्या आसपास रचल्या. ६० चौपद्यांपैकी ३५ चौपद्या मराठी भाषेत असून २५ चौपद्या नाथवाणीत आहेत. चौपद्यांवरील एका भाष्यात या रचनेचा उद्देश पुढील प्रमाणे संगितला आहे 'नाथवाणी प्रशंसिली आणि चौपदीही गाइली म्हणौनि ते प्रमाण करून पंडितबांसी ते भाषा प्रधान करून चौपदिया केलीया : तयाची प्रशंसा भट्टोबासीं... एवं ते वोवी चौपदी परम प्रमाण स्मृतिरूप बोलिजे.' [१०]

भाष्यकाराने केलेल्या प्रस्तावात नाथवाणीची प्रशंसा आली आहे व प्राधान्याने नाथसिद्धांच्या वाणीत चौपद्या रचल्या आहेत या दोन गोष्टी अगदी स्पष्ट केल्या आहेत. त्यामुळे दामोदर पंडिताने काही अमराठी चौपद्या नाथसिद्धांच्या भाषेत रचल्या आहेत हेही शंकातीत ठरते.

श्रीचक्रधर आणि दामोदर पंडित यांनी कारणपरत्वे नाथसिद्धांच्या वाणीचा आश्रय केलेला होता. तरी या भाषेतील साहित्याची परंपरा महानुभाव पंथात आढळत नाही. नाथसिद्धांची वैचारिक भूमिका आणि साहित्य- परंपरा यांचा वारसा खऱ्या अर्थाने पुढे चालविला तो महाराष्ट्रातल्या वारकरी संप्रदायाने. या संप्रदायाचे प्रवर्तक संत ज्ञानेश्वर यांची गुरुपरंपरा नाथपंथाशी संलग्न आहे. गीत- कीर्तनांतून भागवत संप्रदायाचा प्रसार करणारे ज्ञानेश्वर – समकालीन नामदेवही गुरुपंरपरेच्या दृष्टीने नाथपंथीय ठरतात. त्यांनी मराठी भाषेत अभंग-आख्याने रचली तशीच नाथसिद्धांच्या वाणीत त्यांनी रागदारीतील पदेही रचली आहेत. संत नामदेवांचे व्यक्तिमत्त्व आणि साहित्य एवढे प्रभावी होते की महाराष्ट्राबाहेरच्या प्रदेशांतही त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन अनेक संतांनी काव्य –निर्मिती केली. संत कबीर आणि सद्‌गुरू नानक यांचे स्फूर्तिस्थान संत नामदेव होते. दादू दयाल या संताने व त्यांच्या शिष्यपरंपरेने केलेल्या संतवाणीच्या संकलनात नामदेवांच्या वाणीस अग्रक्रम देण्यात आलेला आहे. संत नामदेवांच्या पूर्वीचे 'हिंदी' भाषेतील साहित्य उपलब्ध नसल्याने नामदेवांनाच आद्य हिंदी कवीचे स्थान देण्यात येते.

अनुक्रमणिका

संत नामदेवांनी साहित्य- रचनेसाठी स्वीकारलेल्या नाथवाणीचा वारसा सुमारे दीड-दोन शतकांनंतर उत्तर भारतात वाढीस लागला, तसाच तो महाराष्ट्रातही कालपरत्वे संस्कारित होऊन अखंडितपणे चालत राहिलेला आहे. मराठी शहिरांच्या 'हिंदी' गौळणी याच परंपरेच्या निदर्शक आहेत.

सारांश, पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात सूफीसंतांना देशी भाषेतून साहित्य निर्माण करण्याची निकड भासली त्यावेळी नाथवाणीतून परिणत झालेली भाषा साधु-संतांच्या कवनांची व अध्यात्मिक चर्चेची भाषा या नात्याने प्रचलित होती. या भाषेत साहित्य-रचनाही झालेली असल्याने सूफी संतांनी हीच भाषा आपल्या पंथाच्या प्रसारार्थ साहित्य-लेखन करण्यासाठी निवडली. जनसामान्यांची मातृभाषा मराठी असली तरी नाथसिद्धांना समाजाच्या सर्वथरांत लोकमान्यता होती. त्यांची वाणी समाजाला परिचयाची होती. या सर्व बाबी लक्षात घेऊन सूफींनी नाथसिद्धांच्या वाणीतून परिणत झालेली व महाराष्ट्रात प्रचलित असलेली भाषा आपल्या साहित्याचे माध्यम या नात्याने स्वीकारली. फरक एवढाच की या भाषेच्या लेखनार्थ योजण्यात येणारी नागरी लिपी सूफींना आत्मसात न करता आल्यामुळे त्यांनी स्वत:च्या परिचयाच्या फारसी लिपीत हे साहित्य निबद्ध केले. भारतीय भाषा आणि अभारतीय लिपी असा संगम या साहित्यात आढळतो.

हीच भाषा पुढे दखनी भाषा या नावाने ख्याती पावली. नाथसिद्धांची वाणी अशा रीतीने दखनी भाषेचे उगमस्थान ठरते.

वैचारिक क्रांती आणि नव्या भाषा

प्रश्न उरतो एवढाच की ही तिसरी भाषा अथवा सिद्धवाणी महाराष्ट्रात का रूढ झाली?

वेदकालापासून भारतात निरनिराळ्या भाषा उदयास आल्या तशा अत्यंत प्रगत भाषाही अस्तंगत झाल्या. नव्या भाषांचा उदय भाषेच्या स्वभावधर्मानुसार घडत असला तरी प्रामुख्याने वैचारिक परिवर्तनाशीही तो संबद्ध असतो असे इतिहास सांगतो.

समाजातील प्रस्थापित आणि विस्थापित यांच्यामधील दरी वाढत गेली म्हणजे प्रस्थापितांची शिष्टभाषा आणि त्या भाषेतून व्यक्त होणारे विचार समाजाचे मार्गदर्शन करण्यास असमर्थ ठरतात. विस्थापितांच्या विकासासाठी होणारे वैचारिक आंदोलन लोकभाषांच्या द्वारे प्रसार पावत असते. या प्रक्रियेत लोकांच्या बोलीस महत्त्व येते. कारण, सामान्यांच्या आकांक्षांची अभिव्यक्ती बोलींतून होत असते. लोकभाषा आणि प्रादेशिक बोली यांतून साहित्यनिर्मिती होऊ लागते ती वैचारिक आंदोलन दृढ करण्याच्या हेतूने. या कार्यकारण – परंपरेतून नव्या भाषा उदयास येत असतात.

जैन आणि बौद्ध या पंथांनी वैदिक परंपरेविरुद्ध बंड पुकारल्यानंतर पाली व अन्य प्राकृत भाषांना महत्त्व आले. या बोलींतून त्या त्या पंथाने साहित्य –निर्मितीही केली. त्यामुळे शिष्टेतर समाजात नव्या विचारांचा प्रसार होऊ शकला. नव्याने उदयास आलेली प्रत्येक भाषा ही तत्कालीन समाजातील विस्थापितांची बोली होती. या विस्थापितांना तत्कालीन समाजरचनेत आणि धर्मव्यवस्थेत देखील मानाचे स्थान नव्हते. शिष्टांनी घालून दिलेल्या मार्गाचे अनुसरण एवढाच त्यांचा 'धर्म' होता. जीवितसाफल्यास आवश्यक असलेल्या साधनेच्या वाटा त्यांच्यासाठी बंद होत्या. त्यांच्या बोलींनाही साहित्याची प्रतिष्ठा नव्हती. या परिस्थितीतून वाट काढण्यासाठी व सामान्यांना जीवित- साफल्याचा मार्ग खुला करण्यासाठी वेळोवेळी

जी वैचारिक आंदोलने झाली त्यांतूनच पाली आणि प्राकृत भाषेचे प्रादेशिक भेद या भाषांचा उदय झाला. या भाषांतून साहित्यनिर्मितीही होऊ लागली.

वैदिक परंपरेप्रमाणेच अवैदिक पंथांत देखील कर्मठता प्रभावी ठरल्यानंतर या पंथांची विकासक्षमता अवरुद्ध झाली. 'कहनी 'आणि 'करणी' यांत अंतर पडल्याने दांभिकता वाढीस लागली. या परिस्थितीविरुद्ध सिद्धांनी बंड उभारले आणि चित्तशुद्धी व सदाचार यांना प्राधान्य असलेल्या नव्या धर्माचा पुरस्कार केला. नवविचारांचा प्रसार झाला तो लोकांच्या बोलीतून. या नवजागरणाने अपभ्रंश बोलीतून साहित्यरचनेस प्रोत्साहन मिळाले. अपभ्रंश ही पुढे साहित्याची स्वतंत्र भाषा बनली.

सिद्धांच्या परंपरेनंतर बराच काळ संक्रमणावस्थेत गेला. या काळात नाथपंथाने भारतभर संचार करून सर्वजनसुलभ असा धर्ममार्ग उपदेशिला. या पंथाने ध्यान-योग किंवा हठयोग यावरही भर दिलेला होता. परंतु तो सामान्यांसाठी नव्हे तर समर्थांसाठी. सामान्यजनसुलभ मार्गाचा उपदेश नाथपंथाने तत्कालीन लोकभाषेतून केला. ही भाषा अपभ्रंशोत्तर अवस्था दर्शविते त्याचप्रमाणे आधुनिक देशीभाषांच्या उदयाच्या काही पाऊलखुणाही या संक्रमणकालीन भाषेत आढळतात. 'मऱ्हाटीचे नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळु' करण्याची प्रेरणा ज्ञानदेवांना याच परंपरेतून लाभली. ज्ञानेश्वरांनी कर्मठतेवर केलेले कठोर प्रहार या संदर्भात विशेष अर्थपूर्ण ठरतात. दखनी भाषेच्या उत्पत्तिप्रक्रियेत सिद्ध साहित्यास विशेष महत्त्व आहे.

सिद्ध साहित्याविषयी अधिक माहिती

आज सिद्ध साहित्य या नावाने ओळखले जाणारे साहित्य एकाच पंथाचे नसून जैन, बौद्ध, शैव, शाक्त या पंथांनी रचलेले साहित्य देखील सिद्ध साहित्य या नावाने ओळखले जाते. या पंथांपैकी कित्येकांचे समाज प्रबोधन हे उद्दिष्ट होते. त्यामुळे हे पंथ लोकाभिमुख राहिले व अनेक प्रांतांतून त्यांचा संचार होत राहिला. अनेक प्रादेशिक भाषांतील शब्दांना त्यामुळे, त्यांच्या साहित्यात स्थान मिळाले. सिद्धांची तत्त्वप्रणाली भिन्न असूनही काही बाबतीत त्यांच्या उपदेशात एकसूत्रीपणा आढळतो- त्यात १. कर्मठता आणि जातिभेद यांचा निषेध आहे. २. सत्योपासना व सदाचार यांच्या द्वारा निर्गुण ब्रह्माची साधना सांगितली आहे. ३. दंभाचाराचा निषेध केला आहे. ४. 'कहनी' व 'करणी' यांमधील अविरोध अपेक्षिला आहे.

सिद्ध साहित्याची रचना आठव्या शतकापासून सुरू झाली. बाराव्या शतकापर्यंत ही रचना चालू होती. तद्नुसार आठवे शतके ते बारावे शतक हा सिद्ध साहित्याचा काळ मानावा या विषयी विद्वानांचे एकमत आहे. [११] विद्वानांचे मतभेद आहेत ते या साहित्याच्या भाषेसंबंधी. अपभ्रंश ही सिद्ध-साहित्याची भाषा आहे याविषयीही दुमत नाही. कोणत्या प्रादेशिक भाषेचा तो अपभ्रंश आहे या विषयी मात्र मतभिन्नता आढळून येते. डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांच्यामते तो शौरसेनी प्राकृताचा अपभ्रंश आहे. 'दोहा-कोशाचे' संपादक डॉ. बागची हे 'पश्चिमी अपभ्रंश ही सिद्धसाहित्याची भाषा आहे' असे मत देतात. तर अन्य विद्वानांनी आसामी, मगधी व मैथिली या भाषांची ती पूर्वावस्था मानली आहे. या विविध मतांत सत्याचा अंश असला तरी समग्र सत्य आहे असे म्हणता येत नाही. याचे कारण सांस्कृतिक आहे. सिद्धांचा संचार भारतभर होता. त्यामुळे अनेक प्रादेशिक भाषातील शब्द त्यांच्या साहित्यात आले आहेत. [१२] सिद्धांचा अग्रणी सरहपा (आठवे शतक) याच्या साधनेचा बराच मोठा काळ महाराष्ट्रात गेल्याची आख्यायिका आहे. या सिद्धाला महाराष्ट्रातच साक्षात्कार झाला असे सांगण्यात येते. त्यामुळे त्यांच्या साहित्यात मराठी वळणाचे शब्द अपरिहार्य ठरतात.

हा इतिहास लक्षात घेता सिद्ध साहित्याची भाषा केवळ 'अपभ्रंश' आहे एवढेच गृहीत धरणे इष्ट ठरते. ती कोणत्या प्रादेशिक प्राकृताचा अपभ्रंश आहे याचा निवाडा करता येणे दुरापास्त आहे. सिद्ध सरहपाचे हे कवन पहा.

● *एकेली सबरी ए वण हिण्डइ कर्ण कुण्डल वज्रधारी*
तिउण धाउ खाट पडिला सबरी महासुखें सेजि छाइली
सबरो भूजङ्गम पाइ रमणि दारि षेईल राति मोहाइलि [१३]

या कवनातील काही शब्द मराठी आहेत. तसाच 'रमणि दारि' हा प्रयोग गुजराती भाषेची पूर्वावस्था दर्शविणारा आहे. हे लक्षात घेऊन सिद्धांची भाषा अपभ्रंश आहे एवढेच गृहीत धरणे श्रेयस्कर वाटते. भारतभर ही भाषा समाजास समजत असली पाहिजे. त्यांच्या उपदेशाचा परिणाम त्यामुळेच समाजावर होऊ शकला.

सिद्ध साहित्यास प्रारंभ होतो तो सरहपाच्या साहित्याने. विस्थापितांचा कैवारी आणि बंडखोर असलेल्या या संताने धर्मसाधना ही परलोकाच्या प्राप्तीशी निगडित नसून इहलोकाशीच तिचा संबंध आहे असे मत प्रतिपादिले आहे. इहलोक आणि नरदेह या दोहोंना त्याच्या दृष्टीने अधिक महत्त्व आहे:

(१) 'याच देहात सरस्वती, गंगा, सागर, प्रयाग, इतकेच नव्हे तर चंद्रसूर्यही आहेत. क्षेत्रपीठ, उपपीठ, याच देहात आहेत. देहासारखे पीठ मी पाहिले नाही.' [१४]

'देह सांडावा न मांडावा । एणे परमार्थ साधावा' या संत एकनाथांच्या नरदेहविषयक भावांचे स्मरण करून देणारे हे कवन आहे.

'आत्मज्ञानेंवीण न तुटे बंधन' हा संताचा उपदेश पुढील कवनात प्रतिबिंबित झालेला दिसेल, वर्णभेदाचा निषेधही या गीतात ध्वनित झाला आहे.

(२) 'पवनाचा निरोध करून आत्म्याचा भेद करता येत नाही. नासाग्री दृष्टी लावून साध्य होणारा योगमार्ग अत्यंत कष्टप्रद असतो. अरे मूर्खा, तू आपल्या सहजस्वरुपात रमून जा. त्यासाठी तुला भवबंध व गंध यांचा त्याग करण्याची गरज नाही. मन चंचल तुरंगासारखे असते. पाप हा काही त्याचा स्थायी भाव नाही. निर्मळता हे मनाचे सहज रूप आहे. मनाच्या चंचलतेचा एकदा ऱ्हास झाला की, मानव सर्वच बंधनातून मुक्त होतो. सामरस्याच्या या अवस्थेत शूद्र, ब्राह्मण हे भेद उरत नाहीत.'

'मंत्रतंत्रांचा उपदेश करणारे गुरू अनेक असतात. परंतु ते सद्गुरू नव्हेत' असा उपदेश अनेक संतांनी केला आहे. सरहपानेही या बाबत इशारा देऊन ठेवला आहे :

(३) 'मंत्र म्हणून संत होता येत नाही. पडलेली भिंत कधी उभी राहते काय?फळाच्या दर्शनाने त्याचा आस्वाद मिळतो? वैद्याच्या केवळ दर्शनाने रोग कधी बरा झाला आहे? आत्मज्ञान जोवर होत नाही तोवर शिष्य करण्याच्या खटाटोपात पडू नये. एक आंधळा दुसऱ्या आंधळ्याला वाट कशी दाखविणार ? दोघांना विहिरीत पडण्यावाचून दुसरी कोणती गती मिळणार?'

सिद्धांच्या उपदेशाचे मध्यवर्ती सूत्र ध्यानात यावे या हेतूने सरहपाच्या काही प्रातिनिधिक कवनांचा अनुवाद वर दिला आहे. उत्तरकालीन संतसाहित्यातील निरनिराळ्या संप्रदायांतील संतांचे उपदेश याचा मध्यवर्ती सूत्रावर आधारलेले आहेत. त्यामुळे देशी भाषांतून उत्तरकाळात साहित्यरचना करणारे संत सिद्धपरंपरेचे वारसदार ठरतात.

दखनी साहित्यातील वातावरण व संस्कृती यांचा शोध घेताना 'निरंजन' या शब्दाच्या पाठीशी युगधर्माचे प्रतीक आहे असा उल्लेख मागे केला होता. 'निरंजना'ची मूळ धारणा सिद्धांची. सरहपाच्या कवनातून निरंजनाचा अर्थ कोणता निघतो ते पाहू:

(४) 'शून्य, निरंजन, परमपद हे स्वप्नोपम स्वभाव आहेत. भावात्मकता हा चित्ताचा स्वभाव जोवर नाश पावत नाही ते राहतील... जसे बिंब तसेच प्रतिबिंब पडते. जसा स्वभाव तसाच भाव उत्पन्न होतो. शून्य, निरंजन, परमपद हेही तसेच जाणावे. त्या ठिकाणी पाप आहे न पुण्य. पंच कामगुण-भोगाने निश्चित स्थिती प्राप्त होते. अशा रीतीने परमपदाची प्राप्ती होते. या विषयी अधिक बोलण्यासारखे काही नाही.'

परंपरागत धर्मात परलोकी लाभणारा स्वर्ग प्रधान बनलेला होता. मानवी शरीर आणि इहलोक यांकडे दुर्लक्ष होऊन देहदंड भोगून साधना करण्याकडे व प्रपंचाचा त्याग करण्याकडे धर्मोपदेशाचा कल अधिक होता. लोककल्याणाशी विसंगत असलेल्या या प्रवृत्तीचा निषेध करून चित्तशुद्धी व करुणाभाव यांवर आधारलेला सुलभ मार्ग सिद्धांनी सामान्य लोकांपुढे ठेवला.

या सुलभ मार्गाचाही कालांतराने विसर पडलेला दिसतो. धार्मिक अराजकाच्या अवस्थेतून समाजास मुक्त करण्यासाठी ११ व्या अथवा १२ व्या शतकात दुसरा एक महापुरुष उदयास आला. या सत्पुरुषाने अवकळाप्राप्त साधनमार्गांचे पुनरुज्जीवन करत कर्मयोगी जोग्यांचा पंथ संघटित केला. हा महापुरुष म्हणजे गोरखनाथ. गोरखनाथ हे नाथपंथाचे प्रवर्तक नव्हते. या पंथास कार्यक्षम रूप देणारे ते थोर संघटक होते. त्यांनी आणि त्यांच्या शिष्यप्रशिष्यांनी देशाच्या कान्याकोपऱ्यात संचार करून समाज- प्रबोधन केले. जागोजाग मठांची स्थापनाही त्यांनी केली. आपल्या विचारसरणीस स्थायी रूप देण्यासाठी त्यांनी लोकभाषेतून साहित्य –रचना केली. 'नाथवाणी' प्रगट झाली ती लोकजागरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी. सिद्ध सरहपाचा वारसा पुढे चालविताना नाथसिद्धांना सरहपाची भाषा जशीच्या तशी कायम ठेवणे शक्य नव्हते. गोरखवाणी ही 'सिद्धवाणीची' भाषेच्या दृष्टीने उत्तरावस्था आहे हे भाषावैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास केला असता सिद्ध होते.

सिद्ध साहित्याची भाषा अपभ्रंश होती हे वादातीत आहे. नाथसिद्धांच्या साहित्याच्या भाषेसंबंधी मात्र भिन्न मते व्यक्त झाली आहेत. वर्तमानकालीन देशी भाषांच्या उदयापूर्वी व अपभ्रंशोत्तर काळातील भाषेचे स्वरूप नाथसिद्धांच्या वाणीत आढळते याविषयी दुमत नाही. काही विद्वानांनी नाथसिद्धांसह सर्वच सिद्धांच्या भाषेस 'सधुक्कडी' अथवा 'संधाभाषा' असे नाव दिले आहे. सरहपादी सिद्धांच्या साहित्यातील भाषा अपभ्रंश असल्याने नाथसिद्धांनी आपल्या साहित्यात योजलेली भाषा 'संधाभाषा' आहे असे मानण्यास हरकत नसावी.डॉ. मंगबिहरीशरण सिन्हा यांनी 'संधाभाषेचे'स्वरूप विशद करणारा ग्रंथ लिहिला आहे व 'संधाभाषा' संबंधाने काही निष्कर्षही काढले आहेत. या निष्कर्षांपैकी 'भाषा तथा भाव दोनों दृष्टीयोंसे सिद्धों की संधाभाषा हिन्दी का आदिरूप प्रस्तुत करती है' (पृ. ३३९) हा निष्कर्ष पूर्णतया मान्य होण्यासारखा नाही.[१५] तथापि, 'या भाषेने सर्व भाषांतील शब्द अगदी सढळपणे घेतले आहेत.' त्यामुळे 'संधाभाषा' ही कोणा एका प्रदेशाची भाषा

ठरत नसून ती आपल्या काळातील एक मध्यवर्ती भाषा होती, हा डॉ. सिन्हा यांनी काढलेला निष्कर्ष मात्र सर्वमान्य होण्यासारखा आहे.[१६]

नाथपंथाविषयी थोडी अधिक माहिती

सिद्ध साहित्याची अपभ्रंश भाषा मागे पडून 'नाथवाणीत' आढळणारी 'संधाभाषा' उदयास येण्यास निमित्तकारण घडले तेही वैचारिक आंदोलनाचे. गोरखनाथांच्या काळासंबंधाने एकमत नाही. पण अकराव्या शतकाचा उत्तरार्ध आणि बाराव्या शतकाचा प्रारंभ हा स्थूलमानाने गोरखनाथांचा काळ मानण्यास हरकत नसावी. या कालखंडात उत्तर भारतात इस्लामी सत्ता दृढमूल झाली होती. धर्म आणि संस्कृती यांवर आंतर आणि बाह्य अशा दोन्ही मार्गांनी संकट आलेले होते. निरनिराळे पंथोपपंथ आणि काही पंथांच्या एकांतिक साधना यांच्यामुळे धार्मिक क्षेत्रात एक प्रकारचे अराजक पसरलेले होते. या गदारोळात खरा धर्म लुप्तप्राय झाला होता. समाजास सुसंघटित ठेवणारी धर्मभावना आणि संस्कृती यांचे बंध क्षीण झालेले होते.त्यामुळे समाज दिशाहीन होणे अपरिहार्य होते. दुष्काळात तेरावा महिना यावा त्याप्रमाणे इस्लामी सत्तेचे राजकीय आणि धार्मिक आक्रमण सुरू झाल्याने सर्वसाधारण समाजास हतबुद्धतेची बाधा होणे स्वाभाविक होते.

या परिस्थितीवर मात करण्यास आवश्यक असलेले खंबीर नेतृत्व गोरखनाथ आणि त्यांची शिष्यपरंपरा यांनी पुरविले. या पंथाने अद्वैत वेदांतास कर्मयोगाची जोड दिली आणि योगसाधनेची सफलता लोकोद्धारात असल्याचे प्रतिपादिले. 'आत्माराम' अथवा 'राम' म्हणजे निर्गुण परब्रह्म याच्या उपासनेचे अंगही गोरखनाथांच्या साहित्यात आढळते.[१७] सिद्धांच्या या धर्माचरणाचा संबंध चित्तशुद्धीशी असतो. या तत्त्वप्रणालीस नाथपंथाने उजाळा दिला. केवळ एकाच प्रदेशात लोकभाषेतून विचारप्रसार करण्यात संतोष न मानता नाथसिद्धांनी भारतभर संचार करून नवजागरण घडवून आणले. समाजातील जातिभेद आणि उच्च-नीच भाव यांचे निर्मूलन करण्यासही या पंथाने फार मोठा हातभार लावला. गोरखनाथांच्या कार्याचे मूल्यमापन करताना या नाथसिद्धाने 'भारतीय संस्कृतीची विस्कळित घडी नीट बसविली आणि सांस्कृतिक धारा प्रवाहित ठेवली.' असा निष्कर्ष रांगेय राघव या पंडिताने काढला आहे तो भारताच्या सांस्कृतिक इतिहासाशी सुसंगत असाच आहे.[१८]

दृढमूल झालेल्या उत्तर भारतातील इस्लामी राजवटी केवळ राज्यविस्तारावर संतोष मानणाऱ्या नव्हत्या. राजसत्तेचा उपयोग धर्मप्रसारासाठी झाला पाहिजे ही त्यांची धारणा होती. किंबहुना आपल्या धर्माच्या प्रसारासाठीच राजकीय सत्ता संपादन करावयाची असते हे अकबराच्या काळापर्यंत होऊन गेलेल्या मुसलमान राज्यकर्त्यांचे धोरण होते. आठव्या शतकात झालेल्या सिंधवरील आक्रमणापासून हे धोरण सुसंगत राहिले आहे. राज्यसत्ता प्रतिकूल असल्यामुळे भारतीय धर्म आणि संस्कृती यांच्या रक्षणार्थ कार्य करण्यासाठी अनकूल परिस्थिती दक्षिण भारतात असल्याची जाणीव नाथपंथीयांना झालेली असावी. गोदावरीचे उगमस्थान आणि लगतचा महाराष्ट्रातील प्रदेश ही नाथपंथाची कर्मभूमी बनली. महाराष्ट्रातील नाथपरंपरा तशी पुरातन असली तरी बाराव्या शतकात ती विशेष कार्यक्षम झालेली दिसते. तेराव्या शतकातील महाराष्ट्रात नाथपंथ अगदी सामान्य जनतेपर्यंत कसा पोचलेला होता याचे विवरण 'लीळाचरित्र' या एकाच ग्रंथाच्या आधाराने अगोदर करण्यात आले आहे. या पंथाच्या महाराष्ट्राशी असलेल्या घनिष्ठ संबंधाचे आणखी एक प्रत्यंतर मिळते ते नाथवाणीवर झालेल्या मराठी भाषेच्या संस्कारातून. गोरखवाणीत मराठी शब्दच आढळतात असे नाही. मराठी विभक्त्यंत नामे आणि क्रियापदेही गोरखनाथांच्या रचनांतून विखुरलेली आहेत. काही कवने तर तत्कालीन मराठी भाषेत रचली आहेत की काय असा आभास होतो:

● *माया मारिली माऊसी तजिली तजिला कुटुंब-संबंधु*
संहसर कमल तहाँ गोरखबाला जहाँ मनमनसा सुखबंधू
आसा तजिला तुसना तजिला तजिला मनसा भाई
नवखंड पृथिमी फेरिनै आलौ गोरख राहिला मछेंद्ठाई

किंवा

● *देवलोकाची देवकन्या, मृत्यलोकची नारी*
पाताल लोकची नागकन्या, गोरखबाला भारी ॥ - गोरखबानी ११७

गोरखवाणी आणि मराठी भाषा यांचे साहचर्य किती निकटचे होते याची अधिक कल्पना यावी या हेतूने ग्रंथाच्या अखेरीस परिशिष्ट चार मध्ये अधिक उदाहरणे दिली आहेत.

गोरखवाणीवर मराठी भाषेचे संस्कार आढळतात त्याचप्रमाणे फारसी लिपीतील दखनी साहित्यावर देखील मराठी भाषेची गडद छाया पडलेली दिसून येते. या समान विशेषावरून दोन्ही भाषांचे एका समान क्षेत्रात भरण-पोषण झाले असा निष्कर्ष निघू शकतो.

गोरखनाथ व त्यांचा शिष्यसंप्रदाय यांनी घडवून आणलेल्या नवजागराचे स्वरूप कोणत्या प्रकारचे होते?

हे पाहताना लक्षात येते की नाथपंथ आणि हठयोग यांचे समीकरण दीर्घकाळापासून चालत आले आहे. नाथपंथाचे संस्कृत भाषेतील आणि 'नाथवाणी' त असलेले साहित्य अभ्यासले असता हे समीकरण दृढही होते. परंतु, सामान्य समाजासाठी या पंथाने पथप्रदर्शन केले नाही असा अर्थ मात्र काढता येत नाही. धर्माचरणाची सुलभ सूत्रे गोरखनाथ आणि त्यांचे शिष्य यांनी ज्यांना खडतर साधना साधता येत नाही त्यांच्यासाठी उपदेशिली आहेत. 'योगदुर्गा'चे रुपक रचणाऱ्या ज्ञानदेवांनी हरिपाठाचे अभंग लिहिले त्याप्रमाणे.

सरहपादी सिद्धांप्रमाणेच विश्वव्यापी आत्मतत्त्वावर नाथपंथाने भर दिला आहे. पुढे युगधर्माची वाहक बनलेली 'निरंजना'ची धारणा याच भूमिकेतून गोरखनाथांनी मांडली आहे:" [१९]

(१) *उदै न अस्त राति न दिन सरबै सचराचर भाव न भिन्न*
सोइ निरंजन डाळ न मूल, सब व्यापिक सुषम न अस्थूल ॥

● *'जेथे उदय नाही, अस्त नाही, रात्र नाही, दिवस नाही,*
चर आणि अचर यांत भेद नाही तेच निरंजन
ते सर्व व्यापक आहे. तेथे मूळ नाही की शाखा नाही,
स्थूल नाही की सूक्ष्म नाही.' – गोरखबानी, पृ. ३९

(२) *घटि घटि गोरख फिरै निरुता, को घट जागै को घट सूता*
घटि घटि गोरख घटि घटि मीन, आपा परचै गुरुमुखी चीन्ह॥

● *'विश्वात सर्वत्र आत्मतत्त्व भरलेले आहे. काही शरीरांत ते सुप्त आहे तर काही शरीरांत जागृत. गुरुमुखातून बोध झाला म्हणजे आत्मतत्त्वाची ओळख पटते.' (गोरखबानी, १५)*

(३) कैसे बोलो पंडित देव कौने ठाइं
निज तत निहरता अम्हे तुम्हे नाहीं ।।टेक।।
पषांणची देवळी पषांणाचा देव
पषांण पूजिला कैसे फटीला सनेह (सन्देह)
सरजीव तोडिया निरजीवी पुजिला
पापची करणी कैसे इतर तिरीला
तीरथी तीरथी सतांन करीला
बाहेर धोये कैसे भीतरि भेदिला
आदिनाथ नाती मछींदर पूता । निजमतत निहारै गोरष अवधूता ।।

● आत्मत्त्वाची एकदा ओळख झाली म्हणजे बाह्य उपचार व्यर्थ ठरतात. कारण, बह्योपचाराने अंतरंग परिशुद्ध होत नसते' असा भाव एका पदात आला आहे. या पदाचा अनुवाद असा : 'हे पंडिता, देव कोण्या ठाई आहे हे मी तुला कसे सांगू? आत्मतत्त्वाची एकदा ओळख झाली म्हणजे आम्ही-तुम्ही हा भेदभाव लुप्त होतो. पाषाणाच्या देवळातील पाषाणाच्या देवाची पूजा केल्याने संदेह कसा फिटणार? सजीवाचा वध करून निर्जीवाची पूजा केल्याने दुस्तर संसार तरून जाता येत नाही. तीर्थांत स्थान केल्याने बाह्यरूपाचे क्षालन होईल. त्यायोगे अंतरंग निर्मळ होणार आहे थोडेच?' (गोरखबानी, ४२)

(४) कहणी सुहेली रहणी दुहेली बिन षाया गुड मीठा
षाई हिंग कसूर बखाणें गोरख कहै सब झूठा ।।

● 'विचार आणि आचार यांत संगती पाहिजे.' हा सिद्धांनी धरलेला आग्रह गोरखबानीतही आढळतो. 'गुळाची गोडी चाखल्याविना कळणार नाही. नाहीतर हिंग खाऊन आपण कस्तुरीचा आस्वाद घेतला असे (ढोंग) होत असते. हे सर्व व्यर्थ आहे.' (गोरखबानी, ४२)

(५) जोग का मूल है दयादानं
भणत गोरखनाथ ये ब्रह्यग्यांनं ।।

● नाथपंथात 'जोग' या शब्दाला विशेष महत्त्व आहे. योगसाधना हे त्याचे एक अंग आहे. 'ब्रह्यज्ञानाची प्राप्ती करून घ्यावयाची असेत तर दया आणि दान आवश्यक असतात. जोगाचे हे मूळ आहे.' (गोरखबानी, १२६)

हे अत्यंत महत्त्वाचे तत्त्व गोरखनाथांनी उपदेशिले आहे. या व्यापक भूमिकेवर हिंदू आणि मुसलमान हे धर्मभेद निरर्थक ठरतात असे अनेक स्थळी गोरखनाथांनी प्रतिपादिले आहे. २०

अनुक्रमणिका

महाराष्ट्रात प्रचलीत असलेली 'नाथवाणी'

समाज-प्रबोधनासाठी चित्तशुद्धी आणि सदाचार यावर आधारलेल्या धर्माचा पुरस्कार करताना सिद्धांनी जी भूमिका घेतली होती तीच भूमिका काही कालसापेक्ष तपशील वगळता नाथपंथानेही पुरस्कारिली आहे. सिद्धांची अपभ्रंश भाषा थोडी काळाच्या संस्कारामुळे व थोडी वैचारिक आंदोलनाच्या प्रभावामुळे बदलत गेली. या स्थित्यंतरातून परिणत झालेली भाषा 'संधा'भाषा या नावाने आज ओळखली जाते. परिशिष्टात सिद्ध साहित्यातील अवतरणे दिली आहेत तशीच 'नाथबानीतून' काही उद्धरणे दिली आहेत. या दोहोंचे तुलनात्मक अध्ययन केले असता कोणत्या प्रकारचे स्थित्यंतर भाषेत घडले याची कल्पना करता येईल.

प्रकरणारंभी आपल्यापुढे प्रश्न होता की 'महाराष्ट्रात मराठी खेरीज वेगळी भाषा फारसी लिपीतील दखनी साहित्याच्या निर्मितीसाठी का रूढ झाली? वरील विवेचनात त्याचे उत्तर आले आहे. महाराष्ट्र ही नाथपंथाने आपली कर्मभूमी मानल्यामुळे व या प्रांतात अगदी सामान्य जनतेतही नाथपंथी जोग्यांविषयी आणि म्हणूनच त्यांच्या वाणीसंबंधीही आदर असल्याने 'नाथवाणी' महाराष्ट्रातल्या समाजाची बोधभाषा झालेली होती. साधुसंतांची भाषा या नात्याने या 'वाणीला' प्रतिष्ठा लाभलेली असल्याने सूफी संतांनी पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या पण नाथसिद्धांच्या वाणीतून परिणत झालेल्या भाषेची निवड आपल्या साहित्य- रचनेसाठी केली. अशा रीतीने फारसी लिपीत निबद्ध झालेली दखनी ही सुद्धा नाथ सिद्धांच्या वाणीतून उत्पन्न झाली.

कालाच्या दृष्टीने विचार केला असता नाथसिद्धांचे साहित्य आणि सूफी संप्रदायाचे दखनी काव्य यात किमान तीन शतकांचे तरी अंतर निश्चितच आहे. तरीही दखनी साहित्यावर नाथसिद्धांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रभाव जाणवतो. दखनी साहित्याचा शेवटच्या कालखंडातला कवी शाहतुराब याने 'मनसमझावन' या ग्रंथात (१७४०) योगसाधनेतील षटचक्रे आणि निरनिराळे बंध यांचे वर्णन विस्ताराने केले आहे. अगोदरच्या सूफी आख्यानकाव्यातही नाथजोग्यांसंबंधीच्या निरनिराळ्या कथा वा आडकथा आलेल्या आहेत. मूळ समाजजीवनात नाथपंथाविषयी वसत असलेल्या आदरभावाचे ते निदर्शक म्हणावे लागेल. १७ व्या शतकातील नुस्रती या कवीने तर जोग्यांची साधना आणि वेशभूषा यावर एक रूपकच 'गुलशने इष्क' या आपल्या काव्यात रचले आहे. नाथपंथाचा प्रभाव सूफी साधकांवर असल्याचे ते निदर्शक आहे. [२१] या रूपकातील कथा आहे एका राजाची. तो संसाराकडे पाठ फिरवतो व 'जोग' घेतो. त्याच्या वेषभूषेचे वर्णन करताना कवीने वेषभूषेवर रूपक केले आहे. या राजाने कष्टाची कंथा, संतोषाची राख, संयमाची मुद्रा, वैराग्याचे मृगाजीन, मनोविकाराची धुनी, धैर्याचा जोगवटा, उदात्त विचारांचे चेले आपल्या सांगाती घेतले व तो आपल्या साधनेस निघून गेला असा या रूपकाचा भावार्थ आहे.

सारांश

दखनी भाषेच्या उगमाचा माग काढत काढत सिद्धांच्या काळापर्यंत आपणास मागे जावे लागले. वैचारिक सातत्य आणि भाषा-परंपरा या दोन्ही अंगांनी शोध घ्यावयाचा असल्याने एवढ्या दूरवरचा सांस्कृतिक प्रवास करणे अपरिहार्य होते.

अपभ्रंश ही सिद्ध साहित्याची भाषा. नाथसिद्धांची वाणी ही अपभ्रंशातून परिणत झालेली भाषा. आधुनिक देशी भाषांच्या उदयाच्या पूर्वीची अवस्था नाथसिद्धांच्या वाणीत आढळून येते म्हणून ती

संक्रमणकालीन अथवा ‘संधा भाषा’ या नावाने ओळखली जाते. दखनी भाषेचा उदय या ‘संधा भाषेतून’ झालेला आहे.

संधा भाषेची परिणती दखनीत कशी झाली हे ध्यानात यावे या हेतूने ग्रंथाच्या अखेरीस एक स्वतंत्र परिशिष्ट क्र. ९ जोडण्यात आले आहे. भाषा विकासाच्या निरनिराळ्या अवस्थांचे निरिक्षण या परिशिष्टाच्या आधाराने अभ्यासकांना करता येईल.

संदर्भ

१. लीळाचरित्र, (कोलते प्रत) पृ. ५७९

२. तत्रैव पृ.१४९,२२३,७५५,७६०,७५२

३. लीळाचरित्र, पृ. १४९

४. तत्रैव, पृ. ७५५

५. लीळाचरित्र, (तुळपुळे प्रत) पूर्वार्ध भाग २, पृ. ३१

६. लीळाचरित्र, (कोलते प्रत) पृ. ५६०

७. लीळा, ५६०

८. लीळाचरित्र, ४७५

९. लीळा चरित्रात आलेल्या काही सिद्धांच्या कथा सांगतांना कित्येक सिद्धांच्या मुखी 'सिद्ध्वाणी' चा प्रयोग करण्यात आला आहे. अडदंडीनाथाच्या कथेत (पृ. १३८) 'न डरि, न डरि' असे शब्द येतात. 'भीड भीड' असे शब्द एका जोग्याच्या तोंडी आले आहेत. एका लीलेत 'गोरक्षेन पुसिले: कहाँ थी आयो: कहाँ आव्यो' अशी वाक्ये आली आहेत. जालंधर-गोपीचंद कथेतही असेच अमराठी वाक्य गुरुमुखातून येते. (पृ. ६५६)

१०. मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका, अंक १ (१९६६) संहिता, एक.

११. राहुल सांकृत्यायन, पुरातन निबंधावलि, धर्मवीर भारती, सिद्धसाहित्य, २८७.

१२. सिद्ध सरहपा व त्याचे शिष्य यांच्या कवनांतून मराठी वळणाचे अनेक शब्द व क्रियापदाची रूपे आली आहेत. उदाहरणार्थ-

> ***सरह*** *भणइ* ***बपा*** *उजु वाट* ***पाइला*** *॥ - पुरातत्व निबंधावलि, १७०*
> *भव निर्वाणे पदह* ***पावला,*** *मन पवन वेली* ***करुनु कशाला***
> *जह जह दुंदुमि* ***सादु उछालिला*** *कण्ह डोंबी* ***विनादे*** *चालिला- कण्हपाह*
> *जो मरण विचार* ***आला जाला,*** *आगम पोथी इष्ट भला*
> ***आले*** *गुरु उएसइ सीस, वाक्पथातील कहिला कीस ॥*
> *अपभ्रंश भाषा और साहित्य, ३१५, ३९२*

१३. पुरातत्त्व निबंधावली पृ. १७१.

अनुक्रमणिका

१४. भाषाभ्यासाच्या दृष्टीने मूळ कवने या प्रकरणात जोडलेल्या परिशिष्टात देण्यात आली आहेत.

१५. या संबंधीचे अधिक विवेचन पुढे आले आहे.

१६. 'दुसरा महत्त्वपूर्ण निष्कर्ष यह निकलता है कि सन्धाभाषा को किसी प्रदेश विशेष की सीमा में नही बांधा जा सकता । वह अपने समय में एक केंद्रीय भाषा थी ।' — सिद्धोंकी संन्धा भाषा, पृ. ३३६

१७. 'नामदेवांच्या हिंदी कवनातील राम' या लेखात प्रस्तुत लेखकाने या संबंधी सविस्तर विवेचन केले आहे — मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका, अंक ५

१८. 'इस प्रकार भारतीय संस्कृती की कडी जो टूटी हुई दिखाई देती है गोरखनाथ उसे जोड देते है । गोरखनाथ में तत्कालीन आर्य सामाजिक व्यवस्था के बाहर के समस्त प्रधान संप्रदायों का सारभूत होकर आर्य सामाजिक व्यवस्था के भीतर रहनेवालों का सानिध्य का समीप आने का प्रयत्न स्पष्ट दिखाई देता है' — गोरखनाथ और उनका युग, पृ. १५५

१९. अनुवादरूपाने दिलेली गोरखनाथांची वचने परिशिष्टात मूळ रुपात दिली आहेत. जिज्ञासूंच्या भाषाविषयक अभ्यासास ती उपकारक ठरावीत.

२०. पाहा : गोरखबानी ६, २५, ३३, ६१

२१. फिराकर सो शाही किरा भेंस कूँ। चलिया यूँ **जोगी** हो परदेस कूँ। **कथा** सखत मेहनत अप्रगट किया। **सकचकोळ** साधित तबकुल किया। चडाया सोतंतर किनाअत की **राख**। **सिंगी** करलिया कुदम की हाक। सबुरी के **मुदरे** दिया कोश कूँ। किया हिलम जंबीर आदिक होश कूँ यू राहत की दुनिया कूँ **मिरगान** कर। लिया राख में पगतले आनकर। लिये हिर्स के **करडे** कूँ बगल। जलाने हवस की **धुनी** नीम सगल। अपस न पूस तैं करसंग किया। मुकाकर जगाने **सांगाति** किया।। धरिया खूष हतियार हर हात के। **किनेरी** चकर तेज दाबातके **कमरबस्ता** हिंमत का भारी किया। अटल मस्तकी हतमंजरी किया। धरन जहद हर काम में तेज हात। लिया खुष खिलीयाँ के **चेले** संगात।।

अनुक्रमणिका

५. दखनी भाषेचा उद्भव

सांस्कृतिक परंपरा आणि भाषेतील स्थित्यंतरे ही दोन्ही अंगे लक्षात घेऊन 'संधा भाषेतून' दखनी भाषेची उत्पत्ती कशी झाली याचा शोध या प्रकरणात घ्यावयाचा आहे. या शोधात दखनी भाषेचा उत्पत्ती – काळ देखील निर्धारित करता येईल.

नाथसंप्रदायाचे एक कर्ते सत्पुरुष गोरखनाथ कोणत्या काळात होऊन गेले यासंबंधी विद्वानांत एकमत नाही. तथापि, इ.स. ११०० च्या पूर्वी गोरखनाथ होऊन गेले याविषयी मात्र दुमत नाही. पं. हजारीप्रसाद द्विवेदी यांनी 'नाथसिद्धों की वाणीयाँ' या नावाचा एक ग्रंथ संपादित केला आहे. संपादकांच्या मते या संकलनात असलेले साहित्य गोरखनाथांच्या नंतरचे व बारा ते चौदा या दोन शतकांच्या कालखंडातले आहे. या संग्रहातल्या भाषेसंबंधी संपादकांनी व्यक्त केलेले मत आपल्या शोधास उपकारक ठरणारे आहे. त्यांनी म्हटले आहे, '*भाषा की दृष्टी से इन पदोंका महत्त्व स्पष्ट है. यद्यपि इन वाणीयों के रूप बहुत कुछ विकृत हो गये हैं, परंतु, भाषा का कुछ न कुछ पुराना रूप उन में रह गया है.' प्रस्तावना, पृ. २५*

याचा अर्थ असा की उपलब्ध असलेल्या नाथसाहित्याची भाषा अगदी तत्कालीन आहे असा दावा करता येत नसला तरी प्राचीन भाषेचे काही तरी अवशेष या वाणीत अवशिष्ट राहिले आहेत असे गृहीत धरून गोरखनाथ आणि अन्य सिद्ध यांच्या साहित्यातील भाषेसंबंधी विचार केला पाहिजे. या मर्यादा लक्षात घेऊन गोरखनाथ व उत्तरकालीन नाथसिध्द यांच्या कवनांतील भाषेचे स्वरूप कोणत्या प्रकारचे होते हे समजून घेतले पाहिजे. या भाषेच्या परिसरातच दखनीसदृश भाषेचा उद्भव सामान्यपणे कोणत्या कालात झाला याचा संकेत मिळण्याची संभावना आहे.

तेराव्या शतकातील वैचारिक क्रांती

तेराव्या शतकाच्या आसपास महाराष्ट्रात दोन संप्रदायांची स्थापना झाली. श्रीचक्रधरांनी प्रवर्तित केलेला महानुभाव पंथ आणि संत ज्ञानेश्वरांनी स्थापलेला भागवत अथवा वारकरी संप्रदाय; महानुभाव पंथाची धर्मभाषाच मुळात मराठी होती तर 'मऱ्हाटीच्या नगरीत ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याचे उद्दिष्ट' वारकरी संप्रदायाच्या मराठी साहित्याचे होते. तत्त्वप्रणालीच्या दृष्टीनेमहानुभाव पंथ निवृत्तिमार्गावर भर देणारा असल्याने या पंथाचे साहित्य केवळ साधकांच्या साधनापद्धती लक्षात घेऊन निर्माण झाले. संत ज्ञानेश्वरांनी प्रवर्तित केलेला भागवतधर्म मात्र त्यामानाने अधिक व्यापक ठरला. त्याने समाजधर्माचे स्वरूप धारण केले. गेली सातशे वर्षे या संप्रदायाची परंपरा अखंडितपणे चालू आहे. अद्वैत वेदांत, निष्काम कर्मयोगावर आधारलेली भगवदभक्ती आणि सदाचार ही या संप्रदायाची मूलतत्त्वे आहेत. कालपरिस्थिती ध्यानात घेऊन सर्व जनांस सुलभ अशा भक्तीची जोड वारकरी संप्रदायाने सिद्धांच्या मार्गास दिली आहे. निर्गुण, निराकार ब्रह्मोपासनेच्या तुलनेने सगुण साकार विठ्ठलाची भक्ती जनसामान्यांना आचरण्यास सुलभ असल्याने या संप्रदायाचा व सांप्रदायिकांनी निर्माण केलेल्या साहित्याचा प्रसार समाजात झाला. प्रस्थापित धर्मभावनेत त्यायोगे बरेच स्थित्यंतर घडले. या स्थित्यंतरामुळे अपवादात्मक ग्रंथसंपत्ती असलेली व प्राकृतांची बोली असलेली मराठी भाषा साहित्याच्या दृष्टीने समृद्ध झाली. या दोन संप्रदायांनी घडवून आणलेल्या वैचारिक जागृतीतून मराठी साहित्याचा परिपोष झाला. हे साहित्य एका नव्या युगधर्मास आवाहन करणारे ठरले.

या वैचारिक जागृतीतून दुसरीही एक नवी साहित्यपरंपरा महाराष्ट्रात प्रचलित झाली. दखनी भाषेच्या उत्पत्तीशी या परंपरेचा जवळचा संबंध पोचतो. वारकरी संप्रदायातील साहित्यात मराठी भाषेखेरीज हिन्दी सदृश भाषेत अनेक संतांनी कवने रचलेली आढळून येतात. तेराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत रचलेले या भाषेतील संतसाहित्य उपलब्ध आहे. पंडित कवी आणि शाहीर यांनी देखील ही परंपरा आपल्या परीने चालविलेली आहे. या निराळ्या भाषेच्या नावाचा उल्लेख करण्याची आवश्यकता एकाही संतास भासली नाही. संपादन करताना अलीकडच्या संपादकांनी 'हिंदी/हिंदुस्थानी पदे/आख्याने' असे वर्गीकरण केले आहे.

संत नामदेव हे दखनी भाषेचे आद्य कवी ठरतात, असा निर्वाळा उपलब्ध साहित्याच्या आधाराने आपल्याला देता येतो. त्यायोगे दखनी भाषेचा उद्भव तेराव्या शतकात झाला आणि संत नामदेव हे या भाषेचे आद्य कवी होत असे मानता येते. योगायोग असा की हिन्दी साहित्याच्या इतिहासकारांनीदेखील संत नामदेवांना हिन्दी भाषेच्या आद्य कवीचा मान दिला आहे. इतकेच नव्हे तर हिन्दी भक्तिसाहित्याचा प्रारंभच महाराष्ट्रातील विठ्ठल संप्रदायाने केला असे निःसंदिग्ध मत दिले आहे. [१]

एवढे पाठबळ असताना नामदेवांच्या साहित्याची भाषा 'दखनी' आहे याविषयी अट्टाहास का धरावा? असा प्रश्न या स्थळी उत्पन्न होतो. याला कारण ऐतिहासिक तसेच भाषाशास्त्रीय आहे. व्रजभाषेच्याही पूर्वी हिन्दी साहित्याचा आदर्श दाक्षिणात्यांनी उत्तर भारतीयांपुढे ठेवला होता असे नि:संदिग्ध मत विख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांनाही दिले आहे. [२] परंतु नामदेवांच्या काळापासून म्हणजे तेराव्या शतकापासून एकोणीसाव्या शतकात अस्तित्वात आलेल्या हिन्दी भाषेपर्यंत भाषेचे सातत्य प्रस्थापित होत नसल्यामुळे नामदेवांच्या कवनांच्या भाषेला 'हिन्दी' या नावाने संबोधता येत नाही. हे समजून घ्यावयास हवे.

प्रादेशिक भेद लक्षात न घेता समग्र हिंदी भाषी प्रदेशाची भाषा 'हिन्दी' मानली तरीही भाषेच्या सातत्याचा प्रश्न सुटत नाही. कारण, हिंदीभाषी प्रदेशात साहित्याचे सातत्य आढळते ते संत कबीर यांच्या काळापासून. कबीर-साहित्याची भाषा अवधी आहे याकडे दुर्लक्ष केले तरी संत नामदेवांपासून संत कबीर यांच्या काळापर्यंत म्हणजे तेराव्या-चौदाव्या शतकापासून ते पंधराव्या शतकापर्यंत सुमारे दीड शतकाच्या कालखंडातील भाषा आणि साहित्य यांची संगती आपण कशी लावणार ?

नामदेववाणीच्या भाषेचे हिन्दी वा हिंदी प्रदेशातील कोणत्याही बोलीशी नाते जोडता येत नाही. म्हणूनच नामदेववाणी हिन्दी भाषेपेक्षा, निराळी आहे हा निष्कर्ष स्वीकारावा लागतो. नाथसिद्धांच्या 'संधा भाषे'त देखील नामदेववाणीची गणना करता येत नाही. कारण गोरखवाणी आणि नामदेववाणी यांचा तुलनात्मक अभ्यास केला असताना असे आढळते की, नामदेवांच्या कवनांतील भाषा नाथवाणीचे उत्क्रांत स्वरूप आहे. म्हणजे गोरखवाणीच्या मानाने तिचे स्वरूप वेगळे असून ती पृथगात्म अशी एक निराळी भाषा आहे.

ही निराळी भाषा म्हणजेच दखनी. काही सूफी संतांनी या भाषेला 'दखनी' या नावाने संबोधले आहे म्हणून तिला दखनी म्हणावयाचे अशातला भाग नाही. सिद्धांच्या परंपरेतील विचारसरणीचा आणि याच परंपरेतील भाषिक स्वरूपाचा आविष्कार नामदेववाणीच्या रुपात दक्षिणेत झाला म्हणून ही वाणी दखनी ठरते. नाथसिद्धांना विशिष्ट कारणांमुळे दक्षिणेचा विशेषतः महाराष्ट्राचा आश्रय ध्यावा लागला होता हे अगोदर निर्दिष्ट करण्यात आले आहे. नाथसिद्धांच्या वाणीची परंपरादेखील वारकरी संप्रदायाने आपल्या परीने पुढे

चालविली. गोरखनाथ ते नामदेव यांच्या दरम्यान सुमारे एक-दीड शतकांचे अंतर असल्याने एवढ्या कालावधीत भाषेत स्थित्यंतर घडणे स्वाभाविक होते. तसे ते झाले आहे. अपभ्रंश भाषेचा संधा भाषेच्या माध्यमातून उत्क्रांत झालेला दाक्षिणात्य आविष्कार या नात्याने नामदेववाणीस दखनी हे नाव साजून दिसते.

आणखी एका पूरक आधाराची नोंद या स्थळी करणे आवश्यक वाटते. कलवर्ट या पाश्चिमात्य विद्वानाने अलीकडे (१९९०) संत नामदेवांची हिन्दी पदावली इंग्रजी भाषेत तिचा अनुवाद करून व सोबत संहिता सिद्धीसाठी योजलेल्या सामग्रीची विस्तुत माहिती प्रस्तावनेत देऊन प्रसिद्ध केली आहे. हस्तलिखितांची जमवाजमव करीत असताना राजस्थानात संत दादू यांच्या संप्रदायातील पदसंग्रहात संपादकांना नामदेवांची काही पदे आढळली. 'दकनी पद' या शीर्षकाखाली १६२७ सालीच्या एका हस्तलिखितात नामदेवांची पदे आली आहेत. याचा अर्थ असा की निदान १६२७ साली तरी नामदेवांची वाणी 'दकनी भाषेत' असल्याचे मानण्यात येत असे. राजस्थानात तरी अशा प्रकारची धारणा प्रचलित होती. याविषयी संदेह बाळगण्याचे कारण नाही.

थोडक्यात, नाथसिद्धांच्या 'संधा भाषेतून' तेराव्या शतकात दखनी भाषा उत्पन्न झाली असून संत नामदेव हे दखनी भाषेचे आद्य कवी ठरतात. [३]

नवा समाजधर्म आणि त्याची भाषा

हा निष्कर्ष तर्कशुद्ध असूनही साहित्य आणि संस्कृती यांच्या परंपरांचे पाठबळ त्यास असेल तरच तो प्रमाण मानता येईल. त्यासाठी गोरखनाथांपासून नामदेवापर्यंतच्या काळातील म्हणजे सुमारे दोन शतकांतील साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील घडामोडी ध्यानात घ्यावयास हव्यात.

नाथसिद्धांनी सांस्कृतिक जीवनाच्या पुनरुज्जीवनासाठी केलेल्या प्रयत्नांतून बहुदेवतावादाच्या जागी विश्वात्मक परब्रह्माची धारणा नव्याने उजळून निघाली आणि सद्धर्म, सदाचार आणि चित्तशुद्धी या सूत्रांवर आधारलेला सोपा व आचारसुलभ मार्ग समाजाच्या परिचयाचा झाला. नाथपंथात ध्यानयोगासही महत्त्व होते. परंतु ही साधना दैववशात सद्‌गुरूंची जोड ज्याला लाभेल त्यालाच शक्य होती. हा मार्ग सामान्यांना पेलता येण्यासारखा नसून तो कष्टप्रद आहे हे स्वतः योगी व नाथपंथी असलेल्या ज्ञानदेवांनी आवर्जून सांगितले आहे (ज्ञानेश्वरी, अध्याय ६). तथापि, नाथपंथाच्या साधनेचे हठयोग हे एक अंग होते. अर्थात ही साधना वैयक्तिक स्वरुपाची होती. सामूहिक आचारधर्माशी त्याचा संबंध येत नसे.

बाराव्या शतकानंतर परिस्थितीत झपाट्याने बदल होत गेला.परधर्मीय सत्तेच्या राजकीय आणि धार्मिक अशा दुहेरी आक्रमणामुळे समाजधर्मासच वैयक्तिक परमार्थ-साधनेचे अंग बनविणे अत्यावश्यक होऊन बसले. काळाची ही निकड ध्यानात घेऊन महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे प्रवर्तन झाले. या संप्रदायाचे प्रवर्तन करणाऱ्या ज्ञानदेवांनी नाथसंप्रदायाने उपदेशिलेल्या धर्मकल्पनेस भक्तितत्त्वाची जोड दिली. एका परीने वारकरी संप्रदाय म्हणजे नाथपंथाचेच युगसापेक्ष रूप होते असे म्हणता येईल. वारकरी संप्रदायातील भक्तिसंकल्पना नितांत व्यापक आहे. साधन आणि सध्या या दोन्ही स्वरुपात ती उपदेशिलेली आहे. ती वैयक्तिक साधना आहे तसाच तो एक समाजधर्मदेखील आहे. भजन-संकीर्तन ही या भक्तीची सामूहिक अंगे होत. ज्ञानभक्तिपूर्वक कर्म हे या पंथाच्या आचारधर्माचे सूत्र होय.

वारकरी संप्रदायाने वैयक्तिक अध्यात्मसाधना आणि समाजधर्म यांत एकरूपता प्रस्थापित केल्यामुळे हा संप्रदाय सातशे वर्षे महाराष्ट्राचे मार्गदर्शन करीत आला आहे.

या नव्या समाजधर्माचे दूरगामी परिणाम समाजावर झाले. या संप्रदायामुळे सांस्कृतिक जीवनास तर वेगळे परिमाण लाभलेच त्याबरोबरच समाजाच्या सर्व थरांना साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात सहभागी करून मराठी साहित्य समृद्ध करण्याचे फार मोठे कार्य या संप्रदायाने साधले. शिवाय गुरुपरंपरेची खूण या नात्याने नाथसिद्धांच्या वाणीत पदरचना करून वारकरी संप्रदायाने फार मोलाची कामगिरी बजावली आहे. मराठी संतांची अन्य भाषेतील रचना 'हिंदी' असल्याची आपली समजूत आजही आहे. वस्तुतः या रचनांची भाषा 'हिन्दी' नसून नाथसिद्धांच्या वाणीतून उत्क्रांत झालेली दखनी भाषा आहे.

नाथसिद्धांच्या वाणीतून उत्क्रांत झालेल्या या नव्या भाषेसंबंधी दोन स्तरांवरून विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथम नाथसिद्धांच्या संधा भाषेत कालांतराने घडलेले परिवर्तन लक्षात घेऊन त्या नंतर उत्क्रांत झालेल्या नव्या भाषेचे स्वरूप-विशेष कोणते होते त्याचा विचार केला पाहिजे.

नाथसिद्धांच्या वाणीची वाटचाल

प्रथम नाथसिद्धांच्या वाणीत काळाच्या ओघात कोणत्या प्रकारचे बदल घडले हे लक्षात घेऊ या. त्यासाठी बाराव्या शतकापासून चौदाव्या शतकाच्या आसपासच्या कालखंडातील नाथपंथीय साहित्याचे स्वरूप अभ्यासले पाहिजे. या साहित्यातील काही पदे पुढे देण्यात येत आहेत. या पदांवरून नाथवाणी कोणत्या दिशेने बदलत होती याचे काही संकेत मिळू शकतील. पदांची निवड करताना वैचारिक परंपरा आणि भाषा या दोहोंचेही विशेष ध्यानात यावेत याविषयी दक्षता घेण्यात आली आहे.

नाथपंथाच्या तत्त्वप्रणालीत विश्व ही 'माया' अथवा आभास नसून विश्वासह विश्वंभर हा जगदात्मा मानलेला आहे. या पंथात समाधी साधनेसही महत्त्वाचे स्थान आहे. पुढे देण्यात आलेल्या गोरखनाथांच्या दोन पदांत नाथपंथाच्या विचारसरणीची ही दोन्ही अंगे आली आहेत. पहिले पद 'अलक्ष' अभेद असल्याचे प्रतिपादन करते तर दुसऱ्या पदात 'अनहद नाद' आणि त्याद्वारे प्राप्त होणाऱ्या निर्द्वंद्व करणारे अवस्थेचे वर्णन आले आहे.

'गोरखबानीतील' ही दोन पदे म्हणजे संधा भाषेचे आज उपलब्ध असलेले स्वरूप आहे. ही भाषा गोरखनाथांच्या काळातील असेलच याची शाश्वती देता येत नाही. प्राचीन भाषेचे काहीतरी अवशेष उपलब्ध भाषेत अवशिष्ट राहिले असतील या भावनेनेच या पदांतील भाषांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

गोरखनाथांच्या दोन पदांतून प्रथमदर्शनी लक्ष वेधून घेतात ते मराठी वळणाचे शब्द आणि रूपे. 'जुझौ', 'मारिला', 'खाई', 'फाटिलै', 'करीलै', 'भरीलै' ही क्रियापदाची रूपे मराठी भाषेतून उचलल्यासारखी वाटतात. संत नामदेवांच्या कवनांत येणाऱ्या मराठी शब्दांचे एका परीने समर्थन तरी करता येते. कारण, त्यांची मातृभाषा मराठी होती. गोरखनाथांच्या बाबतीत असे काही म्हणता येणार नाही. या वाणीत मराठी शब्दांचे विशेषतः भाषेच्या प्रकृतिधर्माच्या दृष्टीने महत्त्वाचे असे क्रियापदांचे अस्तित्व आढळावे यास विशेष महत्त्व आहे. या विषेशाचे कारण अर्थात ऐतिहासिक वस्तुस्थिती हे आहे.

या कारणांचा विचार करण्यापूर्वी प्रथम भाषा व आशय यांच्या दृष्टीने गोरखनाथांच्या दोन पदांची समीक्षा करू या –

- *कासौ झुज्यों अवधू-राइ, विषय न दीसे कोइ*
  जासौ अब झूज्यौ रे आत्माराम होई ।।टेक।।
  आपण हीं मछ, कछ आपण ही जाल
  आपण हीं धीवर आपण ही काल ।।१।।
  आपण हीं स्पंद्य, वाद्य आपण ही गाइ
  आपण हीं मारीला आपण ही षाइ ।।२।।
  आपण हीं टाटी फडिका, आपण ही बंध
  आपण हीं मृतग, आपण ही कंध ।।३।।
  न्हाइबे कीं तीरथ, न पूजिले की देव
  भणंत गोरखनाथ, अलष अभेव ।।४।। - गोरखबानी, १३५

‘हे अवधूतराज, तू कोणाशी झुंजणार आहेस? ज्याच्याशी झुंजावयाचे तो तर सर्वव्यापी आत्माराम आहे. मछ, कछ, धीवर, जाल, काल, वाघ, सिंह, गाय हे सर्व आपणच आहोत. येथे कोण कोणाला मारणार आणि कोण कोणाला खाणार? ताटी, तिच्यावरचे प्रेत, तिला बांधलेले फडके हे सर्व आपणच आहोत. कोणत्या तीर्थात स्नान करणार? देव तरी कोणता पुजणार? कारण, अलक्ष सर्वत्र अभेद भावाने वास करीत आहे.’

- *मन रे राजाराम होइलै, नृदंद मूलै कमलै साजिलै रविचंद*
  अनहद भौरी भावें तृवेणी कै घाट
  पीयलै महारस फाटिलै कपाट ।।
  चन्दा करीलै षूटा सुरनि करीलै पाट
  नित उठ धोबी धौबै तृवेणी कै घाट
  भरीलै नाडी षोडी पुरिलै बंक नालि
  वदन्त गोरखनाथ अवधू हम उतरियौ पारि ।। - गोरखबानी, १५५

‘मना, परब्रह्म होऊन निर्द्वंद्व रहा. सूर्य व चंद्र यांचा योग कर. त्रिकुटीमध्ये भ्रमर गुंजारव करीत आहे. ब्रह्मरंध्राचे कपाट उघडून महारसाचे पान कर. चंद्राचे धोपटणे व सूर्याची शिळा करून जीवात्म्यास लागलेला मळ धुवून काढ. नाड्या पवनाच्या योगाने शुद्ध कर. मना, अशा रीतीने भव पार कर.’

या दोन पदांत अपभ्रंश भाषेच्या तुलनेने शब्दोच्चाराच्या दिशेने बरेच परिवर्तन घडले आहे असे दिसून येईल. व्यंजनविरहित स्वरांचा शब्दांत वैपुल्याने उपयोग करण्याची प्रवृत्ती अपभ्रंशात आढळते. तसेच मूळ संस्कृत भाषेतील कठोर वर्णाचे मृदू वर्णात व मृदू वर्णाचे अखेर अर्धस्वरात वा स्वरात परिवर्तन करण्याचाही स्वभावधर्म अपभ्रंशात आढळतो. वर दिलेल्या पहिल्या पदाच्या शेवटी आलेले ‘अभेव’ हे रूप अपभ्रंशाच्या या स्वभावाचा अवशेष आहे. मूळ शब्द आहे – अभेद. नाथसिद्धांच्या वाणीत उच्चार अधिकाधिक सुलभ करण्याची प्रवृत्ती थांबली आहे असे दिसून येईल.उलट शब्दोच्चारात अधिक दृढता आणण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक होत असल्याचे दिसून येईल. या व इतरही परिवर्तनांमुळे नाथसिद्धांची वाणी अपभ्रंशाची उत्क्रांत अवस्था ठरते.

अनुक्रमणिका

सिद्धांचा संचार भारतात होत असल्याने अनेक प्रादेशिक भाषांतील शब्द नाथसिद्धांच्या वाणीत येतात. मराठी शब्द या मार्गाने तर आलेच. परंतु, महाराष्ट्र ही दीर्घकाळ नाथसिद्धांची कर्मभूमी राहिलेली असल्याने मराठी भाषेशी या वाणीचे साहचर्य अधिक प्रमाणात घडले. त्याचा स्वाभाविक परिणाम नाथवाणीस मराठी वळण मिळण्यात झाला. या वाणीतून उद्भवलेल्या दखनी भाषेने देखील हा विशेष कायम ठेवला आहे. नामदेवांची मातृभाषा मराठी होती अथवा महाराष्ट्राच्या परिसरात दखनी साहित्य निर्माण झाले म्हणून दखनीस मराठी वळण लागेल असे नसून नाथसिद्धांच्या वाणीत असलेल्या विशेषाचा पुढे मोठ्या प्रमाणात विस्तार झाला एवढाच त्याचा अर्थ आहे. तसे नसते तर विजापूर व गोवळकोंड्याच्या परिसरातील दखनी लेखकांच्या साहित्यावर मराठी भाषेचा प्रभाव दिसलाही नसता. या लेखकांची मातृभाषा मराठी नसली तरी सूफींच्या व दरबारी कवींच्याही काव्यावर मराठी भाषेची गडद छाया असल्याचे निदर्शनास येते.

साधनपद्धती आणि पुढच्या काळातील युगधर्म या नात्याने गोरखनाथांचे दुसरे पद अधिक लक्ष पुरविण्याजोगे आहे. या पदात मन-पवनावर विजय मिळविण्यास साहाय्यभूत ठरणाऱ्या ध्यानयोगाचे प्रतिपादन आहे. 'देवा बेनू वाजे' हे संत नामदेवांचे पुढे दिलेले पद या पदाच्या जोडीला अभ्यासावे. दोन्ही पदातील अनुभव समान असला तरी तो भिन्न मार्गांनी आलेला आहे. ध्यानयोगाच्या द्वारे गोरखनाथांनी घेतलेला अनुभव नामदेवांना भक्तिद्वारा लाभलेला आहे. वारकरी संप्रदायाच्या नव्या युगधर्माचे हे रहस्य असून त्याचा पुढे अधिक विचार आलेला आहे. वैचारिक परिवर्तन आणि भाषेतील स्थित्यंतर यांचा ऋणानुबंध लक्षात यावा यासाठी हा उल्लेख इथे केला.

- *नवनाथ कहे सो नाथपंथी जुगती कहै सो जोगी*
  बिश्व बूझे सो बैरागी, कही जै ग्यान बुझै सो जोगी ॥
  तुम्हे सुनहो सिद्धांत गुरुवा, सारा ग्यानपंथ हमारा
  सुन्य निरसून्य काहुके कहिजति ब्रह्मा दिन जानंति पारा॥
  आलेख कही सो अपरंपार, जीव कहीजै सो अविनासी
  उत्पति प्रलयो दुइ घडामोडि हुआ संकेतु॥
  चक्रसामी प्रसादे नागार्जुन वदन्ति श्रीकृष्णराऊ केरा दास ॥
  - मस्वासंप अंक १ (१९६६), संहिता विभाग,

'नवनाथांना मानतो तो नाथपंथी. योगाचरण करतो तो योगी. विश्वाचे रहस्य जाणतो तो बैरागी. ज्ञानाचे आकलन झालेला जोगी. (शून्य आणि निःशून्य या नाथपंथातील पारिभाषिक संज्ञा असून त्या निर्विकल्प अवस्थेच्या निदर्शक आहेत. हे मत महानुभावपंथास मान्य नसल्याने दामोदर पंडित सवाल करतो-) शून्य-निराशून्याची भाषा कशाला करता. आमच्या (महानुभावपंथाच्या) ज्ञानमार्गाकडे या. जगात उत्पत्ती आणि प्रलय या दोनच घटना घडतात. जीव अविनाशी आहे हे श्रीचक्रधर आणि नागार्जुन यांच्या प्रसादाने श्रीकृष्णाचा दास असलेल्या मला कळो आले.'

दामोदर पंडित या तेराव्या शतकातील महानुभाव पंथाच्या कवीने रचलेल्या चौपद्यांपैकी एक चौपदी वर दिली आहे. हा कवी नामदेवांचा समकालीन असूनही त्याच्या भाषेचे वळण पुरातन आहे. त्याला कारणही आहे. नाथपंथाच्या तत्त्वप्रणालीचे खंडन करण्याची आज्ञा गुरूने केल्यामुळे या कवीने ६० चौपद्या रचल्या. त्यांपैकी काही मराठी भाषेत व काही नाथवाणीत आहेत. तत्काली रूढ असलेल्या नाथवाणीपेक्षा दामोदर पंडिताने योजलेली भाषा पुरातन का आहे याचे गमक एका भाष्यकाराने दिलेल्या चोपद्यांवरील प्रास्ताविकात

आढळते. तो म्हणतो – 'पंडित बासी (दामोदर पंडिताने) ते भाषा (नाथवाणी) प्रधान करुनि चौपदिया केलीया.' याचा अर्थ असा होता की, पुरातन परंपरेतील नाथवाणीचे अनुकरण करून दामोदर पंडितांनी ही रचना केली आहे. हे लक्षात घेऊनच उत्तर-कालीन असूनही गोरखनाथांच्या पदानंतर ही चौपदी दिली आहे. भाषा गोरखवाणीस बरीच जवळची वाटते. पुढच्या दोन पदांत मात्र भाषेत बदल झाल्याचे निदर्शनास येईल.

- *पंषेरू उडिसी, आय लीयौ विसरांम*
  ज्यों ज्यों नर सारथ करै। कोई न संवाऱ्यौ काम ॥टेक॥
  जलु कुँ चाहे मछली घण कुँ चाहे मोर
  सेवक चाहै राम कुँ, ज्यो च्यवंत चंद – चकोर ॥१॥
  ...जोगी सोइ जाणी रै, जग ते रहै उदास
  सत निरंजण पाइया, यों कहै मछंदरनाथ ॥
  - नाथसिद्धोंकी बानीयाँ, ११४

'पक्षी उडतो आणि विश्रांती घेतो तद्वत या विश्वात वावरावे. स्वार्थबुद्धी बाळगली तर माणसाच्या हाती काहीच लागत नाही. पाण्याला मासळी आवडते, घनाला मोर, चंद्राला चकोर, त्याप्रमाणे रामाला सेवक प्रिय असतो. हे सर्व जाणून जोग्याने जगात उदासीनतेने वावरावे. म्हणजेच त्याला निरंजनाची प्राप्ती होईल.'

- *मान अभिमानै लाहै फिरै, गुरु न षैजै मुरिष भरै*
  डंड कमंडल भगवा भेस, पाथरपूजा बहू उपदेस
  ...तीरथ ज्याइ करैं अस्नान, बौलै चरपट पंडित ग्यान
  न्हावै, धोवै पषालै अंग, भीतरी मैला बाहीर चांग
  होम जाप अग्यारी करै, परब्रह्म के सुध न धरै ॥
  -नाथसिद्धोंकी बानियाँ, २७

'गुरूचा शोध न करता मूर्ख माणूस मानाभिमानाचे ओझे घेऊन फिरत असतो. वेष भगवा, उपदेश दगडाच्या पूजेचा. तीर्थात स्नान करून शरीर धूत असतो. पण, आत मलीन बाहेर स्वच्छ, होम –हवन, जप-जाप्य यांच्या नादी लागल्याने परब्रह्माची प्राप्ती त्यास होत नाही.'

वर दिलेल्या दोन पदांपैकी पहिले पद मत्स्येंद्रनाथांच्या नावावर आढळते. गोरखनाथांचे गुरु मत्स्येंद्रनाथांचे ते असण्याची शक्यता कमी वाटते.कारण, गोरखबानीच्या मानाने या पदाची भाषा बरीच उत्तरकालीन वाटते. चरपट नाथांच्या दुसऱ्या पदाची भाषादेखील तशीच अर्वाचीन वाटते. चरपटनाथ हे गोरखनाथांच्या शिष्यमंडळापैकी एक गणले जातात. परंतु त्यांच्या पदाची भाषा मात्र तेवढी पुरातन वाटत नाही. संत नामदेवांच्या भाषेला ती अधिक जवळची आहे. ही दोन्ही पदे भाषेच्या दृष्टीने गोरखबानीच्या भाषेची उत्तरावस्था दर्शविणारी आहेत. नाथपंथाचे वैचारिक सूत्र मात्र या पदांतून सामावण्यात आले आहे.

सुमारे दीडदोन शतकांच्या कालावधीत नाथसिद्धांच्या वाणीत झालेले बदल वरील पाच पदांवरून ध्यानात येण्यासारखे आहेत. या पदांचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, शब्दोच्चारात दृढता आणण्याच्या दिशेने नाथवाणी वाटचाल करीत होती. शब्दाचे मूळ रूप संदर्भभेदाने निरनिराळ्या विभक्तींच्या अर्थाने न योजता विभक्तिप्रत्ययांचा प्रयोग करण्याची प्रवृत्ती मत्स्येंद्रनाथांच्या पदात आढळून येते. या पदात

कठोर व्यंजने वर्ज्य मानलेली दिसून येत नाहीत. शब्दांतर्गत व्यंजनविरहित स्वरांचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. त्यामुळे संयुक्त व्यंजनांच्या निमित्ताने होणाऱ्या अन्य प्रकारच्या ध्वनिपरिवर्तनास पायबंद बसल्याचे दिसून येते. भाषेला दृढ स्वरूप येत चालल्याचे हे लक्षण मानता येईल.

भाषा कितीही स्थिरावलेली असली तरी कालांतराने बदल घडणे हा तिचा सहज स्वभाव आहे. हा बदल एका विशिष्ट मर्यादेपर्यंत असतो तेव्हा ती एकाच भाषेची भिन्नकालीन रूपे गणली जातात. परंतु हा बदल जेव्हा अधिक व्यापक प्रमाणात होतो तेव्हा मात्र मूळ भाषेशी बदललेल्या भाषेचे नाते सुटत जाते व हा बदलच एका नव्या भाषेचे रूप धारण करून नवी भाषा उदयास येते. बाराव्या शतकापासून तेराव्या चौदाव्या शतकापर्यंत बोलीत आणि साहित्यात रूढ असलेली नाथसिद्धांची वाणी काळाच्या ओघात बदलत गेली. आणि तेराव्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक क्रांती झाल्यानंतर नाथवाणीत एवढे स्थित्यंतर झाले की, ती एक नवी भाषा या नात्याने ओळखली जाऊ लागली.

नाथवाणीतून घडलेले स्थित्यंतर नव्या भाषेचे स्वरूप कसे धारण करते हे ध्यानात यावे या हेतूने संत नामदेवांचे एक पद पुढे देण्यात येत आहे:

- *बैरागी रामहि गाउंगा ।*
  सबद अतीत अनाहद राता । अकुला कै घरि जाउंगा ।।टेका।।
  तीरथ जाऊं न जल में पैसूं। जीव जंत न सताउंगा
  आठसठि तीरथि गुरु लषाये । घट ही भीतरि न्हाउंगा।।१।।
  पाती तोडी न पाहन पूजी । देवल देव न ध्याउंगा
  पांनि पांनि परसोत्तम राता । तांकू मैं न सताउंगा ।।२।।
  वेद पुरान सारत्र गीता । गीत कवीत न गाउंगा
  अषंड मंडळ निराकार में । अनहद बेनि बजाऊंगा ।।३।।
  ... सदा संतोष रहूं आनन्द में। साइर बुंद समाउंगा
  गगनमंडळ में रहनि हमारी । पुनरपि जनमि न आउंगा ।।५।।
  इडा पिंगला सुषमनी नारी । पवनां मांझि रहाउंगा
  चंद सूर दोइ समिकारि राषु । ब्रह्मज्योती मिली जाउंगा ।।६।।
  नामदेव कहै मैं केसव ध्याउं । सहजि समाधि लगाऊंगा ।।७।।

  -नामदेव गाथा, क्र. २२०५, पृ.८३२

या पदातील भाषा गोरखबानीच्या तुलनेने बरीच बदललेली आहे हे ध्यानात येईल. ती उत्तरकालीन नाथसिद्धांच्या वाणीच्या मानानेही निराळी वाटते. बदल मर्यादित स्वरूपाचा नसून भाषेला निराळे रंगरूप मिळावे एवढा तो स्पष्ट आहे. म्हणूनच या पदाची भाषा 'संधा भाषा' आहे असे मानता येणार नाही. संधा भाषेशी तिचे अगदीच नाते नाही असे नाही. काळाच्या ओघात उत्क्रांत होत होत नाथवाणीने नामदेववाणीचे रूप धारण केले हे इथे तुलनात्मक अभ्यासानंतर स्पष्ट होण्याजोगे आहे.

या पदात आणखीही एक विशेष आढळेल. तो म्हणजे अत्यंत आत्मविश्वासपूर्वक केलेला नव्या युगधर्माचा पुरस्कार. ध्यानयोगाच्या साधनाने प्राप्त होणारी सहज-समाधी केशवाला ध्याऊन मी प्राप्त करीन असा आत्मविश्वास या पदात आला आहे. वारकरी संप्रदायाने नाथपरंपरेस सुलभ भक्तिमार्गाची दिलेली जोड

हे या आत्मविश्वासाच्या पाठीशी असणारे महत्त्वाचे सूत्र आहे.एका भाषेतून दुसऱ्या भाषेचा उदय होण्यास सामाजिक व वैचारिक आंदोलन प्रेरक ठरत असते, त्याचे प्रत्यंतर या पदात यावे. म्हणूनच नाथ संप्रदायाच्या परंपरेशी असलेले नाते कायम ठेवूनही संधा भाषेतून दखनी भाषेचा उदय झालेला आहे असे म्हणता येईल.

दखनी भाषेचे उत्पत्तिकालीन स्वरूप

संत नामदेव दखनी भाषेचे आद्यकवी असल्यामुळे या भाषेचे उत्पत्तिकालीन स्वरूप नामदेवांच्या साहित्यात शोधणे लाभप्रद ठरेल. पुढे सतराव्या –अठराव्या शतकात विस्तारलेल्या साहित्यप्रवाहात या गंगोत्रीत आढळणारे कोणते विशेष कायम राहिले याचाही बोध त्यायोगे होऊ शकेल.

पुढचे पद आत्मतत्त्व सर्वव्यापक असल्याचा उल्लेख करणारे असून नाथपंथाच्या तत्त्वज्ञानाशी ते सुसंगत आहे. याच आशयाची कित्येक पदे गोरखवाणीतही आढळतात. नाथपंथाचे अनुकरण करूनही या पदात नामदेवांची स्वतःची छाप आहे. त्याचप्रमाणे त्यात नव्या युगाची, युगधर्माची चाहूलही आढळेल.

- *अनीलै कुंभ भराइलै उदक ठाकूर कउ इसनान करउ*
  जत्र जाऊ तत्र । बिठलु भैला, मन आनन्द करै सद केला
  अनीलै दूद रिधाइलै खीर ठाकूर कऊ नैवेद्यु करउ
  पहिलै दूर बिटारिउ बछरै, बिठलु भैला काइ करउ
  इभै बिठलु उभै बिठलु बिठलु बिन संसारू नाहिं
  थान थनान्तरी प्रणवै नामा पुरि हिबु सरब मही ॥

देवाला स्नान घालण्यासाठी कुंभ भरून उदक आणले आहे. (पण, परमेश्वर आहे कुठे? जावे तिथे विठ्ठल भरलेला आहे. (स्नान कुठे आणि कोणाला घालावे?) अंतरी तर आनंदाचा शब्द भरलेला आहे. दूध आणून खीर रांधली आहे. देवाला नैवेद्य करावयाच्या आहे. परंतु दूध तर प्रथम वासराने उष्टावलेले आहे. अशा दुधाचा (व खिरीचा)नैवेद्य देवाला चालणार कसा ? विठ्ठल सर्वत्र भरलेला आहे. त्याच्या वाचून विश्वात कोणतेच स्थळ रिते नाही. सर्व स्थानांत भरून उरलेल्या (हे परमेश्वरा!) नामदेव तुम्हाला प्रणाम करीत आहे.

'आत्मा', 'आत्माराम', 'राजाराम', 'निरंजन', 'अलक्ष', यांसारखे परब्रह्मवाचक शब्द नाथसाहित्यात येतात. 'विठ्ठल' ही या पदातील संज्ञा याच अर्थाने योजण्यात आली आहे. वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत पंढरीनाथाचा वाचक असा तो शब्द असूनही पंढरीच्या विठ्ठलमूर्ती पुरता तो मर्यादित नाही. आपले आराध्य सगुण असले तरी ते विश्वव्यापक आहे हेही नामदेवांनी या पदात सूचित केले आहे. 'विश्वात्मक देवाची' ज्ञानदेवांनी केलेली प्रार्थना मराठी भाषिकांच्या परिचयाची आहेच.

'विश्वी विश्वंभर' अथवा 'निर्गुण निराकार परब्रह्म' या अंतिम सत्याचा संकेत करणाऱ्या संज्ञा प्राथमिक अवस्थेतील साधकांच्या आकलनक्षेत्रात सहजगत्या सामावू शकत नाहीत. त्यांच्या मर्यादा लक्षात घेऊनच 'साजरे सगुण रूप' हा आदर्श व त्याची भक्ती यांचा उपदेश प्रारंभीच्या अवस्थेत करणे अपरिहार्य असते. परंतु या सगुणातच परब्रह्म साठवलेले आहे अशा मर्यादा साधकांच्या आकलनास पडू नयेत म्हणून हे सगुण रूप सर्व स्थळी व विश्वात भरून उरले आहे ही जाणीव असणे आवश्यक असते. भक्तीचा युगधर्म आणि नाथसंप्रदायाची तत्वप्रणाली यांची सांगड या पदात घातलेली दिसेल.

ध्यान-धारणा अथवा हठयोग सामान्यांच्या आटोक्याबाहेरचा व कष्टप्रदही आहे. 'लोखंडाचे चणे बोचऱ्याने खावेत' तसा या साधनेचा प्रकार असतो हे स्वतः योगेश्वर ज्ञानदेवही ज्ञानेश्वरीत सांगून जातात. समाधि – साधना हे मोक्षाचे साधन खरेच. परंतु, ते सर्वांना योगसाधनेत आचरता येण्याजोगे नाही. भक्तियोग सर्वजनसुलभ आहे इतकेच नव्हे तर योगसाधनेत येणारा अनुभव भक्तीच्या योगेदेखील लाभू शकतो हा आत्मानुभव नामदेवांनी या पदात ग्रथित केलेला आहे. योगसाधनेनेच परमपदाची प्राप्ती होते असे नसून भक्तिमार्गाच्या अधारानेही मोक्ष प्राप्त होतो हा विश्वास या पदात आढळेल.

पुढच्या पदातही भक्तियोग सर्वव्यापक असल्याचे प्रतिपादन आले आहे.

- *देवा बेनु बाजै गगंन गाजै सबद अंनहद बोलै*
  अंतरि गति को जाने नांहीं, मुरिष भरमत डोलै
  चंदसूर दोऊ समकरि राषु मंन-पवन दिढ ठांडी
  सहजै सुषमन तारा-मंडळ इह विधी त्रिस्ना सोडी
  बैठ रहूं न फीरू डोलूं भूषा रहूं न षाऊं
  मरू न जीउं, अहणीस भुगतूं नाही आऊ नाही जाऊ
  गगनमंडळ में रहनी हमारी सहजि सुनि गृहमेला
  अंतरि धुनि में मंन बिलमाउं कोई जोगी या गम सहै
  पाति तोडूं न पूजूं देवा, देवलि देव न होई
  नांमा कहै मैं हरि की सरणा, पुनरपि जनंम न होई ॥
  -नामदेवगाथा, ६२२

वेणू वाजत आहे. गगन गाजत आहे. अनहद नाद घुमतो आहे. अंतरीचे ज्ञान नसल्याने मूर्ख सैरावैरा फिरतात. चंद्र-सूर्य (इडा व पिंगळा या नाड्या) यांच्या सुषुम्नेत प्रवेश करून समता साधा. अशा प्रकारे तारामंडळात तुमचा सहज प्रवेश होईल (सहज समाधी साधेल). तृष्णा सोडा, कुठेही भ्रमण करू नका, उपास करू नका की खाण्यावर भर देऊ नका. कुठेही जाण्यायेण्याची गरज नाही. गगनमंडळ हे आमचे वसतिस्थान. सहज शून्यू हे आमचे घर. अंतरंगाच्या धुनीत मन विलीन करून टाका. जोग घेण्याची व इतर कष्टची आवश्यकता नाही. पत्र –पुष्पांनी देव पुजण्याचीही गरज नाही. (कारण) देव देवळात नसतो. नामदेव म्हणतो मी हरीला शरण गेलो आहे. मला आठ पुनरपि जन्म वा मृत्यू नाही.

हे पद वाचताना ज्ञानेश्वरीच्या ११ व्या अध्यायाचे स्मरण अभ्यासकांना होईल.

समान वैचारिक सूत्र

वर दिलेली संत नामदेवांची दोन पदे प्रामुख्याने आत्मचिंतनपर आहेत. आत्मचिंतन आणि समाजप्रबोधन या निर्मितीच्या दोन भिन्न प्रेरणांचा परिणाम भाषेच्या स्वरूपावर अपरिहार्यपणे पडतो. त्यामुळे पुढे दिलेल्या समाजप्रबोधनपर पदांच्या मानाने वरील दोन पदांची भाषा थोडी निराळी असल्याचे प्रत्ययास येईल.

कर्मकांडाचा निषेध आणि चित्तशुद्धीची आवश्यकता हे पुढील पदात आलेले विषय असून नाथपंथाच्या विचारसरणीशी ते सुसंगत असेच आहेत. या पदात आलेल्या रामभक्तीचा उल्लेख परंपरेचा संदर्भात समजून घेतला पाहिजे. गोरखवाणीत सर्वत्र आणि निवृत्तिनाथ, ज्ञानदेव आणि नामदेव यांच्या साहित्यात काही अपवाद वगळता येणारा 'राम' हा दाशरथी रामाशी संबंधित नसून तो आत्मतत्त्वाचा (आत्मारामाचा) बोधक आहे. [४] या परंपरेचे ज्ञान नसल्याकारणाने हिन्दी भाषेच्या साहित्येतिहासात 'निर्गुण राम भक्ती-धारा' आणि 'सगुण रामभक्तिधारा' असे वर्गीकरण करण्यात येते. वस्तुतः तथाकथित 'निर्गुण रामभक्तिपर' साहित्यात येणारे रामाचे सर्व उल्लेख हे 'आत्मारामा' साठी आलेले आहेत. त्यामुळे उपरोक्त वर्गीकरण अशास्त्रीय ठरते.

- *रामाची भगति दुहेली रे बापा*
  सकल निरन्तरि चीन्हीले आपा॥
  बाहरि उजला भीतरि मैला
  पाणी पिंड पषालिन गहला ॥
  पाखंड भगति राम नंहीं रीझै
  बाहरि अंधा लोक पतीजै ॥
  नांमदेव कहें मेरा नेत्र पलटया
  राम-चरना चित्त चिउटया ॥
  -नामदेव की हिन्दी पदावली (संपा. भगीरथ मिश्र, क्र. २१, पृ. ५०)

रामाची भक्ती सफल झाली की निरंतर आत्मतत्व ओळखता येते. बहिरंग निर्मळ असून भागत नाही. त्यायोगे अंतरंग मलीनच राहते. समग्र पिंड पाण्याने प्रक्षाळिला पाहिजे. पाखंडी भक्तीने राम संतुष्ट होत नाही. बाह्य विश्वाविषयी नेत्रहीन झाल्याविना (अंतरीच्या रामावर) विश्वास बसत नाही. माझे नेत्र अंतर्मुख झाले (पालटले)म्हणूनच चित्त रामचरणी जडले.

वरील पदातील रामभक्तीच्या संदर्भात गोरखबानीतील पुढील वचने ध्यानात घेतली म्हणजे 'राम' या शब्दाचा सांप्रदायिक अर्थ उमगतो-

- *... एही राजाराम आछै । सर्वै अंगें वासा ॥ - गोरखबानी, १००*
- *... अहनिसी समाध्यान । निरंतर रमेबा रांम ॥ - गोरखबानी, १२७*
- *आबै संगे जाइ अकेला । ताथै गोरख रांम रमैला ॥- गोरखबानी, १४७*

निवृत्तिनाथांनी तर गुरुगम्य 'खूण' या नात्याने रामाचा व आत्मारामाचा उल्लेख केला आहे. (श्रीनिवृत्तिनाथ यांचे अभंग, क्र. ३०७, ३०५)

नामदेवादी संत वारकरी संप्रदायाचे असूनही त्यांची नाथपंथाची भूमिका सुटली नाही हेही वरील वचनांवरून ध्यानात येईल.

संत नामदेवांच्या पुढील पदास ऐतिहासिक महत्त्व आहे. या पदाची भाषा 'दखनी' असल्याचे प्रमाणपत्र इ.स. १६२७ सालात म्हणजे फार पूर्वीच लाभले आहे. संत दादू (१५४४-१६०४) यांच्या परंपरेत

संतवाणीचे संकलन करण्याची प्रथा होती. त्यात 'दकणी पद' या शिर्षकाखालीच नामदेवांची काही पदे आली आहेत. त्या पदांपैकी हे एक पद पुढे देण्यात येत आहे.

- *कुनूं क्रिया तुझी होइ ज्यूं आवरी*
  बिघन ब्याधी तेथै काल कांई करी
  एक महाबला महापुरी बलसी या भीतरि
  जीवल हो तातारू जेंन्हैं धरिला निज करी
  एक उदैस भूतली तास दिवो सेनभुष भेटिला
  नीधनिया धन द्यौरी धनाइति कैला
  हरी दीपावली गुणी वाणी रेषिला
  सुरत सुनौ सरपैं पारधी डंकिला
  गाइका पाणधी बाघ झंपादिला
  जीवल होता सिंहू तेन्है निरदालीला
  ऐसी च्यंचर चे तुझी मका लेवा देवा
  विश्नदास नामां बीनवै केसवा ॥
  -हिंदी पदावली ऑफ नामदेव, क्र. २२६, पृ. ३७३

तुझी कृपा माझ्यावर केव्हा होईल? (ती झाली म्हणजे मी) रोग, संकट, मृत्यू या सर्वांपासून मुक्त होईन. आत्म्याने धारण केलेली एक प्रक्षुब्ध महानगरी आतल्या आत जळत आहे. विश्वात एक स्थळ निश्चित असे आहे की, जेथे निर्धनास धनी करणारा प्रकाश आहे. (हा प्रकाश) दिवाळीसाठी वाट पहात बसत नाही. आसमंत सतत उजळीत असतो. (आत्मबळामुळे) काही अघटित घटना घडतात. साप पारध्याला डंख मारतो,वाघाने पांदीत झडप घालूनही गाय वाचते, माया चंचल असली तरी परमेश्वर तिच्या अधीन नाही.

या पदावर मराठी भाषेची असलेली छाया सहजपणेच समजेल.

अरबी-फारसी शब्दांचे प्रयोग

अरबी-फारसी शब्दांचा भरणा हा देखील दखनीभाषेच्या प्रकृतिधर्माचा एक भाग आहे. उत्तरकालीन दखनी साहित्यात अरबी-फारसी शब्दांचे प्रमाण वाढलेले दिसून येत असले तरी अगदी उत्पत्तिकालीन भाषेत देखील हा विशेष दिसून येतो हे संत नामदेव यांच्या पुढील पदावरून लक्षात येईल.

- *हले यारां हले यारां खुसि खबरी*
  बलि बलि जांऊ हंऊ बलि बलि जांऊ ॥
  नीकी तेरी बीगारी आले तेरा नाऊ
  कुजा आमद कुजा रफती कुजा मेरवी
  द्वारिका नगरी रासि बुगोई
  खुबु तेरी पगरी मीठे तेरे बोल ॥
  द्वारिका नगरी काहे को मगोल
  चंदी हजार आलम एक लखाणा

हम चिनी पातिसाह सावले वरना
असपति गजपति नरह नरिंद
नामे के स्वामी मीर मुकुंद ॥
-नामदेवगाथा, क्र. २२६२, पृ. ८४८

नामदेवांच्या इतर पदांच्या मानाने या पदात अरबी-फारसी शब्द अधिक आढळतात. ही शब्दयोजना हेतुपूर्वकही झालेली असावी. पदातील आशय इस्लाम धर्मीयांस अनुलक्षून असल्याने त्या धर्माच्या परिचयाची परिभाषा व शब्द या पदात हेतुत: आलेले असावेत. पुढच्या काळातील संत एकनाथ आणि समर्थ रामदास यांच्या पदातही भाषेचे अशाच प्रकारचे वेगळेपण दिसून येते. मुसलमान समाजास उद्देशून रचलेल्या पदात अरबी- फारसी शब्द अधिक प्रमाणात येतात तर सर्वसाधारण समाजास अनुलक्षून केलेल्या रचनांतून मात्र या भाषांतील शब्दांचे प्रमाण बरेच कमी असते अथवा नसतेही. [५] दखनी साहित्यातला हा विशेष प्रारंभ काळातही अस्तित्वात होता याचे निदर्शक या नात्याने वरील पद लक्षणीय ठरते.

दखनी भाषेचे उत्पत्तिकालीन स्वरूप ध्यानात यावे या उद्देशाने संत नामदेवांची पाच पदे वर दिली. या पदांतून भाषेचे निरनिराळे रंग दिसून येतील. नाथवाणीचे बोट हाती धरून चालणारी मराठी भाषेच्या साहचर्याने पाऊल टाकणारी, नाथवाणीपासून दुरावत जाणारी व स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करणारी दखनी भाषेची ही रूपे प्रारंभकाळातील उत्पत्तीच्या प्रक्रियेची निदर्शक आहेत. तत्त्वप्रणालीच्या क्षेत्रात देखील ही प्रक्रिया घडत होती हेही पदांतून निदर्शनास येते.

या भाषेचा विकास पुढे दीर्घकाळ होत गेला. सोळाव्या –सतराव्या शतकात तर दखनी साहित्याने सुवर्णयुग अनुभवले. तरी उत्पत्तीकाळातल्या अनेक जन्मखुणा या भाषेने वैभव काळातही अंगाखांद्यावर बाळगलेल्या आहेत. आज निरनिराळ्या भाषिक प्रांतात प्रचलित असलेल्या बोलीतही दखनीचे उत्पत्तिकालीन काही विशेष आढळतील. या विशेषांच्या आधारानेच या भाषेचे सातत्य तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंतच्या साहित्यात आलेले आढळेल आणि आज प्रचलित असलेल्या दखनी बोलीतही भाषेचे हे स्वभावधर्म निदर्शनास येतील.

संदर्भ

१. ‘इस दृष्टी से संत साहित्य के विकास का इतिहास यदि देखा जाय तो यह कहा जा सकता है कि संत – साहित्य का आरंभ तेरहवी शताब्दी में ही हो चुका था. इस पूर्वपक्ष में वह महाराष्ट्रामें विठ्ठल-संप्रदाय के रूपमें रहा और पंधरवी शताब्दीमे प्रचारित होने वाले उत्तरपक्ष में वह उत्तर भारत में निर्गुण संप्रदाय का रूप बना’ –डॉ. रामकुमार वर्मा, हिन्दी साहित्य (खंड २). पृ.१९२

२. ‘ब्रज भाषा के स्थानपर सहित्य के लिये विशेषकर हिन्दी या हिन्दुस्थानी के प्रयोग का आदर्श उत्तरी भारत के समक्ष सर्व प्रथम दक्कनवालोंने ही रखा’ – भारतीय आर्य भाषा और हिन्दी, पृ. २११

३. हिन्दी साहित्याच्या इतिहासात ‘दक्खिनी हिन्दी’ असा दखनी भाषेचा उल्लेख येतो. हिंदी भाषेची दाक्षिणात्य बोली या अर्थाने हा शब्दप्रयोग योजण्यात येत असतो. दखनी ही हिन्दी भाषेची बोली होऊ शकत नाही याचे विवेचन वर येऊन गेले आहे. दखनी, हिन्दी आणि उर्दू या तिन्ही भाषांना खडी बोलीचा

आधार असल्याने या तिन्ही भाषा परस्परसंबद्ध आहेत असाही युक्तीवाद करण्यात येतो. तदनुसार उर्दू भाषेची प्राचीन अवस्था म्हणजे दखनी (कदीम उर्दू) असेही प्रतिपादण्यात येत असते. हे प्रतिपादनही समर्थनीय ठरत नाही.

खडी बोली ही उत्तर प्रदेशात रूढ असलेली बोली असून आधुनिक हिन्दी आणि उर्दू या भाषांना खडीबोलीचा आधार आहे यात वाद नाही. परंतु, दखनी भाषा खडीबोलीवर आधारलेली आहे हे मत स्वीकारता येत नाही. या भाषेचा तोंडवळा खडीबोली सारखा दिसत असला तरी तो एक आभास आहे, वास्तव नव्हे. तेराव्या चौदाव्या शतकात खडी बोली अस्तित्वात असली तरी या बोलीत साहित्य आढळत नाही. अमीर खुसरो (१२५३-१३२४) यांच्या काही प्रासंगिक रचनांचा आधार घेऊन तेराव्या-चौदाव्या शतकात खडी बोलीचे साहित्य होते असा अभिप्राय काही-पंडित देतात. अमीर खुसरो यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य दंतकथा-आख्यायिकांनी गजबजलेले आहे. यात इतिहास थोडा व गौरवभाव अधिक आहे. वास्तवात अमीर खुसरोने खडी बोलीत रचना केली असे गृहीत धरले तरी साहित्याचे सातत्य पुढच्या काळात आढळत नाही म्हणून अमीर खुसरो या बाबतीत जमेस धरता येत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, दखनीस आधारभूत असलेली बोली नाथसिद्धांच्या साहित्यातून परिणत झालेली आहे.या सिद्धांच्या साहित्यात देशातील अन्य भाषांतील शब्द विशेषत: मराठी शब्द मोठ्या प्रमाणात आढळतात. भाषेच्या व्याकरणासही मराठी वळण आहे.

४. “संत नामदेवांच्या हिंदी साहित्यातील ‘राम’ या लेखात ही भूमिका विस्ताराने विशद करण्यात आली आहे. —मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका, अंक ८, (१९७३), पृ. ४१ ते ४८

५. समर्थ रामदासांची पुढील दोन पदे या संदर्भात अभ्यास करण्यासारखी आहेत पहिले पद इस्लाम धर्मीयांना अनुलक्षून असून दुसऱ्या पदात मात्र सर्व साधारण सामाजिक उपदेश आढळेल-

१. रे भाई याद करो अल्ला की । हक्क चलना सब दिल-पारखी ।।धृ.।।
कुबल बखत हिन्दू जायेंगे ।जायेंगे मुसलमान । बेग धनीकी तलब
आवे, सब को अलबत जाना ।।१।। अल्ला निरंजन दोऊ नही रे ।समजत
समजनहारे । बन्दा कहे समझो भाई । सोही खुदा के प्यारे ।।२।।

२. जित देखो उत रामही रामा । जित देखो उत पूरन-कामा ।।तृण तरूवर
साचे सागर ।जित देखो उत मोहन नागर ।। जल, थल, काष्ठ, पाखाण,
आकाश । मेरे मन मानस राम भज्यो रे । रामदासप्रभु ऐसा कियो रे ।।
-समर्थांचा गाथा, पृ. ४८८ व ४७६

६. दखनी भाषेचा विकास

दीड शतकांची 'आस्मानी-सुलतानी'

उत्तर भारतातील संत परंपरा आणि प्रादेशिक हिंदी भाषांतील साहित्यनिर्मिती यांना प्रेरणा देऊन कृतार्थ झालेली नामदेवांची दखनी भाषा, महाराष्ट्रात व लगतच्या प्रदेशात कालप्रवाहाशी झुंज देत देत, साधुसंताच्या साहित्याद्वारे परिस्थितीस योग्य वळण लावण्याच्या प्रयत्नात असताना, महाराष्ट्रातही चौदाव्या शतकानंतर परिस्थिती अधिकच बिकट होत गेली. कालपरिस्थितीच्या या जबर मर्यादांचा मराठी आणि दखनी या दोन्ही भाषांतील साहित्यावर प्रतिकुल परिणाम घडला.

नामदेवांनंतरच्या दखनी साहित्याचा शोध घ्यावयाचा म्हणजे सुमारे दीड शतक तरी अंधारातच चाचपडत पाऊल टाकावे लागते. इ. स. १३५० ते १५०० हा दीडशे वर्षांचा कालखंड महाराष्ट्रात 'आस्मानी सुलतानी' चा काळ म्हणून ओळखला जातो. निसर्गाचा प्रकोप आणि परधर्मीय सुलतानांचे आक्रमण यांनी महाराष्ट्रास अक्षरशः 'त्राहि भगवान्' करून सोडले होते. मराठी साहित्याच्या इतिहासात हा कालखंड 'अंधार युग' या नावाने संबोधला जातो. दखनी भाषा याच वातावरणात वावरत असल्याने हे दुर्भाग्य तिच्याही वाट्यास आले. 'तुर्कांच्या धाडीत' अनेक धर्मग्रंथांची 'वाट लागल्याचे' उल्लेख महानुभाव साहित्यात आढळतात. इतर पंथाच्या साहित्याचीही तीच गत झालेली असणार.

या कालखंडात महाराष्ट्रात आणि उत्तर भारततही सत्ता काबीज करण्यासाठी भीषण स्पर्धा मुसलमान सरदारांत चालू होती. एकाच धर्माच्या सरदारांतील या स्पर्धांची झळ सामान्य जनतेसच मोठ्या प्रमाणात लागत होती. कारण, राज्यकर्त्यांच्या दृष्टीने ती जनता परधर्मीय होती आणि परधर्मीयांचे निर्दालन करणे वा त्यांचा अनन्वित छळ करणे हे त्यांच्या लेखी पवित्र असे 'धर्म कर्तव्य' होते. 'म्लेंच्छे गांजिले देवभक्ता । महिमा उच्छेदिला सर्वथा' हे एकनाथांनी केलेले वर्णन तत्कालीन वास्तवाचे निदर्शक आहे. उत्तर भारतातील वातावरण याहून निराळे नव्हते. 'कलियुगात राजे कसाई झाले आहेत. धर्म पंख लावून उडून गेला आहे. असत्याच्या आमावस्येमुळे सत्याचा चंद्र, दृष्टीआड झाला आहे[१] हे सद्‌गुरू नानकांचे उद्‌गार याच परिस्थितीचे वाचक आहेत. बाबराच्या केलेल्या आक्रमणाचे (१५२४) त्यांनी केलेले वर्णन अत्यंत हृदयस्पर्शी तसेच प्रतिनिधीकही आहे.

"हे परमात्मा, बाबराने खुरासानवर राज्य केले. खुरासान, हे आपलेच आहे असे समजून तू या प्रदेशाचे रक्षण केलेस (परंतु, हिंदुस्थानच्या बाबतीत मात्र तू कर्तव्य- पालन केले नाहीस). बाबराच्या आक्रमणामुळे सारा देश भयभीत झाला आहे. सर्व विश्वाच्या संरक्षणाची जबाबदारी, देवा, तुझ्यावर आहे. (ती पार न पाडता तू मुत्सदेगिरीने वागतो आहेस) मोगलांना यमाचे रूप देऊन तू त्यांच्या करवी हिंदुस्थानावर आक्रमण करविले. लोक एवढा आक्रोश करीत आहेत. तुला थोडासुद्धा पाझर फुटत नाही? अरे, तू केवळ मोगलांचा त्राता नाहीस. आम्हा हिंदूंचा रक्षणकर्ता देखील तूच आहेस."[२]

'आस्मानी सुलतानी'च्या काळातील महाराष्ट्रातले वातावरण कोणत्या प्रकारचे होते याची कल्पना या उद्‌गारांवरून यावी. महम्मद तुघलकाने सर्व देशावर प्रभावीपणे हुकुमत गाजविता यावी या हेतूने राजधानीचे ठाणे देवगिरी/ दौलताबादेस आणले (१३२६). तरीही त्याला आपल्या साम्राज्याचे विघटन टाळता आले नाही. दक्षिणेत (आणि उत्तरेतही) अनेक मुसलमान सरदारांनी बंडखोरी करून लहान मोठी

राज्ये स्थापन केली. त्यांपैकी दीर्घकाळ टिकले ते १३४७ साली स्थापन झालेले बहामनी राज्य. त्याचीही शकले १४९० ते १५२६ या कालखंडात उडाली. त्यातून उदयास आलेल्या आदिलशाही व निजामशाही या दोन घराण्यांच्या हुकुमतीत महाराष्ट्र विभागला गेला. १६३५ साली शहाजहानने नगराची निजामशाही बुडविली. त्यानंतर मोगल आणि आदिलशहा यांच्या सत्तेखाली महाराष्ट्र व सभोवतालच्या परिसरातील प्रदेश गेला.

तत्पूर्वी एक क्रांतिकारक घटना घडलेली होती. १३३६ साली विजयनगरचे राज्य हरिहर आणि बुक्क या दोघा बंधूनी 'धर्मरक्षणार्थ' स्थापन केले. हिंदुधर्माचे संरक्षण हे आपले ब्रीद आहे असे हे राजे मानत. [3] या राज्यामुळे मुसलमानी आक्रमणास दक्षिणेत पायबंद बसला. महाराष्ट्राच्या दुर्दैवात मात्र फरक झाला नाही. कारण, विजयनगर साम्राज्याचा विस्तार कावेरी नदीच्या काठाने होत गेला. आपल्या धर्माला कोणीतरी त्राता आहे एवढाच दिलासा या साम्राज्याने महाराष्ट्रातल्या जनतेला मिळाला. तोही आधार दीर्घकाळ टिकला नाही. राज्यविस्तारासाठी आपापसात लढणाऱ्या मुसलमानी सत्तांनी संघटित होऊन १५६५ साली विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचा अंत घडवून आणला.

अशा धामधूमीच्या काळात समाजास सावरून धरण्याचे प्रयत्न त्या त्या काळातील साधुसंतांनी केलेले असले तरी एकंदरीत परिस्थितीचा प्रतिकूल परिणाम साहित्याच्या निर्मितीवर होणे अपरिहार्य होते. म्हणूनच संत नामदेवांच्या नंतर (१३५०) एकनाथांचा उदय होईपर्यंतच्या काळात मराठी आणि दखनी या दोन्ही भाषांतील साहित्याचे प्रवाह खंडित झालेले दिसून येतात. संत एकनाथांच्या कर्तृत्वामुळे व त्यांच्या अनेकरंगी साहित्याच्या प्रभावाने समाजात नवचैतन्य निर्माण झाले. मराठी आणि दखनी या दोन्ही भाषांतील साहित्याचे खंडित झालेले प्रवाह पुन्हा गतिमान झाले. संत नामदेवानंतरच्या दखनी साहित्याचे खंडित झालेले प्रवाह पुन्हा गतिमान झाले. संत नामदेवानंतरच्या दखनी साहित्याचा मागोवा घ्यावयाचा म्हणजे एकनाथ काळापासून झालेली साहित्य निर्मिती ध्यानात घेतली पाहिजे.

प्रजेचा धर्म आणि राजसत्तेचा धर्म

चौदाव्या शतकानंतर या देशातील धार्मिक व राजकीय वातावरण बरेच गुंतागुंतीचे होत गेले. भारतावर मुसलमानांचे आक्रमण होण्यापूर्वी अनेक धर्म-पंथ या भूमीवर नांदत होते. तथापि, राज्यकर्त्यांचा धर्म आणि जनतेचा धर्म असे भेद कधीच पडले नाहीत. त्यामुळे या दोहोत संघर्षाचा प्रसंगही उद्भवला नाही. राजा कोणत्याही धर्म पंथाचा असला तरी प्रजेच्या धर्माचे सर्वतोपरी रक्षण करणे हे तो आपले कर्तव्य मानीत असे. समाज-व्यवस्थेचे नियमन प्रचलित असलेल्या धर्मशास्त्रानुसार होत असे. या व्यवस्थेत राजा व राजसत्ता यांनी ढवळाढवळ कधीच केली नाही. त्यामुळे राजा बदलला अथवा राजघराण्यांत पालट पडला तरी समाज-व्यवस्था आणि समाजाचे नियमन यांत फारसे अंतर पडले नाही. मुसलमानी आक्रमणानंतर मात्र परिस्थितीत मूलभूत बदल झाला. आपल्या धर्माचा प्रसार हे इस्लामी राजसत्तेचे ध्येय होते. धर्मप्रसारार्थ अन्य धर्मीयांवर अत्याचार करावे लागले तरी सत्ताधाऱ्याच्या दृष्टीने तो 'धर्मकार्याचाच' एक भाग होता. त्यात अन्याय्य असे काही आहे असे त्यांना कधीच वाटले नाही. राजसत्तेचा धर्म आणि प्रजेचा धर्म त्यामुळे वेगळे पडले. राजसत्तेच्या विरोधात स्वधर्माचे रक्षण करणे अथवा राज्यकर्त्यांच्या धर्माचा निमूटपणे स्वीकार करणे हे दोनच मार्ग जनतेपुढे होते. परिस्थिती विषम असल्याने बळाने बळाचा प्रतिकार केवळ अव्यवहार्यच नव्हे तर अयशस्वी व सर्वनाशास आवाहन करणारा ठरला असता. अशा परिस्थितीत समाजाचे आणि स्वधर्माचे संरक्षण साधुसंतांना करावयाचे होते.

स्वधर्माचे रक्षण करावयाचे म्हणजे प्रथम समाजास धर्माच्या मूलतत्त्वांविषयीचे ज्ञान असणे आवश्यक असते. ज्ञान नसेल तर समाजात धर्माविषयी निष्ठा जागृत होणे अशक्य असते. धर्म-रक्षण केवळ देव – देवळांच्या संरक्षणाने होत नसते. व्यक्तीच्या व समजाच्या अंतःकरणात खऱ्या धर्मतत्त्वाचा उदय झाला तरच धर्मरक्षण शक्य होते. खरा धर्म अन्य धर्मांचा व धर्मीयांचा द्वेष करीत नाही, कारण, लौकिक धर्मभेद अनेक असले तरी सर्व धर्मांना आधारभूत असलेली मूळ तत्त्वे समान असतात ही धारणा धर्माज्ञानाने बळावते. उपास्य व उपासना-पद्धती यांच्या संबंधीचे वादही या ज्ञानाने शांत होतात. धर्माच्या मूलतत्त्वाविषयीच्या अज्ञानातूनच धर्मभेद व तत्संबधीचे संघर्ष उद्भवत असतात. या विकृतीवर एकच मात्रा गुणकारी ठरते ती म्हणजे सर्व-धर्म-समभाव. संत एकनाथांनी आपल्या दखनी व मराठी साहित्यातून पुरस्कारिलेला धर्म याच सूत्रांवर आधारलेला आहे. नाथांनी विषय परिस्थितीत समाज-प्रबोधन केले ते या सूत्रांच्या आधाराने.

दखनी-मराठीचे समान सामाजिक जीवन

एकनाथांच्या 'हिंदू-तुर्क-संवादात' या सूत्रांचा सुबोध आविष्कार झालेला आहे. दोन्ही धर्मातील काही रूढी व संकेत यांचे वैयर्थ्य या भारुडात प्रगट झाले आहे. तदनंतर 'प्राप्ती एक, भजन विरुद्ध' असा निष्कर्ष काढण्यात आलेला असून सर्वधर्म-समभावाचा पुरस्कार करण्यात आलेला आहे. राजकीय वातावरणातून निर्माण झालेला विखार दूर करण्याच्या दृष्टीने अशा प्रकारचे मार्गदर्शन समाजास आवश्यक होते. नाथांच्या वाणीचा व व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव एवढा मोठा होता की, त्यांच्या नंतर होऊन गेलेल्या सूफी संतांनीही या भूमिकेचा पुरस्कार आपल्या साहित्यातून प्रभावीपणे केला आहे. अगोदरच्या प्रकरणात दखनी साहित्यातील वातावरण आणि सांस्कृतिक परंपरा यांचे विवेचन करताना तत्कालीन युगधर्माचे निरुपण विस्ताराने केले आहे. त्यावरून नाथांच्या वाणीचे संस्कार किती खोलवर झाले होते याची कल्पना करता येईल. 'निरंजन' हा या युगधर्माचा परवलीचा शब्द. निराकार परब्रह्माचा वाचक असलेला निरंजन नाथपंथाशी निगडित आहे. उत्तरकालीन संतांनीही तो योजलेला आहे.

एक निरंजन अल्लह मेरा ।हिन्दु तुरक दुहू नही तेरा ।
-कबीर ग्रंथावली, १५२

असे कबीराचे वचन असून सूफींच्या दखनी काव्यात देखील हीच संकल्पना येते. नाथांच्या पुढील कवनात हाच युगधर्म प्रतिबिंबित झालेला आहे.

- *चल चल चल । नाम अल्ला का बडा है*
  वो अल्ला ब्रह्म नाम विटपर खडा है
  सो पंढरपूरमें विठ्ठल ब्रह्म नाम है
  सर्व साधुसंत रात और दिन ध्यान करत है
  इसे पार पडेगा ।
  ये नाम से चौऱ्यावंशी लक्ष फेरी न आवेगी
  इस आगे माया लवंडी है
  ये नाम भूल जायगा तो माया डंखिणी झूल मारेगी ॥
  -एकनाथ गाथा, गारुडी, पृ. ४१६ अ.

सर्वच धर्मांचे अधिष्ठान असलेला परमेश्वर एकच आहे ही साधुसंतांनी घेतलेली भूमिका बरीच पुरातन असली तरी [४] एकनाथकालीन परिस्थिती लक्षात घेता या धारणेस अधिक प्राधान्य आवश्यक होते म्हणून नाथांच्या दखनी साहित्यात या संकल्पनेचा पुनरुच्चार अनेक स्थळी झालेला दिसतो.

एकनाथोत्तर

सोळाव्या शतकानंतर दखनी साहित्याचा विकास दोन समांतर प्रवाहांनी घडवून आणला हे लक्षात येते. १. नागरी लिपीतील साहित्य आणि २. फारसी लिपीतून झालेली ग्रंथ-रचना. हाच काळ मराठी साहित्याचाही उत्कर्ष-काळ ठरावा हा केवळ योगायोग म्हणता येणार नाही. मराठी आणि दखनी या भाषा भिन्न असल्या तरी एकाच समाजजीवनात त्या वावरत होत्या. शिवाय, समाजप्रबोधन ही उभय भाषांतील साहित्याची समान निर्मिती –प्रेरणा असल्याने साहित्यातील चढ-उतार व प्रवाह अभिन्न राहणे अपरिहार्य होते. फारसी लिपीतील दखनी साहित्य प्रारंभकाळात तरी सूफी संतांनी रचलेले असले तरी राजकीय वातावरणातील धर्मभेदांचे संघर्ष त्यांच्या साहित्यात उमटले नाहीत. उलट कर्मठतेइतकाच संकुचित धर्मभावांचा निषेधच सूफींनी केला असून उभय प्रवाहांतून समान युगधर्माचा पुरस्कार झालेला आढळून येतो. तरीही उभय लिपीतील साहित्यात काही वेगळेपणाही आढळून येतो. त्याची नोंद घेतली पाहिजे.

नागरी लिपीतील दखनी साहित्याचा प्रारंभ संत नामदेवांच्या काव्याने झालेला असला तरी मध्यंतरीच्या दीड शतकात तिच्यातील साहित्य –निर्मिती खंडित झालेली होती. पण संत एकनाथांच्या काळात सुरु झालेली साहित्य – निर्मिती मात्र १८५० पर्यंत अखंडितपणे चालू होती. कालपरिस्थितीनुसार भाषेत बदल झाले तसेच काही नवे प्रवाहही साहित्यात रूढ झाले.सतराव्या शतकापर्यंत संत कवीच दखनी –भाषेतून रचना करीत होते. नंतरच्या काळात संतकवींबरोबरच पंडितकवींनीही साहित्य –निर्मितीत भाग घेतला. प्रारंभीची रचना स्फुट पदांपुरतीच मर्यादित होती. पदे भक्तिपर तशीच समाज- प्रबोधनपर असावयाची. पंडिती काव्याच्या उत्कर्षकाळात अनेक आख्यानांचीही भर साहित्यात पडली.नारदीय कीर्तनाच्या प्रसाराने मराठी आख्यानक कवितेला प्रोत्साहन मिळाले. संतकवींच्या अभंगात्मक व ओवीबद्ध आख्यानांच्या बरोबरीने विविध वृत्त-छंदात्मक आख्याने रचण्यात येऊ लागली. उत्तर भारतातील कित्येक संत हे आख्यानांचे विषय झाले. त्याबरोबरच संपूर्ण दखनी व दखनी-मराठी मिश्र आख्यानांचीही रचना सुरु झाली. इ. स. १७०० नंतरच्या काळात दक्षिण आणि उत्तर या भागांतले सांस्कृतिक दळणवळण वेगाने वाढत गेले. त्याचा परिणाम साहित्यावर होणे अपरिहार्य होते. तो लक्षात घेता नामदेवोत्तर दखनी साहित्याचे भाषेच्या व अंतःप्रवाहांच्या दृष्टीने दोन विभाग कल्पावे लागतात – एकनाथांपासून समर्थ रामदासांपर्यंतचा कालखंड आणि तदुत्तरचा काल.

आशयाचे अंग आणि भाषेचा रंग

समर्थांच्या नंतरच्या कालखंडात भाषा आणि साहित्यातील आशय आणि अभिव्यक्ती यांच्या स्वरुपात बरेच स्थित्यंतर घडलेले दिसून येते. या स्थित्यंतरास राजकीय, सामाजिक, आणि सांस्कृतिक घडामोडी कारणीभूत आलेल्या आहेत.त्यांचा मागोवा स्वतंत्रपणे घेतल्याविना या घडलेल्या स्थित्यंतराची योग्य ती मीमांसा करता येणार नाही. तत्पूर्वी रामदासांच्या काळापर्यंतच्या दखनी साहित्याचे स्वरूप कोणत्या प्रकारचे होते हे लक्षात घेणे श्रेयस्कर ठरेल.

एकनाथ ते रामदास या कालखंडातील नागरी लिपीतले साहित्य एकतर भक्तिप्रधान आहे अथवा समाज-प्रबोधनपर. समाजप्रबोधनपर रचना करतांना संतानी भिन्नधर्मीय समाजाचे अस्तित्व गृहीत धरून रचना केलेली आहे. अशा रचनांतून आलेली दखनी भाषा भक्तिपर साहित्यातील भाषेच्या तुलनेने वेगळ्या प्रकारची वाटते. भक्ती आणि अध्यात्म यांच्या विवरणार्थ रचलेल्या साहित्यात अरबी, फारसी शब्दांचे प्रमाण कमी असून समाजप्रबोधनपर रचनेत मात्र ते वाढलेले दिसते. समाजात रूढ असलेली भाषा प्रबोधन परिणामकारक रीतीने करू शकेल या जाणीवेतून अशा रचना होत असल्यामुळे भाषेच्या स्वरूपात अंतर पडलेले दिसून येत असावे. काही उदाहरणांच्या आधाराने हा मुद्दा अधिक स्पष्ट करता येईल. नाथांच्या साहित्यातून दोन उतारे पुढे उद्धृत करण्यात येत आहेत.पहिला उतारा नाथांच्या एका गवळणीतून घेतलेला आहे; दुसरा 'फकीर' या भारूडातून उद्धृत केला आहे. नाथांची गौळण भक्तिभावाची निदर्शक आहे. नाथांच्या शैलीप्रमाणे त्यात रुपकही साधलेले आहे. भाषा संस्कृत-प्रचुर नसली तरीही अरबी-फारसी शब्दांचे प्रयोग फारसे झालेले नाहीत. 'फकीर' हा जाणूनबुजून परधर्मीय. त्याच्या धर्माची परिभाषा योजावयाची म्हणजे अरबी-फारसी शब्द अपरिहार्य ठरतात. तथापि, या फकीराने दिलेला संदेश मात्र तत्कालीन युगधर्माशी सुसंगत असा आहे. 'निजतत्त्व' हे अल्ला आणि विठ्ठल या दोन्ही नावांनी संबोधले जात असल्याने या दोहोत एकरूपता आहे असे या फकीराचे सांगणे आहे.

१. मैं दधि बेचन चली मथुरा । तुम क्युं थोर नंदजी के लाला ॥
भक्ति का आचला पकडा हरी । मत खेलो मेरी फारी चुनरी ॥
अहंकार को मेरा गरगा फोरा । व्हाको गोरस सब ही गिरा ॥
द्वैतन की मोरी अंगीया फारी । क्या कहूं मै नंगी नार उधारी ॥
एका जनार्दन ज्यासो भेटा । लागत पगले कभी नही छूटा ॥
-एकनाथ गाथा, क्र. ९२, पृ.३६

२. हजरत मौला मौला । सब दुनिया का पालनवाला
सब घट मों सांई बिराजे । करत हय बोलबाला
नवाजे मैं गरीब तेरा । तेरे चरण कु रतवला
अपना साती समज के लेना । सलील वोही अल्ला
जीन रुपसे है जगत पसारा । वोही सल्लाल अल्ला
एका जनार्दनी निजबत अल्ला । असल वोही विटपर अल्ला
-एकनाथ गाथा, क्र. ३९५१, पृ. ४१०

थोर संगीतकार आणि संगीतपर रचनेचे नानाविध प्रयोग दखनी व मराठी या दोन्ही भाषांतून करणारे दासोपंत हे एकनाथांचे समकालीन. भाषेच्या स्वरूपाचा तुलनात्मक अभ्यास करता यावा या हेतूने दासोपंतांच्या पदांपैकी दोन पदे पुढे देण्यात येत आहेत. पहिले पद सूफी साहित्यात प्राधान्याने येणाऱ्या मस्नवी छंदात रचलेले आहे. त्याची भाषा सूफींच्या दखनी साहित्यातील भाषेशी संवादी असून व्यापक आत्मतत्त्वाची ओळख करून घेण्याचे आवाहन त्यात करण्यात आले आहे. दुसऱ्या पदात सूफी संप्रदायात प्रचलित असलेल्या परिभाषेचा उपयोग करण्यात आला आहे.

१. धरम से करम का भरम कौन जाने
उसे देखने को बडे है दिवाने

तनिक बोल मुख लोल हँसकर खुशीसुँ
लगा है सदाशिव हमारा उसीसूँ
गगन घड मनोहर गगन मे नगर कर
अलख तूँ जमावे अलख में जिक्र कर
न तूँ है जुदा न तुज में है जुदाई
जुडाई मुझे तव दिगंबर खुदाई
-संत दासोपंत: चरित्र आणि भावदर्शन, २७२

२. लालन मेरा साँवला भोला दिलदार रे
इष्क बन्दे तुमसे लुटी मेरी सांस रे
फिर फिर देखी दिलको दिलसे साहब तेरी वाट रे
दिगंबरसे मिलते मिलते छुटी मेरी गांठ रे ॥
-श्री संत दासोपंत: भावचरित्र आणि वाङ्मयदर्शन, २७

दासोपंतांचा समाधी-काल आणि समर्थ रामदास यांचे निर्वाण यात अवघ्या वीस वर्षांचे अंतर असले तरी (१६६१ व १६८१) नागरी लिपीतील दखनी भाषेच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात बदल घडत असल्याची लक्षणे समर्थांच्या साहित्यात आढळतात. समर्थांच्या समाज-प्रबोधनपर रचनांतील दखनी विशेष बदलली नाही. परंतु, त्यांची भक्तिपर पदे मात्र भाषेच्या दृष्टीने बरीच संस्कारित झालेली दिसतात. उत्तर भारतातील व्रज व अवधी या भाषांचे संस्कार या पदांवर अधिक झालेले आढळतील.त्यामुळे अशा पदांची भाषा दखनी मानावी किंवा नाही असा संभ्रम आपल्याला पडतो. पुढच्या काळात ही प्रवृत्ती अधिक वाढलेली दिसून येते. या परिवर्तनाची कारणे सामाजिक तशीच वाढत्या सांस्कृतिक दळणवळणाची निदर्शक आहेत. त्यांचा विचार पुढे करावयाचा आहे. समर्थांच्या साहित्यातून ही नवी प्रवृत्ती सुरू झालेली आहे हे लक्षात यावे यासाठी समर्थांची दोन पदे पुढे देण्यात येत आहेत. पहिले पद लोकरूढ दखनी भाषेतले असून सारंग रागातील दुसऱ्या पदांवर मात्र उत्तर भारतातील प्रादेशिक बोलींची दाट छाया आढळून येईल –

१. सब घट में है रे खुदाई ॥धृ॥
खाली जागा नही रे, खुदाबिन जानत नाहीं रे ॥
झुटी काहे सो झुटी दिवानी, खबर नहीं है रे भाई
दास फकीर कहे इतनाही, आनंद माही रे ॥
-समर्थांचा गाथा, ४८

२. खेलते है नन्दलाल बसन्त ॥धृ॥
अबीर सिलारस मृगमद केसर,डारत लाल गुलाल
तेल फुलेल गुलाब, कुसुंबा, छिदकर नन्दगुपाल
केतकी चंपक मालती माला, मारते गंध रसाळ ॥
आपे रंग भिने गोपी, भिनाई तन मन दीजे हो ॥
-समर्थांचा गाथा,४७९

अनुक्रमणिका

दखनी, अवधी आणि व्रज

उत्तर भारतातील बोलींचा विशेषत: व्रज भाषेचा परिणाम समर्थ रामदासांच्याच पदांवर पडलेला आहे असे नाही. समग्र दखनी साहित्यातील सर्वच पदरचनांत ही प्रवृत्ती सतराव्या शतकापासून आढळून येते. इब्राहीम आदिलशाहा याचा 'नवरसनामा', सुलतान अली आदिलशहाचा पदसंग्रह आणि कुली कुतुबशहा याची गीते, या सर्व साहित्यादेखील ही प्रवृत्ती दिसते. उपरोक्त साहित्यिकांनी आपापल्या पदांतून हिंदू देवदेवतांची वर्णनेही रचली आहेत. काही राग -लक्षणेही या साहित्यात आली आहेत. या लक्षणांत रागदेवतांचे चित्रण करताना व्रज भाषेचा उपयोग अधिक अंशाने झालेला दिसतो. पद - साहित्याव्यतिरिक्त अन्य साहित्यात मात्र हा विशेष आढळत नाही. सतराव्या शतकात रागदारी चीजांची एक विशिष्ट भाषा घडत चाललेली होती असे अनुमान या आधारावरून निघते. तसे नसते तर एकाच कवीच्या काव्यात भाषेची भिन्न रूपे आढळली नसती. नागरी आणि फारसी या दोन्ही लिपींतील दखनी साहित्यात हे तारतम्य दिसते. समर्थांचे पद वर उद्धृत केले आहे. इब्राहीम आदिलशाह व सुलतान अली आदिलशाह यांच्या काव्यातून दोन अवतरणे पुढे देण्यात येत आहेत. सुलतान आदिलशहाने तर आपल्या काव्यातील नावेसुद्धा दोन धारण केली आहेत.दखनी साहित्यात तो स्वत:चा 'शाही' या नावाने निर्देश करतो. पदांतून मात्र 'मदनगुपाल' हे त्याचे नाव आढळते. या दोन्ही कवींनी अनुक्रमे आसावरी व भैरव रागांचे रचलेले 'ध्यान' पुढे देण्यात येत आहे. उत्तर भारतीय बोलींचे संस्कार नागरी व फारसी लिपींमधील दखनी भाषेवर सारख्याच प्रमाणात होत होते हे या उदाहरणांवरून ध्यानात येईल.

राग : असावरी

इस्तरी गौरी चंपकसार
रगत पितंबर कंचुकी नीली सरब सिंगार
जिन्ती जिन्ती हँस बोलत पी पें चौसर कांसे डार
ऐचत वस्तर नर कर धरनार
चंचल चपल चक प्रीतम को महँक प्यार
यो लछन आखें इब्राहीम कवितगार
- किताबे नवरस, ७७

राग : भैरो

भैरो भेद मनजात सो महासुंदर गौरवर्ण घनसार
तिरलोचन चंदर सीस मुकट मदगंगास्वरूप सिंगार
एक हस्त मुडंनर तिरसूल
जुगलकर तजें खपर सिंग उधार
आसन गज परिशत व्यागर चरम
रजत बसत मंदर मुरदंग बजावत नार
-कुलियाते शाही, १७९

नागरी व फारसी य दोन्ही लिपींतून निबद्ध असलेल्या दखनी साहित्यात दिसून येणारी ही नवी प्रवृत्ती केवळ कालौघाचा परिणाम नसून सोळाव्या शतकाच्या आसपास सुरू झालेल्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचा तो एक परिपाक आहे. वाढत्या सांस्कृतिक दळणवळणामुळे दखनी साहित्यावर उत्तर भारतातील

निरनिराळ्या भाषांचे संस्कार झाले. या संस्कारांमुळे समग्र देशाची राष्ट्रभाषा होईल अशा स्वरुपात दखनी भाषेला आणि साहित्याला नवे वळण लागण्यास प्रारंभ झाला.

हे वळण समजून घेण्यासाठी पुन्हा पुढील कालातील समकालीन सांस्कृतिक घडामोडींची दखल घेतली पाहिजे.

संदर्भ

१. कलि काति राजे कसाई धरमु पंखु करि उडिला
कूड अमावस सचु -चंद्रमा दीसे नही कड चडिआ ॥
-नानक वाणी, मांझ की बार, ३५

२. नानकवाणी, सबद ३९

३. बुक्करायाचे दानपत्र, इ.स. १३७९

४. ● हिन्दु ध्यावै देहुरा मुसलमान मसीत
जोगी ध्यावै परम पद जहाँ देडरा न मसीत ॥ - गोरखबानी २५
पंजाबातील नामदेव (पृ. १११) या ग्रंथात याच आशयाचे नामदेवांचे पद आले आहे.
● दादू हिन्दू लागै देहूरा मुसलमान मसीती
हमें लागे एक अलेख सौ सदा निरंतर मीति
-सं. संत सुधासार, २९२
● रज्ञब हिन्दू पासल वही, वोही मुसलमान
रज्ञब किणका रहम का, जिसकूँ दे रहमान
-सं. संतसुधासार, ३५१

अनुक्रमणिका

७. गोदा मिळाली गंगेला !

वाढते सांस्कृतिक दळण-वळण

रामदासोत्तर काळातील नागरीलिपीतील दखनी भाषा व साहित्य यांचा विचार आता करावयाचा आहे. या कालखंडात नागरी लिपीतील भाषा व साहित्य यांना निराळे वळण लागलेले आहे; तसेच फारसी लिपीतून प्रसृत झालेल्या दखनीने देखील वेगळे स्वरूप धारण केलेले दिसून येते. दोन्ही लिपीतील भाषा व साहित्य यांत घडलेले परिवर्तन एकाच दिशेने झालेले नाही. या कालखंडात दोन्ही लिपींतील साहित्याने उत्कर्षाची परिसीमा गाठलेली होती हे मात्र सत्य आहे. रचनेत विविधता आणि साहित्यात नवे प्रवाह दोहींकडे सारख्याच प्रमाणात प्रचलित झाले. या दोन बाबतीत असलेले साधर्म्य वगळले तर त्यांचा बाकीचा विकास मात्र निरनिराळ्या दिशेने घडलेला आहे असे प्रत्ययास येते.

या कालखंडातील फारसी लिपीतील साहित्यात दरबारी कवींची परंपरा प्रभावी ठरली आहे. सूफी संतांचे साहित्य निर्माण होतच होते. परंतु, दरबारी राजप्रशस्तीपर साहित्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते. फारसी भाषेतील राजप्रशस्तीपर काव्यांचे आदर्श दखनी कवींनी आपल्या समोर ठेवलेले असल्याने भाषेचे पूर्वीचे वळण सुटत गेले. फारसी काव्यातील प्रतिमा, रचनापद्ध्ती आणि छंद यांचे प्रयोग दखनी साहित्यात वाढत्या प्रमाणावर झालेले आढळतात. अरबी-फारसी शब्दांची विपुलता हा या आदर्शांचाच परिणाम म्हणता येईल. भाषेचे मराठी वळण मात्र सुटले नाही.फरक एवढाच झाला की, अगोदरच्या दखनी साहित्यात मराठी साहित्यातले व बोलीतलेही शब्द योजले जात. दरबारी साहित्यात मात्र ग्रामीण मराठी शब्दांचे व व्याकरण रूपांचे प्रयोग वाढत्या प्रमाणात होत असल्याचा प्रत्यय येतो. लोकव्यवहारात प्रचलित असलेल्या भाषेवर दरबारी कवींचा अधिक भर होता असा त्याचा अर्थ होतो.

नागरी लिपीतील दखनी साहित्यात मात्र भाषेच्या दृष्टीने दोन धारा प्रचलित झालेल्या आढळतात. एक धारा मराठी वळण असलेल्या परंपरागत दखनीची आणि दुसरी उत्तर भारतीय भाषांचे संस्कार घेऊन सिद्ध झालेली भाषा. या धारेची व्रज, अवधी या तत्कालीन साहित्यात रूढ असलेल्या भाषेत गणना करता येत नाही. ती एक संमिश्र भाषा असून फार तर ‘राष्ट्रभाषा’ असे नाव या संमिश्र भाषेस देता येईल. उत्तर-दक्षिणेचे वाढते सांस्कृतिक संबंध आणि विस्तारलेले आदान-प्रदान यांच्या योगाने हे परिवर्तन घडून आलेले आहे.

तसे पाहिले तर समग्र भारतातच सोळाव्या शतकापासून सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची प्रक्रिया सुरु झालेली होती. मोगल राजवट उत्तरेत स्थिरावल्यामुळे या प्रक्रियेत अप्रत्यक्ष रित्या गतिमानता निर्माण झालेली होती. मोगल राजवटीपूर्वी होऊन गेलेली परधर्मीय राज्यकर्त्यांची घराणी नेहमीच स्वतःला अभारतीय मानत होती. या देशाशी केवळ राज्य करण्यापुरताच आपला संबंध आहे अशी सर्वांचीच धारणा होती. त्यामुळे या देशातील भाषा आणि संस्कृती यांचा परिचय करून घेण्याचाही प्रयत्न राज्यकर्त्यांनी केला नाही. मोगल राजवटीत विशेषतः अकबराच्या काळापासून सत्तेच्या बळावर स्वधर्माचा पुरस्कार करण्याचे राज्यकर्त्यांचे धोरण बरेच सौम्य झालेले दिसून येते. त्यामुळे प्रजेचा धर्म आणि राज्यकर्त्यांचा धर्म हा संघर्ष अगोदरच्या काळाइतका प्रखर राहिलेला नव्हता. भारतीय विद्या आणि कला यांना प्रोत्साहन देण्याच्या राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे वातावरण निवळण्यास बरेच साहाय्य झाले. उपनिषदांची फारसी भाषेतील भाषांतरे याचे काळात झाली. संगीतशास्त्रावरील संस्कृत ग्रंथांचे अनेक फारसी अनुवाद व रुपांतरेही झाली.

भारतीय संगीताच्या उपासकांना दरबारात मान व प्रतिष्ठा मिळत गेली. याचा स्वाभाविक परिणाम या दोन संस्कृती अधिकाधिक जवळ येण्यात झाला.

कृष्णभक्तिपर साहित्याचा उत्कर्षकाळ

देशातल्या सांस्कृतिक जीवनास प्रभावी कलाटणी मिळाली ती निरनिराळ्या प्रांतांतील व भाषांतील भक्तिपरंपरांचे परस्परांत वाढलेल्या दळणवळणाच्या योगाने. या दळणवळणामुळे परस्पर आदानप्रदान देखील वाढले. सर्वच भाषांतील साधुसंत भक्तीबरोबरच सर्व धर्ममतांच्या समन्वयाचा प्रसार अगोदरपासूनच करीत होते. सूफींच्या दखनी साहित्यातूनही याच भूमिकेचा प्रसार झाल्याचे विवेचन अगोदर येऊन गेले आहे. नाथसिद्धांच्या विचारधारेतून उदयास आलेला महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय तेराव्या शतकापासून लोकजागरणाचे कार्य करीत होता. या संप्रदायातील संत नामदेवांच्या दखनी साहित्यापासून स्फूर्ती घेऊन उत्तर भारतात संतमताचा प्रसार कबीर व नानक यांनी पंधराव्या-सोळाव्या शतकात केला. इतर भाषांतूनही निरनिराळे भक्तिसंप्रदाय समाजजागरणाचे कार्य करीत होते. या कालखंडात या कार्याला अधिक चालना मिळाली.

कोणताही एक भक्तिसंप्रदाय वा एखाद्या भाषेतील साहित्य यांच्या आधाराने भारतभर सुरू असलेल्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे समग्र दर्शन घडणे शक्य नाही. आधुनिक भारतीय भाषा, विशेषतः आर्यभारतीय (Modern Indo-Aryan Languages) भाषांतील या कालखंडातील साहित्याचे अवलोकन केले असता या कार्याची थोडी फार कल्पना करता येते. या भाषांतील साहित्य भक्तिपर तर आहेच; कृष्णभक्ती हा सर्वच भाषांतील या कालखंडातील साहित्याचा केंद्रबिंदू आहे; भक्तिसंप्रदाय अनेक आहेत; प्रत्येकाची तत्त्वप्रणालीही भिन्न आहे. परंतु श्रीकृष्ण ही सर्वच भक्तिसंप्रदायांची आराध्य देवता आहे. महाराष्ट्रात विठ्ठल हे दैवत असले तरी कृष्ण आणि गोपगोपी यांना वारकरी संप्रदायात महत्त्व आहेच. सर्वच भक्तिसंप्रदायांनी गीता आणि भागवत या दोन संस्कृत ग्रंथांना प्रमाण मानले आहे.

गीता आणि भागवत यांच्या बरोबरीने जयदेवाच्या 'गीतगोविन्दम्' या संगीत प्रबंधाचा प्रभावही सर्व भक्तिसंप्रदायांवर पडलेला आहे. 'कलियुगात व्यासाज्ञेने गीतगोविंदाची रचना झाली'- असे अमृतराय हा कवी एका कटावात नमूद करतो. गुरु नानकांनी थोर भक्तांत जयदेवाचा अंतर्भाव केला आहे. बाराव्या शतकात बंगाल प्रांतात रचण्यात आलेले हे काव्य एक संगीत प्रबंध असला तरी 'भक्ती, शृंगार, संगीत, साहित्य आणि नाट्य हे सारे माझ्या प्रबंधात आहेत ;ज्याला जे रुचेल ते त्याने घ्यावे'-असे कवी स्वतःच प्रतिज्ञेवर सांगतो.त्यात तथ्यही आहे.निरनिराळ्या काळातील व भाषांतील संत कवींना गीतगोविन्दाचे कोणते ना कोणते तरी अंग स्फूर्तिप्रद वाटलेले आहे.कोणी या काव्याचा घाट उचलला,तर कोणी संगीताने प्रभावित झाले.कित्येकांना या काव्यातील नाट्य आकर्षण वाटले,तर कित्येकांना या काव्यातील शृंगारभक्तीने आकृष्ट केले.

याच काव्यापासून स्फूर्ती घेऊन विद्यापतीने (१३८०-१४६०)मैथिली भाषेत 'कीर्तन-परंपरे 'ची पायाभरणी केली. चंडीदास (१५१४-३३) याच परंपरेतला.चैतन्य संप्रदायाचे प्रवर्तक चैतन्य महाप्रभू (१४८५-१५६१)चंडीदासाच्या कीर्तनाने प्रभावित झालेले होते. सोळाव्या शतकातील बंगाल प्रांतात कीर्तन-परंपरेस बरीच महती लाभली होती. आसाम प्रांतातील भक्तिपरंपरेचा प्रारंभ शंकरदेवांच्या (१४४९-१५६०) काव्याने होतो.'एक शरण नामधर्म' हा त्यांचा पंथ. गीतगोविन्दाची संगीत व भक्ती यांची परंपरा शंकरदेव

आणि त्यांचे शिष्य यांनी रचलेल्या 'बीरगीतांनी' आजपर्यंत टिकवून धरलेली आहे. शंकरदेवाच्या साहित्याचा दुसरा विशेष असा की त्यांनी मातृभाषेबरोबरच व्रज भाषेतूनही काव्यरचना केलेली आहे, नामदेवादी संतांनी मराठी आणि नाथवाणीतही कवने रचली त्याप्रमाणे व्रज ही श्रीकृष्णाची जन्मभूमी, त्यामुळे व्रजभाषा म्हणजेच श्रीकृष्णाची मातृभाषा या भावनेने व्रज भाषेतील पदरचना झालेली असावी, ही परंपरा उरिया भाषेच्या कवींनी देखील चालविलेली आहे.या प्रांतात चैतन्य संप्रदायाचे अनुसरण करणाऱ्या संतांनी उरिया भाषेत साहित्यनिर्मित केलेली आहे. पंचसखा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कवींनी (जगन्नाथदास, बलराम, अनंतदास, यशोवंतदास आणि अच्युतदास) तेथे जयदेवाची 'कीर्तन' परंपरा आपल्या परीने सांभाळली आहे.

भक्तिपर साहित्यात आणि गीत-रचनेत देखील व्रज भाषेस मानाचे स्थान मिळवून देण्यास सूरदासांचे (१४८३-१५६३) असाधारण कर्तृत्व कारणीभूत ठरले आहे. कबीरांच्या दोह्यांइतकीच लोकप्रियता सूरदासांच्या पदांना हिंदी भाषेच्या क्षेत्राबाहेरील प्रदेशात लाभलेली असून ती आजही टिकून आहे. कारण कोणतेही असो संगीतासाठी चीज बांधावयाची झाल्यास ती व्रज भाषेतच असावी असा संकेत अकबराच्या काळापासून रूढ झाला.

गुजराती आणि राजस्थानी या भाषांचे मुळातच व्रज भाषेशी जवळचे नाते आहे. त्यातूनही नरसी मेहता (१४४५-१४८१) आणि मीराबाई (१४९८-१५०३) यांच्या अनुक्रमे गुजराती व राजस्थानी भाषांतील कवनांनी ते अधिक दृढ केले आहे. या दोन्ही संतांच्या कवनातील भाषेचे स्वरूप बरेच संमिश्र आहे.

या बदलल्या कालपरिस्थितीपासून महाराष्ट्र अलिप्त राहिला असे नाही. महाराष्ट्रातल्या दखनी व मराठी या दोन्ही भाषांतील साहित्याने समग्र भारतात सुरु असलेल्या सांस्कृतिक पुनरुत्थापनास साथ दिलेली आहे. किंबहुना असेही म्हणता येईल की, या प्रक्रियेस चालना देण्याचे कार्य प्रथम महाराष्ट्रात घडले व त्याचा विस्तार नंतर अन्यत्र झाला. सामाजिक जागृती भारतव्यापी व्हायची असेल तर भिन्न भाषीय समाजास सहजगत्या आकलन करता येईल अशी एक सामाजिक बोधभाषा आवश्यक असते. भिन्न समाजात त्याविना दळण-वळण असंभवनीय होऊन बसते. ही निकड प्रथम महाराष्ट्राने ओळखली. दखनी भाषेच्या उद्भवास नाथसिद्धांची वाणी निमित्तकारण ठरलेली असली तरी अशा प्रकारच्या व्यापक राष्ट्रभाषेची सांस्कृतिक निकड त्याच्या मुळाशी होतीच. म्हणूनच महाराष्ट्रातल्या संत नामदेवांचे दखनी साहित्य उत्तर भारतातील कबीर-नानक यांना प्रेरणा देऊ शकले. उत्तरभारतीय संतपरंपरेचा विकास त्यामुळे घडून आला. मध्यंतरीच्या तीन शतकांच्या कालावधीत सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या कार्याला व्यापकता आली. त्यातून व्रज भाषेस महत्त्व आले. मराठी संतांच्या दखनी साहित्यावरही या वातावरणाचे संस्कार झाले. परिणामस्वरूप रामादासोत्तर काळातील नागरी लिपीतील दखनी भाषेत परिवर्तन घडत असल्याचे दृश्यही दिसून आले. प्रचलित युगधर्माशी महाराष्ट्र एकरूप झालेला होता याचा बोध या बदलत्या भाषिक स्वरूपावरून होतो.

सांस्कृतिक एकात्मतेची वाढती जाणीव

एक महत्त्वाची परंपरा या संदर्भात लक्षात घेण्याजोगी आहे. प्राचीन मराठी हस्तलिखितांची बाडे चाळत असताना मूळ ग्रंथाचे लेखन होऊन कोऱ्या राहिलेल्या जागेत एकतर काही घरगुती औषधांची व त्यांच्या गुणधर्मांची नोंद आढळेल; अथवा कबीर, सूरदास व अन्य उत्तर भारतीय संतांची कवने लिहिलेली आढळतील. मराठी ग्रंथांचे प्रतलेखन करणाऱ्या लेखकांनी परप्रांतातील संतांच्या रचनाही भक्तिभावाने उतरून घेतलेल्या आहेत. पंढरपूर येथील अनंतदास महाराजांनी स्वहस्ते लिहून ठेवलेल्या बाडाची माहिती

नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. [१] १६९८ ते १७०० कालखंडात लिहून ठेवलेल्या या बाडांत अनंतदास महाराजांचे स्वतःचे ग्रंथ तर आहेतच, पण मीराबाई, सूरदास यांची अनेक पदे, स्वामी हरदास व तानसेन यांच्या अनेक रागातील चीजा व कित्येक अनवट रागांतील पदेही या बाडात आहेत. स्वतः अनंतदास यांनी मराठी भाषेव्यतिरिक्त दखनीत काही पदे रचली आहेत. या पदांवर व्रज भाषेचा गाढा संस्कार जाणवतो. उदा.

- *पंढरीनाथ करत सनाथ सब जिव चेतन पतन को आप ॥ धृ ॥*
सुर, नर, मुनि, गंदर्व, नारद, तुंबर, करन जाण ॥ १ ॥
पतित पावन आतम उधारण दिनबंध दिनानाथ
*तारे रगुवर प्रति भीमा तीरि आप ताप *****
यथार्थ गुन गावत सकळ हरत और दुख भाव ॥

आदान-प्रदानाचा दुसरा आविष्कार परप्रांतातील संताच्या चरित्र-आख्यानांच्या रूपाने मराठी भाषेत झालेला आहे. मीराबाई, कबीर, दादू, रैदास इत्यादिकांच्या चरित्रावर संतांनी आणि पंडित कवींनी अनेक आख्याने रचली. संत नामदेवांचे प्राचीनतम चरित्र राजस्थानी भाषेत अनंतदास कवीने इ. स. १५८८ साली रचले. त्याचप्रमाणे इ.स. १६०० च्या सुमारास रचण्यात आलेल्या नाभाजीच्या 'ग्रंथमाल' या ग्रंथात महाराष्ट्रातील अनेक संतांची आख्याने आली आहेत.

रामदासोत्तर काळात अखिल भारतीय स्तरावर झालेले आदान-प्रदान व त्याचे दखनी भाषेच्या स्वरूपावर घडलेले परिणाम ध्यानात यावेत या हेतूने ही पार्श्वभूमी कथन केली. या कालखंडात भिन्न भाषांतील साहित्यात कृष्णाच्या बाळलीला, गोपांचे खेळ, गौळणीस लागलेला कृष्णाचा वेध इत्यादी विषयांना प्राधान्य मिळाले आहे. मधुराभक्तीचा प्रसारदेखील याच कालखंडातला. नागरी लिपीतील दखनी साहित्याच्या या भाषेवर काळप्रवाहाचे परिणाम होणे अपरिहार्य होते. मराठी संतांनी या कालावधीत रचलेल्या दखनी साहित्यात भाषेच्या दृष्टीने दोन प्रवाह दृष्टीस पडतात. कृष्णभक्तिपर कवने व्रजभाषेकडे झुकलेली दिसतात. दखनीचे मराठी वळण अशा कवनांत आढळत नाही. दुसरा प्रवाह मूळ दखनीचा. सामान्यपणे समाजप्रबोधनपर रचनांत थेट दखनीचा प्रयोग झालेला दिसतो. रामदासोत्तर काळात दखनी कवनांवर व्रज—अवधीचा परिणाम अधिक गडद झालेला आढळतो. इतका की नागरी लिपीतील या कवनांची भाषा दखनी मानावी किंवा नाही असा संभ्रम पडतो. मूळच्या दखनी भाषेवर काळाचे संस्कार झाल्याने भाषेचे स्वरूप बदलले असावे असे इथे मानता येत नाही. या मराठी कवींनी भक्तिपर रचनांपुरती तरी व्रज-अवधी इत्यादींचे संस्कार असलेली भाषाच योजलेली असावी असा ग्रह होतो. परिशिष्टात काही कवने दिली आहेत. त्यावरून या बदललेल्या भाषेचे स्वरूप ध्यानात येईल.

गोदावरी व गंगा यांचा संगम

साकल्याने विचार केला असता असा निष्कर्ष काढावा लागतो की, रामादासोत्तर काळात मराठी संतांच्या भक्तिपर कवनांतून दखनीभाषा अंतर्धान पावलेली आहे. एखाद्या योग्याने आपले अवतारकार्य पूर्ण होताच संजीवन समाधी घ्यावी आणि अनंतात विलीन व्हावे तद्वत नागरी लिपीतली दखनी भाषा रामदासोत्तर काळात एका व्यापक प्रवाहात विलीन होत चालल्याचे दृश्य तत्कालीन साहित्यात आढळते. या भाषेचे दखनी वळण सुटले; पण ती व्रज राहिली नाही की अवधी बनली नाही. एका अर्थाने तिला राष्ट्रभाषेचे स्वरूप प्राप्त झाले. असे म्हणता येईल की या विलीनीकरणाच्या योगाने दखनी भाषेने आपल्या मूळ उद्दिष्टांशी इमान

राखले. भिन्न भाषिक समाजाची बोधभाषा या नात्याने दखनी भाषेचा उदय महाराष्ट्रात झाला होता. उदयकाळात तिचे क्षेत्र महाराष्ट्र आणि लगतचा प्रदेश यांपुरतेच मर्यादित होते. प्रारंभी या भाषेने उत्तर भारतातील संत परंपरेस प्रेरणा देऊन अवधी भाषेतील साहित्यास चालना दिली. तरीही तिच्या मूळ स्वरूपात परिवर्तन घडले नाही, अथवा या भाषेतील साहित्य निर्मितीतही खंड पडला नाही. तथापि, सोळाव्या शतकानंतर झालेल्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनानंतर आणि व्यापक स्वरुपात आदान-प्रदान प्रक्रिया सुरु झाल्यावर मात्र नागरी लिपीतील दखनीचे स्वरूप पालटले व ती एका व्यापक भाषिक प्रवाहात — राष्ट्रभाषेत — विलीन झाली. एका परीने राष्ट्रभाषेत तिचे रुपांतर झाले. या परिवर्तनातून असा निष्कर्ष निघतो की उद्दिष्ट सफळ झाल्याकारणाने आपल्या अस्तित्वाचे विसर्जन ही दखनी भाषा एका व्यापक राष्ट्रीय भाषाप्रवाहात करीत गेली.

दखनी भाषेत घडलेले हे परिवर्तन संतसाहित्यापुरते मर्यादित होते असे नाही. या कालखंडात पंडित कवींनी रचलेल्या पदांत आणि आख्यानंतही या पालट जाणवतो. रामदासपूर्वकाळातील देवनागरी लिपीतले दखनी साहित्य केवळ संतांपुरते मर्यादित होते. उत्तरकाळात पंडित कवींनी दखनीत पदे रचली तशीच आख्याने देखील. त्यांची काही आख्याने निखळ दखनी भाषेतली आहेत तर काही रचनांत भाषेचे स्वरूप बरेच संमिश्र आढळते. उत्तर भारतीय संतांच्या वाणीचा प्रभाव पंडित कवींच्या या कालखंडातील साहित्यात आढळतो. त्यामुळे ही भाषा दखनी म्हणता येत नाही तशीच ती त्या काळातल्या व्रज व अवधी या भाषांशीही पूर्णपणे मिळतीजुळती आहे असे म्हणता येत नाही. भाषेच्या या स्वरूपास नावच द्यावयाचे झाले तर ‘राष्ट्रभाषा’ असे सर्वसमावेशक नाव द्यावे लागेल.

प्रातिनिधिक उदाहरण म्हणून अमृतराय कवीच्या रचनांतील भाषेचा निर्देश करता येण्यासारखा आहे. या कवीची ख्याती कटाव रचनेसाठी आहे. उत्तरभारतात देखील त्याला कधीतरी मान्यता लाभली असावी. ‘तुम चिरंजीव कल्याण रहो.’ हे त्याचे पद आजही विवाह-मंगल प्रसंगी आशीर्वचनाच्या रुपात गाण्यात येत असते. त्याच्या काळात उत्तर भारतीय साहित्यात प्रचलित असलेले ‘करक’, ‘दोहा’, ‘कवित्त’ आदी छंद योजण्यात आले आहेत. अन्य समकालीन कवींच्या काव्यात देखील हे छंद प्रयुक्त आहेत. ‘कृष्णनृत्य’ या अमृतरायाच्या काव्यातून पुढील अवतरण घेतले आहे. त्यावरून या कवीची भाषा दखनीपासून बरीच दुरावलेली आहे असे दिसून येईल.

- *मात जसोमति ताली बजावे, नंदनलाल सब देखन आवे,*
  श्यामसुंदर प्यारा मन भावे, निकल भान तनसो उड जावे,
  दे गिरकी पवन की ठोकरे, त्रिकट त्रिकट धुं धुदुकट,
  ध्रुदुकट, पायल नर्तन चालत घुंगरू, छुम, धुम, धुम,
  क्वणित किंकिणी...

  -महाराष्ट्रकवी अमृतरायकृत पदे, ६७

तथापि, अमृतराय व इतर पंडित कवी यांना दखनी भाषेचा पूर्णपणे विसर पडलेला होता असे म्हणता येणार नाही. फारसी भाषेतून आलेले व दखनी साहित्यात रूढ असलेले गजल व मसनवी हे छंद पंडित कवींनी योजले आहेत. तसेच काही रचना दखनीतूनही केलेल्या आहेत. अमृतरायाचे ‘सुदामचरित’ हे आख्यान केवळ फारसी- मसनवी छंदात नसून दखनी साहित्यातील मसनवीचा आकृतिबंधदेखील त्याने उचलला आहे. या आख्यानाचा समाप्ती लेख अगदी मसनवीच्या पद्धतीने लिहिण्यात आलेला आहे:

- *बताया चरितर किसन का जो नाम*
  किसन की कृपा से हुया है तमाम
  उसे किन्स्नका सित्पशायां बनाम
  कहे राव अमृत वही का लियो नाम ॥
  -म.अ.प., १०१

'वाल्मिकी चरित्राती' ल पुढील अवतरणावरूनही या काळात नागरी लिपीतील दखनी भाषा पूर्णपणे अस्तंगत झाली होती असे म्हणता येत नाही-

- *बडा नष्ट दगाबाज, करे चोरी का काम*
  दुष्ट पापी सिरताज, जबरदस्त जनम का
  ... ऐसा कीर्तन का रंग, बडा संतन का संग
  बीना बाजे मृदंग, अमृतराय गावते
  -म.अ.प., ११०

मराठी शाहीरांचे अर्ध्यदान

मराठीखेरीज 'दखनी भाषेत' रचना करण्याची परंपरा संत व पंडित कवींप्रमाणेच शाहिरांनीही आपल्या परीने चालविलेली आहे. 'करक' हा उत्तर भारतात प्रचलित असलेला छंद शाहिरांनी 'कडाका' गाऊन अधिक लोकप्रिय केला. तथापि, कडाका वा पोवाडा यांची भाषा मराठीच राहिली. पोवाड्यात कथानकाच्या ओघात अधूनमधून येणारे सवाल-जवाब दखनीतून येतात तेवढेच. लावण्यांत मात्र दखनी-मराठी मिश्र व निखळ दखनी अशा स्वरूपाच्या रचना आढळतात. एक चरण दखनी व दुसरा मराठी असे द्वंद्व-गीतही लावण्यांतून येते. भाषेच्या स्वरूपाचा काटेकोरपणे विचार केला असता दोन परी आढळतात. भक्तिपर व 'कृष्णा'च्या लावण्या व्रज भाषेचे संस्कार घेऊन व्यक्त झाल्या आहेत. अन्य शृंगारपर लावण्यांतून दखनी भाषा योजण्यात आलेली असली तरी रचना व भाषा या दोहोंतही फारसी शेरोशायरीचा भडक गंध उतरलेला दिसून येतो. शाहिरांच्या काळात उत्तरेत फारसी शेरोशायरी व तिच्या जोडीने उर्दू मुशायरे यांची बरीच चलती होती. शाहीर हा शब्दच मुळात 'शाअर' या फारसी शब्दाचा मराठी अपभ्रंश आहे. फारसी-उर्दू शेरोशायरीच्या तत्कालीन मराठी परंपरेचा तो वाहक नसेलच असे म्हणता येणार नाही. दोन्ही प्रकारांतील काही अवतरणांवरून या दोन भाषाप्रवाहांची कल्पना करता येईल-

१. दखनी-मराठी –मिश्र

दाद कोइ नही देता मैं तो जोगिन होउंगी
राख लावा माझे अंगी ॥
हाल हाल फकीरी लेऊं धूंडत बन बन में जांऊ
सख्याला दृष्टीने पाहू
पीतम प्यारे हो गये न्यारे । बिडा किसे देऊं
कोण्या समजूतीने समजाऊ

-सगनभाऊ, ४५

२. कृष्णाची लावणी

- *जा सखी पीतम लावो घर बेग बुलावो ॥ धृ ॥*
  मै भई री दिवानी, सब की रीत पछानी
  रखी होगी बिरानी, ताको चित खुलावो
  -प्रभाकर, १३९

- *सखे जमुना का पानी गहरा चला*
  भरन जाती जिस मों माधो मिला ॥धृ ॥
  सुने रे यसोदा गोपी मील सबरी
  सिरपों धरिते पानी भरी गगरी
  जलद चली थी अपने घर नगरी
  पकर मोहे कुँ कहे जल दे पिला ॥
  -होनाजी बाळा, ३५

३. दखनी : फारसी प्रभाव दाखविणारी

तेरे सूरतपर तो प्यारे हुवा दिल फिदा
घुँगट लेके करती अबी मैं अदा ॥ धृ ॥
बीस बरस की उम्र बने तू दुला
बदन तेरा क्या कहूँ माषुक चंदा खुला
मेरा निकलकर जी जाता है हाये खुदा...
यही तो इष्क के खातिर कब की अडी
मेहरबान मुजपर होना क्या आई घडी
-प्रभाकर, ९६

लावण्यांतील शृंगाररस आणि पोवाड्यांतील वीररस एवढ्यापुरतेच शाहिरी वाङ्मय आपण विचारात घेतो. वस्तुतः शाहिरांच्या साहित्याचे ते केवळ एकांगी अध्ययन आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक परंपरांच्या संदर्भात शाहिरी वाङ्मयाचा नव्याने अभ्यास होण्याची नितांत आवश्यकता आहे. महाराष्ट्रातल्या स्वतंत्र संगीत परंपरेचे संरक्षण शाहिरांनी अत्यंत निष्ठेने केले आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीत शाहिरांचे हे फार मोठे योगदान आहे हे सध्या लक्षात घेतले जात नाही. त्याचप्रमाणे राष्ट्रात प्रचलित असलेल्या व्यापक सांस्कृतिक प्रवाहांपासून शाहीर अलिप्त राहिला नाही ही त्याची कामगिरीही विसरता येत नाही. [२] हिंदी व मराठी शाहिरी कवनांचा सांगितिक परंपरेसह नव्याने अभ्यास झाला तरच या साहित्याचे योग्य मूल्यांकन होऊ शकेल.

फारसी लिपीतील दखनी भाषेची वाटचाल कोणत्या दिशेने होत गेली याचा परामर्श आता पुढच्या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

संदर्भ

१. ‘पंढरीसंदेश’, दिवाळी अंक १९७९
२. प्रस्तुत लेखकाच्या ‘ओवी ते लावणी’ या ग्रंथात यासंबंधी अधिक विवेचन आले आहे.

८. अंतिम पर्व

सूफी साधूंना दक्षिणेत आपल्या संप्रदायाचा प्रसार करावयाचा होता. सूफींची मूळ भाषा फारसी. या भाषेत बरेच साहित्य अगोदरपासून अस्तित्वात होते. इ.स. १६०० ते १७०० हे शतक म्हणजे समग्र दखनी वाङ्मयाचा उत्कर्षकाळ. या खंडात एका नवीन प्रवाहाची जोड दखनी साहित्यास लाभली. दरबारी कवींनी रचलेल्या राजप्रशस्तिपर काव्याने हा नवा प्रवाह निर्माण केला. दरबारी काव्याचे आदर्श फारसी भाषेतील राजप्रशस्तिपर काव्यांचे होते. फारसी साहित्यास राजप्रशस्तिपर काव्यांची प्रदीर्घ परंपरा लाभलेली आहे. राज्यकर्त्यांच्या समवेत भारतात आलेल्या कवींनी ही परंपरा या देशात पुढे चालविली.

पूर्वीच सांगितले आहे की सतराव्या शतकात विजापूर आणि गोवळकोंडा येथील राजघराण्यांनी दखनी भाषेस प्रोत्साहन दिल्याकारणाने या राज्यांत फारसी भाषेच्या बरोबरीने दखनी भाषेसही प्रतिष्ठा मिळाली. त्यामुळे दरबारी कवींनी दखनी भाषेतूनही राजप्रशस्तिपर काव्यरचना करण्यास प्रारंभ केला. फारसी काव्यांचे आदर्श असल्यामुळे दरबारी दखनी काव्यांतील वातावरण व कविसंकेत तितकेसे भारतीय वाटत नाहीत. अरबी-फारसी शब्द मूळ स्वरुपात योजण्याकडे दरबारी कवींचा कल अधिक असल्याने या भाषांतील त्या शब्दांचे वैपुल्यदेखील वाढलेले दिसून येते.

दखनी भाषेचे मराठी वळण या दोन्ही प्रवाहांत कायम असले तरी त्यातही दोन परी दिसतात. सूफींनी सामान्य जनतेसाठी काव्य रचले असले तरी त्यांचा वापर सामान्यपणे साधुसंतांच्या मेळाव्यात होत असल्याने त्यांच्या काव्यांत शिष्ट समाजात रूढ असलेल्या मराठी बोलीतील शब्द योजले गेलेल आहेत. त्या मानाने दरबारी काव्यांतून येणारे मराठी शब्द सामान्यांच्या बोलीतून उचललेले दिसतात. आजही ग्रामीण मराठीत प्रचलित असलेले शब्द दरबारी काव्यांत जेवढे आढळतात तेवढे सूफी साहित्यात दिसून येत नाहीत. या ग्रंथाच्या अखेरीस दिलेल्या शब्दकोशावरून या विशेषाचा प्रत्यय येईल.

दक्खनची अस्मिता

या स्थित्यंतराच्या मुळाशी दुसरेही एक कारण संभवते. सूफींच्या दखनी साहित्यास प्रारंभ झाल्यानंतर सुमारे एक शतक लोटल्यावर दरबारी परंपरेतील काव्यरचना सुरु झाली. या कालावधीत राजकीय व सामाजिक क्षेत्रात बरीच परिवर्तने झाली. प्रारंभीच्या कालखंडात साहित्यरचना करणारे सूफी साधुसंत परदेशातून आलेले होते. त्यांची मातृभाषा तुर्की, इराणी अथवा अरबी यांपैकी कोणतीतरी एक होती. नंतरच्या काळातील मुसलमान समाजातील पिढी दक्षिणेत स्थायी झालेली असल्याने या पिढीत मूळ मातृभाषा कायम राहिली असली तरी समाजव्यवहारासाठी त्यांना दखनीवरच अवलंबून राहावे लागत असे. दक्षिणेत स्थायी झालेल्या मुसलमानांपैकी कित्येकांनी सोय म्हणून दखनी भाषेचा स्वीकार केलेला असला तरी अनेकांनी मातृभाषेच्या स्वरूपातही तिचा निष्ठेने अवलंब केलेला होता.

‘दखनी’ या भाषानामाची चर्चा करताना पहिल्याच प्रकरणात दखनी अस्मितेचा उल्लेख येऊन गेला आहे. बहामनी राजवटीच्या काळात मुसलमान सरदारांतच दखनी आणि बिगर दखनी असा संघर्ष निर्माण झालेला होता. या संघर्षापायीच बहामनी राजवट खिळखिळी होऊन तिची शकले उडाली. नव्याने उदयास आलेल्या राजघराण्यांनी काळाचा ओघ ओळखून आपल्या धोरणास थोडी मुरड घातली. विशेषतः

अनुक्रमणिका

अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाहीची आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही या घराण्यांनी तर मुसलमानेतर सरदारांना भरपूर वाव दिला आणि एका परीने दखनी अस्मितेचे संरक्षण केले.

ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेतली म्हणजे दरबारी कवींच्या साहित्यात शिष्टेतर समाजाच्या बोलीत रूढ असलेले मराठी शब्द वाढत्या प्रमाणात का आढळतात याची संगती लागते. रामदासकालीन आणि तदुत्तरकालीन ऐतिहासिक कागदपत्रे आणि बखरी यांचा अभ्यास केला असता तत्कालीन मराठी भाषा देखील किती फारसीमय झालेली होती याची प्रचीती येते. दरबारी साहित्यातील अरबी-फारसी शब्दांचे वाढलेले प्रमाण या सामाजिक परिस्थितीचाही परिणाम असण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकूण समकालीन भाषा व सामाजिक जीवन यांचे प्रतिबिंब दरबारी परंपरेतील दखनी साहित्यात पडले आहे या निर्णयावर यावे लागते.

परिवर्तनाच्या दिशा

पुढे दिलेल्या काही उताऱ्यांवरून फारसी लिपीतील दखनी साहित्यातील भाषेत झालेल्या स्थित्यंतराची कल्पना करता येईल. परिवर्तन नेमके कोणत्या दिशेने घडत गेले याची कल्पना करता यावी यासाठी प्रथम संत नामदेवांचे (१३५०) एक पद दिले आहे. नंतरचे तिन्ही उतारे सूफी परंपरेतल्या कवींच्या काव्यांतून उद्धृत केले आहेत. हे कवी निरनिराळ्या कालखंडातले आहेत; फेरोज (१५६४), अफजल (१६२५)आणि शाहतुराब १६९५-१७८३. यांपैकी शाहतुराब हा सूफी परंपरेतलाच नव्हे तर एकंदरीत दखनी साहित्यातला शेवटचा कवी ठरतो.

१. जब देखा तब गावा, तउ तनु मन धरिजु पावा
नादिं समाइलो रे, सतगुरु भेटिले देवा
जह झिलिमिलि कारू दिसन्ता
तह अनहद नाद बजन्ता
ज्योति ज्योति समानि, मैं गुरुपरसादी जानी ॥
... जह अनहद सूर उजारा
तह दीपक जलै छंछारा
गुरु परसादी जानिया । तनु नामा सहज समानिआ ॥
-संत नामदेव गाथा, पृ. २३१.

२. अमूलक रतन तूँ के जग मानिया
खुदा के खजीने तें तुज आनिया
सो 'फेरोज' सहने में पाया रतन
रख्या सो रतन ढाँप, जीवसो जतन
सुने सार दिल गाल कंदन किया
गडत साफ कंदन जिला मन दिया
के जब तुज रतनजोत हम दिल पडे
पदक दिल मने लाल म्याने अडे
हमन दिल पदक में सो तूँ लाल है

अनुक्रमणिका

पदक लाल ज्योति से उजाल है
रतन खास 'फेरोज' जब पाइया
पदक दिल मने लाल बिसलालिया ॥
-अफजल, 'पीरीतनामा', उर्दू-ए-कदीम पृ. ३५०

'तू जगातले एक अमोल रत्न आहेस. परमेश्वराच्या खजान्यातून हे रत्न आणले आहे (आनिया). हे रत्न-'फेरोज', तुला सहजगत्या लाभले आहे. त्याला झाकून जीवाजतन सांभाळले पाहिजे. लक्ष घालून ऐक : या रत्नाने तुझ्या मनाला चैतन्य दिले आहे. या रत्नाची ज्योत आमच्या अंतःकरणात पडते तेव्हा हृदयाचे पदक रत्नजडित होते. ही ज्योती विश्व उजळते. म्हणून ती गवसताच तू तिला अंतरात बसव.'

३. सुनो सखियों बिकट मेरी कहानी
भई हूँ इष्क के गम ते दिवानी
न मुंजे कोई भूक दिन, ना नींद राता
बिऱ्हे के दर्द सूँ सीना पिराता
तमामी लोक मुंज बूरी कहे री
खूद गम करद मंजूँ हो रही री
नही इस दर्द की दारू किसीकन
भये हैरान हकाये दो फन
अरे, जिस शेख्स को न देव लागा
मियाना देखा उस को दूर भागा
अरे, या नाग जिस के डंक लावे
*न पाडे * * * जीवडा गँवाये ॥*

'सख्यानों माझी बिकट कहाणी ऐका. इष्कापायी मी वेडी झाले आहे. दिवसा भूक व रात्री झोप माझ्या निशिबी नाही. विरहाच्या दुःखाने हृदय पीडित झाले आहे. सर्व लोक मला नावे ठेवतात. या रोगावर औषध नाही. हा देव ज्या माणसाला लागतो (त्याची अशीच गत होते). शहाणे मात्र याला पाहून दूर पळतात. हा नाग ज्याला डंख मारतो त्याला आपला जीव गमवावा लागतो.'

-अफजल, 'बिकट कहानी', उर्दू-ए-कदीम, पृ. ४१०

४. जो बांद लंगोटा लगत खाक तन कों।
दिया छोड यक बार हब्बुलवतन को
जला इश्क की बाट में माल व धन कों
रखे काँस न पास परगट कफन कों
अरे मन इसे क्या है दुनिया का आसा
लिया हात में भीक का जिसने काँझा ॥
-शाहतुराब, 'मनसमझावन', पृ. ३२,

अनुक्रमणिका

कमरेला लंगोट व अंगाला राख लावून जो एकदा आपल्या मायभूमीतून बाहेर पडतो (त्याच्या लेखी जगात काही उरलेले नसते). अशा माणसाला जगापासून कोणतीच आशा नसते. कारण, त्याने भिक्षेसाठी कटोरा(कांशाचे भांडे) हाती घेतलेला असतो.

दरबारी कवींची भाषा

सुमारे दोन शतकांच्या कालवधीत रचण्यात आलेल्या सूफी साहित्यातून वरील तीन उतारे उद्धृत केले आहेत. या तिन्ही उताऱ्यांत काळाचे अंतर बरेच असले तरी भाषेवर काळाचा परिणाम झाला आहे असे जाणवत नाही. सूफींनी शिष्टांची ग्रांथिक भाषा आपल्या रचनांतून योजली असा अर्थ त्यातून निघतो. कारण, बोलीच्या तुलनेने ग्रांथिक भाषेत मंदगतीने बदल होत असतो. तत्कालीन समाजात प्रचलित असलेल्या बोलीचा अवलंब या ग्रंथकारांनी केला असता तर भाषेत बराच बदल आढळला असता. त्या मानाने दरबारी काव्याच्या भाषेवर काळाचे संस्कार जाणवतात.

दरबारी काव्यातून पुढे दोन उदाहरणे घेतली आहेत.पहिले अब्दुल या कवीच्या 'इब्राहीमनामा' या काव्यातले असून या काव्याचा रचनाकाळ इ.स. १६०४ आहे. दुसरे अवतरण १६७४ च्या सुमारास निधन पावलेल्या नुस्रती या कवीच्या 'अलीनामा' या काव्यातून घेतले आहे. दोन्ही काव्यांत सुमारे ६०/७० वर्षांचे अंतर आहे. 'इब्राहीमनामा'तील भाषा सामान्यपणे सूफींच्या काव्यपरंपरेतली असली तरी अलीनाम्याची भाषा मात्र बदललेली आहे. अब्दुल या कवीने ग्रांथिक दखनीचा प्रयोग केलेला दिसतो. तर नुस्रती मात्र तत्कालीन बोलीवर अवलंबून असल्याचे जाणवते. आजही ग्रामीण मराठीत प्रचलित असलेले कित्येक शब्द नुस्रतीच्या पुढे दिलेल्या उताऱ्यात आढळतील. याच कवीने मृत्यूच्या पूर्वी एकवर्ष आधी रचलेल्या 'तारीख-ए-इस्कंदरी' या काव्यातून आणखी एक उतारा दिला आहे. १६७३ हा या काव्याच्या रचनेचा काळ आहे. दखनी भाषेवर फारसी भाषेचा प्रभाव कसा वाढत चाललेला होता याचे प्रत्यंतर या तिसऱ्या उताऱ्यावरून येईल.

१. तपे सुरिज तो हो अग्निजाल जग
कला रवीन हो चांदमुक स्याह लग
सूरिज दिस निकले तो छिप रात में
कला चांद पूरन कलंक जात में
सूरीज जोती बारा कला लागती
दुजे चांद सोळा कला लागती
सुरीज चांद मिलकर अठाईस कला
कलारूप तन शाह चौंसट कला ॥
- इब्राहीमनामा, १४४

'सूर्य तापला तर अग्नी होऊन जग जळतो. कलाक्षीण चंद्राचे तोंड काळे होते. दिवसा उगवणारा सूर्य रात्री लपून बसतो. पूर्ण कलांनी युक्त चंद्रदेखील कलंकित असतो. सूर्य आणि चंद्र यांच्या मिळून अट्ठावीस कला होतात तर बादशहाच्या अंगी कला आहेत चौंसष्ट.'

२. न कोई मदद कर सके इस घडी
हर एक सरपे अपनंच आपसी पडी

अनुक्रमणिका

खुला जां जो सूरा को बंद पड्या
उजालियाँ सो खड्गाँ के चंदना पड्या
उठाया जों खनाखन का आवाज जोर
फलक कान मूँच्या न सुन सक शोर
खरग कडकडाती सूरज ठाँव ठाँव
सपर बस न थी कुच बी किस सर पे छाँव
ओडाओड में आग खरगाँ ते झडे
सपर कर मिटे ज्यूँ भूने सो पपड ।।
अलीनामा, २९०

कोणी कोणाला मदत करणाऱ्या अवस्थेत नव्हते. प्रत्येकाला आपलेच पडले होते. उभ्या जगाला वीरांनी बंधनात टाकले होते. खड्गांच्या खणखणाटाने उडालेल्या ठिणग्यांमुळे चांदणे पसरल्यासारखे वाटत होते. खणखणाट एवढा मोठा होता की, तो आवाज सहन न झाल्याने आकाशाने आपले कान बंद करून घेतले. सूर्य तळपत असूनही पृथ्वीवर मात्र विरांच्या गर्दीने सावली धरली होती. या ओढाओढीत तरवारीतून पडणाऱ्या आगीने (शत्रूपक्षाचे) सैनिक पापडासारखे भाजून निघत होते.'

३. खुसुसत सिवा काफिरे-बे निजाम
जो फिऔन का है सो साया तमाम
जबलग जग में मोहलत है इब्लिस कूँ
नसे पैस जाँलग पवन का मजाल
अछे वाँ तलग तिसके घोड्यां की चाल
जो जाँलग है चलने कूं चिंटी की झेल
जनम तिस पो उसके हशम का है खेल ।।[८]
-तारीखे इस्कंदरी, पृ. ५

'विशेषतः शिवा धर्मद्रोही व अराजक निर्माण करणारा आहे. जणू सैतानाचीच सावली. जगात जोवर सैतान आहे तोवर शिवाजीचे कपट-कारस्थान चालूच राहणार. वाऱ्याचाही जिथे शिरकाव होत नाही तिथे शिवाजीचे घोडे घुसतात. मुंगीलाही रिघाव मिळणार नाही अशा स्थळी धाड घालणे हा तर शिवाजीच्या सैन्याला एक खेळ वाटतो.

'प्रगतीचे अत्युच्च शिखर गाठणे हा पतन —प्रारंभ ठरतो' अशा आशयाचे आधुनिक कवी 'बी' यांचे एक वचन आहे. दखनी भाषा आणि साहित्य यांना ते पूर्णपणे लागू पडते. इ. स. १६०० ते १७०० हा दखनी साहित्याचा उत्कर्षकाळ. नागरी आणि फारसी या दोन्ही लिप्यांतील साहित्याने या शतकात वैभवाचे दिवस पहिले. या कालखंडाच्या प्रारंभी भाषाभेद आणि धर्मभेद यांतील तीव्रताही बरीच कमी झालेली होती. इब्राहीम आदिलशहाचे (१५८०-१६२०) पुढील वाचन या दृष्टीने वास्तवाचे प्रतिबिंब वाटते.

- *भाका न्यारी न्यारी भाव एक*
  कहाँ तुरुक कहाँ बरहमन
  उत्तम भाग नीको सो सोहे

अनुक्रमणिका

जो सरसुती हुई परसन
इब्राहीम सौंसार चाहे विद्या
सबद गुरुसेवा जप, कर मन एक ॥
-किताबे नवरस

भाषा भिन्न असल्या तरी भाव एक असतो. त्यात मुसलमान, ब्राह्मण असा भेद करता येत नाही. श्रेष्ठ गुण शोभून दिसतात. (या गुणांनी) सरस्वती प्रसन्न होते. या विश्वात विद्या संपादन करणे महत्त्वाचे. त्यासाठी गुरूची सेवा करावी व त्याने दिलेल्या मंत्राचा मन एकाग्र करून जप करावा.

परिस्थितीच्या दडपणातून निर्माण झालेला सामाजिक समतोल सन १६४५ च्या सुमारास सुरु झालेल्या स्वराज्य संस्थापनेच्या प्रयत्नाने बराच ढासळलेला आढळून येतो. तरीही साहित्यनिर्मितीचा वेग इ.स. १७०० पर्यंत कायम राहिला.इ.स. १७०० नंतर मात्र दोन वेगवेगळ्या दिशांनी ओहोटीस प्रारंभ झाला. सांस्कृतिक आदानप्रदानाचा वाढता प्रभाव पडल्याकारणाने नागरी लिपीतील दखनी साहित्य हळूहळू एका व्यापक राष्ट्रभाषेच्या प्रवाहाशी समरस होत गेले. सामरस्याच्या या प्रक्रियेमुळे दखनी भाषेचे पृथगात्म रूप पुसट होत गेले व एका संमिश्र पण व्यापक अशा राष्ट्रभाषेचा उदय त्यातून झाला.

भारताच्या एकात्मतेच्या जडणघडणीत महाराष्ट्राचे हे फार मोठे योगदान आहे असे आपण मानले पाहिजे.

या ऐतिहासिक व वैशिष्ट्यपूर्ण कार्याची नोंद आजवर घेण्यात न आल्याने या विषयाचा प्रपंच एवढ्या विस्ताराने मला करावा लागला आहे.

साहित्याला उतरती कळा

फारसी लिपीतील दखनी साहित्यात परिवर्तन घडले ते निराळ्या दिशेने. गोवळकोंडा व विजापूर या दोन दरबारांचा आश्रय दखनी साहित्यास दीर्घकाळ लाभलेला होता. पण १७०७ च्या सुमारास ही दोन्ही राज्ये औरंगजेबाने खालसा केली. मोगल राजवटीत फारसीचे प्रस्थ फार. या राजवटीस दाक्षिणात्य जनता व देशी भाषा यांच्या विषयी मुळीच आत्मीयता नव्हती. मोगलांना आपल्या राज्य विस्तारासाठी दाक्षिणात्य राज्यांशी सातत्याने लढाया द्याव्या लागल्या होत्या. नगरची निजामशाही नष्ट केल्यानंतर मोगलांना समग्र दक्षिणेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी आदिलशाही व कुतुबशाही आणि नंतर मराठे या तिन्ही सत्तांशी दीर्घकाळ झुंज द्यावी लागली. तरीही मोगलांना फारशी प्रगती करता आली नाही. शिवछत्रपतींच्या निधनानंतर समग्र दक्षिण काबीज करण्याच्या महत्त्वाकांक्षेने औरंगजेब दक्षिणेत आला. त्याने विजापूर व गोवळकोंडा येथील राज्ये नष्ट केली. परंतु, मराठ्यांचा संपूर्ण बिमोड त्याला करता आला नाही. या वातावरणाचा प्रतिकूल परिणाम फारसी लिपीतील दखनी साहित्यावर झाला. राजाश्रयाच्या अभावी दरबारी साहित्य घसरणीस लागले. दखनीचा शेवटचा कवी वली १७०७ च्या सुमारास निधन पावला. त्याचा समकालीन सिराजी १७६५ पर्यंत कसा तरी तग धरून होता. सूफी परंपरेतील साहित्याला अगोदरपासूनच उतरती कळा आलेली होती. या परंपरेतला शेवटचा कवी शाह तुराब १७८३ मध्ये निधन पावला. अशा रीतीने एका वैभवशाली साहित्य परंपरेचा अंत झाला.

१७६५ नंतर रचलेले दखनी साहित्य आज आपल्याला उपलब्ध नाही.

साहित्य-निर्मितीत खंड पडला म्हणून दखनी भाषा नष्ट झाली असे नव्हे. भाषा शेवटी टिकवून धरतो समाजच. साहित्याने भाषेला गौरव लाभतो. पण साहित्याच्या अभावी भाषा जगू शकते. चौदाव्या शतकापासून दक्षिणेच्या निरनिराळ्या भागात स्थायी झालेल्या मुसलमान घराण्यांच्या दुसऱ्या पिढीपासून तरी दखनी ही या समाजाची मातृभाषा झालेली होती. समाजव्यवहार याच भाषेतून होत असल्याने साहित्याचे वैभव पाहिलेली भाषा नंतरच्या काळात विशिष्ट समाजाची बोली या नात्याने गुजराण करू लागली. इ.स. १७०० नंतर आजतागायत बोली या नात्याने टिकून राहिली. पण विपन्न अवस्थेतही या भाषेवर असलेल्या मराठीच्या जन्मखुणा पुसलेल्या नाहीत. तेलुगू, तामीळ, मल्याळम या भिन्न भाषांच्या संपर्कात निरनिराळ्या प्रदेशांत वावरत असतानाही दखनीने आपला मूळचा पिंड सुरक्षित ठेवलेला आहे. प्रांतोप्रांतीच्या भाषांचे कमी-अधिक संस्कार दखनी बोलीवर झालेले असले तरी तिचे मराठी वळण आजही ओळखता येते.

या भाषेचा भूतकाळ जेवढा वैभवशाली तेवढीच तिची आजची अवस्था दैन्यवाणी आहे. दरिद्री आप्ताशी रक्ताचे नाते असले तरी ते सांगण्याची लाज श्रीमंतांना वाटते. त्याचप्रमाणे स्वाभिमानी निर्धनांना धनवंतांशी असलेला आप्तसंबंध सांगण्यास संकोच वाटतो, तर श्रीमंत कुळाशी आपला बादरायण संबंध जोडण्यात कित्येकांना भूषण वाटते. फारसी लिपीतील दखनी साहित्याच्या समृद्धीने भारावल्याकारणाने उर्दू आणि हिन्दी या दोन्ही भाषांचे पंडित दखनीशी नाते —संबंध जोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण वर्तमान दखनी बोलीशी मात्र या भाषांचा काही संबंध आहे असे या भाषांच्या पंडितांना वाटत नाही. दखनी बोलीचा परामर्श घेण्याचे या दोन्ही भाषांतील एकाही संशोधकाच्या मनात आले नाही. किंवा या बोलीची दखल घ्यावी असाही विचार या पंडितांच्या मनाला शिवलेला नाही.

या बोलीचे दारिद्र्य हे त्याचे एक कारण असू शकेल. पण, खरी गोम निराळी आहे. या बोलीचे स्वरुपच असे विलक्षण आहे की, उर्दू वा हिंदी या दोन्ही भाषांना ही आपल्या भाषेची बोली आहे हे प्रस्थापित करणे अडचणीचे होणार आहे. या बोलीचा पद्धतशीर अभ्यास केला तर मात्र तिचा दखनी साहित्याशी असलेला आप्तसंबंध प्रस्थापित होतो.त्यासाठी निरनिराळ्या भागात प्रचलित असलेल्या दखनी बोलींचा संग्रह करून त्यांचा अभ्यास झाला पाहिजे. एका मोठ्या प्रकल्पास पुरणारे हे कार्य आहे.

तथापि, विषयाच्या पूर्णतेसाठी आणि केलेल्या विवेचनास दृढता यावी या हेतूने लेखकाने विजापूरच्या व हैद्राबादच्या परिसरातील दखनी बोलीची जी विस्ताराने पाहणी केली होती त्या पाहणीचा संक्षिप्त निष्कर्ष परिशिष्ट सात/ आठ मध्ये दिला आहे.

या पाहणीतून असे निष्पन्न झाले, की आजच्या अवस्थेतील दखनी बोलीस सर्वार्थाने दखनी साहित्यावर आपला वारसा हक्क सांगता येतो. दखनी भाषेच्या प्रकृतिधर्मासंबंधी पुढे देण्यात आलेले विवेचन दखनी साहित्यातील भाषेप्रमाणेच आजच्या बोलीसही लागू पडते. सहा, सात व आठ या परिशिष्टांवरून या सत्यासंबंधी थोडीफार कल्पना करता यावी. सहाव्या परिशिष्टात विजापूर येथील कवी नुस्रती याने १६७३ त रचलेल्या 'तारीखे इस्कंदरी या काव्यातले एक उदाहरण दिले आहे. सतराव्या शतकाच्या अंतिम पर्वातील साहित्यिक दखनीचा एक नमुना तुलनात्मक अध्ययनासाठी पुढे असावा या उद्देशाने हा उतारा दिला आहे. सातव्या परिशिष्टात विजापूरच्या परिसरातील पाहणीतून निघणारे निष्कर्ष थोडक्यात दिले असून विजापूरच्या एका शतायुषी व्यक्तीशी झालेल्या संभाषणाचा मूळ भाग थोडक्यात दिला आहे. आजच्या

बोलीच्या दखनी साहित्याशी असलेला आप्तसंबंध त्या योगे प्रस्थापित व्हावा. आठव्या परिशिष्टात सातारा जिल्ह्यातील काही लोकगीते दिली आहेत. ही लोकगीते आज प्रचलित आहेत. त्याच्या आधाराने देखील बोलीचा दखनी साहित्याशी असलेला संबंध प्रस्थापित होतो.

पुढील विश्लेषणात दिलेले दखनी भाषेचे स्वरूपविशेष लक्षात घेता ‘वर्तमानकालीन उर्दू भाषेची पुरातन अवस्था’ अथवा ‘हिन्दी भाषेचा प्रादेशिक भेद’ हे दोन्हीही आज प्रचलित असलेले सिद्धांत मान्य करता येत नाहीत. दखनी भाषेच्या व्याकरणव्यवस्थेचे परीक्षण केले असताही याच निष्कर्षास पुष्टी मिळते.

अनुक्रमणिका

९. दखनीचे भाषिक विशेष

उदय आणि अस्त या दोन टोकांच्या दरम्यान रचण्यात आलेले नागरी व फारसी लिपीतील दखनी साहित्य आज उपलब्ध आहे. दक्षिण भारतात प्रचलित असलेल्या दखनी बोलीच्या आधारानेही या भाषेचे कित्येक विशेष लक्षात येतात. या सामग्रीच्या आधाराने दखनी भाषेच्या व्याकरण-व्यवस्थेचा विचार करावयाचा आहे.

दखनीच्या व्याकरणासंबंधी चर्चा करताना प्रामुख्याने फारसी लिपीतील साहित्य आणि वर्तमान बोली यांचा आधार घेतला आहे. मराठी संतांच्या कवनांतील दखनी भाषा आवश्यक व अपरिहार्य अशा स्थळी विचारात घेतली आहे. ह्याला कारण असे आहे की मराठी संतांची 'हिंदी' कवने संतमंडळात आजही गाण्यात येतात. त्यामुळे या साहित्यावर काळाचे व उत्तर भारताशी असलेल्या सांस्कृतिक दळणवळणाचे संस्कार झालेले आहेत. फारसी लिपीतील दखनी साहित्याच्या बाबतीत मात्र तसे झाले नाही. हे साहित्य सूफी संप्रदायात आणि दरबारी वातावरणातच प्रसृत झालेले असल्यामुळे दखनीचे मूळ रूप आणि स्वभावविशेष फारसी लिपीतील त्या साहित्यात पुष्कळ अंशी सुरक्षित राहिले आहेत. म्हणूनच फारसी लिपीतील दखनी साहित्य व्याकरण-व्यवस्थेस इथे आधारभूत मानले आहे.

हा अभ्यास करताना आधुनिक भाषावैज्ञानिक अभ्यासातील घटक प्रस्थापित क्रमानुसार घेता येतीलच असे नाही. भाषेचा स्वभाव लक्षात घेता हे क्रम मागेपुढे करावे लागतील. सामान्यतः कोणत्याही भाषेच्या अभ्यासास प्रारंभ होतो तो ध्वनिव्यवस्थेच्या चिकित्सेपासून. दखनी भाषेच्या बाबतीत हा क्रम बदलावा लागेल. दखनी भाषेतील शब्दसंग्रहाचा या भाषेतील ध्वनिव्यवस्थेशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. हे लक्षात घेऊनच दखनी भाषेतील शब्दसंग्रहाचा विचार अगोदर करण्यात आलेला आहे. या भाषेचे कित्येक स्वभावविशेषही शब्दसंग्रहाची चिकित्सा करताना ध्यानात येतात. म्हणूनच इतर घटक विचारात घेण्यापूर्वी शब्दसंग्रहाची चिकित्सा करण्यात आली आहे.

फारसी लिपीतील दखनी साहित्य आणि वर्तमान दखनी बोली यांत रूढ असलेल्या शब्दसंपत्तीचे विश्लेषण केले असता दखनीची शब्दसंपदा तीन धारांनी घडविलेली आहे असे निर्दशनास येते —

१. पहिली धारा मूळ शब्दांची, हे शब्द संस्कृत —प्राकृत —अपभ्रंश- सिद्धवाणीची 'संधाभाषा' या परंपरेतून आलेले आहेत.

२. दुसरी धारा निखळ मराठी शब्दांची. मराठीत रूढ असलेल्या आणि प्राकृत-अपभ्रंश यांच्या परंपरेने आलेल्या शब्दांचाही त्यात समावेश आहे. यादवकालीन मराठीत प्रचलित असलेले व ग्रामीण भागांत आजही रूढ असलेल्या मराठी बोलीतले शब्द पंधराव्या शतकानंतरच्या दखनी साहित्यात मराठीतूनच आलेले असावेत असे गृहीत धरणे तर्कसंगत ठरते. या दोन्ही धारांतील भाषा आर्यभारतीय कुलातील असल्याकारणाने दोन्ही धारांतील शब्दसंपत्तीचा संभव एकाच कुलगोत्रात झालेला आहे.

३. तिसरी धारा अरबी व फारसी या परभाषांतून आलेल्या शब्दांची. या दोन्ही भाषांचे कुलगोत्र भिन्न असल्यामुळे अरबी-फारसी शब्द दखनी भाषेत रूढ झाले ते आवश्यक त्या ध्वनिपरिवर्तनासह. कारण, या भाषांची ध्वनिव्यवस्था दखनी भाषेपेक्षा भिन्न आहे. मराठी शब्द कोणत्याही प्रकारचे ध्वनिपरिवर्तन न होता

दखनीत जसेच्या तसे आलेले आहेत. याचा अर्थ मराठी व दखनी या दोन्ही भाषांची ध्वनिव्यवस्था एका मर्यादेपर्यंत समान आहे असा होतो.

तथापि, या बाबतीत निश्चित विधान शब्दसंग्रहाच्या विश्लेषणानंतर करता येईल.

एक वैशिष्ट्यपूर्ण बाब या संदर्भात नमूद करणे आवश्यक वाटते. दखनी भाषेतील साहित्य प्रामुख्याने गोवळकोंडा आणि विजापूर या भागाच्या परिसरात वाढले. या भागातील बहुसंख्य जमातींची भाषा अनुक्रमे तेलुगू आणि कन्नड असूनही फारसी लिपीतील साहित्यात एकही कन्नड व तेलुगू शब्द आढळू नये याचे आश्चर्य वाटते. आजच्या बोलीत प्रदेशपरत्वे तेलुगू व कानडी शब्द आलेले आहेत. साहित्यात मात्र या भाषांतील व एकंदरीत द्राविड कुळातील भाषांतून आलेल्या शब्दांचा अभावच आहे.दखनी साहित्याचे पहिल्या पिढीतील संशोधक पै. मौलाना अब्दुल हक आणि आधुनिक काळातील अभ्यासक डॉ. श्रीराम शर्मा या दोघांनीही हेच मत संशोधनांती दिले आहे.[१]

दखनी भाषेतील शब्दसंग्रहासंबंधीचा एक गैरसमज याच स्थळी दूर केला पाहिजे. हिंदी भाषेतील शब्द दखनीने उचलले आहेत असे विधान कित्येकांनी केले आहे. [२] हे विधान अनैतिहासिक आहे. कारण, हिंदी भाषा व या भाषेच्या पूर्ववर्ती बोली अस्तित्वात येण्यापूर्वी दखनी भाषेचा उद्भव झालेला आहे. हिंदी भाषी प्रदेशातील बोलीत साहित्यनिर्मिती होण्यापूर्वी किमान दोन शतके तरी दखनी साहित्य अस्तित्वात होते. त्यामुळे म्हणायचेच झाल्यास दखनीत रूढ असलेले शब्द हिंदी भाषेत आढळतात असे फार तर म्हणता येईल.अस्तित्त्वात नसलेल्या भाषेतून दखनी भाषेने शब्द उचलले हे विधानच तर्कदुष्ट ठरते. उर्दू भाषेतले काही शब्द दखनीत उतरले आहेत ही समजूतही अशीच अनैतिहासिक ठरते. कारण, एकोणिसाव्या शतकापूर्वी उर्दू भाषा अस्तित्वात नव्हती.

पारंपरिक पद्धतीनुसार तत्सम, तद्भव आणि देश्य असे कोणत्याही भाषेतील शब्दांचे वर्गीकरण होत असते.

१. तत्सम संस्कृत भाषेतून जसेच्या तसे आलेले.

२. तद्भव प्राकृत अपभ्रंशद्वारा दखनी भाषेत उतरलेले आणि सिद्धांच्या संधा भाषेतून परिणत झालेले शब्द.

३. देश्य प्रामुख्याने मराठी वळणाचे शब्द.

४. आधुनिक युगात आणखी एका चौथ्या वर्गाची भर या वर्गीकरणात पडलेली आहे -ती म्हणजे परभाषांतील उसनवारीने उचललेल्या शब्दांच्या वर्गाची अरबी, फारसी आणि तुर्की या भाषांतील शब्द.

या चार वर्गांपैकी पहिल्या दोहोंची चिकित्सा करण्याचे कारण नाही. कारण, तत्सम आणि तद्भव या शब्दांच्या पायावरच दखनी भाषा उभी आहे. दखनी भाषेला लाभलेला तो वारसा आहे. मराठी शब्दांच्या बाबतीत देखील असेच म्हणता येईल. कारण पूर्ववर्ती 'संधा भाषेवर' देखील मराठीचे संस्कार झालेले आढळतात. तरीही दखनीची पिंडप्रकृती लक्षात येण्याच्या दृष्टीने दखनीतील मराठी शब्दांची विशेष चिकित्सा आवश्यक ठरते. परभाषेतील शब्दांत प्रामुख्याने अरबी-फारसी शब्द येतात. फारसी लिपी दखनी साहित्याने

स्वीकारलेली असल्याने अरबी-फारसी शब्द कोणत्या स्वरूपात दखनीने उचलले आहेत ही बाब महत्त्वाची ठरते.

पुढील प्रकरणांतून मराठी व अरबी-फारसी भाषांतील शब्दांचा विचार क्रमशः करावयाचा आहे.

मराठी शब्दांचे वैपुल्य

दखनी आणि मराठी या दोन्ही भाषा आधुनिक आर्य - भारतीय भाषाकुळातल्या आहेत. एकाच कुळातल्या भाषांत काही समान गुणविशेष असतात तसे ते दखनी आणि मराठी या भाषांतही आहेत. केवळ मराठीत रूढ असलेले प्राकृत – अपभ्रंश भाषांतील शब्द, शिलालेखांतील मराठी शब्द आणि यादवकालीन मराठी साहित्यातील शब्दसंपत्ती अगदी 'घरच्यासारखे' दखनीत वावरताना आढळतात. इतकेच नव्हे तर ग्रामीण मराठी बोलीतील शब्दही दखनी कवींनी अगदी सराईतपणे व अचूक संदर्भात आपल्या काव्यांतून योजले आहेत.समान सांस्कृतिक व सामाजिक वातावरणात या दोन्ही भाषा वावरत होत्या हे या साधर्म्यातून निष्पन्न होते. दखनीची जननी असलेली संधा भाषा आणि मराठी या दोन्ही भाषांत प्रारंभकाळी निर्माण झालेल्या साहित्याची समाजप्रबोधन ही निर्मिती-प्रेरणा होती हे देखील या संदर्भात जमेस धरले पाहिजे.

'दखनीच्या सर्वांगावर मराठीचा प्रभाव आहे' – असे मत डॉ. श्रीराम शर्मा यांनी व्यक्त केले आहे. [३] दखनीचे दुसरे एक अभ्यासक श्री. देविसिंग चौहान यांच्या मते 'केवळ मराठीत रूढ असलेले अपभ्रंशातील शब्द दखनीने उचलले आहेत. इतकेच नव्हे तर कित्येक मराठी वाक्प्रचारही दखनीत आलेले आहेत.' ग्रामीण मराठी बोलीतील कित्येक शब्दांना दखनी साहित्यात स्थान मिळाले आहे असाही त्यांचा अभिप्राय आहे. [४]

-परंतु, असे का घडले याची मीमांसा या पंडितांनी केलेली नाही. या ग्रंथात प्रथमच दखनी भाषेच्या उत्पत्तीचा माग काढताना या साधर्म्याची मीमांसा करण्यात आली आहे. ती लक्षात घेतली म्हणजे 'दखनी भाषेच्या सर्वांगावर मराठी भाषेचा प्रभाव' का आढळतो याचा उलगडा होतो. त्या माहितीच्या पार्श्वभूमीवर दखनी भाषेतील मराठी शब्दांचा विचार करावयाचा आहे.

दखनी साहित्यात आणि बोलीत आढळणाऱ्या मराठी शब्दांची निवड करावयाची म्हणजे 'उडदामाजी काळे-गोरे, काय निवडावे निवडणारे' या पंक्तीची आठवण होते. दखनी साहित्याचा अभ्यास करणाऱ्या कोणाही वाचकास हाच अनुभव येईल. ग्रंथाच्या आलेल्या शब्दकोशात दखनी साहित्यात आणि बोलीत प्रचलित असलेले सुमारे एक हजार मराठी शब्द दिले आहेत. त्यावरून दखनी भाषेच्या या विशेषाची कल्पना करता येईल. या कोशाच्या आधाराने दखनीवरील मराठी भाषेच्या प्रभावाचे क्षेत्र आणि स्वरूप यांचा शोध सहजगत्या लावता येईल.

दखनी भाषेच्या उत्पत्तीस कारणीभूत ठरलेले महाराष्ट्रातले सांस्कृतिक जीवन या भाषेला जन्म देऊन अलिप्त राहिले नाही. सहोदरींचा सहप्रवास अखंडितपणे चालू राहावा त्याप्रमाणे अठराव्या शतकापर्यंत बोलीत आणि साहित्यात आणि तदनंतर केवळ बोलीत दखनीची साथ मराठीने केली आहे. महाराष्ट्रातल्या सांस्कृतिक घडामोडींचे साद-पडसाद दखनी साहित्यात वेळोवेळी उमटलेले आहेत. या भाषेच्या वाटचालीत मराठी भाषेने दखनीची पाठराखणी सातत्याने केली आहे. मराठी शब्दांचे विश्लेषण म्हणूनच महत्त्वाचे ठरते.

ग्रामीण मराठी बोलीत प्रचलित असलेले शब्द

शब्दसंग्रहाचा विचार करताना प्रथम लक्ष वेधून घेतात ते दखनी साहित्यातील ग्रामीण मराठी शब्द. आजच्याही ग्रामीण मराठी बोलीतले शब्द दखनी साहित्यात आढळावेत हे कोड्यात टाकणारे आहे. नागर आणि अनागर ही विशेषणे तशी सापेक्ष असतात; काळाच्या ओघात एखादा नागर शब्द अनागर बोलीत टिकून राहतो, शिष्ट साहित्यात तो 'अपंक्त' देखील ठरतो. काही कारणांमुळे अनागर जीवनास महत्त्व येते तेव्हा साहित्यातही ग्रामीण बोलीतले शब्द मानाने वावरू लागतात. दखनी साहित्यातील ग्रामीण मराठी शब्दांचे वैशिष्ट्य असे की, कधीही मराठी साहित्याची प्रतिष्ठा न लाभलेले पण आजच्या ग्रामीण मराठीत प्रचलित असलेले शब्द दखनी ग्रंथकारांनी सराईतपणे योजले आहेत. शेजारधर्माचा भाग म्हणून एखाद्या भाषेने परभाषेतले शब्द दत्तक घेणे स्वाभाविक असते. परंतु ग्रांथिक भाषा परभाषेतल्या ग्रामीण बोलीतील शब्द दत्तक घेते तेव्हा तिच्या प्रकृतीचा विचार खोलात शिरून होणे अगत्याचे ठरते.

थेट ग्रामीण बोलीतले काही शब्द वानगीदाखल पुढे उद्धृत केले आहेत.

सांचं (सायंकाळी), मोप(पुष्कळ), न्याव (न्याय), भुई(भूमी), बाई (विहीर), फाँटी (फान्टी-फांदी), कौटाल (जादू).

केवळ शब्दच नव्हे तर शब्दांत असलेल्या महाप्राण वर्णाचा लोप वा स्थलांतर करण्याची मराठी ग्रामीण बोलीतील प्रवृत्तीही दखनीने उचलेली आहे-

भोतेक (बहुतेक), धाशत (दहशत), फाट (पहाट), धा (दहा), धई (दही), जीब (जीभ), पावना(पाहुणा).

हे शब्द दखनी साहित्यात रूढ होताना ते ग्रामीण उच्चार-पद्धतीसह आलेले आहेत हे विशेषेकरून ध्यानात घेण्यासारखे आहे. या शब्दांपुरातच विचार केला तर असे निदर्शनास येईल की, ग्रामीण मराठीची ध्वनिव्यवस्थादेखील या शब्दांबरोबरच दखनी भाषेने स्वीकारली आहे. भाषेच्या प्रकृतीधर्माच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरते.

शब्द कोणत्याही भाषेतला असला तरी त्यास प्राप्त होणारे अर्थ सामाजिक संदर्भातून निश्चित होत असतात. हे संदर्भ समान नसतील तर एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत प्रचलित होऊ शकत नाहीत. ग्रामीण मराठीची दखनी लेखकांनी मुक्तपणाने केलेली उसनवारी हे साहित्यिक मराठी समाजात पूर्णपणे मिसळून गेलेले होते याची साक्ष देते.

यादवकालीन मराठी शब्द

दखनी लेखकांची उसनवारी अनागर मराठी शब्दांपुरती मर्यादित नाही. साहित्यात आणि शिष्ट समाजात रूढ असलेल्या मराठी शब्दांचाही उपयोग या लेखकांनी आपल्या साहित्यात केला आहे. शेवटच्या भागात दिलेल्या मराठी शब्दांच्या कोशाचे परीक्षण केले असताना या वैशिष्ट्याचा प्रत्यय येतो. दखनी साहित्यातील काही मराठी शब्दांना तर अकराव्या-बाराव्या शतकाइतका पुरातन इतिहास आहे. बाराव्या

शतकातील मराठी शिलालेख आणि तेराव्या शतकातील मराठी साहित्य यांत आढळून येणारे कितीतरी शब्द दखनी साहित्यात सहजगत्या प्रयुक्त झालेले आहेत. उदाहरणांदाखल काही शब्द देता येतील.

- अजूँ/अजुईं/अजँ- अद्याप या अर्थाने येणारा हा शब्द ज्ञानेश्वरीत व दखनी साहित्यात येतो. (ज्ञा.२-अझुई. कुतुब १२, सैफु. ९५).
- ऐलाड- अलीकडे. हा शब्द ग्रामीण मराठीत तसाच ज्ञानेश्वरीतही येतो. (ज्ञा. ६ – १०१, मैना १६३.)
- हाट - बाजार या अर्थाचा हा शब्द शके ११५० च्या सोमेश्वराच्या शिलालेखात येतो. (लीळा. उत्तरार्ध २८, ज्ञा. ९-४९२, सैफुल २)
- राऊत - घोडेस्वार, (राणेबेन्नुराचा शिलालेख शके ११७४, ज्ञा.९ ३२३, लीळा पृ. ५००)
- पावलाँ - पाऊल या शब्दाचे अनेकवचन, (मराठी शिलालेख शके ११०६, ज्ञा. ६- ३५०, अली ७२)

मराठी शिलालेख आणि यादवकालीन मराठी –साहित्य यांत आढळून येणाऱ्या ह्या शब्दांची निवड करण्यामागे दुसराही हेतू आहे. फारसी लिपीतील दखनी साहित्याचा प्रारंभ चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धातला. पण, तत्पूर्वी दखनी भाषा अस्तित्वात होती. 'संधा भाषेतून' दखनी भाषा उद्भवली त्यावेळी वारकरी आणि महानुभाव या दोन्ही पंथांनी मराठी साहित्य समृद्ध केलेले होते. नागरी लिपीतील दखनी याच सुमारास रूढ झाली, प्रारंभकाळातले दखनी साहित्यिक मराठी भाषिक होते. या परिस्थितीचा प्रभाव दखनी साहित्यातील शब्दसंग्रहावर होणे अपरिहार्य होते. दखनी भाषेत आढळून येणारे यादवकालीन मराठी शब्द एका परीने दखनी भाषेच्या संभवाचे स्थळ आणि काळ यांचे निदर्शक ठरतात. दखनीतील ग्रामीण मराठी शब्द या भाषेच्या लेखकांचे महाराष्ट्रातल्या समाजजीवनाशी असलेले सामरस्य दर्शवितात तर यादवकालीन मराठी साहित्यातील शब्दांचा दखनी साहित्यात होणारा वापर दखनीचे समकालीन मराठी साहित्याशी असलेले निकटचे नाते स्पष्ट करतात. जन्मापासूनच दखनी भाषेला मराठी वळण लागले आहे याचा हा एक अप्रत्यक्ष पुरावा समजता येईल.

प्राकृत-अपभ्रंशाची उसनवारी

प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांतील साहित्यात प्रचलित असलेले कित्येक शब्द दखनी साहित्यात प्रचलित आहेत. हे शब्द एकतर संधा भाषेतून दखनीत उतरले असावेत अथवा मराठी भाषेच्याद्वारा त्यांची आयात दखनी साहित्यात झालेली असावी. या वैशिष्ट्याची निदर्शक काही उदाहरणे पुढे देण्यात येत आहेत.

- आंसू - (गाथा सप्तशती, ७-११)
- उताणा - (गास-उत्ताणअ) – मनसमझावन 'उताना ', मराठी 'उताणा'
- ऊसर - (नापीक जमीन) हा शब्द शिलालेख, ग्रामीण मराठी आणि दखनी साहित्यात येतो. विशेष म्हणजे 'सावयधम्मदोहा' या दहाव्या शतकातील ग्रंथातही तो आला आहे.

अनुक्रमणिका

- कंत - (सं. कांत, पती/ प्रियकर) लावणीत आणि लोकगीतांत येणारा हा शब्द 'लीळाचरित्र' या ग्रंथात आढळतो. दखनीत प्रचलित असलेल्या या शब्दास प्राकृत- अपभ्रंशाची परंपरा आहे कुमारपालचरित्र (१-१९), करकण्डु चरिउ (५७१-२), लीलावई (१०५६),
- कूड - (खोटे, कुडे) ज्ञानेश्वरीत आलेला हा शब्द दखनीत प्रचलित आहे. (सबरस, १०) या शब्दालाही प्राकृत-अपभ्रंशाची परंपरा आहे (सावयधम्मदोहा, ४९).

'दखनी भाषेला मराठीच्या भाषिक व सांस्कृतिक परंपरांनी घडविले आहे'- हा अगोदरच्या प्रकरणात मांडलेला सिद्धांत दखनी भाषेतील श्ब्दसंग्रहाच्या अंगानेही विचार केला असता दृढ होतो.

क्रियावाचक मराठी शब्दांचे महत्त्व

दखनी भाषेतील मराठी शब्दांचे परिक्षण करताना आणखीही एक महत्त्वाची बाब ध्यानात येते. शब्दांच्या जातींपैकी कोणत्या जातीतल्या शब्दांची अधिक प्रमाणात उसनवारी झाली आहे याचे तपशील शोधताना असे आढळते की मराठी क्रियावाचक शब्द दखनीत मोठ्या प्रमाणात प्रचलित आहेत. सामान्य सिद्धांत असा आहे की, परभाषेतील शब्दांची उसनवारी करताना कोणतीही भाषा क्वचितच परभाषेतील क्रियावाचक शब्द उचलते. बहुतेक भाषांच्या बाबतीत हा सिद्धांत निरपवाद ठरलेला आहे. परभाषेतील व्याकरणाची रूपे देखील सहसा परभाषेतून उसनवारीने घेण्यात येत नसतात.[५] मराठीच्या बाबतीत दखनीने हे दोन्ही सिद्धांत पाळलेले नाहीत.

दखनी क्रियापदांचा विचार करता असे दिसते की, या भाषेने अरबी-फारसी शब्दांची उसनवारी केलेली असली तरी या भाषांतील मूळ धातू मात्र घेतले नाहीत. अरबी-फारसी नामांपासून झालेले काही नामधातू दखनीत रूढ आहेत. अरबी-फारसी शब्दांना साहाय धातू जोडून काही संयुक्त क्रियापदेही प्रचलित आहेत. परंतु या भाषांतील मूळ धातू मात्र दखनीने उचलला नाही. (उदाहरणार्थ कबूलना, दफनाना आणि फना करना,जाया करना इ.) त्यामुळे दखनी भाषेतील धातूंचा विचार करताना अरबी-फारसी भाषांतील मूळ धातू बाद ठरतात. धातूचे फक्त दोनच प्रकार उरतात. मूळ दखनी भाषेतले आणि मराठी भाषेतून उचललेले. मराठी क्रियावाचक शब्दांतही काही धातू मराठी भाषेतील कालवाचक प्रत्ययासह आलेले आहेत हे विशेष. आन (आण), घाल, काड (काढ), जप, जळो ही आज्ञार्थाची रूपे; जाइ, भावे, शोभे, पावे ही रीतिभूतकाळाची रूपे; तळती, पडता, पेरता ही वर्तमानकालीन क्रियापदे दखनीत मुक्तपणाने वावरताना दिसतात. 'आती' (आथी) हे प्राचीन मराठीतील 'अस्'धातूचे भूतकाळी रूप आणि काही धातूंची प्रयोजक रुपेही मराठी वळणाची आहेत. (उदा. फुटना- फोडना, फटना –फाडना इ.) मराठी प्रमाणेच दखनीत नामाचा क्रियापदासारखा उपयोग होत असतो, सल-सले (सलते), बिसर-बिसरता, विचार- विचाऱ्या (विचारले), विचार केला, चित्र-चिताऱ्या, चित्र्या, अनमान-अनमानना ; तसेच डळमळना, चुरचुरना, धडधडना.

विशेष लक्ष वेधून घेतो तो आहे/ अहे या क्रियापदाचा वारंवार होणारा प्रयोग. मूळ 'अस्' धातूचे हे रूप दखनीत वर्तमानकाळी आहे/अहे या रुपात आढळते. याच धातूचे अथा/अता (होता) हे भूतकालीन रूपही दखनीत प्रचलित आहे. शिवाय, ओतना, आपटना, उपटना असे कितीतरी मराठी क्रियावाचक शब्द दखनी साहित्यात पानोपानी आढळून येतील.

डॉ. श्रीराम शर्मा यांनी आपल्या ग्रंथात दखनी भाषेचा धातुपाठ दिला आहे. या धातुपाठात आलेल्या ४५९ धातूंची वर्गवारी त्यांनी अशी केली आहे –

केवळ हिन्दी धातू -	२००
केवळ मराठी धातू -	१००
हिन्दी-मराठी धातू -	१००
अन्य -	५९
एकूण -	४५९

हे वर्गीकरण मुळातच सदोष आहे. दखनी ही हिन्दी भाषेची प्रादेशिक बोली आहे असे गृहीत धरून केलेल्या या वर्गीकरणात 'केवळ हिन्दी' धातूंचा वर्ग अनैतिहासिक ठरतो तसाच हिन्दी – मराठी हा वर्ग देखील. अन्य धातू हा त्यांनी कल्पिलेला चौथा वर्ग देखील अस्तित्वात नसल्यामुळे दखनीचा धातुपाठ केवळ दोन वर्गातच विभागला जाऊ शकतो –

मूळ दखनी धातू -	२००
मराठी धातू -	२५९
एकूण -	४५९

संधा भाषेतून आलेले धातू हे मूळ दखनी धातू आणि संधा भाषेत नसलेले ते मराठी धातू असेच वर्गीकरण स्वीकारावे लागते. प्राकृत – अपभ्रंश यांपासून उत्पन्न झालेले पण संधा भाषेत रूढ नसलेले धातू मराठी भाषेच्याद्वारा दखनीत रूढ झालेले असल्याने तेही 'मराठी धातू' याच सदरात येतात. मूळ धातुपाठ ४५९ धातूंचा आहे असे गृहीत धरले तरी दखनी भाषेतील मराठी धातूंचे प्रमाण ५२% होते.

मराठी भाषेच्या व्याकरणाचे संस्कार

दखनी भाषेवरील मराठी भाषेचा प्रभाव दर्शविण्याच्या दृष्टीने आतापर्यंत केवळ मूळ शब्दांचाच विचार केला. मराठी शब्दांची व्याकरणानुसार बदलणारी रूपे विचारात घेतली नाहीत. तथापि, मराठी शब्दच नव्हे तर या शब्दांची मराठी व्याकरणानुसार बदलणारी रुपेदेखील दखनीत प्रचलित आहेत हा मुद्दा या स्थळी ध्यानात घेतला पाहिजे. मराठी धातूंची चर्चा वर आली आहेच. मराठी धातूंची कित्येक आख्यातांतील रूपे दखनी ग्रंथकारांनी मराठीत रूढ असलेल्या काळार्थवाचकाचे संदर्भ लक्षात घेऊन योजलेली आहेत – जाई, करी, बोले, धरी ही रीतीभूतकाळाची रूपे; करसी (करशील),जासी (जाशील),होसी (होईल) ही भविष्यकाळाची रूपे दखनी साहित्यात प्रचलित आहेत. काही उदाहरणे उद्बोधक ठरतील-

- 'सुधन के रूप **तोले**, सूर्यां की बटॉं घाले' [सुंदरीचे रूप तोलले तेव्हा पारड्यात सूर्याचे वजन घातले.]
- 'अब कैसे **सोसूँ** मेरे रब,लहू तेल मेनें **तलती** हूँ [माझ्या परमेश्वरा (तुझा विरह) मी कसा सहन करू? रक्तरूपी तेलात तळल्यासारखे मला होत आहे.]

अनुक्रमणिका

- ‘सरिजन के चंदरने मुक देखन कों हिया तापे’ [प्रियकराचे चंद्रासारखे मुख पाहण्यासाठी हृदय तापते.]
- ‘टुक **तलमले**, टुक **तरफरे**’ [विरह बाधेमुळे मी क्षणात तळमळते, क्षणात तडफडते.]
- हमें वाटसरू नमन यॉं **आहे** [या (जगात) आपण वाटसरूसारखे आहोत.]

धातूंच्या आख्यातरूपांप्रमाणेच कित्येक अनेकवचनी मराठी शब्द दखनी भाषेत प्रचलित आहेत. दखनी भाषेचा नियम असा की, एकवचनी नामास ऑं प्रत्यय लागून अनेकवचनी रूप बनते. परंतु काही मराठी नामांच्या बाबतीत या नियमास वळसा घालण्यात आलेला असून अनेकवचनी मराठी शब्द दखनीने जसेच्या तसे उचलले आहेत. उदाहरणार्थ झरे (एव. झरा), हरबरे (एव. हरबरा), नवे (एव. नवा), शेंगा (एव.शेंग), पुतळे (एव. पुतळा), राजे (ए.व. राजा)

अनेक मराठी अव्ययांची उसनवारीही दखनीने केलेली आहे- आता, अजूँ (अद्याप), कदीमदी, नावेक, बेगी, ऐलाड, पैलाड इ. त्याच प्रमाणे कारणे, लागी यांसारखी विभक्तिप्रत्ययाऐवजी योजण्यात येणारी अव्ययेही दखनीत त्याच अर्थाने योजण्यात आलेली आहेत.

मराठी शुद्धलेखनाचे नवे नियम प्रचलित झाल्यापासून काही शब्दांवर असलेले ‘अनुच्चारित’ अनुस्वार बाद ठरले आहेत. दखनीतील काही मराठी शब्द पाहिले म्हणजे हे अनुस्वार खरोखरच अनुच्चारित होते काय असा प्रश्न पडतो. कारण दखनीत असे शब्द येतात ते मुळातला तथाकथित अनुच्चारित अनुस्वार घेऊनच. उदाहरणार्थ: केंस,संपडना (सापडणे), हिंवाळा, हॉंक, हॉंकाटी, हळूँ, वॉंटा (हिस्सा), तूँ.

दखनी भाषेच्या सर्वांगावर मराठीची सावली किती गडद आहे याची थोडीफार कल्पना या विवेचनातून यावी.

संदर्भ

१. ‘अगरके वजीही (‘सबरस’ या ग्रंथाचा कर्ता) गोवलकोंडेका है ओर हैदराबाद तेलंगाने में है लेकिन यह अजीब बात है के वो मराठी मिसल (वाक्प्रचार) तो एकजगह लिखता है एखाद गुजराती लफ्ज और शेर इस्तमाल करता है लेकिन कही तिलंगी मिसल, फिक्रा, या लफ्ज इस किताब में नही आता’ — सबरस, प्रस्तावना, पृ. -४४.

डॉ. श्रीराम शर्मा यांनी याच ग्रंथाचे नागरी संस्करण प्रसिद्ध केले आहे. या संस्करणास जोडलेल्या प्रस्तावनेत डॉ. शर्मा यांनी हेच मत व्यक्त केले आहे. पृ. १२.

२. ‘दक्खिनी भाषाः उद्भव और विकास’ या ग्रंथात (पृ. १२६) डॉ. श्रीराम शर्मा यांनी अशा आशयाचे मत मांडले आहे. आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनी ‘खोड’, ‘पैलाड’, ‘रूक’ हे राजस्थानी बोलीतले आणि ‘पातर’ (पात्र- नर्तकी) व ‘धड’ हे पूर्वी हिंदीतले शब्द दिले आहेत. हे सर्व शब्द हिंदीच्या प्रादेशिक बोलीत रूढ असतील. परंतु, यादवकालीन मराठी साहित्यात देखील ते प्रचलित असल्याने या शब्दाच्या उसनवारीसाठी दखनी भाषेला उत्तरेचा प्रवास करण्याचे कारण नव्हते.

एकतर हिंदीभाषेच्या प्रादेशिक भेदात साहित्य निर्माण होण्यापूर्वी दखनी भाषा आणि साहित्य अस्तित्वात होते. शिवाय, हिंदीची व हिंदीच्या प्रादेशिक बोलीची ध्वनिव्यवस्था दखनीन संपूर्णपणे स्वीकारलेली नाही. ती मराठी भाषेच्या ध्वनिव्यवस्थेस जवळची आहे. दंत्य आणि मूर्धन्य वर्ण असलेल्या शब्दांची उदाहरणे (कंसातील शब्द हिंदी भाषेतले) या संदर्भात देता येतील –

तुकडा (टुकडा),तूटना (टूटना), थंडा (ठंडा), धुंडना (ढूंड्या), महाप्राणाचा लोप कित्येक शब्दांत मराठीप्रमाणेच झालेला आहे.

हत्ती (हाथी),हात (हाथ), कात (कत्था), लात (लाथ).

३. दक्खिनी हिन्दी: उद्‍भव और विकास, पृ. १०९.

४. ‘मराठीने दखनी में ध्वन्यात्मक भेद भी कराए हैं. मराठी केवल शब्दौंकी देन तो बहुत बडी है. मराठीने अपनी भगिनि को कई वाक्प्रचार और कहावतें प्रदान की हैं. मराठी के कई व्याकरण विशेष दकनी हिन्दी के उच्च श्रेणी के साहित्यिकों के जिव्हाग्रपर खेलते नजर आते हैं. केवळ मराठी के संभाषण प्रकार और अर्थव्यक्तीविशेष भी दखनी में प्रयुक्त होते देखे जाते है’- तारीखे इस्कंदरी, प्रस्तावना, पृ. ३४

याच प्रस्तावनेत ‘तारीखे इस्कंदरी’ या २३१ पंक्तींच्या काव्यात शंभर मराठी शब्द आल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

५. “ Words can be borrowed freely between distinct languages, but grammar with difficulty at all” – KROBER, Language in Culture and Society,643

१०. अरबी-फारसी शब्दांची उसनवारी

परभाषा संपर्क आणि त्याचे परिणाम

मराठी शब्दांप्रमाणेच अरबी, फारसी आणि तुर्की या भाषांतील शब्द दखनी बोलीत आणि साहित्यात प्रचलीत आहेत.

केवळ वर्णमालेचा विचार केला तरी आधुनिक आर्यभारतीय भाषांची वर्णमाला अरबी-फारसी भाषांतील वर्णमालेपेक्षा भिन्न आहे. या भाषांतील कित्येक वर्णोच्चार आर्यभारतीय भाषांत आढळत नाहीत. कोणत्याही भाषेची वर्णमाला सामान्यपणे त्या भाषेच्या ध्वनिव्यवस्थेस अनुसरून सिद्ध होत असते. भिन्न वर्णमालांचा अर्थ सध्यातरी एवढाच निघतो की, आर्यभारतीय भाषांची ध्वनिव्यवस्था अरबी – फारसी भाषांच्या ध्वनिव्यवस्थेपेक्षा निराळी आहे. त्यामुळेच मराठी शब्द दखनीत जसेच्या तसे उतरले आहेत तर अरबी-फारसी शब्दांत स्थित्यंतर होऊन ते दखनीत प्रचलित झालेले आहेत.

'परभाषा संपर्क' हा भाषाशास्त्रीय विचारांचा एक घटक असतो. कोणतीही भाषा कितीही समृद्ध असली तरी परभाषेतील कित्येक शब्द भाषा उसनवारीने घेत असते. इंग्रजी भाषा जगातल्या समृद्ध भाषेतील एक मानली जाते. तरीही अनेक परभाषांतील शब्द इंग्रजीत रूढ आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी अनेक कारणांमुळे अनेक भाषांचा परस्परांशी संपर्क येत असतो, अशा भाषांतून शब्दांची देवाण-घेवाण होत असते त्यामुळे परभाषांतील शब्द कोणत्याही भाषेत घर करून बसतात. इंग्रजांच्या राजवटीत राजव्यवहाराची भाषा इंग्रजी होती. महाविद्यालयीन स्तरावर शिक्षणाचे माध्यमही इंग्रजी होते. प्रतिष्ठितांचा व्यवहार याच भाषेतून होत असे तर उद्योगधंद्यातही याच भाषेचे प्राबल्य होते. या व्यवहाराचा परिणाम असा झाला की, अनेक इंग्रजी शब्द मराठीत 'घरच्यासारखे' वावरू लागले. काही इंग्रजी शब्दांचे तर परकेपणही लुप्त झाले आहे.

तीच गोष्ट फारसी भाषेची. मुसलमानी अमदानीत राजव्यवहाराची भाषा फारसी होती. राज्यकर्ते धर्माने मुसलमान असल्याने त्यांची धर्मभाषा अरबी होती. राज्यकर्त्यांच्या सेवेत असलेले कित्येक अमीर उमराव आणि व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेले व्यापारी यांची भाषा अरबी-फारसी तशीच तुर्की होती. राज्यव्यवहारात या भाषा प्रचलित असल्याने सर्वच देशी भाषांवर या भाषांचे संस्कार झाले. मराठीत व इतर भारतीय भाषांत अरबी-फारसी शब्द या कारणांमुळे प्रचलित झाले. दक्षिण भारतात तेराव्या शतकानंतर इस्लामी राजवटीस प्रारंभ झाला. या काळापासून अरबी-फारसी भाषांचा दाक्षिणात्य भाषांशी संपर्क आला. कालांतराने या भाषांतील विशेषतः फारसी भाषेतील अनेक शब्द मराठी, दखनी आणि अन्य भाषांतून घर करून बसले. अशा रीतीने मराठी व दखनी भाषांत अरबी-फारसी शब्दांची आयात सुरू झाली. कालांतराने हे शब्द भाषेच्या शब्दसंपत्तीचे अंग होऊन बसले.

दखनी भाषेत अरबी-फारसी शब्दांच्या आयातीस आणखीही एक सांस्कृतिक घटना कारणीभूत ठरलेली आहे. ती म्हणजे पंथाच्या प्रसारार्थ सूफींनी दखनी भाषेतून केलेली साहित्य निर्मिती. सूफींच्या प्रभावामुळे दखनीत अरबी-फारसी शब्दांच्या आयातीस प्रोत्साहन मिळाले.

दखनीतील अरबी-फारसी शब्दांच्या अपभ्रंशांचे विश्लेषण करताना दोन बाबी ध्यानात येतात-

अनुक्रमणिका

१) मराठी भाषेत रूढ असलेले अरबी-फारसी शब्दांचे अपभ्रंश दखनीतही त्याच स्वरूपात झाले आहेत.

२) मूळ शब्दांच्या उच्चारांत परिवर्तन घडले आहे ते आर्यभारतीय भाषाकुलातील वर्णमालेत नसलेल्या वर्णोचारांच्या बाबतीत.

दखनी भाषेत प्रचलित असलेल्या अरबी-फारसी शब्दांच्या अपभ्रंशाच्या मुळाशी एक प्रकाराची शिस्त आहे. या शिस्तीचा भाषेच्या स्वभावधर्माशी विशेषतः ध्वनिव्यवस्थेशी निकटचा संबंध आहे असे या विश्लेषणातून निष्पन्न होते. या मुद्याचा थोडा विस्तार केला पाहिजे.

अपभ्रष्ट शब्दांची मीमांसा

भाषेत प्रचलित असलेले व 'अपभ्रष्ट' या सदरात मोडणारे शब्द दोन प्रकारचे असतात.

१) पूर्ववर्ती भाषेतून आलेले (तद्भव) आणि

२) परभाषेतून आयात झालेले.

पूर्ववर्ती भाषेतील शब्दांत कालांतराने परिवर्तन होत असते. अशा प्रकारचे परिवर्तन भाषेच्या स्वाभाविक विकासातून घडत असते आणि त्या त्या भाषेच्या ध्वनिव्यवस्थेशी ते सुसंगत असते. परवर्ती भाषेत कालांतराने होणारा उच्चार-विकास अशा परिवर्तनास कारणीभूत ठरतो. विशेषतः उच्चारास अवघड वाटणारे शब्द सोपे करणे हा या सामाजिक सवयीचा परिणाम असतो. उदाहरणार्थ, बहीण हा मराठी शब्द घेऊ. संस्कृत भाषेतील भगिनी या शब्दाचा तो अपभ्रंश आहे. अपभ्रंशास प्रारंभ प्राकृत भाषेपासूनच झालेला आहे. या शब्दाचे 'बहिणी' असे प्राकृत रूप होते. मराठीत हा शब्द रूढ झाला तो 'बहीण' या रुपात. याच शब्दाचे ग्रामीण मराठीत भैन असे रूप होते.

या अपभ्रंशाच्या तुलनेने 'किल्ला' ह्या मराठीत रूढ असलेल्या मूळ फारसी शब्दाचे उदाहरण घेऊ या. मराठी बखरीत आणि दखनीत हा शब्द 'किला' असा येतो. मूळ फारशी शब्द 'किलह्' असा असून प्रारंभीचा 'क' आणि अंती आलेला 'ह्' हा वर्णोच्चार आर्यभारतीय ध्वनिव्यवस्थेत नाही. त्यामुळे प्रारंभीचा 'क' आर्यभारतीय 'क' सारखा उच्चारला जातो व अंतीच्या 'ह्' चे रुपांतर 'आ' मध्ये होते. उच्चारात दृढता यावी या हेतूने कालांतराने 'किल्ला' असे रूप या शब्दास प्राप्त झाले. दुसरे उदाहरण 'खिलाफ' या अरबी भाषेतून आलेल्या शब्दाचे देता येईल. मराठी बखरीत आणि दखनीत 'किलाप' या स्वरूपात हा शब्द येतो. अरबी शब्द आहे 'खिलाफ' प्रारंभीचा 'ख्' आणि अंतीचा 'फ्' हे दोन्ही वर्णोच्चार आर्यभारतीय भाषांतील ध्वनिव्यवस्थेत नाहीत. त्यामुळे 'ख्' चे ध्वन्यंतर 'क' अथवा 'ख' मध्ये होऊन अंतीचा 'फ' आर्यभारतीय 'फ' सारखा उच्चारला जातो.ल दखनीत आणि मराठी बखरीत महाप्राणाचा लोप होऊन किलाप हा शब्द रूढ झालेला आहे. (परिशिष्टात अधिक उदाहरणे दिली आहेत.)

अनुक्रमणिका

भिन्न ध्वनिव्यवस्था असलेल्या भाषा

एकाच कुळातील भाषेतील वर्णोच्चारात कालांतराने घडणारे बदल आणि भिन्न ध्वनिव्यवस्था असलेल्या भाषेतून येणाऱ्या शब्दांतील स्थित्यंतर या दोहोंना अपभ्रंश मानण्यात येत असले तरी शब्दांतील उच्चारप्रक्रियेत घडणाऱ्या परिवर्तनाची प्रक्रिया भिन्न असते हे या संदर्भात ध्यानात ठेवले पाहिजे. उच्चाराच्या सुलभीकरणार्थ घडणारे बदल सामान्यपणे ग्रामीण बोलीत आढळतील.

दखनीत प्रचलित असलेल्या अरबी-फारसी शब्दांत झालेले बदल हे भिन्न ध्वनिव्यवस्था असलेल्या भाषेतून आलेल्या शब्दांच्या धर्तीवर झालेले आहेत. कारण, परभाषेतून येणारा शब्द कोणतीही भाषा आपल्या ध्वनिव्यवस्थेनुसार घडवूनच त्यांचा स्वीकार करीत असते. दखनीत रूढ असलेले अरबी-फारसी शब्द त्यामुळे मूळ स्वरूपात न येता अपभ्रष्ट रुपात आले आहेत. दरबारी दखनी काव्यात मूळ रूपातील अरबी-फारसी शब्द येतात. अशा अपभ्रंशाचे स्वरूप दखनी आणि मराठी या दोन्ही भाषांत सारखेच आढळते त्यावरून दखनी आणि मराठी या दोन्ही भाषांची ध्वनिव्यवस्था समान होती हे निष्पन्न होते.

दखनी भाषेतील अरबी-फारसी शब्दांचा अभ्यास केला असता एक बाब प्रामुख्याने निदर्शनास येते ती ही की, आर्यभारतीय भाषांतील ध्वनिव्यवस्थेत नसलेले वर्णोच्चार असलेल्या शब्दांतच परिवर्तन घडलेले आहे. ही बाब समजून घेण्यासाठी फारसी भाषेतील वर्णमाला आणि उच्चारपद्धती ध्यानात घेतली पाहिजे. नागरी वर्णमालेच्या संदर्भात त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल:

अ नागरीतील ‘अ’ हा वर्णोच्चार फारसी ‘अलीफ’ आणि ‘ऐन’ या दोन वर्णांशा संबद्ध आहे. पैकी ‘ऐन’ हा वर्ण कंठ्य —घर्षक या स्वरुपात उच्चारला जातो. नागरी वर्णमालेत हा वर्णोच्चार नाही.

क नागरीतील ‘क’ च्या जवळपास पोचणारे दोन भिन्न उच्चार-छटा असलेले वर्ण फारसी वर्णमालेत आहेत.पैकी ‘काफ’ या वर्णाचा उच्चार नागरी ‘क’ सारखा होतो तर ‘काफ’ चा उच्चार दर्शविणारा वर्ण नागरी वर्णमालेत नाही. त्यामुळे दखनी —मराठीत हा वर्ण असलेले फारसी शब्द येताना त्याचे ‘क’ मध्ये व ‘ख’ मध्ये रुपांतर होत असते. उदाहरणार्थ वखत आणि कायम.

ख या उच्चाराच्या जवळपास पोचणारे दोन वर्ण फारसी वर्णमालेत आहेत त्यापैकी ‘खै’ हा उच्चार नागरी वर्णोच्चारात नाही. नागरी ‘ख’ हा ‘काफ’ आणि ‘हे’ यांच्या संयोगाने दाखविता येतो.

ग हा वर्णोच्चार दर्शविणारे ‘गाफ’ आणि ‘गैन’ हे दोन वर्ण फारसी वर्णमालेत आहेत. नागरी ‘ग’ हा गाफ’ या वर्णाने दर्शविता येतो. परंतु ‘गैन’ हा वर्णच नागरीत नसल्याने हा वर्णोच्चार काही ‘ग’ तर कधी ‘घ’ या वर्णाने दर्शविला जातो. उदाहरणार्थ, गनिम आणि घुसलखाना.

ज ही उच्चार छटा असणारे अनेक वर्ण फारसी वर्णमालेत आहेत. संस्कृत ‘ज’ चा उच्चार ‘जीम’ या वर्णाने दर्शविता येईल. तथापि ‘ज्वाल’, ‘जे’ ज्वाद आणि ‘जोम’ या वर्णोच्चारांचा समावेश करता येईल असे वर्ण नागरी वर्णमालेत नाहीत.

त भिन्न उच्चार छटा असलेले ‘ते’ आणि ‘तोय’ या वर्णापैकी फक्त ‘ते’ चाच उच्चार नागरी ‘त’च्या द्वारे दर्शविता येतो. ‘तोय’ हा वर्णोच्चार नागरी वर्णमालेत नाही.

फ इंग्रजी वर्णमालेतील 'एफ्'शी समांतर असणारा 'फे' हा वर्ण नागरी वर्णमालेत नाही. महाप्राणयुक्त 'फ' फक्त नागरी वर्णमालेत आहे.

स या उच्चाराच्या भिन्न छटा असलेले तीन वर्ण फारसी वर्णमालेत आहेत से, स्वाद, सीन. यांपैकी फक्त 'सीन'चा उच्चार नागरी 'स' ने दर्शविता येतो. अन्य उच्चारांची चिन्हे नागरी वर्णमालेत नाहीत.

ह 'है' आणि 'हे' अनुक्रमे 'ह' आणि महाप्राणयुक्त वर्णात येणारा 'ह' यांचे समांतर ठरतात.

दखनी-मराठीतील समान अपभ्रंश

अरबी-फारसी वर्णमालेत नसलेले कित्येक वर्णोच्चार नागरी वर्णमालेत आहेत. परंतु या स्थळी त्यांचा विचार करण्याचे कारण नाही. मुख्य मुद्दा हा आहे की, नागरी वर्णमालेत नसलेले वर्णोच्चार असलेले फारसी व अरबी भाषेतील शब्द दखनीत आणि मराठीत रूढ होण्यापूर्वी अशा शब्दांतील वर्णात परिवर्तन घडते. पुढील उदाहरणांनी हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल-

अकबार (फा. —अख़बार) 'ख़' या वर्णाचा अंतर्भाव नागरी वर्णमालेत नसल्याने दखनीत 'अकबार' रूढ झाला.

अन्देशा ('फा. —अन्देशाह्) अंती असलेला 'ह्' नागरी वर्णमालेत नाही. त्याचे 'आ' मध्ये रुपांतर झाले. (पाहा. भाऊसाहेबांची बखर, १०३).

उजर (फा. —उजर) या शब्दातील 'ऐन' व 'जे' हे वर्ण नागरी वर्णमालेत नाहीत.

दानादान (फा. —दानादान) या मूळ शब्दातील 'ह्' नागरी वर्णमालेत नसल्याने उच्चारात बदल.

तगादा (फा. — तक़ाज़ा) 'क़' या वर्णाचे 'ग' मध्ये आणि 'ज्' या वर्णाचे 'द' मध्ये रूपांतर.

अरबी-फारसी शब्दांचे अपभ्रंश मराठी भाषेतही अशाच प्रकारे होत असतात. परिशिष्टात मराठी बखरींत आलेले काही शब्द दिले आहेत. दखनी आणि मराठी या दोन्ही भाषांची ध्वनिव्यवस्था समान असल्याचा तोही एक पुरावा नमूद करण्यासारखा आहे.

या विवेचनातून एक निष्कर्ष निघतो की दखनी साहित्याचे लेखन फारसी लिपीतून झालेले असले आणि अरबी-फारसी शब्द मूळ स्वरूपात लिहिता येण्याजोगी लिपी असूनही या भाषेने अरबी-फारसी भाषांची ध्वनिव्यवस्था स्वीकारली नाही. उलट, मराठी भाषेच्या ध्वनिव्यवस्थेचेच अनुसरण दखनी भाषेने केलेले आहे.

फारसी लिपीतून लिहिण्यात येणाऱ्या उर्दू भाषेच्या बाबतीत मात्र असा निर्णय देता येणार नाही. उर्दू भाषेने फारसी भाषेची वर्णमाला आणि ध्वनिव्यवस्थाही जशीच्या तशी स्वीकारलेली आहे. त्यामुळे फारसी

शब्द मूळ स्वरूपात आणि उच्चारांच्या लकबीसह उर्दू भाषेत रूढ झालेले आहेत. लिपी समान असूनही दोन्ही भाषांचे कुलगोत्र निराळे आहे असाच निष्कर्ष या विशेषातून निघतो.

उर्दू साहित्याच्या प्रारंभकाळात मात्र ही परिस्थिती अस्तित्वात नव्हती. उर्दू भाषेच्या प्रारंभकाळात या भाषेने फारसी भाषेची ध्वनिव्यवस्था स्वीकारली नव्हती. ‘उर्दू ड्रामा और स्टेज’ या ग्रंथात (प्रकाशन १९४७, लेखक – सय्यद महम्मद हुसेन रज्वी) प्रारंभकालीन उर्दू नाटकांचा इतिहास देताना या नाटकांतील भाषेसंबंधी पुढील विशेष नमूद केले आहेत. अयोध्येचा नवाब वाजद अली शाह यांनी रंगभूमीवर सादर केलेल्या ‘रहस’ (रास – १९४२) आणि ‘इंदरसभा’ या नाटकांच्या आधाराने लेखकाने हे निष्कर्ष काढले आहेत.

१. (या नाटकांत) अरबी-फारसी शब्दांतील ‘ख़’ चा लोप होऊन सर्वत्र ‘ख’ उच्चारला जात असे.

२. ‘ज’ च्या उच्चाराचे ‘जीम’ या वर्णाखेरीज अन्य कोणतेही पर्याय अस्तित्त्वात नव्हते.

३. ‘ग़’, व ‘फ़’ या वर्णाचे उच्चार अनुक्रमे ‘ग’ व ‘फ’ असे होत असत.

४. ‘क’ आणि ‘क़’ यांतील भेद नाहीसा होऊन सर्वत्र ‘क’ हाच उच्चार प्रचलित होता.

५. ‘श्’ सर्वत्र ‘स’ असाच उच्चारला जात असे.

उर्दू भाषेचा उदयच मुळात इंग्रजांच्या राजनीतीतून झालेला असल्याने या देशातील मुसलमानांना बहुजन समाजापासून अलिप्त ठेवण्याच्या हेतूने उर्दू भाषा उदयास आली; उत्तरोत्तर अभारतीय सांस्कृतिक वातावरणाच्या दिशेने वाटचाल करीत राहिली.दखनी साहित्यातील सांस्कृतिक वातावरण त्या मानाने संपूर्ण भारतीय असल्याचा उल्लेख अगोदर येऊन गेलाच आहे.

११. ध्वनिव्यवस्था आणि वर्णविचार

दखनी : आधुनिक आर्यभारतीय कुळातील भाषा ध्वनिव्यवस्था आणि वर्णमाला

अगोदरच्या दोन प्रकरणांतील चर्चेतून असे निष्पन्न झाले की, अरबी-फारसी शब्द दखनीत प्रचलित होताना मूळ शब्दांत बदल झालेला आहे. मराठी शब्द दखनीत येताना मात्र मूळ शब्दांत बदल झालेला नाही ; त्यामुळे दखनी आणि मराठी या भाषा एकाच भाषाकुळातल्या ठरतात.

आधुनिक भारतीय आर्यकुलोप्तन्न भाषांची वर्णमाला देताना आपण सामान्यपणे संस्कृत भाषेची वर्णमाला प्रमाण मानीत असतो. ही वर्णमाला आधुनिक आर्यभारतीय भाषांना लागू पडत नाही असे नाही. परंतु भाषेच्या मूळ ध्वनिव्यवस्थेचा बोध या वर्णमालेवरून होत नाही. संस्कृत भाषेपासून उद्भवलेल्या भाषांची वर्णमाला समान असती तर निराळ्या भाषा उद्भवण्याचे कारणच नव्हते. नव्या भाषा उदयास आल्या त्या भिन्न ध्वनिव्यवस्थेमुळे. कालांतराने संस्कृत भाषेतील तत्सम शब्दही शिष्टांच्या बोलीत आणि तद्द्वारा साहित्यात प्रचलित झाले. त्यामुळे संस्कृत भाषेची वर्णमाला प्रमाण मानावी लागते. सध्या प्रचलित असलेल्या भाषेच्या व्यवस्थेचे निदर्शक ठरतात ते तद्भव आणि देश्य या वर्गात मोडणारे शब्द.

या बाबतीत मराठी भाषेतील तद्भव शब्दांचे उदाहरण देता येईल. शिष्टेतर समाजात रूढ असलेले तद्भव शब्द मराठी भाषेच्या ध्वनिव्यवस्थेची कल्पना देऊ शकतात. या शब्दांचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येईल की, संस्कृत वर्णमालेतील कित्येक वर्ण शिष्टेतरांच्या भाषेत रूढ असलेल्या शब्दांत येत नाहीत. येतात ते मूळ वर्णात परिवर्तन असलेले शब्द. कारण, अशा वर्णांना मूळ भाषेच्या ध्वनिव्यवस्थेत स्थान नसते. 'ॠ' आणि 'ऌ' हे स्वर असलेले तद्भव शब्द मराठीत आढळणार नाहीत.रीण (ॠण), तण (तृण), क्रुपा (कृपा) या शब्दांत 'ॠ' चे 'रि', 'अ', 'उ' आदी स्वरांत रूपांतर झालेले आहे. या रूपांतरास वररुची या प्राकृत व्याकरणकाराची मान्यता आहे. [२] ऐ आणि औ या संयुक्त स्वरांचा तोच प्रकार आहे. स्वर-संयोगातून पुढे ऐ आणि औ हे स्वर मराठीत रूढ झालेले असले तरी संस्कृत शब्दांतील 'ऐ' आणि 'औ' या स्वरांचे 'ए', 'ओ' मध्ये रुपांतर होते. या परिवर्तनासही प्राकृत व्याकरणकारांनी मान्यता दिलेली आहे. [३] 'ङ्', 'ञ्', आणि 'ण्' या नासिक्यवर्णाच्या बाबतीत असाच प्रकार आढळतो. तद्भव शब्दांत 'ङ्' आणि 'ञ्' वर्ण आढळत नाहीत. 'ण्' चे सार्वत्रिक उच्चारण 'न' असे करण्याची प्रवृत्ती शिष्टेतर समाजात आढळते. [४] 'ष', 'श्' आणि 'स' या वर्णांच्या उच्चारात सामान्यीकरण होऊन 'स' हाच वर्ण प्राकृतात आढळतो. [५]अशा रीतीने ॠ, ऌ, ऐ, औ, ङ्, ञ् आणि 'ण्' हे वर्ण प्राकृत भाषांच्या ध्वनिव्यवस्थेने स्वीकारलेले नाहीत.

दखनी भाषेची ध्वनिव्यवस्था आणि वर्णमाला यांचा विचार करतानाही संस्कृत भाषेतील वर्णमालेवर समग्रपणे विसंबून राहता येत नाही.

दखनी भाषेवर संस्कृतीकरणाचा संस्कार झाला तसाच अरबी-फारसी शब्दांचाही. दखनीत संस्कृत शब्दांप्रमाणेच अरबी-फारसी भाषांतूनही तत्सम शब्द आले आहेत. तद्भव शब्द अर्थातच दखनीने आपल्या वर्णव्यवस्थेनुसार रूप देऊन घडविले आहेत. तत्सम शब्दांचे विवाद्य अपवाद वगळले तर एकंदरीत प्राकृत अपभ्रंशाची वर्णव्यवस्था मराठीप्रमाणेच दखनीभाशेतही रूढ आहे या निर्णयावर यावे लागते. काही उदाहरणे घेऊन हा मुद्दा स्पष्ट करता येईल. 'ॠ' या स्वराचे उदाहरण देता येईल. वररुची आणि हेमचंद्र यांच्या व्याकरणाप्रमाणे या स्वरांचे अ, इ, ऊ, रि आणि रू अशा पाच वर्णांत रूपांतर होते. [६] दखनी –मराठीत याच

अनुक्रमणिका

पद्धतीने ‘ऋ’ चे परिवर्तन होत असते. उदाहरणार्थ : गृह- घर (अ), दृष्टी– दिठी (इ), मातृस्वसा – माउसी (उ), ऋतु- रितु, (इ) वृक्ष –रूक /रुख (रु).

दुसरे उदाहरण ‘श्’ चे देता येईल. प्राकृतात संस्कृत शब्दातील ‘श्’ चा ‘स’ होणे हा सर्वसाधारण नियम आहे. [७] उदा. शिर-सिर/सर. तथापि, या परिवर्तनाखेरीज आणखीही काही बदल संस्कृत शब्दातील ‘श्’ चे प्राकृतात रूपांतर घडताना होतात. त्यांपैकी एक नियम आहे ‘छ्’ मध्ये रूपांतरीत होण्याचा. [८] या नियमानुसार शकट या संस्कृत शब्दाचे मराठीत ‘छकडा’ हे रूपांतर घडते. ‘शावक’ या संस्कृत शब्दाचा मराठी ‘छावा’ होतो तोही याच नियमानुसार, दखनी भाषेने संस्कृत शब्दांच्या बाबतीत तर हे नियम पाळलेच. अरबी-फारसी भाषांतील ‘श्’ चे रूपांतरही याच नियमानुसार दखनीत होत असते. उदा. शबीनाह – छबीना, शामियाना- छावणी, शानशौक- छानछोक.

‘प्राकृत कल्पतरू’ या प्राकृत भाषेच्या व्याकरणात एक नियम दिलेला आहे.तद्नुसार संस्कृत भाषेतील ‘स्’चा प्राकृतात ‘च्’ होतो आणि ‘च्’ चा ‘स्’ [९] या नियमानुसार ‘सदानित’ या शब्दाचे ‘चंदन’ असे रूप बनते. दखनी भाषेत चंदन हा शब्द रूढ आहे तसाच ‘संदल’ही.सूफी संतांच्या पुण्यतिथीनिमित्त निघणाऱ्या मिरवणूकीसही ‘संदल’ असे नाव आहे. ही मिरवणूक असते समाधीवर वाहिलेल्या चंदनाच्या गंधाच्या गोळ्यांची.

या निमित्ताने आणखी एका बाबीचा उलगडा होऊ शकतो. मराठी भाषेतील ‘चा’ हा षष्टीचा प्रत्यय संस्कृत ‘स्य’ प्रत्ययापासून आलेला आहे असे आपण मानतो. परंतु, व्युत्पत्तीच्या दृष्टीने मात्र ‘स्य’ चा ‘च’ शी संबंध जोडता येत नाही. परंतु ‘स’ चे रुपांतर ‘च’ मध्ये होत असते हा नियम प्रमाण मानला तर ‘स्य’ या प्रत्ययापासून द्वितीयेचा ‘स’ आणि षष्ठीचा ‘च’ या मराठी प्रत्ययांची उपपत्ती सहजगत्या लागते. प्राकृत भाषेत चतुर्थीचा लोप झालेला असून षष्ठी विभक्तीने चतुर्थीचे कार्य साधले जाते असे व्याकरणकार सांगतात. ते लक्षात घेता षष्ठी विभक्तीच्या प्रत्ययापासून मराठीत षष्ठीचा ‘च’ आणि चतुर्थीचा ‘स’ हा प्रत्यय यावा हे भाषेच्या परंपरेशी सुसंगत दिसते. उदाहरणार्थ, बहीण या शब्दाता ‘भैन’ हा अपभ्रंश प्राकृत भाषेच्या ध्वनिव्यवस्थेनुसारच झाला आहे.

ही उदाहरणे लक्षात घेतली म्हणजे दखनी भाषेने स्थूलमानाने प्राकृत भाषांची ध्वनिव्यवस्था व वर्णव्यवस्था स्वीकारली आहे या निर्णयावर यावे लागते.

काही उच्चारविशेष

दखनी भाषेत रूढ असलेला शब्दसंग्रह अभ्यासला असता या भाषेच्या उच्चारपद्धतीत आढळून येणारे आणखीही काही विशेष लक्षात येतात. त्यांचीही नोंद या स्थळी घेतली पाहिजे.

स्वरभक्ती : हा सर्वच प्राकृत भाषांचा विशेष आहे. जोडाक्षर उच्चाराच्या दृष्टीने सुलभ व्हावे या हेतूने स्वरांचे साहाय्य प्राकृत भाषेत घेतले जाते तसेच ते ग्रामीण बोलीत देखील. कित्येक दखनी शब्दांत अशा रीतीने सुलभता निर्माण झालेली दिसून येईल. उदा. परगट (प्रगट), गियान (ज्ञान), परमेसर (परमेश्वर), परनाम (प्रणाम), रगत (रक्त) इत्यादी.

स्वर आणि अर्धस्वर यांची अदलाबदल : प्राचीन मराठी साहित्यात आणि वर्तमान ग्रामीण मराठीत आढळून येणारी ही प्रवृत्ती दखनी भाषेतही विद्यमान आहे. या प्रवृत्तीनुसार 'ए' च्या जागी 'य' येतो तर 'ओ' च्या जागी 'वो', 'ई' चे 'वी' किंवा 'वी' चे 'ई' मध्ये रूपांतर घडते.

येकला (एकला), यकंदर (एकंदर), वोखद (औषध), बाई (सं. वापी, बावी)

दंत्य आणि मूर्धन्य वर्णांचे उच्चार :मूळ शब्दात येणाऱ्या दंत्य व मूर्धन्य वर्णांची दखनीत अदलाबदल होते असा नियम देता येत नाही. तथापि, दखनी उच्चार पद्धतीवर मराठी भाषेचा प्रभाव पडलेला आहे हे लक्षात न घेतल्याने डॉ. बाबूराम सक्सेना यांनी असा नियम दिला आहे की, 'एकाच शब्दात दोन मूर्धन्य वर्ण जवळ जवळ आले असता पहिल्याचे रूपांतर दंत्य ध्वनीत होते.' वस्तुतः असा नियम देता येत नाही. काही हिंदी शब्दांतील मूर्धन्य वर्ण दखनी भाषेत दंत्य होतात हे खरे आहे. त्याचे कारण हे शब्द मराठी भाषेतून दखनीने उचलले आहेत. तिलक हा संस्कृत शब्द हिंदी भाषेत जसाच्या तसा येतो. पंरतु मराठीत तो टिळक/टिळा असे रूप धारण करतो. थंडा हा शब्द दखनीने मराठीतून घेतल्या कारणाने तो 'ठंडा' होऊ शकत नाही. तीच गोष्ट तुकडा (टुकडा), तुट्या (टुट्या), धुंड्या (ढूंड्या- मराठी धुंडणे), दाटया(हिंदी – डाँटना, मराठी-दाटणे), थाट (हिंदी –ठाट, मराठी- थाट), धीट (हिंदी – ढीट, मराठी- धीट), दंडा (हिंदी- डंडा, मराठी-दंडा) या शब्दांच्या बाबतीतही आढळून येईल.

दखनीच्या ध्वनिव्यवस्थेवर मराठी भाषेचा किती खोलवर परिणाम झालेला आहे हे या श्ब्दांवरूनही लक्षात येईल.

महाप्राण वर्ण : महाप्राण वर्णाच्या स्थित्यंतराबाबतही दखनीने मराठीचे विशेषतः ग्रामीण मराठीचे अनुसरण केले आहे. या संदर्भात पुढील विशेष आढळून येतात-

१) **लोप**-काही शब्दातील महाप्राणाचा लोप दखनीत होतो- चाडी (चाहाडी), न्यारी(न्याहारी), रैता (रहता), कता (कहता), सैता (सहता)

२) **अल्पप्राणात रूपांतर** –ही प्रवृत्ती ग्रामीण मराठी बोलीतही आढळते-जीब (जीभ), आट (आठ), चिंदडया (चिंधड्या), लिकत्या (लिखत्या), काड (काढ), आदार (आधार), डग (ढग), देक (देख). याबाबतीत विशेष लक्षात ठेवण्याजोगी बाब म्हणजे वर्तमान हिंदी भाषेत रूढ असलेले महाप्राणयुद्ध शब्द दखनीत (मराठीच्या धर्तीवर) अल्पप्राणयुक्त उच्चारले जातात.

३) **स्थलांतर** –ग्रामीण मराठी बोलीप्रमाणेच दखनीतही महाप्राणाचे स्थलांतर झाल्याची उदाहरणे काही शब्दांत आढळतात – धई (दही), भार (बाहेर), भोतेक (बहुतेक), फाट (पहाट), इभ्राम (इब्राहीम).

ग्रामीण मराठी शब्दांचे वैपुल्य

शब्दांतर्गत महाप्राण वर्णांच्या उच्चाराबाबत दखनी भाषा काही बाबतीत प्राकृत भाषांच्या उच्चारपद्धतीचे अनुसरण करीत असली तरी प्रामुख्याने ग्रामीण मराठीत रूढ असलेली उच्चारपद्धतीच या भाषेने आत्मसात केली आहे असे दिसून येते. या विशेषातून दुसराही एक अर्थ निघतो. आपल्या

साहित्यरचनेसाठी शब्दांची निवड करताना दखनी साहित्यिक ग्रामीण मराठी बोलीवर विसंबलेले दिसून येतात.ही बोली त्यांच्या काळी ग्रामीण नसेलही. ती शिष्ट समाजात प्रचलित असल्याने तिला साहित्यात स्थान मिळाले असावे. आज ग्रामीण गणलेले मराठी शब्द दखनी साहित्यात भरपूर आढळतात हा उल्लेख अगोदर येऊन गेला आहे. शेवटी दिलेला शब्दसंग्रह अगदी वरवर चाळला तरी लीळाचरित्रातील मराठी शब्दांचे प्रमाण त्यात अधिक असल्याचे निदर्शनास येईल. लिळाचरित्राची भाषाही ही तत्कालीन बोलीभाषा असावी असे एकूण संदर्भावरून लक्षात येते. लीळाचरित्राचा आकृतिबंधच मुळी लोककथेचा आहे. अशा रीतीने यादवकालीन मराठी साहित्यातील आणि बोलीतील मराठी शब्दांना दखनी साहित्यात प्रतिष्ठेचे स्थान मिळालेले आढळते.

दखनी भाषेतील वर्णव्यवस्था आणि उच्चारपद्धती यांचा साकल्याने विचार केला असता असे दिसून येते की, या भाषेत साहित्यनिर्मिती करणाऱ्या सूफी संतांनी अरबी-फारसी भाषांतून असलेल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार फारसी लिपीतील दखनी साहित्यातून केलेला असला तरी या भाषांची वर्णव्यवस्था आणि उच्चारपद्धती यांचा परिणाम या साहित्यिकांच्या दखनी भाषेवर झालेला नाही. अरबी-फारसी भाषांतील शब्द कोणत्याही प्रकारचा बदल न होता उर्दू भाषेत रूढ झाले आहेत. नागरी वर्णमालेत नसलेले वर्णोच्चार उर्दू भाषेत आले आहेत. दखनी भाषा या बाबतीत भिन्न असल्याकारणाने ती 'कदीम उर्दू' मानता येत नाही. तोच न्याय निराळ्या कारणास्तव हिंदी भाषेसही लावता येतो. त्यामुळे दखनी भाषा उर्दू भाषेची पुरातन अवस्था ठरत नाही आणि हिंदी भाषेची ती दाक्षिणात्य बोलीही मानता येत नाही असा निष्कर्ष निघतो. मराठी भाषेची उच्चारपद्धती आणि वर्णव्यवस्था दखनीने आत्मसात केलेली असल्याने दखनी भाषा महाराष्ट्रात उदयास आलेली मराठीची सहोदरा भाषा ठरते.

दखनी भाषेने केवळ उच्चारपद्धतीच्याच बाबतीत मराठी भाषेचे अनुसरण केले आहे असे नसून या भाषेशी व्याकरण- व्यवस्थादेखील मराठी भाषेच्या व्याकरणाशी बरीचशी समांतरच आहे.

संदर्भ

१. Blomfield, Language P. 465

Meriopein, Inrimalian to Languastics, P. 102

२. ऋतोऽत्। वररूची, प्राकृत प्रकाश, १-२७

३. ऐत् एत्। - प्राकृत प्रकाश, १-३५; औत् ओत् । तत्रैव १-४१

४. णोर्नः । हेमचंद्र ४. ३०६ ते ३०९

५. शषोर्सः । प्राकृत प्रकाश २. ४३

६. प्राकृत प्रकाश १.२७ ते ३०, हेमचंद्र १.१२६ ते १४०.

७. हेमचंद्र १-२६०.

८. प्राकृत प्रकाश ३-४०, प्राकृत कल्पतरू ३-१-३

९. प्राकृत कल्पतरू ३-१३-३, प्राकृत प्रकाश ३-४०

१०. हेमचंद्र २.१२६ वरील संस्कृत वृत्ती.

अनुक्रमणिका

१२. व्याकरणव्यवस्था

शब्द : सिद्ध आणि साधित

प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांतील शब्दही काहीही बदल न होता देशी भाषांत प्रचलित असले तरी त्यांची गणना तद्भव शब्दांतच होते. परभाषेतून आलेले शब्ददेखील एका दृष्टीने तद्भावच म्हणता येतील. कारण भाषा आपल्या ध्वनिव्यवस्थेनुसार परभाषेतील शब्द उच्चारत असते त्यामुळे असे शब्दही तद्भावच बनतात.

शब्दांच्या वर्गीकरणाची आणखीही एक पद्धती आहे. ती शब्दांच्या जडणघडणीवर अवलंबून असते. तद्नुसार सिद्ध आणि साधित असे शब्दांचे दोन वर्ग करता येतात. वर दिलेल्या तिन्ही वर्गातील शब्द ‘सिद्ध’ शब्दात समाविष्ट होतात. या शब्दांत काही बदल येऊन अथवा प्रत्यय लागून दुसरा शब्द बनतो ते साधित शब्द.

भाषेत मूळ वा सिद्ध अशा शब्दांची संख्या मर्यादितच असते. शब्दसंपत्तीत भर पडते ती साधित शब्दांच्या योगाने. साधित शब्द हे मूळ शब्दांवरून साधण्यात येत असतात. शब्दांच्या सर्वच जातीतल्या शब्दांवर आवश्यक संस्कार करून निराळा शब्द बनविण्यात येतो. उदाहरणार्थ. नामांवरून नामधातू होतात तशीच विशेषणेही साधण्यात येतात. ‘ढेप’ हे नाम, ‘ढेपाळणे’ हा धातू त्यावरून साधण्यात येतो. ‘पाय’ हे नाम, ‘पायाळू’ हा साधित शब्द विशेषणात मोडतो. तसेच धातूवरूनही नाम, विशेषण, अव्यय इत्यादी शब्दांच्या जाती सिद्ध करण्यात येत असतात. ‘जाणे’ हा धातू —या धातूवरून ‘जाणारा’ हे नाम/विशेषण साधण्यात येते, ‘गेलेला’ हे विशेषण या धातूच्या भूतकालवाचक रूपावरून साधण्यात आले आहे; ‘जाऊन’ हे धातुसाधित अव्ययही याच धातूवरून बनते; ‘जाणे’ हे नामही याच धातूचे साधित रूप.

शब्दसिद्धी मूळ शब्दास प्रत्यय, उपसर्ग वा अन्य विकार घडून होत असते. दोन वा अधिक शब्द एकत्र येऊन बनलेले सामासिक शब्ददेखील साधित शब्दांत समाविष्ट होतात. एकाच शब्दाची संपूर्ण वा अंशतः आवृत्ती होऊन झालेले शब्दही समासच होत. त्यांचीही गणना साधित शब्दांत होते.

मराठी भाषेप्रमाणेच दखनीतही निरनिराळ्या पद्धतीने शब्दसाधना होत असते. शब्द-साधनेसाठी योजण्यात येणारे उपसर्ग आणि प्रत्यय संस्कृत अपभ्रंशाच्या परंपरेतले असतात तसेच अरबी-फारसी प्रत्यय/ उपसर्ग लागूनही साधित शब्द होतात. कित्येकदा शब्द संस्कृत परंपरेतला तर प्रत्यय/उपसर्ग फारसी असे गंगाजमनी समासही होतात.हरदिन, हरघडी, ही अशा समासाची उदाहरणे. हररोज, रोजाना, बेमिसाल, बिलानागा अशा उदाहरणे दखनीत विपुल मिळतील.

दखनी भाषेतील सामासिक शब्दांचा लक्षात घेण्याजोगा विशेष असा की हे शब्द अरबी-फारसी शब्दांपासून साधण्यात आलेले असले तरीही त्यांचे मराठी भाषेतल्या समासाच्या धर्तीवर साधित रूप बनते. समासातील दोन शब्द जोडण्यासाठी फारसी समासात ‘इजाफत’ येत असते. दरबार-ए-आम, जुबान-ए-दकनी, अफसर-ए-आला याप्रमाणे. दखनीत इजाफतचा उपयोग होत नाही. इश्कशाह (इश्केशहाना), माशुकनाज (नाजेमाशूक), शाहदरबार (दरबारेशाह) इ. फारसी शब्दांचा उपयोग ज्या समासात होत नाही ते समासही संस्कृत भाषेतील समासांप्रमाणेच बनतात. सीसफूल, कंठमाल, इत्यादी.

समासासंबंधी संस्कृत भाषेत असलेल्या नियमांना वळसा घालून काही वैशिष्ट्यपूर्ण समास आधुनिक भाषांत बनतात तसेच ते दखनीतही होतात, अगदी मराठी समासांच्या धर्तीवर. काही उदाहरणांवरून या विशेषांची कल्पना येईल –

- **भालेकर :** (मालेकरी, मारेकरी या समासांच्या धर्तीवर)
  न जानों के भालेकर उनके हैं भार
  हरन है बेगडी करो संग शिकार ॥ तारी, ४.२४

- **घडमोड:** (मराठी- घडामोड)
  वाँ क्युँ बराबर हो सके घडमोड ना मेयार का । - अली, १४०

- **खनोखन :** (मराठी- खनोखनी)
  तिस चारों दिवारी में भर लगती खनोखन जब दिवे । - अली, १२२

- **घालमेल:** जमे थे सो बाजे हुए घालमेल । - अलीनामा, २०८

वरील समासांप्रमाणेच पुनरावृत्त व अंशपुनरावृत्त सामासिक शब्दही दखनीत रूढ आहेत: तळमळ, तडफड, झोडाझोड, ओडाओड (ओढाओढ), तगबगी (तगमग), चकमक, चरफड (चडफड), दानाँदान (दाणादाण), चळावळी (चळवळ), नेमानेम, रोमारोम इत्यादी.

दखनी साहित्यात नामधातू आहेत तशीच धातुसाधित नामेही : परगट्या (प्रगट झाला), चिन्त्या (चिंतिले), विचाऱ्या (विचार केला), चिताऱ्या (चित्रित केले), उपज्या (उपजला) अशी अनेक उदाहरणे देता येतील.

दखनीतील धातुसाधित नामे आणि विशेषणे जवळपास मराठीप्रमाणेच बनतात. ‘करणारा’, ‘देणारा’, ‘लिहिणारा’ या विशेषणांच्या धर्तीवर ‘हारा’ हा प्रत्यय लागून धातुसाधित नामे/ विशेषणे बनतात : पालनहार (पाळणारा), करनहार (करणारा), लिखनहार (लिहिणारा), बुझनहार (समझबुझ- समजणारा), धरणहार (धरणारा), अशी या प्रकारात बसणारी अनेक उदाहरणे देता येतील. वर्तमानकाळवाचक धातुसाधितापासून नाम/विशेषण सिद्ध करण्याच्या हेतूने मराठीत ‘णारा’ हा प्रत्यय लागतो तर दखनीत ‘हारा’.

संदर्भ –भेदानुसार वर्तमानकाळवाचक धातू अथवा नाम होऊ शकेल अशीही काही रूपे दखनीत येतात. पण, ती अपवादात्मक आहेत. उदाहरणार्थ : करन्त (करतो/करणारा), भणन्त (म्हणतो/म्हणणारा), डसन्त (डसतो/डसणारा). सिद्धांच्या संधा भाषेत अशी रूपे विपुल आहेत. या भाषेतला हा वारसा दखनीने थोड्याफार प्रमाणात पुढे चालविला आहे. मराठी भाषेतही थोड्याफार फरकाने असे प्रयोग रूढ आहेत : ‘बोलत बसला’, ‘चालत गेला’, ‘करत आला’ या उदाहरणांत मूळ धात्वार्थाचे साधित रूप बनते व साहाय्य धातूच्या योगाने क्रियार्थास पूर्णता येते.

मराठी भूतकालवाचक धातुसाधित विशेषणे ‘केलेला’, ‘गेलेला’, ‘राहिलेला’ अशी होतात. दखनीत मात्र क्रियापदाचे भूतकाळवाचक रूपच योजण्यात येते व वाक्यार्थाच्या संदर्भावरून ते क्रियापद आहे की

विशेषण याचा उलगडा होतो. उदा. किया काम (केलेले काम), दिया दाम (दिलेला दाम), धरी पीरत (धरलेली प्रीत), सुनी कीरत (ऐकलेली कीर्ती) इ.

अविकारी शब्द

वाक्यार्थाच्या संदर्भात शब्दांचा विचार करताना शब्दांचे आणखी दोन वर्ग मानावे लागतात : अविकारी आणि विकारी.

भाषेच्या ध्वनिव्यवस्थेस अनुसरून अर्थपूर्ण असलेल्या काही ध्वनीच्या समूहास शब्द ही संज्ञा देण्यात येते. शब्द मुळातच अर्थपूर्ण असतो. परंतु, वाक्यात शब्दांची योजना करताना काही शब्द जसेच्या तसे योजले जातात तर काही शब्दांना वाक्यार्थांच्या अभिव्यक्तीच्या दृष्टीने रुपसिद्धीच्या प्रक्रियेतून जावे लागते. केवळ अभिप्रेत अर्थाचे निदर्शक असलेले शब्द एकापुढे एक ठेऊन वाक्य तयार होत नाही आणि वक्त्याच्या मनातील अभिप्राय देखील स्पष्ट होत नाही. अर्थात श्रोत्यांपर्यंत मनोगत पोचविणे हे भाषाव्यवहारारचे मूळ उद्दिष्ट तेणेकरून सफळ होत नाही. हे उद्दिष्ट साधण्यासाठी वाक्यातील शब्दांचा परस्परांशी असणारा संबंध दर्शविणारे विकार वा प्रत्यय शब्दांना लावण्यात येतात. विकारी शब्द अशा 'रुपात' वाक्यात आला तरच वाक्य सार्थ होते आणि त्यातून अर्थनिष्पत्ती होऊ शकते.

भाषाव्यवहाराच्या मुलभूत घटक वाक्य असते. ते शब्दांनी बनते आणि विकारी शब्द योग्य त्या रुपात आले तरच शब्दसमूहांना वाक्य ही संज्ञा देता येते. विकार लागून वाक्यात आलेल्या शब्दाला 'पद' ही संज्ञा आहे. शब्दाचे पदात रुपांतर घडण्याची प्रक्रिया ही स्थूल मानाने व्याकरण-व्यवस्था या नावाने आपण ओळखतो. सर्वच शब्दांना या प्रक्रियेतून जावे लागते असे नाही. अविकारी शब्द वाक्यात कोणताही विकार न घडता योजले जातात. वाक्यार्थास तेणेकरून कोणत्याही प्रकारची बाधा येत नाही. विकारी शब्दांचे मात्र तसे नसते. इष्ट त्या विकारासह त्यांची रुपसिद्धी झाली नाही तर त्यांचा वाक्यात उपयोग करता येत नाही. विकारी शब्दांना वाक्याच्या संदर्भात अर्थपूर्ण ठरण्यासाठी लिंग, वचन, विभक्ती आणि आख्यात या विकारांच्या प्रक्रियेतून जावे लागते. लिंग आणि वचन या प्रक्रिया सर्वच विकारी शब्दांना समान असतात. तद्व्यतिरिक्त नाम आणि सर्वनाम यांना विभक्ति – व्यवस्था असते तर क्रियावाचक शब्दांना आख्याताच्या संस्कारातून गेल्यानंतरच वाक्यात स्थान मिळते. नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियावाचक शब्द अथवा धातू यांची गणना विकारी शब्दांत होते तर क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय यांचा समावेश अविकारी शब्दांत होतो.

परिचित असलेल्या ह्या मराठी व्याकरण-व्यवस्थेच्याच आधाराने दखनी भाषेच्या व्याकरण-व्यवस्थेचा शोध आपण घेणार आहोत. मराठी व्याकरणाशी न जुळणारे जे जे विशेष दखनी व्याकरण-व्यवस्थेत आढळतील त्यांचा उल्लेख त्या त्या संदर्भात करण्यात येईल.

प्रथम अविकारी शब्द विचारात घेऊ. क्रियाविशेषण व अव्यय या दोहोंचा समावेश या वर्गात होतो. क्रियाविशेषण तसे अव्ययच. तथापि, क्रियेच्या स्थलकालाचा बोध त्यावरून होतो म्हणून त्यास क्रियाविशेषण म्हणावयाचे. हा वर्ग अविकारी असल्याने तो वाक्यार्थाच्या दृष्टीने कमी महत्वाचा असतो असे समजण्याचे कारण नाही. सावकाश, ताबडतोब, अवचट, अचानक, हळू, नावेक, टुक, अदांतरी यांसारख्या शब्दांच्या द्वारे क्रियेची पद्धती, रीत इत्यादिकांचा बोध होतो म्हणून त्यास क्रियाविशेषण म्हणावयाचे –

अनुक्रमणिका

● *आय चांद **बेगी** देख ले तीस बीच आपस दीदार आज – अली, १०७*
● *जाया ते फिर आने **दिरंग** लाया न अनिवार का –अली, १२१*
क्रियेच्या स्थल – कालांचे निदर्शनही कित्येक अव्ययांवरून होत असते –
● *इष्क **कधीं** साहेब **कधीं** गुलाम – सब, ७८.*
● *जिसकूं दर्शन **इत** है, तिस कूं दर्शन उत*
*जिसकूं इत दर्शन नई, तिस कूँ **इत** ना **उत**– सब १७०*

काही सामासिक शब्दांचाही उपयोग अव्ययांसारखा होतो. अशा समासास मराठी भाषेत अव्ययीभाव समास ही संज्ञा आहे –

● *उसकी मारिफत **ठावेठाव**–सब, १*

काटाकाट, मारामारी, झोडाझोड, घरेघर, जागाजागा यांसारखे समास याच प्रकारात मोडतात. क्रियेची अवस्था दर्शविणारीही काही अव्यये असतात :

● *इता मार चौढल हुए **जैतलग***
*रहेगा तूं वहां उहा **कौतलग** ॥ -तारी, २०.*

क्रियेशी अप्रत्यक्ष संबंध असणारे निषेधात्मक वा अवधारणाबोधक शब्द या नात्यानेही अव्ययांचा उपयोग होत असतो –

● *हिरस गुस्से का सांगात कर **मत**–मनस, ३*
● *अरे मन **नको** रे **नको** हो दिवाना –मनस, १०*

दखनीत आलेला मराठी 'च' आणि ग्रामीण मराठीतील 'बी' यांचा समावेश याच वर्गात होतो. काही धातुसाधितेही अव्ययासारखी योजली जातात. देखत, करत, पावत, कलाकर इ.

उभयान्वयी व शब्दयोगी हे अव्ययांचे मान्यता पावलेले प्रकार. त्यांपैकी उभयान्वयीचे कार्य (उदाहरणार्थ – होर, पर, पन, व,या, अथवा) मर्यादित असते. दोन शब्द वा वाक्यांश जोडण्याचे कार्य ही अव्यये करतात. शब्दयोगी अव्ययांचे क्षेत्र मात्र त्या मानाने व्यापक असते. वाक्यातील एका शब्दाचा दुसऱ्या शब्दाशी संबंध जोडण्याचे कार्य ही अव्यये करतात. विभक्ती-प्रत्ययांच्या योगानेही हे कार्य होत असते. म्हणूनच कित्येक विभक्ती – प्रत्ययांच्या जागी अव्ययांचा उपयोग होत असतो. संस्कृत भाषेतही शब्दयोगी अव्ययांचा असा उपयोग होत असतो, परंतु तो विभक्त्यंत नामांबरोबर होत असतो. इतकेच नव्हे तर कोणत्या विभक्तीचे प्रत्यय कोणत्या अव्ययांपूर्वी असले पाहिजेत याचीही नोंद व्याकरणकारांनी केली आहे- 'तस्य कृते' कृते या अव्ययाचा उपयोग वाक्यांत षष्ठ्यंत नामांबरोबर होतो- 'मय विना' विना हे अव्यय तृतीयांत नामासह येते इ.

विभक्ती प्रत्ययाचे कार्य करणारी अव्यये

प्राकृत भाषेत विभक्ती-व्यवस्था संस्कृत भाषेइतकी काटेकोर राहिली नाही. चतुर्थी विभक्तीचा लोप झाला आणि तिचे कार्य षष्ठीच्या द्वारे होऊ लागले. काही विभक्तींच्या कार्यात फेरबदल झाले तर कित्येक विभक्ती –प्रत्यंयात एकविधता निर्माण होऊ लागली. त्यामुळे निश्चित विभक्त्यर्थ दर्शविण्यासाठी अव्ययांचा उपयोग मोठ्या प्रमाणात सुरु झाला. या प्रवृतीचे संस्कार प्राचीन मराठी वाङ्मयातील भाषेवरही झालेले आहेत. एकाच सांस्कृतिक आणि भाषिक वातावरणात दखनी –मराठीचा विकास झालेला असल्याने विभक्ति-निदर्शक अव्ययांचा उपयोग दखनीतही रूढ झाला.

- *जो तुज **कारणें** जगत सब किया – लैला, ५१*
- *दिया जीव शेरीन के **कारणें**–कुमु, ४५.*

प्रसंगी अव्ययांनाही विभक्तिप्रत्यय लागू लागले –

- तेरे करतल करते ते मैं चुप हुई बदनाम
  मैं **म्याने** उट गई तूं जाने तेरा काम – सब, १६२
- जब ते झलक देख्या आडक सूरज तरी तरबार का – अली, ५८

वर दिलेल्या उदाहरणांत अरबी-फारसी भाषांतून आलेली अव्यये दिसत नाहीत याचा अर्थ दखनी भाषेत या परभाषांतून अव्ययांची आयात झाली नाही असा नव्हे.अरबी-फारसी भाषांतील बरीच अव्यये दखनीत रूढ आहेत. 'व' हे उभयान्वयी अव्यय मुळात फारसी आहे. दखनीतील 'के' आणि मराठीतील 'की' हेही असेच अरबी-फारसी भाषांतून आले आहेत. 'अगर' आणि 'बिगर' ही दखनी भाषेत व ग्रामीण मराठीत प्रचलित असलेली अव्यये याच परभाषांतून आलेली आहेत. उदा.

- ***बादज*** होय उस तन नास
- *मछली **दायम** जल मे बसती.*
- ***हमेशा** ताबा उस मुं सब जहाँ था ।*

अव्ययांचे काही विशेष

काही महत्त्वाचा अव्ययांची सूची परिशिष्टात दिली आहे. या सूचीवरून मराठी व दखनी अव्ययांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल. या अभ्यासातून दखनी भाषेतील अव्ययांसंबंधी पुढील निष्कर्ष निघतात-

१. तेराव्या शतकातील मराठी साहित्यात रूढ असलेली व सध्या फारशी प्रचारात नसलेली मराठी अव्यये दखनी साहित्यात आढळतात. उदाहरणार्थ, अवासवा (ज्ञा. १-१२५-अव्हासवा), ऐलाड (ज्ञा. ६-१९१), पैलाड (ज्ञा. ६-२६९) इ.

२. एके काळी साहित्यात रूढ असलेली व वर्तमान मराठी बोलींनी जतन करून ठेवलेली अव्ययेही दखनी साहित्यात रूढ आहेत. उदाहरणार्थ, झुंझुरके, लई, बेगी, टुक (क्षणभर), अलादी, बी इ.

अनुक्रमणिका

आजच्या मराठी साहित्यात न आढळणारी ही अव्यये दखनी साहित्यात प्रचलित होती याचा अर्थ एकतर त्याकाळी तरी ती ग्रामीण गणली जात नसावीत अथवा ग्रामीण मराठी शब्दांचा वापर अगदी सहजगत्या दखनी साहित्यात झाला असावा.

३. 'ऐलाड', 'पैलाड', 'आपसे आपे' (आपैसें) यांसारखी अव्यये प्राचीन मराठीप्रमाणेच प्राकृत भाषेतील साहित्यातही रूढ होती. दखनीच्या विकासकाळात प्राकृतभाषा जवळपास इतिहासजमा झालेली असल्याने अशी अव्यये दखनीचे उगमस्थान असलेल्या 'संधा भाषात' रूढ असावीत किंवा मराठी भाषेच्या द्वारे त्यांना दखनी भाषेत प्रवेश मिळालेला असावा. ग्रामीण मराठीचाही तो प्रभाव असण्याचा संभव आहे.

४. दखनी साहित्यात येणाऱ्या 'जे' ('की' या अर्थाने) या अव्ययाचा विचार विशेषकरून केला पाहिजे. वर्तमान मराठीत हे अव्यय इतिहासजमा झालेले असून त्याची जागा फारसी 'की' ने घेतली आहे. संस्कृत 'यत्' या अव्ययाचा 'जे' हा मराठी अपभ्रंश आहे. इंग्रजी भाषेच्या व्याकरणाच्या परिभाषेत सांगावयाचे झाल्यास 'Direct form' योजताना प्रारंभी 'जे' हे अव्यय योजले जाते. उदाहरणार्थ,

तोखोनि मज देआवें । पसायदान हें —
जे खळांची व्यंकटी सांडो । तेया सत्कर्मीं रती वाढो -
-ज्ञानेश्वरी, १८-१७७२-७३

वरील ओव्यांत 'जे' चा उपयोग याच अर्थाने आला आहे. सभासदाच्या बखरीत देखील —

'चरित्र लेहून देणें म्हणोन आज्ञा केली, त्यावरून वर्तमान ऐसी जे...' 'आज्ञापत्रा' तही असा उल्लेख येतो. प्रारंभी हे अव्यय योजण्यात आले आहे — 'राजश्री रामचंद्रपंडित अमात्य हुकूमत पन्हा यासी आज्ञा जाली यैसी जे...' भौसाहेबांच्या बखरीत मात्र 'जे' च्या ऐवजी 'की' सर्वत्र आढळते.

दखनी साहित्यात 'जे' या अव्ययाचा उपयोग विपुल प्रमाणात आढळतो. परवर्ती हिंदी व उर्दू भाषांत या अव्ययाचा उपयोग होत नाही हे या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे. उदा.

- लिखूं जे फतेह अलम में फलक तूमार को तिसके — अली. १७४. *

अब्दुलकृत 'इब्राहीमनामा' या काव्यात 'जे' हे अव्यय 'जो' च्या रुपात येते असे या काव्याचे संपादक श्री. देविसिंग चौहान यांचे मत आहे. या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनी पुढील, पंक्ती उद्धृत केलेल्या आहेत-

- *बूझ्या कंही उस सुतर का जो भाव । - इब्रा, ११*
- *इकायक निकल्यां जो उस दौरकर — इब्रा, ६५७, इब्रा, प्रस्ता. ११७*

तथापी संदर्भ लक्षात घेता हे मत कितपत ग्राह्य मानावयाचे हा प्रश्न पडतो.

५. 'च' हे अव्ययदेखील दखनीने मराठी भाषेतून उचलले आहे. या भाषेच्या परंपरेवर हक्क सांगणाऱ्या हिंदी व उर्दू या भाषांत हे अव्यय नाही. 'च' प्रमाणेच 'पन' (पण) दखनीत पदोपदी आढळेल-

● *पन इसके दिल में था खान का सक्त धाक । - तारी, १-२६.*

६. आजच्या ग्रामीण मराठीत प्रचलित असलेल्या अव्ययांचा आढळ दखनीत साहित्यात घडतो हे दखनी –मराठीच्या संदर्भात निकट संबंधांच्या दृष्टीने विशेषेकरून लक्षात ठेवण्यासारखे आहे. झुंझुरके, लई, बेगी यांसारखी मराठी अव्यये दखनी साहित्याने जपून ठेवली आहेत-

● *अवल बेग जा पाँव पडते तई । -कुमु, १०*
● *लिख्या नामां बेगी कर अस धातसों ।-मस्त, २३*
● *हुई जो सबा झुंजुरकेच ऊट । -तोती, १०९*

आजच्या मराठी शुद्धलेखनाच्या नियमांप्रमाणे 'कधी' या अव्ययातील 'धी' वरचा अनुस्वार उडालेला असला तरी दखनीत तो लेखनात आणि उच्चारातही कायम आहे

● *कधीं रात हो तो कधीं दीस । - कुमु, ३.*

कधीशी समांतर असलेली 'जधी', व 'जेधवाँ' ही अव्ययेदेखील दखनीत सानुस्वार उच्चारण्यात व लिहिण्यातही येतात. आज अनुच्चारित वाटणारे अनुस्वार कधी काळी पूर्णपणे उच्चारले जात होते म्हणूनच प्राचीन मराठीच्या लेखनात त्यांचा समावेश झालेला होता. दखनीने मराठीतून घेतलेले हे व अन्य शब्द मात्र सानुस्वारच कायम ठेवले आहेत.

दखनी अव्ययांचा समग्रतेने विचार केला असता या क्षेत्रातही मराठी भाषेतून बरीच उसनवारी झालेली आहे असे प्रत्ययास येते. वाक्यात वारंवार येणारी मराठी वळणाची अव्यये दखनी – मराठीचे जिव्हाळ्याचे संबंध परिपुष्ट करणारी आहेत.

विकारी शब्दांची रुपसिद्धी

नाम, सर्वनाम, विशेषण, आणि क्रियावाचक शब्द अथवा धातू या विकारी शब्दांच्या चार प्रकारांचे मात्र तसे नाही. हे शब्द वाक्यात प्रयुक्त होण्यापूर्वी वाक्यार्थाच्या संदर्भात त्यांचे 'पद' होताना त्यांना कोणत्या ना कोणत्या विकाराच्या प्रक्रियेतून जावेच लागते. पुरुष, वाचन आणि लिंगभेद हे या चारही प्रकारांना घडणारे समान विकार आहेत. त्याशिवाय नामादिकांना विभक्ति- प्रत्यय लागतात तर धातूंना आख्यात – प्रत्यय लावल्या वाचून अर्थास पूर्णता येत नाही. या सर्व प्रकारच्या विकारांचा म्हणजे रुपसिद्धीचा विचार या स्थळी करावयाचा आहे.

श्रोता आणि वक्ता यांच्या अनुसंधानाने वक्ता हा प्रथम पुरुषी असतो तर श्रोता द्वितीय पुरुषी. तदितरांची गणना तृतीय पुरुषात करण्यात येते. सामान्यतः सर्वनामांवरून प्रत्यक्ष वा अध्याह्यत पुरुष-भेद निर्धारित करता येतात. क्रियापदाच्या रूपातही पुरुषभेद दर्शविण्याची क्षमता असते. वचनभेद सर्व विकारी शब्दांना समान असतात असे आपण मानत असलो तरी विशेषणाचा अपवाद त्यास करावा लागतो. कारण, सर्वच विशेषणांवरून लिंगभेद आणि वचनभेद स्पष्ट होईलच याची शाश्वती नसते. क्रियापदांच्या बाबतीत

देखील लिंगभेदाचा अपवाद मानावा लागेल. कारण, सर्वच आख्यातातील क्रियापदावरून कर्त्याच्या लिंगभेदाची कल्पना येईलच असे नाही.

(अ) नाम

वाक्यात उपयोगात येण्यापूर्वी नामांना पुढील विकारांच्या प्रक्रियेतून जावे लागते. पुरुष, वचन, लिंग आणि विभक्ती. सर्वनामांनाही हेच विकार होत असतात. नाम आणि सर्वनाम यांना एक वचन असते तसेच अनेक वचन. संस्कृत भाषेत असलेले द्विवचन प्राकृतातच लुप्त झाले; त्यामुळे आधुनिक भारतीय भाषांच्या संदर्भात द्विवचन विचारात घेण्याचे कारण नाही. मराठी भाषेत पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग अशी तीन लिंगे आहेत. दखनी भाषेत मात्र नपुंसक लिंगाचा अभाव आहे, प्राकृत भाषांच्या विकासकाळातच नपुंसकलिंगाचा लोप होत चाललेला होता असे विद्वानांचे मत आहे. [१] या प्रवृतीचा अखेरचा टप्पा दखनी भाषेने गाठला आहे. या भाषेत नपुंसकलिंगाचा पूर्णतया लोप झालेला आहे. मूळ नाम तृतीय पुरुषीच असते, तसेच एकवचनी. काही नामे मूलतः स्त्रीलिंगी वा पुलिंगी असतात. पुलिंगी नामांना विशिष्ट प्रत्यय लावून त्याचे स्त्रीलिंगी रूप मराठी प्रमाणेच दखनीतही होत असते.

दखनीच्या संदर्भात वचन विचार निराळ्या स्तरावरून करावा लागतो. एकवचनी नामाचे अनेकवचनी रूप करण्याची प्रत्येक भाषेची स्वतःची अशी पद्धती आहे. तशी ती दखनी भाषेतही आढळते. परंतु याशिवाय मराठी आणि फारसी या दोन भाषांत प्रचलित असलेल्या पद्धतीप्रमाणेही दखनी नामांचे अनेकवचन होत असते. तुलनात्मकदृष्ट्या विचार केला तर फारसी पद्धतीने होणाऱ्या अनेक वचनांची उदाहरणे अगदी अपवादात्मक आढळतात. उदाहरणार्थ फौज (ए.व.), अफवाज (अ.व.), लफ्ज (ए.व.), अल्फाज (अ.व.)

मराठी शब्दांची अनेक वचन करण्याची पद्धती मात्र मोठ्या प्रमाणात दिसून येते. उदाहरणार्थ –

- खड्ग हल रहे जब भाले पडे। -भाला (ए.व.) – भाले (अ.व.)
- धडक आग उटी जल दंटाले पडे।। - दंटाला (ए.व.) –दंटाले (अ.व.)
- जो थे कोटपर बान भांडे पडे ।। - भांडा (ए.व.) –भांडे (अ.व.)

अनेक वचनाचा ‘आँ’ प्रत्यय

दखनी भाषेची स्वतःची पद्धती म्हणजे एकवचनी नामास ‘आँ’ प्रत्यय लावून अनेक वचन साधणे. उदा- सकी-सकीयाँ, उंदर-उंदराँ, लोक-लोकाँ, आदमी-आदमियाँ, तोंड-तोंडाँ, सुंड-सुंडाँ, धड-धडाँ, दिल-दिलाँ इ.

अनेक वचनाचा निदर्शक ‘आँ’ प्रत्ययाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न अनेक विद्वानांनी केला आहे. फारसी भाषेतून हा प्रत्यय आला असावा असे एक मत आहे तर संस्कृत भाषेतील नपुंसकलिंगी नामांस प्रथमा व द्वितीया विभक्तीस लागणाऱ्या ‘आनि’ या प्रत्ययापासून तो आला असावा असे दुसरे मत आहे. संस्कृत भाषेतील नामांना लागणाऱ्या षष्ठीच्या ‘नाम्’ प्रत्ययात ‘आँ’ चे मूळ आहे असेही एक मत श्री. देविसिंग चौहान यांनी मांडले आहे.

माझ्या मते 'आँ' हा अनेक वचनाचा निदर्शक असलेला प्रत्यय मराठी भाषेतूनच दखनीत आलेला असावा. मराठी भाषेत निरनिराळ्या विभक्तीत नाम चालताना अनेक वचनांत अनुस्वार अपरिहार्यपणे येत असतो. उदा- लोकांना, स्त्रियांचे, खेळांना, माणसांतून, देवांसाठी, शत्रूंकरिता इ. या उदाहरणांत विभक्तिप्रत्यय व विभक्ती-वाचक अव्यय लागण्यापूर्वी अनेकवचनी रूप अनुस्वार देऊन झाले आहे. अकारांत नामांना तर 'आँ' हाच अनेकवचनी प्रत्यय लागेला दिसून येईल. हाच प्रत्यय पुढील दखनी नामांच्या अनेक वचनांतही आढळेल – लोकाँ, बाइकाँ, खेळाँ, आदमियाँ, दुश्मनाँ, अछरियाँ (अप्सरा) इ.

अनेकवचन आणि विभक्ति-प्रत्यय यांच्या सूत्रांच्या आधाराने थोडे मागे जाऊ या. संस्कृत भाषेतील विभक्ती-व्यवस्था प्राकृत भाषेने जशीच्या तशी स्वीकारली नाही. या व्यवस्थेत बरीच पडझड झाली. प्रथम चतुर्थी विभक्तीचा लोप झाला. या विभक्तीचे कार्य षष्ठीच्या प्रत्ययाने होऊ लागले. [२] काही विभक्तींचा उपयोग परस्परांसाठी होऊ लागला. उदा. द्वितीयेसाठी षष्ठी, तृतीयेसाठी पंचमी, सप्तमीसाठी द्वितीया इत्यादी. [३] त्यामुळे विभक्ति प्रत्ययांची विविधता कमी झाली आणि अनेक विभक्तींच्या प्रत्ययांत एकविधता येऊ लागली. यादवकालीन मराठीतही याच प्रवृत्तीचे दर्शन घडते. उदाहरणार्थ-

डोळां हे तृतीयेचे एकवचन आहे तसेच सप्तमीचे.

तेया हे रूप संदर्भ –भेदाने द्वितीया, चतुर्थी, आणि षष्ठी यांपैकी कोणत्याही विभक्तीचे असू शकते. याच प्रक्रियेतून पुढे सामान्य रूपाचा उद्भव झाला आणि नामाचे सामान्यरूप झाल्यावर त्या रुपास विभक्तिप्रत्यय लागू लागेल. विभक्तिप्रत्यय निदर्शक अव्यये देखील सामान्य रुपासच जोडण्यात येऊ लागली. या घडामोडीत अनेकवचनाचा निदर्शक 'आँ' हा प्रत्यय मात्र टिकून राहिला. 'लोकांपासाव', 'लोकांतव', 'लोकांही' या विभक्त्यंत नामांत तो आढळेल. इतिहासाचार्य राजवाडे यांनी या 'आँ' प्रत्ययाची व्युत्पत्ती संस्कृत भाषेतील द्वितीयेच्या बहुवचनाच्या 'आन्' या प्रत्ययापासून साधली आहे.[४] कोणत्या संस्कृत प्रत्ययापासून मराठीत 'आं' हा प्रत्यय आला आहे यास विशेष महत्त्व नाही. त्याचे अस्तित्व आपल्या दृष्टीने लक्षात घेण्याजोगे आहे. यादवकालाप्रमाणेच वर्तमान मराठीतही नामांना त्या त्या विभक्तीचे अनेकवचनी प्रत्यय लागण्यापूर्वी 'आं' हा प्रत्यय लागतो.

	मराठी	**दखनी**
साप-	सापांना	सापाँ
माली-	माळ्यांना	मालियाँ
सखी-	सख्यांही	सकियाँ
बायको-	बायकांना	बाइकाँ
सई -	सयांपासून	सयाँ

वरील उदाहरणांत आणखीही वाढ करता येण्यासारखी आहे. अनेकवचनी विभक्यंत नामांत अपरिहार्यपणे येणारा 'आं' प्रत्यय हेच दखनी भाषेतील अनेकवचनाच्या 'आँ' या प्रत्ययाचे मूळ आहे हे या उदाहरणांवरून स्पष्ट होईल. त्यामुळे 'आँ' प्रत्यय लागून होणारे अनेकवचन ही दखनी भाषेची वैशिष्ट्यपूर्ण लकब असली तरी तो मराठी भाषेच्या साहचर्याचा प्रभाव आहे असा निष्कर्ष निघतो.

विभक्तिव्यवस्था

नामांना होणारे लिंग व पुरुष हे दोन्ही विकार विशेष गुंतागुंतीचे नाहीत. दखनी भाषेतील विभक्ति-व्यवस्था मात्र संस्कृत, प्राकृत आणि मराठी या भाषांतील विभक्ति-परंपरेच्या आधाराने समजून घेतली तरच या व्यवस्थेची समाधानकारक उकल होऊ शकते.

आधुनिक भारतीय भाषांतील विभक्तिविषयक विचार प्रामुख्याने संस्कृत भाषेतील विभक्ती-व्यवस्था प्रमाण मानून होत असतो. संस्कृत भाषेतील विभक्ती आधुनिक भाषांत जशाच्या तशा स्वरुपात आल्या आहेत हा एक गैरसमज आहे. संस्कृत भाषेत विभक्तिप्रत्यय व त्यांची संख्या अगदी साचेबंद आहे. कारणे कोणतीही असोत ही साचेबंद व्यवस्था प्राकृत भाषांत आढळत नाही. निरनिराळ्या प्रांतात बोलींच्या रूपाने प्रथम नांदणाऱ्या भाषा कालांतराने साहित्याच्या भाषा बनल्या व या भाषांतून साहित्यनिर्मिती होऊ लागली. या घडामोडीत व्याकरणाच्या बाबतीत संस्कृत भाषेच्या व्याकरणाचे तंतोतंत अनुसरण न करता प्राकृत भाषांनी आपल्या परीने बरेच स्वातंत्र्य घेतले. विभक्ति-व्यवस्थेच्या संदर्भात प्राकृत भाषांनी काही निश्चित नियम पाळले असतील ही अपेक्षा व्यर्थ ठरते. प्राकृत भाषांनी नेमके कोणत्या बाबतीत संस्कृत व्याकरणाचे अनुसरण केले नाही याचे स्थूल दिग्दर्शन मात्र करता येते.

पहिली बाब विभक्तींच्या संख्येचा संकोच. प्राकृतात चतुर्थीचा लोप झाला हे पूर्वी नमूद करण्यात आले आहे. षष्ठीने चतुर्थीचे कार्य साधण्यात येते हा उल्लेखही अगोदर येऊन गेला आहे. सर्व प्राकृत व्याकरणकार या दोहोंच्या बाबतीत एकच मत मांडतात.[५]

प्रत्ययच लक्षात घ्यावयाचे ठरले तर प्रथमा आणि द्वितीया या दोन्ही विभक्ती बाद कराव्या लागतात. कारण, या दोन्ही विभक्तींना प्राकृतात प्रत्यय नाहीत.[६] (मराठीत — ही प्रथमा आणि 'अपप्रत्यय' द्वितीया प्रत्ययविहीन आढळतात तो प्राकृताचाच प्रभाव म्हणता येईल). प्राकृतात षष्ठीचा लोप झालेला नसला तरी या विभक्तीच्या प्रत्ययांच्या ऐवजी अव्ययांचा प्रयोग प्राकृतात वाढला असे हेमचंद्र सांगतो. [७] अशा रीतीने चतुर्थीचा मुळातच लोप, प्रथमा व द्वितीया प्रत्ययहीन आणि मध्यम मार्गाने चालणारी षष्ठी हे सर्व लक्षात घेतले असता प्राकृतात विभक्तींच्या संख्येत घट झाली या निर्णयावर यावे लागते.

विभक्ति-प्रत्ययांच्या विविधतेस लागलेली ओहोटी आणि काही विभक्तींच्या कार्यांची अन्य विभक्तींनी घेतलेली जागा या बाबी जमेस धरल्या तर ही घट आणखी वाढते. यादवकालीन मराठीतही निरनिराळ्या विभक्तींच्या प्रत्ययांत एकविधता निर्माण होत चालली होती. द्वितीया, चतुर्थी आणि षष्ठी या विभक्तींत येणारी नामे बरीच सारखी आहेत. आठव्या शतकातील सरहपाकृत दोहाकोश आणि दहाव्या शतकातील 'लीलावई कहा' या प्राकृत ग्रंथादेखील हीच अवस्था असल्याचा अभिप्राय या ग्रंथांचे संपादक अनुक्रमे पं. राहुल संकृत्यायन आणि डॉ. अ.ना.उपाध्ये यांनी व्यक्त केला आहे. विभक्तींच्या कार्यात होणारी अदलाबदल तर प्राकृत व्याकरणकारांनी वैध ठरविली आहे.[८]

विभक्ती आणि त्यांचे प्रत्यय यांसंबंधीची ही अनिश्चितता आणि काही बाबतीत अनियमितता लक्षात घेऊन दखनी भाषेतील विभक्ती आणि यांचे प्रत्यय यांचा शोध न घेता विभक्तिविषयक कार्याचा मागोवा घेऊन तदनुषंगाने प्रत्ययांचा शोध घेणे अधिक लाभप्रद ठरेल. विभक्तीचे कार्य द्विविध असते- वाक्यातील नामांचा क्रियापदाशी असलेला संबंध दर्शविणे- यालाच कारकविभक्ती म्हणतात आणि वाक्यातील नामांचा इतर

शब्दांशी असलेला संबंध प्रस्थापित करणे – याला उपपदविभक्ती अशी संज्ञा आहे. उपपदविभक्तीचे कार्य मर्यादित नसते. त्या मानाने कारक-विभक्तीच्या कार्यास मर्यादा आहेत. शिवाय वाक्य –व्यवस्थेच्या दृष्टीने कारक-विभक्ती निर्णायकही असते. म्हणून दखनी भाषेतील कारक-विभक्ती आणि त्यांचे प्रत्यय यांचा मागोवा घेणे श्रेयस्कर ठरेल.

कारक विभक्ती सहा मानलेल्या आहेत. म्हणजे नामांचा क्रियापदाशी असलेला संबंध सहा प्रकारचा असतो. 'प्राधान्येन व्यापदेशः' या न्यायाने या सहा कारकांशी सहा विभक्ती प्राधान्याने निगडित झालेल्या आहेत. हे सहा कारक असे –

कर्ता - प्रथमा विभक्ती; **कर्म** – द्वितीया विभक्ती; **करण**- तृतीया
संप्रदान- चतुर्थी; **अपादान**- पंचमी; **अधिकरण**– सप्तमी.

या सहांव्यतिरिक्त **संबंध** या उपपदविभक्तीचा ही विचार पुढे आला आहे. **संबंध** हा प्राधान्याने षष्ठी विभक्तीच्या कार्याचा भाग असून,षष्ठयंत नामे इतर नामांशी (क्रियापदाशी नव्हे) –असलेला संबंध दर्शवितात. षष्ठ्यंत नामांचा प्रयोग वाक्यात मोठ्या प्रमाणात होत असल्याने कारक नसतानाही या विभक्तीचा समावेश विभक्तिविवरणात करण्यात येत असतो.

कर्ता :दखनी भाषेतील वाक्यरचना सामान्यपणे कर्तृप्रधान असते. मराठी भाषेप्रमाणेच दखनीतही कर्ता प्रत्ययविरहित असतो अथवा 'ने' प्रत्ययांत –म्हणजे मराठी व्याकरणाच्या परिभाषेप्रमाणे तृतीयांत. मराठी वाक्यात क्रियापद सकर्मक असल्यास ते भूतकाळी आणि विध्यर्थी असेल तरच कर्ता 'ने' प्रत्ययांत असतो. अकर्मक क्रियापदाचा कर्ता भूतकाळी प्रथमांत असतो तर विध्यर्थी तो विकल्पाने प्रथमांत वा तृतीयांत होतो. दखनी भाषेतील वाक्यात कर्त्याची विभक्ती आणि क्रियापदाचा काळ व अर्थ यांचा संबंध मराठी भाषेप्रमाणे राहीलच याची खात्री देता येत नाही. वाक्य- व्यवस्थेच्या संबंधात या बाबीचा अधिक विचार पुढे होणार आहे. या ठिकाणी एवढेच लक्षात ठेवले पाहिजे की, दखनी भाषेतील वाक्यात कर्ता प्रथमांत म्हणजे प्रत्ययहीन असतो तसाच 'ने' प्रत्ययांत. क्रियापदाचा काळ व अर्थ लक्षात न घेता 'ने' प्रत्ययांत कर्ता योजण्याची प्रवृत्ती या भाषेत मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे दखनीत कर्तृप्रधान वाक्यरचना वा कर्तरिप्रयोग मोठ्या प्रमाणात आढळतो. उदा- 'मैं काम कऱ्या' ; 'उने आया'; लैलाने रास्ता पकडी' असे प्रयोग दखनीत विपुल प्रमाणात आढळतील.

कर्म :कर्मस्थानी असलेले नाम एकतर प्रत्ययविरहित असते अथवा त्यास कुं/कूं हे प्रत्यय लागतात.

करण: तृतीय विभक्तीच्या अनेक कार्यापैकी करण हे एक. क्रियेचे साधन या दृष्टीने येणारे नाम सामान्यपणे सुं, सूं, सो, थी, तई या प्रत्ययांनी युक्त असते.नें, एं (ए.व.) व एही, ही (अ.व.) हे देखील तृतीयेचेच प्रत्यय. परंतु ते प्राधान्याने कर्तृत्ववाचक आहेत. 'ने' हा प्रत्यय मराठीत आहे तसाच तो हिंदी-उर्दू भाषांतही तृतीयेचा प्रत्यय आहे. परंतु एं (ए.व.) आणि एहीं व हीं (अ.व.) हे प्रत्यय मात्र हिंदी-उर्दूत नाहीत. मराठी भाषेतील हे प्रत्यय दखनीत आहेत. दखनीत ते मराठी भाषेतून आलेले आहेत हे उघड आहे. तृतीयेचे अन्य प्रत्यय (सुं, सूं, सो, थी, तई) मात्र संधा भाषेतून दखनीने उचलले आहेत.

अनुक्रमणिका

- *कदम दर कदम मुहक में उन सुं पैठ —तारी,८*
- *इसी डरसुं जंगल फिरे ले परान —तारी, ६१*
- *बारा बारे की वजासुं दिसता है —सब, ७*

'ही' आणि 'एही' या प्रत्ययांना गाथासप्तशतीच्या काळाइतकी पुरातन परंपरा आहे 'जेंही' (गास. १६), 'तेहीं' (गास. १-५२) ही पदे गाथासप्तशतीत आढळतात:

- तूं हीं तुज थे जगत सब कऱ्या
  तूंहीं रूप अलम में अपना भऱ्या ॥

संप्रदान :संप्रदान हे चतुर्थी विभक्तीचे कारक आहे. संप्रदानार्थी येणारे कुं, कूं, कों, हे प्रत्यय दखनीने संधाभाषेतून ग्रहण केले आहेत-

- कीं दारा कूं आ शाह औरंग सुं- तारी, २८

अपादान : या कारकाचे निदर्शन करणारे 'से ती' आणि 'सुन्तो' हे प्रत्यय प्राकृतातील पंचमी विभक्तीच्या प्रत्ययावरून आले आहेत. प्राकृत भाषेप्रमाणेच दखनीतही तृतीयेचा उपयोग पंचमीसाठी होत असतो; तद्नुसार वरील प्रत्ययांबरोबरच ए, एं, एही हे प्रत्ययही अपादान या कारकाच्या निदर्शनासाठी नामांना लागतात. शिवाय, ते, ये, यें, ओं, सुं हेही आपादानवाचक प्रत्यय रूढ आहेत. संधाभाषा, हे या प्रत्ययांचे उगमस्थान आहे.

- *कह्या सोंच सन्मुकते गाडे निकाल — तारी, २१*
- *न भलेतें डरेगा न बुरेतें डरेगा — सब, ७६*
- *तेरे होरे के रतन थें सुन्या हूँ बात सही —मानी, ८१*
- *तूना नांव दिल थे सबी याद दिल थे धूत — मानी, ७४*
- *मुंज जीव की आरजूं को बदे मो सीते पिया-मानी, ६६*

अधिकरण : हे सप्तमी विभक्तीचे कारक. इं, ए, एं,एहिं, हि, हिं, में हे या विभक्तीचे प्रत्यय. या प्रत्ययांत प्राचीन मराठी वाङ्मयात आढळून येणाऱ्या सप्तमी, पंचमी आणि तृतीया या विभक्तींच्या प्रत्ययांची सरमिसळ झालेली दिसून येईल. संधा भाषेत रूढ असलेले 'मने' वा 'म्याने' यांसारखे शब्दही सप्तमीच्या अर्थाने रूढ आहेत.

संबंध : हे कारक नाही. तथापि, वाक्यात षष्ठी विभक्तीचा उपयोग विपुल आणि अनेक प्रकारांनी होत असल्याने संबंधदर्शक प्रत्ययांची देखील दखल घेतली पाहिजे. प्राकृतात षष्ठीवाचक असलेला 'केरा' हा प्रत्यय दखनीत अल्पप्रमाणात का होईना रूढ आहे. 'गोरखबानी'त तो अधिकांशाने योजलेला आढळतो.

- *चींटी केरा नेत्रमां गजेन्द्र समाइला — गोरखबानी*
- *हलजाये जिया कों सकी अब चोटीकेरे ताब में — मानी, ८५*

'न' हाही एक संबंधवाचक प्रत्यय असून तो सामान्यपणे प्रथम व द्वितीय पुरुषवाचक सर्वनामांनाच लागतो –

- ***हमन*** *हमकूं देकने हम जग में आये*
  हमन *हमकुं देक हम कूं भंवाये –मनसमझावन, २५*

कारकांच्या अनुसंधानाने विभक्तींचा व विभक्तिवाचक अव्ययांचा शोध घेतला असता जे साध्य झाले ते वर निर्दिष्ट केले आहे. तथापि, मराठी भाषेच्या व्याकरणात कारकांच्या अपेक्षेने विभक्ती अधिक परिचित असल्याने निरनिराळ्या विभक्तीप्रत्ययांची नोंद पुढीलप्रमाणे देता येईल

प्रथमा -	अप्रत्यय. [९]
द्वितीया -	अप्रत्यय/ कुं ,कूं
तृतीया –[१०]	ने, ए, एं, एंही, हीं, सुं,सूं, सो, थी, तइं, ते.
चतुर्थी-	कुं ,कूं, कों,के.
पंचमी-	थे, थें, से, ते, ओं,सुं, सेति, सुन्तो.
षष्टी-	का (की, के) केरा, न
सप्तमी-	इं, ए, एं, एहि, हिं, हि, सें

विभक्ती-प्रत्यय लागण्यापूर्वी मराठी भाषेत नामाचे सामान्यरूप होत असते. तसे ते दखनीत होत नाही. धातुसाधितांना अव्यय लागण्यापूर्वी मात्र सामान्यरूप होत असल्याचे आढळते. उदा- आयेपर, जायेपर, सोयेपर इ.

(आ) सर्वनाम

पुरुष, वचन, लिंग आणि विभक्ती हे नामांच्या रुपसिद्धीस कारक असलेले घटक सर्वनामांसही लागू पडतात. त्यामुळे विकारांच्या संदर्भात सर्वनामांचा स्वतंत्रपणे विचार करण्याचे तसे कारण नसते. तथापि, काही बाबतीत सर्वनामांची रुपसिद्धी थोड्या वेगळ्या पद्धतीने होत असल्याने सर्वनामांचा स्वतंत्र विचार आवश्यक ठरतो.

पुरुष-वाचक, दर्शक, संबंधी, प्रश्नार्थक आणि अनिश्चितार्थबोधक असे सर्वनामांचे पाच प्रकार मराठीत आहेत तसेच ते दखनीतही आहेत.

पुरुष वाचक सर्वनाम-
प्रथम पुरुष- मैं, अपन, (ए.व.); हम, अपन,अपुन (अ.व.)
द्वितीय पुरुष – तूं, तुम्, आप, (ए.व.); तुम्, आप (अ.व.)
तृतीय पुरुष – वो (ए.व.), वो (क्वचित् वे) अ.व.)
दर्शक – वो (ए.व.), ये (अ.व.)
संबंधी – जो (उभयवचनी)

प्रश्नार्थक – कौन, कोन, क्या, कोई

अनिश्चितार्थवाचक – कोन, कौन, कोई या पाचही प्रकारांतील सर्वनामांची रुपसिद्धी होताना काहींना विकारनिदर्शक प्रत्यय लागतात तर कित्येक सर्वनामांचे रूपच बदलते. पुरुषवाचक सर्वनामांपैकी प्रथम व द्वितीय पुरुषी सर्वनामांचा लिंगभेद क्रियापदाच्या रुपांवरून अथवा या सर्वनामांस लागणाऱ्या विशेषणांच्या स्वरूपावरून सूचित होत असतो. 'मैं' या एकवचनी सर्वनामाच्या ऐवजी बोलीत निरपवादपणे व साहित्यात क्वचित 'अपन' वा 'अपुन'चा प्रयोग होत असतो. ग्रामीण मराठी बोलीतही हाच प्रकार आढळतो-

● अपुन कुं गांव में येक घर है और छोटासा रान बी ।
(आपल्याला (म्हणजे मला) गावात एक घर आहे आणि लहानसे शेत देखील)

● अपुन का नांव गांव में सबकूं मालूम ।
(आपले (माझे) नाव गावात सर्वांना माहीत आहे).

या वाक्यात वक्ता एकवचनी असूनही 'अपुन'चा प्रयोग करण्यात आला आहे

● अपुन तो अबीच आया ।
(आपण (मी) तर आताच आलो).
● अपुन का घर नजिकच है ।
(आपले (माझे) घर जवळच आहे).
● उन्ने बोल्या अपुन काम में है ।
(तो म्हणाला आपण कामात आहोत.)

शेवटच्या वाक्यात 'वह' या तृतीय पुरुषीसर्वनामास 'ने' हा प्रत्यय लागला असून त्याचे उन्ने हे रूप झाले. आवश्यक असो वा नसो कर्ता तृतीयांत योजण्याची दखनी भाषेची लकब या वाक्यात आढळेल. अपन/अपुन प्रमाणेच 'हम' हे सर्वनाम वक्ता एकवचनी असला तरीही योजले जाते. कित्येकदा 'हमन' हे षष्ठीवाचक रूपही मूळ सर्वनामाच्या (अप्रत्यय)ऐवजी प्रयुक्त होत असते. तोच प्रकार 'तुमन्' या सर्वनामाच्या बाबतीतदेखील आढळतो.

● हमन-तुमन की बात छोड हक के राह में चल ।
(आमचे –तुमचे ही भाषा सोडून सत्याच्या मार्गाने चल)
या वाक्यात हमन-तुमन ही रूपे षष्ठीवाचक आहेत.

● हमना आराम है तुमना कैसा । (चतुर्थी/ द्वितीया)
● हमना क्या की गरीबां, तुमना तो तालेवार ।(प्रथमा)
परंतु, कित्येकदा हमन-तुमन हीच मूळ रूपे गृहीत धरून या रुपास विभक्ति-प्रत्यय लागतात-

● तुमन कूं आमीन अछो । - मानी, ८१
● हमन कूं येक हो गम करता है फर्याद । - मानी, ८२

● कीं तुमना कूं यारां न मालूम (अ) हे । - तारी, २८

असाच प्रकार 'मों', 'मुज', 'मुंज' आणि 'तुज' या रुपासंबंधी आढळतो. यांपैकी पहिली तीन रूपे 'मैं' या सर्वनामाची आणि शेवटचे 'तूं' या सर्वनामाचे द्वितीयांत/ चतुर्थांत रूप आहे तरीही याच रूपांना कधी कधी अन्य विभक्ति-प्रत्यय लावण्यात येत असतात.

● मुंज जीव की अराज् कों बांदे मोंसीते पिया ।- मानी, ५६
● न लडसी अपंग मंज सीते फौज जोड । - तारी, ७

सामान्यपणे मज-तुज ही रूपे द्वितीया, चतुर्थी आणि षष्ठी यांची वाचक असतात.

● गदा तुंज इश्क का हूं दे जकाते इश्क मुंज साई । - मानी, ६७
(तुंज-षष्ठी, मुंज- चतुर्थी)
● अछो मुंज वचन ते यो मर्दा का नाँवु ।-तारी, ५०
(मुंज- षष्ठीवाचक)

प्राचीन मराठी व वाङ्मयातही मज व तुज ही रूपे द्वितीया/चतुर्थी व क्वचित षष्ठीवाचक असतात तर कधी कधी या रुपांनाही विभक्ति-प्रत्यय लागतात- मजला, मजसंगे, तुजलागी, तुजपासाव इ.

दखनी भाषेत तृतीय पुरुषी एकवचनी (वह) सर्वनाम कधी कधी 'तिस' या रुपात योजले जाते.

● असे वाँ तलक तिसके घोड्यांकी चाल-तारी, ५
● जनम तिसपो उसके हशम का है खेल-तारी, ५.

संबंधी आणि अनिश्चितार्थवाचक सर्वनामांचा एकत्र उपयोग होत असताना कधी कधी 'जो कोई' च्या ऐवजी 'जे कोई' असे रूप बनते. अनिश्चितार्थवाचक कोन/ कोई हे सर्वनाम 'को' व 'कने' या रुपांतही कित्येकदा योजण्यात येते.

● मरे मजहब की बातां खोलकर सब पूछे जेको – मानी, ९३
● न लिक सकेगा कने शरा मंज मुंज किताबां का – मानी, ८५

सर्वनामांच्या सविभक्तिक रुपांसंबंधी एक विशेष गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे –पुरुष वाचक सर्वनाम वाक्यात कर्तृस्थानी असताना प्रथमा व तृतीया या दोन विभक्तीपैकी एका विभक्तीत असावे अशी अपेक्षा असते. कारण, मराठी भाषेत तसा प्रयोग होतो. दखनी भाषेत मात्र ते नाहामी तृतीया विभक्तीत असते. 'हमने आया', 'उन्ने चला', असे प्रयोग सार्वत्रिक आढळतील. पुढे प्रयोग-व्यवस्थेच्या संदर्भात या विशेषाचा अधिक विचार करण्यात आला आहे.

(इ) विशेषण

मराठी व्याकरणात विशेषणाची गणना विकारी शब्दांत होत असली तरी सर्वच विशेषणांना लिंग-वचन-पुरुष-विभक्ती निदर्शक प्रत्यय लागतातच असे नाही. विशेषणांचा उपयोग नामांसारखा होतो तेव्हा मात्र नामांना होणारे सर्व विकार त्यास होतात. अन्यथा विशेषणांत विकारांच्या दृष्टीने पुढील तीन प्रकार आढळतात.

१) काही विशेषणे विशेष्याच्या लिंगभेदाप्रमाणे बदलतात.
२) कित्येक विशेषणांना विभक्तिप्रत्यय न लागता त्यांचे केवळ सामान्य रूप होते.
३) बरीच विशेषणे अविकृत रूपातच वाक्यात योजण्यात येतात.

संस्कृत भाषेत हे प्रकार आढळत नाहीत. या भाषेत अपरिहार्यपणे विशेष्याचे लिंग, वचन, पुरुष आणि विभक्ती ही विशेषणांसही लागते. विशेषणांच्या विकारांच्या बाबतीत दखनी आणि मराठी या दोन्ही भाषा समपातळीवर आढळतील. अगदी अपवादात्मक परिस्थितीतच विशेष्याचे लिंग-वचन-पुरुष आणि विभक्ती यांचे विकार घेऊन विशेषणांचा वाक्यात उपयोग होत असतो. अशी अपवादात्मक उदाहरणे प्राचीन मराठी साहित्यातही आढळतील.[११]

- कहे तूं कीं पर्दा है यक नाटकी- तारी, ४७

या उदाहरणात 'पर्दा' या नामाचे 'नाटकी' हे विशेषण आहे. मूळ नामच प्रत्ययहीन असल्याने विशेषणाला विशेष्याचे विकार झाले आहेत किंवा नाही याचा निर्णय लावता येत नाही. पुढील उदाहरणात विशेषणाचा उपयोग नामांप्रमाणे झालेला असल्याने त्यास विभक्ति-प्रत्यय लागला आहे —

- चुकात्यां को जाहिर नको कस करो — तारी, ७८

पुढील उदाहरणांत मात्र विशेषण विशेष्याच्या लिंग-वचन विभक्ती विकारासह योजण्यात आलेली आहेत. ही उदाहरणे अर्थातच अपवादात्मक आहेत.

- झूमत्या मोत्यांक्या लडां रहजू भर — इब्रा, २४२
- कवल्यां कलियां हो आत्यां — इब्रा, ३५५.
- नव्यां कोणत्यां हो सो पडत्यां नजर — इब्रा, ५०१.
- जित्यां खूबशकत्यां श्यां सुंदऱ्यां — कुमु, ५०१.

धातुसाधित विशेषणे आणि षष्ठयंत अनुबंध निदर्शक नामांच्या बाबतीतदेखील असाच अपवादात्मक प्रकार आढळतो- उदाहरणार्थ, बहतियां नदीयां; अवतियां नारियां;इमारतां जैसियां; बुरियां आदतां इ.

काही विशेषणे मराठीप्रमाणेच विशेष्याच्या लिंगभेदाप्रमाणे बदलतात.

- पुस्तक चक्षू सो सुंदरी खत कागत पांढरी —नवरस

● नको चल तपटकर छाती उतानी-मन, २३

विशेष्याच्या लिंगभेदाप्रमाणे बदलणाऱ्या विशेषणास दखनी भाषेत (आणि मराठीतही) विभक्तिप्रत्यय लागत नाहीत त्यांचे केवळ सामान्यरूप होते हे वरील काही उदाहरणांतून लक्षात येईल. [१२] वर दिलेली काही उदाहरणे आणि आकारांत विशेषणे यांचा अपवाद वगळता दखनी भाषेतील विशेषणांची गणना अविकारी शब्दांतच करावी लागेल.

व्युत्पतीच्या दृष्टीने सिद्ध आणि साधित असे विशेषणांचे दोन प्रकार होतात तर गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून गुणविशेषण आणि संख्याविशेषण असे दोन प्रकार मानता येतात. सर्वनामसाधित विशेषण हा साधित विशेषणाचाच एक प्रकार मानता येईल.

● यो गज नांऊं तुज केऊं साजे – नवरस, ८१
● गुमत दिसे जेऊ खुद्द दिसे मदीना – नवरस, ८२

या उदाहरणांत 'केंऊ' आणि 'जेंऊ' ही सर्वनामसाधित विशेषणे आहेत. साधित विशेषणांचा आणखी एक प्रकार म्हणजे उपसर्ग व प्रत्यय नामांना लागून होणारी विशेषणे- बेशुमार, बदकार, इष्कबाज, चुगलखोर इ.

धातुसाधित विशेषण हाही साधित विशेषणाचाच एक प्रकार. उदा. – देखन्त, बूझन्त, करन्त, पेखन्त इ.

शब्दसाधना कोणत्याही प्रकारे झालेली असो विशेषणांच्या योगाने विशेष्याच्या गुणधर्मात आणि एकंदरीत वाक्यार्थात भर पडते यात शंका नाही. कित्येकदा समग्र वाक्याचा आशयदेखील एखाद्या विशेषणाच्या पोटात दडलेला आढळून येईल.

● निराकार निर्गुण वो परमेसरी है – मन, १
● बडा शेख चंचल व अचपल बना है – मन, ७
● ये सारा हे परपंच झूटा जमाना
अरे मन नको रे नको हो दिवाना – मन, १०
● ये पंचभूत का तुज कों जेवर कते हैं – मन, १२

वाक्यातील पदक्रम संस्कृत वाक्यात फारसा महत्त्वाचा नसतो. प्राकृत आणि देशी भाषांत मात्र वाक्यातील पदे कोणत्या क्रमाने यावयाची हे निश्चित झालेले आढळून येते. वाक्यरचनेच्या संदर्भात पुढे पदक्रमासंबंधी विवेचन आले आहे. या स्थळी केवळ विशेषण आणि विशेष्यही वाक्यात कोणत्या क्रमाने येत असतात एवढेच लक्षात घ्यावयाचे आहे. भारतीय भाषांत वाक्यात विशेषणानंतर विशेष्य योजण्याची प्रथा आहे. अरबी –फारसी भाषांत मात्र अगोदर विशेष्य आणि नंतर विशेषण असा क्रम येतो. दखनी भाषेत हे दोन्ही क्रम आढळतात. विशेष्यानंतर विशेषण योजण्याचा प्रकार मराठी बखरीत देखील आढळतो. हा अर्थातच अरबी-फारसी भाषांतील वाक्यरचनेचा परिणाम म्हटला पाहिजे.

अनुक्रमणिका

वाक्य –रचनेच्या अनुरोधाने वाक्यात जे शब्द मूळरूपात योजण्यात येतात व जे प्रत्यय लागल्यावरच वाक्यात प्रयुक्त होण्याच्या योग्यतेचे बनतात अशा शब्दांच्या विचारात आतापर्यंत नाम, सर्वनाम आणि विशेषण यांचा विचार करण्यात आला आहे.

(ई) धातू अथवा क्रियावाचक शब्द

विकारी शब्दांच्या कक्षेत येणाऱ्या आणखी एका शब्दासंबंधी विवेचन करावयाचे आहे. हा शब्द आहे धातू अथवा क्रियावाचक शब्द. वाक्यार्थाच्या दृष्टीने हा शब्द निर्णायक स्वरूपाचा असतो. धातूचे 'क्रिया-पद' झाल्याविना त्याचा वाक्यात उपयोग करता येत नाही आणि क्रियापद असल्याविना अन्य शब्दसमूहास वाक्याची प्रतिष्ठा लाभत नाही. वाक्याची रचना आणि घडण क्रियापदाच्या योगाने निश्चित होत असते.

धातूस प्रत्यय लागून सिद्ध झालेल्या रुपास क्रियापद म्हणतात. वक्त्यास अभिप्रेत असलेला क्रियेचा काळ व अर्थ यांचे निदर्शन करण्यास केवळ धातू असमर्थ ठरतो. क्रियेचा बोध सर्वार्थाने होण्यासाठी धातूस काही संस्कारांच्या प्रक्रियेतून जावे लागते. लिंग, वचन, पुरुष आणि आख्यात यांचे संस्कार धातूवर झाल्यानंतरच धातूचे क्रियापदात रुपांतर होते.

आख्यात –प्रत्यय दोन प्रकारचे असतात- क्रियेचा काळ दर्शविणारे आणि क्रियेच्या अर्थाचे निदर्शन करणारे. काळ तीनच – भूत, वर्तमान आणि भविष्य. भाषा-व्यवहाराच्या दृष्टीने रीतिभूतकाळ हाही एक चौथा काळ मानण्यात येतो. आज्ञा, विधि आणि संकेत हे तीन अर्थ. चार काळ आणि तीन अर्थ अशा सातांचे क्रियापदांना लागणारे प्रत्यय ते आख्यात प्रत्यय. या सातही आख्यातांत लिंग, वचन आणि पुरुष यांचे विकार होत असतात. हे विकार /विकार-निदर्शक प्रत्यय धातूंना लागल्यानंतरच धातूंचे क्रियापद बनते व त्याचा वाक्यात उपयोग होऊ शकतो.

प्रकृति-धर्माच्या दृष्टीने सकर्मक आणि अकर्मक असे धातूंचे दोन प्रकार आहेत. धातू यांपैकी कोणत्याही प्रकारातला असला तरी त्याला घडणारे विकार मात्र समान असतात. काही आख्यांतात क्रियापदाचे रूप कर्ता वा धातूरूपेश यांच्या लिंगभेदाप्रमाणे बदलत असते तर काही आख्यातांत हा बदल घडत नाही. पुरुष आणि वचन (कर्ता वा धातूरूपेश यांचे) यांच्याप्रमाणे होणारे बदल मात्र सर्व आख्यातांत घडतात. तोच प्रकार व्युत्पत्तीच्या दृष्टीने असलेल्या सिद्ध व साधित या दोन प्रकारच्या धातूंच्या बाबतीत आढळून येतो. धातू सिद्ध असो वा अन्य शब्दांपासून साधलेला, त्याला लागणारे आख्यात-प्रत्यय मात्र समान असतात. प्रयोजक हाही साधित धातूचाच एक प्रकार. या प्रकारात मूळ धातूचे प्रेरणास्थान बदलत असते. उदा. फुटना-फोडना; तुटना-तोडना; फटना-फाडना. याही प्रकारांत आख्यात –प्रत्ययांच्या बाबतीत कोणताच बदल घडत नाही.

संयुक्त क्रियापदांच्या बाबतीत मात्र दोन घटक क्रियापदात असतात-धातूचा मुख्यार्थ धातुसाधिताच्या रुपात येतो व त्या अर्थाला पूर्णता देणाऱ्या साहाय धातूस आख्यात प्रत्यय लागतात. उदाहरणार्थ: 'देकता अथा' (पहात होता), बोलता अछेंगा (बोलत असेल), या उदाहरणांत अनुक्रमे भूतकाळ व भविष्यकाळ या आख्यातांचे प्रत्यय साहाय धातूस लागले आहेत व मुख्य धात्वर्थ धातुसाधिताच्या रुपात आला आहे. 'अस्', 'अछ', 'हो' हे प्रमुख साहाय धातू आहेत. त्यांचा स्वतंत्रपणेही वाक्यात उपयोग होत असतो. अस् हा मूळ संस्कृत धातू असून तो दखनीत आणि मराठीतही रूढ आहे. 'आहे' व 'अहे' हा

दखनी अपभ्रंश याच धातूचा. ‘अछ’ हाही प्राकृतात रूढ असलेला संस्कृत ‘अस्’चाच अपभ्रंश. दखनीने तो बंगाली भाषेपासून उचलला असे मत काही विद्वानांनी व्यक्त केले असले तरी ते ग्राह्य धरता येत नाही. कारण, प्राकृत परंपरा दखनीस अधिक जवळची आहे. संधा भाषेच्या द्वारे ‘अछ्’ चा प्रवेश दखनीत झाला आहे. उदा-

- मेरा जो प्यारा है सो तो प्यारा **अहे** करतार का –अली, १२३
- गरज, अपनी समजसूं **अछे** तो बुरा नई है – सब, १०५
- आपै अपनी जाया कम न **अछता**-सब
- अटल सब थे कबी बाजू **अथा** हर न सके मंजिल का –अली, १६१

परभाषेतून दखनीत आलेल्या धातूंचाही विचार या संदर्भात केला पाहिजे. धातूंच्या वर्गीकरणाशी त्यांचा संबंध पोचतो आणि पोचत नाहीही. शब्दसंग्रहाच्या प्रकरणात या बाबीचा विचार थोड्याफार प्रमाणात येऊन गेला आहे. दखनीने मराठी धातूंची सर्वाधिक उसनवारी केली आहे हे पूर्वी स्पष्ट करण्यात आले आहेच. तथापि, दखनीतील परभाषेतून आलेले धातू विचारात घेण्यापूर्वी मूळ दखनी भाषेतले धातू कोणते मानावयाचे यासंबंधी विवेक केला पाहिजे.

संधाभाषा हे दखनीचे उगमस्थान. संस्कृत; प्राकृत आणि अपभ्रंश या परंपरेतून संधाभाषा उदयास आली. मराठी भाषेलाही हीच परंपरा आहे. या परंपरेतून दखनीत आलेले धातू मूळ दखनीच मानले पाहिजेत. या परंपरेत बसणारे पण मराठी भाषेचा गंध धारण करणारे धातू दखनीत रूढ आहेत. त्या बरोबरच निखळ मराठी धातूदेखील दखनीत प्रचलित आहेत. या सर्वांना दखनीच्या दृष्टीने ‘परभाषिक’ मानण्याचे कारण नाही.अरबी-फारसी भाषांतून आलेले धातूच खऱ्या अर्थाने दखनीतील परभाषांतील धातू ठरतात. दखनीत मूळ अरबी-फारसी धातू फार थोडे आहेत. जे आढळतात ते नाम व विशेषण यांच्यापासून साधण्यात आलेले साधित धातू आहेत. उदाहरणार्थ – कबूलना (कबूल), नवाजना (नवाजिश), दफनाना (दफन) इ. दखनीत रूढ असलेल्या मराठी वळणाच्या धातूंची कल्पना यावी या हेतूने परिशिष्टांत काही धातू दिले आहेत. शेवटी जोडलेल्या शब्दकोशातदेखील असे अनेक धातू आढळतील.

वर्गीकरणाच्या दृष्टीने धातू कोणत्याही वर्गातला असला तरी त्याला लागणारे विकार सारखे असतात हे ध्यानात घेऊन पुढील विवरणात धातूच्या प्रकारांचे उल्लेख करण्यात आलेले नाहीत. धातूस होणाऱ्या पुरुष, वचन, लिंग आणि आख्यात या चार विकारांपैकी वचन आणि पुरुष यांच्या अनुसंधानाने होणारे विकार सर्वच धातूस होतात. लिंगभेद मात्र सार्वत्रिक असतो असे नाही. धातुरुपेशाच्या लिंगभेदास अनुसरून क्रियापदाचे रूप बदलते ते काही आख्याततातच. संस्कृत भाषेत आख्यात –प्रत्यय कर्ता वा धातूरुपेश यांच्या लिंगभेदाप्रमाणे बदलत नाहीत. परंतु, दखनीत आणि मराठीतही वर्तमानकाळ, (सकर्मक क्रियापद असल्यास) भूतकाळ, विध्यर्थ व संकेतार्थ या आख्यातात येणाऱ्या क्रियापदांचे प्रत्यय धातूरुपेशांच्या लिंगभेदाप्रमाणे बदलत असतात.

संस्कृत भाषेत नसलेला हा विशेष देशीभाषेत आला तो एका ऐतिहासिक परंपरेतून. संस्कृत भाषेत क्रियापदांच्या ऐवजी धातुसाधित विशेषणे योजण्याची पद्धती होती. प्राकृतात ही पद्धती जवळपास सार्वत्रिक झाली. त्यामुळे मूळ आख्यातप्रत्यय मागे पडले. क्रियापदासाठी येणारी ही धातुसाधिते विशेषणे असल्याने विशेष्याच्या लिंगभेदांप्रमाणे बदलण्याचा गुणधर्म त्यांच्या ठिकाणी होता. त्याचप्रमाणे आख्याताच्या ज्या प्रकारातून ही विशेषणे साधण्यात आली त्या आख्याताचे कालार्थवाचक गंधही या रूपांना अपरिहार्यपणे

लागेल. दखनी –मराठीत लिंगभेदाप्रमाणे बदलणारे प्रत्यय हे धातुसाधित विशेषणांपासून आलेले असल्याने मूळ संस्कृतात नसलेला हा विशेष दखनी-मराठी आख्यातांच्या काही प्रकारांत आला आहे. वर्तमानकाळ – संकेतार्थ,भूतकाळ-विध्यर्थ या आख्यातांचेच प्रत्यय तेवढे धातूरुपेशाच्या लिंगभेदाप्रमाणे बदलत असतात. रीतिवर्तमान, भविष्य हे दोन काळ आणि आज्ञार्थ या तीन आख्यातांच्या प्रकारांत क्रियापद धातुरुपेशाच्या लिंगभेदाप्रमाणे बदलत नाही.

वर्तमानकाळ :नामांना विभक्ति-प्रत्यय लागल्याने त्याचा इतर शब्दांशी असलेला संबंध प्रस्थापित होतो त्याचप्रमाणे धातूचे क्रियापद होऊन वाक्यातील अन्य शब्दांशी असलेले धातूचे संबंध स्पष्ट होतात आणि वाक्यार्थास पूर्णता येते. आख्यात-प्रत्ययांच्या बाबतीत दोन प्रकार आढळतात मूळ संस्कृत आख्यात – प्रत्ययापासून आलेले आणि निरनिराळ्या आख्यातातील धातुसाधितांच्या प्रत्ययापासून आलेले. वर निर्देशिलेले तीन आख्यात- रीतिवर्तमान काळ, भविष्यकाळ आणि आज्ञार्थ –मूळ संस्कृत आख्यात प्रत्ययापासून आलेले असून अन्य चार आख्यात प्रत्यय त्या त्या आख्यातात लागणाऱ्या धातुसाधिताच्या प्रत्ययावरून आलेले आहेत.दखनी-मराठीतील वर्तमानकालवाचक 'त' प्रत्यय संस्कृत भाषेतील वर्तमानकालवाचक धातुसाधिताच्या 'अत्' या प्रत्ययापासून आलेला आहे. हा प्रत्यय मुळात विशेषणाच्या प्रत्ययापासून आलेला असल्याने धातूरुपेशाच्या लिंगभेदाप्रमाणे बदलण्याचा गुणधर्म या प्रत्ययात आहे.

- चलने में हंस कूं हटकती-सब, ६९
- कंही तोड देवल मस्जीत बनाते मन,२

'ई' आणि 'ए' असे वर्तमानकाळाचे आणखी दोन प्रत्यय दखनीत आहेत. मराठी व्याकरणाच्या परिभाषेत **रीतिभूतकाळ** असे या आख्यातास नाव देता येईल. हे प्रत्यय साक्षात आख्यात-प्रत्ययापासून आलेले असल्याने ते धातुरुपेशाच्या लिंगभेदाप्रमाणे बदलत नाहीत. या दोन्ही प्रत्ययांचा उगम संस्कृत भाषेतील अनुक्रमे परस्मैपदी व आत्मनेपदी धातूच्या वर्तमानकालीन रुपात आढळेल. कृ या परस्मैपदी धातूचे तृतीयपुरुषी एकवचनी करोति असे रूप होते व लभ् या आत्मनेपदी धातूंची रुपसिद्धी (तृ-पु-ए-व) 'लभते' अशी होते. प्राकृतात आत्मनेपदाचा लोप झालेला असल्याने 'ई' आणि 'ए' हे प्रत्यय सामान्यपणे वर्तमानकालवाचक बनले-

धुई(गा.स.५-३३), **देई** (गा.स. ७.३); **होई** (सावयधम्मदोहा, ६) **बैसई** (महापुराण, ४-१-११)

दखनी उदाहरणे :

- बाट **सरी** सब, १२८,
- औतार सूरत मजु भौत **भाई**– सब, ७५
- बरत का **अहे** डर मुंज भौत घैरा ।मन, ४९
- कुहिस्तां यो ज्युं नौनिहालाँ **दिसे**– तारी, २७

भूतकाळ :

वर्तमानकालवाचक 'ई' आणि 'ए' हे प्रत्यय भूतकाळाच्या अर्थानेही दखनीत येतात. संदर्भावरून या प्रत्ययांनी युक्त असलेल्या क्रियापदाचा अर्थ वर्तमानकाळी वा भूतकाळी असा घ्यावयाचा असतो. मराठी भाषेतील रीतिभूतकाळवाचक क्रियापदांतही हाच विशेष आढळतो –

- ज्यों गडांपर **कोंडे** उसे – अली, ६३
- **हुई** बी अदिक रेज चौंडल पो यूँ – तारी, २७.

संदर्भावरून वरील उताऱ्यांतील क्रियापदे भूतकाळवाचक ठरतात.

भूतकाळाचा अधिक प्रचलित असलेला प्रत्यय आहे 'या', अथवा 'इया' सिद्धांच्या भाषेतही हा प्रत्यय आढळतो –

- सिधे सिध **मिल्या** वे अवधू- गोरखबानी
- **बांध्या** मेल्हा जगत्र चेला –गोरखबानी, १५३
- **जमी** आ दोघिर लडाई अजीम – तारी, ३५.

'बैस्या', 'राख्या', 'खोल्या', 'देख्या' अशी कितीतरी रूपे सिद्धसाहित्यात येतात तशीच दखनीत देखील.

- **कऱ्या** चड जहाजां जो दर्या पो दौड –तारी, ६.
- **पड्या** घर तो आपी बी नाबूद है – तारी, १३
- **लग्या** है मरी तेग का जिव कूँ धाक – तारी, १५.

भविष्यकाळ : दखनी भाषेतील भविष्यकाळाची रूपे तीन निरनिराळे प्रत्यय लागून होतात.

१-सी प्राचीन मराठीत 'सी' प्रत्यय लागून द्वितीयपुरुषी एकवचनी भविष्यकाळाचे रूप बनते. दखनीत हा प्रत्यय सर्वपुरुषी भविष्यकाळी धातूंना लागतो. हा प्रत्यय संधाभाषेतही आढळतो.

- पवना रे तूं **जासी** कौने बाटीं – गोरखबी, ११६
- पंडित ग्यानी न **करसी** गरब – गोरखबी, २१९

पहिल्या उद्धरणातील रूप द्वितीय पुरुषी एकवचनी आहे तर शेवटच्या उद्धरणातील रूप तृतीय पुरुषी अनेकवचनी आहे. आता दखनी भाषेतील काही उदाहरणे

- बादशाह शराब पिया तो गुन्हागार होसि-सब, २३
- यहाँ ते मालूम होता है के सखीपर किसीका बददुआ **चालसीना**- सब, ४७
- हरगीज तन्हाई ना **आसी**–सब, ६४
- खुदा कूं **देखेंगे** तो खुदा नजर कूं न **आसी** –तारी,१६

२. 'ई' हा प्रत्यय संदर्भभेदाने वर्तमान, भूत आणि भविष्यकाळाचा वाचक आहे.

● तब **होई** मालुम ऐबो हुनर-इब्रा, १०९
● न बिन जोहरी तिस **पछानी** तो कोई – इब्रा, ११०

मराठी भाषेतही शिलालेखात व प्राचीन वाङ्मयात संदर्भभेदानें 'ई' हा प्रत्यय भविष्यकाळाचा वाचक या नात्याने आलेला आहे – 'फोडी', 'लोपी', 'करी' या शिलालेखातील शापवचनात येणारी रूपे भविष्यकाळवाचक आहेत. पुढील उताऱ्यात भविष्य काळ सूचित झालेला आहे. 'न घरी शस्त्र करीं मी' (मोरोपंत), 'आरोगण करी' (लीळाचरित्र).

३. गा- वर्तमान उर्दू/हिंदी भाषेत प्रचलित असलेला 'गा' प्रत्ययांत भविष्यकाळदेखील दखनी भाषेत प्रचलित आहे. अछेंगा, करेगा/करेंगा, बोलेगा-बोलेंगा अशी रूपे दखनी साहित्यात आणि बोलीतही विपुल प्रमाणात आढळतात.

संकेतार्थ : संकेतार्थाचे प्रत्यय वर्तमान कालवाचक धातुसाधित विशेषणांपासून आलेले असल्याने धातुरूपेशांच्या लिंगभेप्रमाणे बदलण्याचा विशेष या प्रत्ययात आढळतो.

● अगर रामदास होर केसोदास **होते**
*हमारा यो दुखदर्द दरस को **रोते***
तुराब वे तुराब हो के सुदबुद गंवाते -मन.
● राम जैसा साहेब **आये** तो हनुमान जैसा नफर पैदा **होय**–सब, १०५.

विध्यर्थ आणि आज्ञार्थ : अगदी निखळपणे उठून दिसतील अशी विध्यर्थाची उदाहरणे दखनी साहित्यात आढळली नाहीत. जी आढळली ती निर्विवादपणे विध्यर्थाची असतीलच असे वाटते नाही. तेवढ्यावरून या भाषेत विध्यर्थ नाही असा निष्कर्ष काढणे धोक्याचे ठरेल. तथापि, विध्यर्थाच्या जवळपास अभावाचे कारण मात्र देता येण्यासारखे आहे. दखनी भाषेतील वाक्यरचनाच मुळात कर्तृप्रधान असते. क्रियापदे कोणत्याही आख्यातात असली तरी ती कर्तृगामी असतात. त्यामुळे कर्मणि प्रयोगच या भाषेत अपवादात्मक आढळतो.

कर्मणि वाक्यरचना विध्यर्थास पोषक असते. तथापि मुळात कर्मणि – प्रयोगच तुरळक होत असल्याने निरपवाद विध्यर्थाची उदाहरणेदेखील दुर्मिळ ठरतात.

मराठी भाषेत नसलेले कोणतेही विशेष दखनीतील 'आज्ञार्थात आढळत नाहीत. त्यामुळे आज्ञार्थाचा अधिक विचार करता आला नाही. धातूचे मूळ रूप हे आज्ञार्थी द्वितीय पुरुषी एकवचनाचे रूप असते हा मराठी भाषेत आढळणारा विशेषही दखनीत उतरला आहे.

साधित धातू : साधित धातूंचा उल्लेख अगोदर येऊन गेला आहे. नाम आणि विशेषण यांच्यापासून साधण्यात आलेल्या धातूंना लागणारे आख्यात प्रत्यय अन्य धातू सारखेच असतात. त्याचप्रमाणे गुण-वृद्धी वा

‘अव’ प्रत्यय मूळ धातूंस लागून साधण्यात येणाऱ्या प्रायोजक धातूंनाही वेगळे आख्यात प्रत्यय लागत नाहीत. उदाहरणार्थ-

- वो साती कजर व फलक **धाक्या** सो तेरे दर में –अली १०१.
- उचाया है शैतान ज्युं **गर्दकार**– तारी. १९
- अपनेच लोकां लूटते नंगाते – सब ११२
- जाहिल थे खुदा के फरमान को नई विचारते – सब. ३१

वरील उदाहरणांपैकी पहिल्या व शेवटच्या उदाहरणांत नामधातूचा प्रयोग झाला आहे तर दुसऱ्या व तिसऱ्या अवतरणात विशेषणसाधित धातूंपासून झालेली क्रियापदे आली आहेत.

धातुसाधित:धातुसाधितांत आढळून येणाऱ्या काही विशेषांची नोंद क्रियावाचक शब्दांच्या संदर्भात घेतली पाहिजे. मूळ आख्यात-प्रत्यय न योजता धातुसाधितांचा प्रयोग प्राकृत भाषेत वाढीस लागलेला होता. (तेलंगणातील अरे मराठ्यांच्या बोलीतही हा विशेष आढळतो.)

दखनीत आणि मराठीत या विशेषाचे रुपांतर निराळ्या स्वरुपात घडले ते म्हणजे या धातूसाधितांचेच प्रत्यय आख्यात-प्रत्यय या नात्याने रूढ झाले हे अगोदर नमूद केले आहेच. धातुसाधित शब्द नाम, विशेषण आणि अव्यय यांच्या रुपात देखील प्रयुक्त होतात. कित्येकदा मूळ धातूचा प्रयोग कृदन्ताप्रमाणे होतो. कित्येकदा धातूचे भूतकालीन रूपही कृदन्तासारखे योजण्यात येते.

उदाहरणार्थ :

- हरेक काम अव्वल एख्तीयार **कर** करना
  *जो काम करते उसे टुक विचार **कर** करना –सब, ३९*

या अवतरणात ‘कर’ हे धातूचे मूळ रूप ‘करके’ (करून) या कृदन्ताच्या अर्थाने आले आहे. पुढील उदाहरणातही तोच प्रकार आढळेल:

- संभाल्या तो भालेले साबित कटार

गया फेड वख्तर कूं छाती के पार – तारी, ३६

‘किया काम’, ‘धरा नाम’, ‘बोल्या राम’ यांसारख्या उदाहरणात मूळ भूतकाळवाचक क्रियापदाचा धातुसाधित विशेषणासारखा उपयोग करण्यात आलेला दिसून येईल.

क्रियावाचक शब्दांसंबंधी साकल्याने विचार केला असता असे दिसून येईल की ‘या’ प्रत्ययांत भूतकाळ, ‘गा’ प्रत्ययांत भविष्यकाळ आणि विध्यर्थाचा अभाव या बाबींचा अपवाद वगळता क्रियावाचक शब्दांना लागणारे आख्यातप्रत्यय दखनीत आणि मराठीत समान आहेत. वर्तमानकाळवाचक धातुसाधिताच्या अत् प्रत्ययपासून झालेला ‘त’ प्रत्ययांत वर्तमानकाळ, ‘ई’ प्रत्यय लागून होणारी भूतकाळ व रीतिवर्तमानकाळाची रूपे, धातुरुपेशाच्या लिंगभेदाप्रमाणे बदलणारी वर्तमान-भूतकाळी व संकेतार्थी रूपे

दखनीत आणि मराठीत सारखीच होतात. धातूंच्या बाबतीत अशा रीतीने दखनी भाषा मराठी भाषेचा पिंड धारण करणारी आहे याचा प्रत्यय येतो.

हा प्रत्यय केवळ क्रियावाचक शब्दांपुरता मर्यादित नाही. एकंदरीत रुपसिद्धीच्या प्रक्रियेतच हे साधर्म्य आढळून येते.

भाषा —व्यवहारात रुपसिद्धीस विशेष महत्त्व असते. भाषेच्या विशेषांचे निदर्शन रुपसिद्धीच्या प्रक्रियेत जेवढे घडते तेवढे अन्यत्र होत नाही. रुपसिद्धीचे हे महत्त्व लक्षात घेऊनच दखनी भाषेतल्या सर्व जातींच्या शब्दांचा विचार रुपसिद्धीच्या अनुरोधाने या प्रकरणात करण्यात आला आहे.

दखनी भाषेत अरबी-फारसी शब्द विपुल प्रमाणात असले तरी या भाषांचा दखनी भाषेतील रुपसिद्धीवर परिणाम झाला नाही हे विशेषेकरून नमूद केले पाहिजे. रुपसिद्धीच्या बाबतीत दखनीने प्राकृत-अपभ्रंश-परंपरेचे अनुसरण मराठीच्या द्वारा केले आहे. मराठी भाषेतले किती तरी विशेष दखनीने आत्मसात केले आहेत.

संदर्भ

१. लीलावई कहा, प्रस्तावना पृ. ८०. सिद्ध सरहपाकृत दोहाकोश, प्रस्तावना;सिद्धोंकी सन्धाभाषा, पृ. १८४

२. हेमचंद्र, १-१ वरील संस्कृत टीका; ३-१३१-१३७

३. प्राप्र. ६-६४; प्राप्र. १-६.५.

४. ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण, पृ. १९१

५. ‘षष्ठीवत् चतुर्थी’ — चण्डकृत प्राकृत कल्पतरू, १३; हेमचंद्र ३-१३१

६. हेमचंद्र ४-३४४, प्राकृत कल्पतरू, ३-१ व ८, ९.

७. हेमचंद्र, ४-३४५.

८. द्वितीयेच्या जागी षष्ठी, सप्तमीच्या ऐवजी द्वित्तीया, तृतीयेसाठी द्वितीया आणि पंचमीसाठी तृतीया योजावी असे हेमचंद्र सांगतो. हेमचंद्र, ३-१३२-१३७.

९. प्रथमा विभक्तीत नामांना कधीकधी ‘उ’ हा प्रत्यय लागतो असे मत श्री. देविसिंग चौहान यांनी ‘इब्राहीमनामा’ या ग्रंथाच्या प्रस्तावनेत व्यक्त केले आहे. (पृ. १०९). परंतु तो नियम नसून अपवाद गणला पाहिजे. प्राकृत भाषांचे उकारबहुलत्व आणि यादवकालीन मराठीत आढळून येणारे त्याचे अवशेष यांचा हा परिणाम असणे असंभवनीय नाही.

१०. तृतीया विभक्तीच्या ‘ने’ या प्रत्ययांसंबंधाने श्री. देविसिंग चौहान यांनी काही लेखांतून चर्चा केलेली असून त्याबाबत स्वतःचे निष्कर्ष काढले आहेत. श्री. चौहान यांचा मताचा परामर्श परिशिष्टात घेण्यात आला आहे.

११. आतां विश्वात्मकें देवें- ज्ञानेश्वरी; मग साष्टांगे दंडवतें घातिली-लीळाचरित्र

१२. मराठी — काळ्या माणसांना, वाहत्या पाण्यावर, पांढऱ्या घोड्यांचे इ.

१३. प्रयोगव्यवस्था

वाक्य —व्यवस्थेत वाक्यातील पदांचा क्रम आणि प्रयोग-व्यवस्था या दोहोंना महत्त्व असते. वाक्यात अव्ययाखेरीज सर्वच शब्दांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा विकार होतोच. अशा विकारांनी अथवा प्रत्ययांनी युक्त असलेल्या शब्दास 'पद' ही संज्ञा आहे. वाक्यातील पदांना वाक्यार्थाच्या दृष्टीने विशिष्ट क्रम देण्यात येत असतो. सामान्यपणे कर्ता प्रारंभी येतो. कर्त्याची काही विशेषणे असतील तर ती अगोदर येतात. कर्म असेल तर ते कर्त्यानंतर आणि क्रियापद शेवटी असा पदक्रम असतो. कर्ता आणि क्रियापद या दोन टोकांच्या दरम्यान अन्य शब्दांची व्यवस्था लावण्यात येते — तेणेकरून वाक्यार्थ दुरान्वित न होता तो सहजपणे लागतो. त्यामुळेच वाक्यरचनेचे स्वरूप लक्षात घेताना पदक्रमही ध्यानात घेणे आवश्यक असते.

संस्कृत भाषेतील वाक्यात कोणत्याही प्रकारचा पदक्रम नसतो. कोणतेही पद कोठेही आले तरी अर्थनिष्पत्तीत फारसा अडथळा होत नाही. प्राकृत भाषेत मात्र पदांना क्रम लागला व कर्ता, कर्म आणि क्रियापद या क्रमाने वाक्यरचना रूढ झाली. या तीन प्रधान पदांशी संबंधित असलेली पदे त्या त्या पदांच्या आगेमागे येत असल्याने प्राकृत वाक्यांचा अन्वय लावावा लागत नाही. आधुनिक देशी भाषांनीही प्रकृताच्याच पदक्रमाचे अनुसरण केले आहे. दखनी आणि मराठी या दोन्ही भाषांतही प्रकृतांचाच पदक्रम रूढ आहे.

वाक्यरचनेत पदक्रमाइतकाच महत्त्वाचा वाटा असतो प्रयोग-व्यवस्थेचा. क्रियापदाचा कर्ता आणि कर्म यांच्याशी असलेला अन्वय वा अनन्वय यास प्रयोग ही संज्ञा आहे. क्रियापद कर्त्याप्रमाणे चालणारे असल्यास वाक्याचा कर्तरी प्रयोग होतो, कर्मानुसारी असल्यास कर्मणी आणि क्रियापदाचा कर्ता आणि कर्म या दोहोंशी अन्वय नसेल तेव्हा भावे प्रयोग होतो. अशा रीतीने प्रयोगाचे तीन प्रकार होतातः कर्तरी, कर्मणी आणि भावे. कोणत्याही वाक्यात या तिहीपैकी कोणता तरी एक प्रयोग असतो. प्रयोग — व्यवस्थेनुसार कर्ता आणि कर्म यांची विभक्ती आणि क्रियापदाचे आख्यात निश्चित होत असतात.

दखनी भाषेतील प्रयोग- व्यवस्था या पार्श्वभूमीवर समजून घेतली पाहिजे. संस्कृत भाषेत तीन प्रयोग आहेत तसेच ते मराठीतही आहेत. प्राकृत भाषेत मात्र भावे प्रयोग रूढ नाही. प्राकृतात वाक्यरचना सामान्यपणे कर्तृप्रधान असल्याने या भाषेत कर्तरी प्रयोगच अधिक प्रचलित असून कर्मणी प्रयोगाची उदाहरणे तुरळक आढळतात. प्राकृतात दिसून येणारे कर्मणी प्रयोगाचे गौणत्व आणि भावे प्रयोगाचा अभाव यांच्या मुळाशी एक बलवत्तर कारण आहे, ते म्हणजे आत्मनेपदी क्रियापदांचा प्राकृतात झालेला लोप. आत्मनेपदी आणि परस्मैपदी असे क्रियापदाचे दोन प्रकार संस्कृत भाषेत आहेत.त्यांपैकी आत्मनेपदी क्रियापद सामान्यपणे कर्मणी प्रयोगास अनुकूल असते. प्राकृतात आत्मनेपदाचा लोप झाल्याने भावे प्रयोग होऊ शकला नाही आणि कर्मणी प्रयोगासही गौणत्व आले. साहित्याची प्रतिष्ठा लाभण्यापूर्वी प्राकृत भाषा बोलीच्या रुपात नांदत होत्या. बोलीच्या व्यवहारात वक्ता नेहमी स्वतःला प्राधान्य देऊन बोलत असल्याने कर्तृप्रधान वाक्यरचना हा बोलीचा विशेष आजही आढळतो.

बोलीचा हा विशेष दखनी बोलीतच नव्हे तर साहित्यातदेखील दिसून येतो. त्यामुळे दखनीत भावे प्रयोग आढळत नाही. कर्मणी प्रयोगसुद्धा बराच कमी प्रमाणात दिसतो. मराठी भाषा बोलीतूनच विकास पावलेली असली तरी या भाषेवर यादवकाळापासूनच संस्कृत भाषेचे संस्कार झालेले दिसून येतात. या संस्कारातून मराठी भाषेत तिन्ही प्रयोगांना स्थान मिळाले. बोलीच्या जवळ असलेले यादवकालीन महानुभाव

गद्य ग्रंथ तुलनात्मक दृष्टया अभ्यासिले असता या ग्रंथात कर्तरी प्रयोगच आधिक्याने आढळून येतील. दखनी भाषेतली प्रयोग-व्यवस्था साहित्यिक मराठीपेक्षा यादवकालीन बोलीशी अधिक मिळती जुळती आहे.

प्रथम महानुभावांच्या गद्य ग्रंथातील काही उदाहरणे घेऊ.

या गद्यग्रंथांत कित्येक स्थळी प्रथमपुरुषी क्रियापदाच्या जागी तृतीयपुरुषी क्रियापदे आली आहेत त्याच प्रमाणे प्रथमांत कर्ता अपेक्षित (प्रमाण भाषेनुसार) असतो त्या स्थळी तृतीयांत कर्ताही योजण्यात आलेला आहे. उदाहरणार्थ :

- बाई, मी आतां चि आलां – लीळा, २६०
- मी मागा राहिलां – लीळा, १८८
- मी सरला होऊनि आलां – गोगोच, १९७
- मी घरासि येत होता – पंचो, १२६

विभागात आलेली दोन्ही वाक्ये कर्तरी प्रयोगात आहेत. वर्तमान मराठीत मात्र या वाक्यांचे प्रयोग कर्मणी होतील:

- भाटोबासांनी झोळ्या दृष्टीपूत केल्या
- मग तिहीं कुदळी फावडे आणिली.

आता दखनी भाषेतील काही उदाहरणे घेऊ

- हर यक कुसल बरच्या बना –अली १०२.
- हर यक बैल सो पांव दावन दिसे – अली १९४.
- हजारांच आपस यक को देखों तुमें –अली २०२

या तिन्ही वाक्यांतील क्रियापदे कर्त्याच्या लिंगवचनापुरुषांप्रमाणे चालणारी आहेत. पहिल्या दोन वाक्यांतील कर्ता प्रथमांत (प्रत्ययविरहित) असून शेवटच्या वाक्यातील कर्ता मात्र तृतीयांत असूनही प्रयोग कर्तरी आहे. आणखी काही उदाहरणे पाहा –

- मैने जीव दी मेरा तेरो हात में – लैला, ११०
- कही लैलाने अब मिल रहेंगे सदा-लैला, १०१.
- मेरे काज (मराठी –मज कारणे) तूं आजलग टुक सही – लैला, १०५

या तिन्ही वाक्यांतील प्रयोग कर्तरी आहेत. पहिल्या व तिसऱ्या वाक्यातील कर्ता प्रथमांत असून दुसऱ्या वाक्यात पूर्वार्धात कर्ता तृतीयांत आहे. वाक्याच्या उत्तरार्धात (हम) हा कर्ता अध्याहृत घ्यावा लागतो तो वर्तमान सरणीनुसार. दखनी भाषेचा स्वभाव लक्षात घेता येथे (हमें) असेच रूप अध्याहृत घ्यावे लागेल. वर्तमान हिंदी/उर्दूत ही वाक्ये कर्तरी राहणार नाहीत.

वर दिलेल्या उदाहणांवरून दोन बाबी स्पष्ट होतात.

१) दखनी भाषेत प्राधान्याने कर्तरी प्रयोग रूढ आहे, आणि

२) तृतीयांत कर्ता व भूतकाळी सकर्मक क्रियापद असताही दखनीत कर्तरी प्रयोगच होतो. वर्तमान मराठीत अशा परिस्थितीत कर्मणी प्रयोग होत असला तरी यादवकालीन मराठीत हा नियम पाळला जात नाही.

दखनी भाषेचा हा स्वभावधर्म लक्षात न आल्याने हिंदी पंडितांची या भाषेच्या व्याकरणाबाबत बरीच दिशाभूल झाली आहे. तृतीयेच्या 'ने' या प्रत्ययावर पंडितांनी बरेच वाद घातले आहेत. डॉ. श्रीराम शर्मा यांनी 'ने' प्रत्ययांत प्रयोगच मुळात अपवादात्मक मानले आहेत. [१] तर डॉ. सक्सेना यांच्यासारखे विद्वान हा प्रत्यय अनियमितपणे लागतो असे नमूद करतात. तसे पहिले तर हिंदी-उर्दू भाषेत होणाऱ्या 'ने' प्रत्ययांत नामांच्या उपयोगावरून भाषेतल्या 'ने'प्रत्ययाचा निर्णय लावणे चुकीचे ठरेल. कारण, या बाबत दखनी भाषेची स्वतःची अशा काही ढब आहे. तद्नुसार हा प्रत्यय लागतो. तो अपवादात्मक नाही तसा अनियमितही नाही. हिंदी – उर्दू भाषेत ज्या वाक्यात नामाला 'ने' प्रत्यय अपेक्षित असतो त्या स्थळी तो लागावा असे गृहीत धरण्याचे कारण नाही. कारण, या भाषा वेगळ्या आहेत आणि प्रत्येक भाषेला स्वतःचे व्यक्तिमत्व असते. हिंदी-उर्दू आणि मराठी या भाषांतही व्याकरणाप्रमाणे आवश्यक न वाटणाऱ्या स्थळीही दखनीत नामाला 'ने' प्रत्यय लागतो.

उन्ने काम करी; अब्दुल्लाने चाकरी कऱ्या ; फातिमाने बाताँ करी इ. असे प्रयोग बोलीत व साहित्यात रूढ आहेत. इतकेच नव्हे तर हिंदी –उर्दूत ज्या स्थळी 'ने' प्रत्यय लागतो त्या स्थळी प्रत्ययविरहित नामाचा उपयोगही दखनीत होत असतो – **मैं** काम कऱ्या; **मैं** खाना खाया ; **अब्दुल्ला** मच्छी पकड्या इ.

श्री. देविसिंग चौहान यांनी 'ने' प्रत्ययांत नामाच्या उपयोगास मराठीप्रभाव कारणीभूत ठरला आहे असे मत दिले आहे. त्यांच्या मतें 'ने' या विभक्तिप्रत्ययाचा दखनीत होणारा उपयोग मराठी इतकाच नियमित वा अनियमित आहे.[२]

वस्तुतः हा प्रश्न नामांना लागणाऱ्या 'ने' प्रत्ययाशी संबंधित नसून तो दखनी भाषेच्या प्रयोग-व्यवस्थेशी निगडित आहे. या भाषेतल्या प्रयोग – व्यवस्थेच्या अनुसंधानाने या विशेषाचा विचार होणे अगत्याचे आहे. आत्मनेपदाचा प्राकृतात लोप झाल्याने प्राकृतात कर्तरी प्रयोगास प्राधान्य मिळाले हा उल्लेख पूर्वी येऊन गेला आहे. संस्कृतीकरणाच्या प्रभावामुळे मराठीने तिन्ही प्रकारचे प्रयोग स्वीकृत केलेले असले तरी मराठी बोलीत मात्र क्रियापद कर्तृगामी ठेवण्याचा विशेष अवशिष्ट राहिला आहे. या संबंधीची उदाहरणे अगोदर येऊन गेली आहेत. प्रमाण भाषेच्या दृष्टीने (मराठी, हिंदी व उर्दू) अनियमित वाटणारा 'ने' प्रत्ययांत नामांचा उपयोग हा कर्तृप्रधान वाक्यरचनेचाच एक भाग असून प्राकृताचे हे वैशिष्ट्य मराठी बोलीच्या माध्यमातून दखनीत संक्रांत झाले आहे.

यादवकालीन मराठीप्रमाणेच वर्तमान काळातील कसरगोडच्या बोलीत देखील सारखेच 'अनियमित' प्रयोग आढळतात:

अनुक्रमणिका

रामो एक गाडी आडला	(प्रमाण मराठी : **रामाने** एक गाडी आणली दखनी : **रामाने/रामा** एक गाडी लाया)
मी तेले येकु बुकू देलो	(प्रमाण मराठी : **मी** त्याला एक पुस्तक **दिलें,** दखनी: **मैं/मैंने** उसे एक किताब **दिया**)
मी येकी कागद अडलो	(प्रमाण मराठी : मी एक पत्र **आणले**. दखनी: **मैं/मैने** एक खत **लाया**)
बाई मले योकी बुकू देलेनी	(प्रमाण मराठी : बाईने मला एक पुस्तक **दिले,** दखनी: अम्मा मुझे एक पुस्तक **दी**) [३]

या चारही वाक्यांतील क्रियापदे कर्तृगामी आहेत. दखनी भाषेतही ती कर्तृगामीच राहतात. प्रमाण मराठीत मात्र क्रियापद कर्त्यानुसार बदलल्याचे आढळेल. कसरगोडच्या मराठी बोली प्रमाणेच दखनी भाषेतही कर्तृप्रधान वाक्यरचना ठेवण्याकडे असलेला कल या उदाहरणांवरून ध्यानात येईल.कुडाळी,महाडची कुणबी आणि ठाण्याची वारली या बोलींतही अशाच प्रकारे कर्तरी प्रयोगास प्राधान्य मिळालेले आढळेल.[४] तेलंगणातील अरे – मराठा बोलीत देखील हाच विशेष आढळतो –[५]

तेनं आला; **तिनं** काम **केली,मियाँ** जुंदले पेरलो इ. अशी वाक्ये या बोलीत प्राधान्याने येतात. वरील उदाहरणातील क्रियापदे कर्त्याच्या लिंगवचन भेदाने बदलली आहेत असे दिसून येईल.

या संदर्भात मराठी बखर वाङ्मयाची साक्ष महत्त्वाची ठरते. बखरीत कर्तृप्रधान वाक्यरचना प्राधान्याने आढळेल. 'भाऊसाहेबांची बखर' या ग्रंथातील वाक्यरचनेचा विचार करताना संपादक श्री. शं. ना.जोशी यांनी पुढील विचार मांडले आहेत-

"या बखरीत जी वाक्य-रचना आली आहे तीत तृतीयांत कर्ता आणि कर्तरी प्रमाणे क्रियापद अशी वाक्ये पुष्कळ म्हणजे कर्मणी प्रमाणे वाक्याचा आरंभ पण कर्तरी प्रमाणे वाक्याचा शेवट; अशी वाक्ये हा साने यांनी एके ठिकाणी भाषा-दोष म्हणून सांगितला आहे." (सप्तप्रकरणात्मक चरित्र, पृ. ८.)

श्री. जोशी यांच्या मते अशाप्रकारची वाक्ये हा भाषादोष नसून तत्कालीन भाषेचा तो एक विशेष आहे. या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनी भाऊसाहेबांच्या बखरीतील अनेक वाक्ये उद्धृत केली आहेत. ही वाक्यरचना दखनी वाक्यव्यवस्थेस किती जवळची आहे याची कल्पना पुढील उदाहरणांवरून करता येईल–

१) भाऊसाहेब यांनी मुक्काम करून तेथें राहिले. (परिच्छेद ११५)
२) त्याणें हिंमत धरून सोबतीस होते. (परि. १३६)
३) सर्वत्रांनी हिंमत करून जानकोजी शिंदे याजवर नजर ठेवून राहिले. (परि. १७)
४) येसाजी भोइरे यांणीं जागा सोडून पळू लागले. (परि. ११३)

अनुक्रमणिका

एकूण प्रमाण भाषेच्या दृष्टीचे मानण्यात येणारा उपरोक्त दोष हा वस्तुतः दखनी आणि मराठी या दोन्ही भाषांत आढळून येणारा एक विशेष आहे. दखनीने तो समकालीन मराठी बोलीतून उचलला. बखरसाहित्यात या मराठी बोलीचे संरक्षण झाले आहे. आता ही दखनी उदाहरणे पाहा –

- कह्या शाह उस्ताद अब्दुल यूं सुन – इब्रा, १००.
- दिया रूप शाहने सो दहलीज लाल- इब्रा, १५९.

ही दोन वाक्ये प्रमाण भाषेस अनुसरून आहेत. परंतु-

- मैं येकायेक देखी खाब – लैला,१०९

या वाक्यात प्रमाण भाषेनुसार वाक्य कर्मानुसरी असावयास पाहिजे होते. त्यासाठी कर्ता तृतीयांत आणि क्रियापद कर्मगामी पुल्लिंगी असणे आवश्यक होते. तसे न होता भाऊसाहेबांच्या बखरीत आलेल्या वाक्याप्रमाणे ही रचना झाली आहे. पुढील वाक्यांतील तृतीयांत कर्ता याच विशेषाचा निदर्शक आहे-

- **लैलाने** काही आय बशर होश धर – लैला, १०९
- खुदाके **दोस्तोने** बोला है – सब, १७.
- **उननने** हक बोल्या है – सब, ९३.

या तिन्ही वाक्यांत क्रियापद अकर्मक असून भूतकाळी असले तरी कर्ता प्रथमांत अपेक्षित आहे. वरील विवेचनाच्या आधारे दखनी भाषेतील प्रयोग- व्यवस्थेसंबंधाने पुढील निष्कर्ष काढता येतील –

१. दखनी भाषेत प्रयोग दोनच –कर्तरी आणि कर्मणी. त्यातूनही कर्मणी प्रयोग गौणरुपाने प्रचलित असून कर्तरी प्रयोग असलेली वाक्येच प्राधान्याने आढळून येतात. ‘लीळाचरित्र’ व ‘गोविंदप्रभुचरित्र’ या मराठी गद्यग्रंथांतही असेच प्रयोग आढळतील.

२. भाषेच्या या स्वभावधर्मामुळे प्रमाण भाषेत सकर्मक क्रियापद भूतकाळी असताना होणारा कर्मणी प्रयोग दखनी वाक्यरचनेत मात्र कर्तरीच राहतो. अकर्मक क्रियापद भूतकाळी असताना कर्ता सहसा तृतीयांत येत नाही. परंतु दखनी भाषेत मात्र तो तृतीयांत असतो. ज्या स्थळी तृतीयांत कर्ता अपेक्षित असतो त्या स्थळी मात्र दखनी भाषेत प्रथमात कर्ता आढळेल. क्रियापदाचा काळ आणि अर्थ कोणताही असो वाक्याचा प्रयोग मात्र कर्तरी असावा हा मराठी बोलीत आढळणारा विशेष दखनी भाषेत दिसून येतो.
३.दखनी भाषेतील प्रयोग-व्यवस्था प्रमाण मराठीशी जुळणारी नसली तरी यादवकालीन मराठी बोलींतील प्रयोग-व्यवस्थेशी मात्र तिचे नाते अगदी जवळचे आहे. मध्ययुगातील मराठी बखरीत देखील अशाच प्रकारची प्रयोग-रचना निदर्शनास येते.

३. दखनी भाषेतील प्रयोग-व्यवस्थादेखील मराठी बोलीतील वाक्य –व्यवस्थेचे अनुसरण करणारी आहे असाच निर्वाळा या विवेचनाच्या आधारे देता येतो.

दखनी भाषेच्या वाक्यव्यवस्थेत असलेले इतरही काही विशेष याच ठिकाणी नमूद केले पाहिजेत. प्रत्येक भाषेची स्वतःची अशी घडण असतेच. वाक्यरचेनेवर तिचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम होतातच. पद्यापेक्षा गद्यग्रंथांत असे विशेष व्यक्त होण्यास अधिक अवसर मिळतो. दरबारी काव्ये वगळता दखनी भाषेत गद्य-पद्य

रचना करणाऱ्या कवींनी सामान्यपणे लोककथा व लोकजीवन यांचा आधार घेतला आहे. त्यामुळे केवळ बोलीत रूढ असणारे काही विशेष दखनीच्या साहित्यातही प्रविष्ट झाले आहेत.

'बोलके' हा असाच एक शब्द आहे. तो बोलीत प्रचलित आहे. साहित्यातही तो डोकावतो. 'बोलके' (म्हणून-नावाचा या अर्थी) हे कृदन्त असून कथाकाव्यात येणाऱ्या पात्रांच्या नावांचा उल्लेख 'बोलके' सह येत असतो- दशरथ बोलके एक राजा अथा. (दशरथ म्हणून (नावाचा)एक राजा होता.) मराठी बोलीत बोलके'चा 'म्हणून' हा प्रतिनिधी आजही वावरतो. 'म्हणून' या अर्थानेही 'बोलके'चा प्रयोग होतोच. उदा.-

- मैं क्या पाप करी बोलके ऐसा शोहर मिल्या. (मी काय पाप केले म्हणून असा नवरा मिळाला.)
- पापाँ भोत बोलकेच पानी नइ पडता. (पापे पुष्कळ झाली म्हणूनच पाऊस पडत नाही.)

अन्य व्यक्तींची अवतरणे 'बोलके' पूर्वक येतात —

- उन्ने मैं नई आताउं बोलके कह्या. (त्याने मी येत नाही म्हणून सांगितले.)

'म्हणून' प्रमाणेच 'म्हणे'चाही उपयोग मराठी बोलीत होतो तसाच दखनीत 'कते' (कहते-म्हणे) या शब्दांनी होत असतो —

- उन्ने तालेवार है कते. (तो धनवान आहे म्हणे!)
- उनो आते कते. (ते येणार आहेत म्हणे !)
- उनकू घोडा नइ मिल्या कते. (त्यांना घोडा मिळाला नाही म्हणे.)

एखाद्या गोष्टीची प्रस्तावना 'त्याचं असं आहे' या शब्दांत आपण करतो. दखनीत देखील 'उसका क्या कि' असा प्रस्ताव होतो. मराठी 'त्याचं असं आहे' याचाच तो अनुवाद वाटतो.

लीळाचरित्रादी प्राचीन मराठी गद्यग्रंथांतून लोककथांच्या बोलीचे अनुसरण केलेले दिसून येते. प्रारंभीच्या दखनी गद्यातदेखील अशीच शैली आढळते. 'सबरस' या सूफी पंथाच्या तत्त्वज्ञानावर आधारलेल्या गदयग्रंथातून पुढे दोन उतारे उद्धृत करण्यात येत आहेत. ते वाचताना 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभुचरित्र' आदी ग्रंथांचे स्मरण होईल. 'सबरस'चा विषय तत्त्वज्ञानपर असला तरी प्रतिपादनशैली मात्र दृष्टांतपाठासारखी आहे.

- *'दुनिया को दिन की, कोई नई किसी का. आखिर रहेगा सो योच कदर जानता उसका. माल धन सब खरच जावेगा. आखिर योच काम आवेगा. आखिर नाम योच उचारेगा. तमाम योच है. काम योच है. यो खुदा की इनायत. यां क्या शिकायत?' —सबरस, १३*

- *'आरसी हात में होर मूं देखने नई आता. खिसा कमर में होर नगद लेने नई पाता. जीता है होर जीना बिसऱ्या. दरया में पड्या होर पानी पीना बिसऱ्या. सर में फूल होर दिमाग में बास नई, दिल में माना भऱ्या होर बात कहे नई जाती' — सबरस, ३५.*

एकूण दखनी वाक्यरचनापद्धतीवर देखील मराठी भाषेतील/बोलीतील वाक्यरचने- चे संस्कार झाले आहेत हे वरील विवेचनावरून ध्यानात येईल.

अनुक्रमणिका

रुपसिद्धी आणि प्रयोगव्यवस्था हे भाषेचे अंगभूत घटक असतात. वस्त्रालंकारासारखे ते उपरे नसतात. या दोन्ही क्षेत्रांत दखनीचे स्वतःचे असे वैशिष्ट्य आहे तसेच आत्मसात केलेले मराठी भाषेचे विशेषही. तसे पाहिले तर सोळाव्या शतकानंतरचे व जवळपास वैभवकाळातले दखनी साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले ते महाराष्ट्राबाहेर-विजापूर व गोवळकोंडा या राजधान्यांच्या परिसरात.या साहित्यावर तरी मराठी भाषेचे संस्कार कमी प्रमाणात होणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात तसे घडले नाही. शरीरावर असलेल्या जन्मखुणा वाढत्या वयाबरोबर त्याच प्रमाणात विस्तार पावाव्यात त्याप्रमाणे दखनीवरील मराठी भाषेचे संस्कार हे दखनी भाषेतील साहित्य-निर्मिती महाराष्ट्राबाहेर होऊनही कायम राहिले आहेत. या भाषेने आपल्या वैभव काळातही आपल्या मराठी पिंडाचे जाणीवपूर्वक रक्षण केले आहे.

वाढत्या काळाबरोबर अरबी-फारसी ग्रंथांतील विचारसंपदेची उसनवारी दखनीने मोठ्या प्रमाणात केली आहे. परंतु, त्या विचारांना शब्दरूप देताना मात्र दखनी विसंबून राहिली ती मराठी साहित्यात आणि बोलीत प्रचलित असलेल्या शब्दसंपत्तीवर. दखनी भाषेतील शब्दसंग्रहात मराठी साहित्यात आणि बोलीत आढळणारे विविध शब्द विपुल प्रमाणात आहेत. विशेषतः मराठी धातूंचे वैपुल्य लक्षात भरण्याजोगे आहे. रूपसिद्धीतही विभक्ती आणि आख्यातांच्या बाबतीत लक्षात भरेल एवढे मराठी वळण दखनीने उचलले आहे. वाक्यव्यवस्थेत मराठी बोलीत आढळणारी कर्तृप्रधान वाक्यरचना मराठी भाषेच्या संस्काराची निदर्शक आहे. इतकेच नव्हे तर सामाजिक अनुभूती आणि शैली यांच्या संदर्भातदेखील दखनी-मराठीचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे असल्याचे निदर्शनास येते. दखनी वाक्प्रचारदेखील या वैशिष्ट्यास दृढ करणारे आहेत हे पुढील प्रकरणातील विवेचनातून स्पष्ट होईल.

संदर्भ

१. "दक्खिनी में 'ने' का प्रयोग कम हुआ है. पुराने समय में एक दो स्थानोंपर कर्मकारक में 'ने' का उपयोग हुआ है. सकर्मक भूतकालिक क्रिया के साथ साथ कर्ताकारक में इस चिन्ह का कंहीं कंहीं प्रयोग होता है."
दक्खिनी के पुराने साहित्य में कंहीं कंहीं 'ने' का प्रयोग होता था, लेकिन उसके प्रयोग के लिये कोई नियम निर्धारित नही हुआ था.' — दक्खिनी भाषा और साहित्य. पृ. १८५

२. अब्दुलकृत इब्राहीमनामा, प्रस्तावना, पृ. १११ (श्री. चौहान यांच्या मताचा परामर्श परिशिष्टात घेतलेला आहे.)

३. Ghatge, Marathi of kasargod, p. 133.

४. Warli of Thana 70, 115, kunbi of Mahad 181, kudali 92.

५. श्रीधर कुलकर्णी, 'तेलंगणातील अरे — मराठा समाज: भाषा आणि संस्कृती '(पृ. १९४-१९७ या स्थळी यासंबंधी सविस्तर चर्चा झाली आहे.

अनुक्रमणिका

१४. दखनी भाषेतील वाक्प्रचार आणि म्हणी

सांस्कृतिक जीवनाचे 'संचित'

कोणत्याही भाषेतील वाक्प्रचार आणि म्हणी या केवळ शब्दार्थांच्या वाहक नसतात. त्यांना शब्दार्थांच्या पलीकडचे सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ असतात. त्यामुळे वाक्प्रचार आणि म्हणी यांचा अभ्यास करताना केवळ भाषाविषयक दृष्टीकोन अपुरा ठरतो. वाक्प्रचारांचे योग्य रीतीने आकलन व्हावयाचे असेल तर त्यांच्या मुळाशी असलेले हे सर्व संदर्भ लक्षात घेतले पाहिजेत.

या बाबतीत वेदांतातील कर्मविषयक सिद्धांत बराच उद्बोधक ठरतो. या सिद्धांताप्रमाणे कर्माचे एकूण प्रकार तीन – संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण. मानवाच्या हातून घडणाऱ्या कोणत्याही बऱ्या वा वाईट कर्माचे फळ त्याला केव्हातरी भोगावे लागते – या जन्मी नाही तर पुढच्या. याला अपवाद फक्त निष्काम व भक्तियुक्त कर्मांचा, कारण, ही कर्मे 'निष्फळ' असतात. अन्य कर्मे मात्र इष्टानिष्ट फलदायी असल्याने फलभोगावाचून जिवाला सुटका नसते. हे फलभोग संपेपर्यंत जिवाला जन्ममृत्यु यांच्या आवर्तात प्रवास करावा लागतो. म्हणूनच जन्माला आलेला जीव हा पूर्वकर्माचे 'गाठोडे' घेऊनच जन्माला येत असतो. यालाच 'संचित' ही संज्ञा आहे. जन्म घेतल्यावर जिवाच्या हातून जी कर्मे घडतात ते 'क्रियमाण' आणि ज्या कर्मांच्या भोगास प्रारंभ झालेला असतो ते 'प्रारब्ध'. प्रारब्ध कर्माचा पुरवठा 'संचितातून' होत असतो आणि 'क्रियमाण' हे पुन्हा संचितात भर घालत असते. अस त्रिविध कर्मांचे चक्र व त्याबरोबरच जन्ममृत्यूचेही चक्र सुरु असते.

भाषेतील वाक्प्रचार आणि म्हणीच नव्हे तर शब्दार्थांना असलेले संदर्भदेखील या संचितासारखे असतात. नव्याने उदयास येणारी भाषा पूर्ववर्ती भाषेतील शब्दसंपत्ती आपल्या पद्धतीने स्वीकारते व नवा संसार मांडू लागते. तोवर झालेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाच्या संचितावर ही उभारणी होत असते. भाषेतील वाक्प्रचार या संचिताचाच एक अविष्कार असतो. कारण, भाषा नवी असली तरी सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या सातत्यात खंड पडलेला नसतो. त्यामुळे नव्या भाषेला देखील या 'संचिता' चा पुरवठा सातत्याने होत असतो. मराठी भाषेचेच उदाहरण घेऊ या. या भाषेचा उद्भव आठव्या शतकातला. तथापि, मराठी भाषेला लाभलेली सांस्कृतिक व सामाजिक परंपरा आठव्या शतकापेक्षा कितीतरी आधीची आहे, पुरातन आहे. म्हणूनच वेदकालीन संस्कृतीवर देखील ती आपला हक्क सांगू शकते.

'संपुष्टात येणे' हा वाक्प्रचार घ्या. 'संपणे' व संपण्याच्या बेतात असणे' हा या वाक्प्रचारचा अर्थ. हा अर्थ या वाक्प्रचारास कसा आला हे पाहणे मनोरंजक ठरेल. देवांची पूजा झाल्यानंतर सर्व देव झाकण असलेल्या संपुष्टात ठेवून देण्याची प्रथा काही संप्रदायात आहे. पूजा आटोपत आली की देव संपुष्टात ठेवण्यात येतात. या प्रभेवरून 'संपुष्टात येणे' हा वाक्प्रचार रूढ झाला. आणि त्याबरोबरच विचार संपुष्ट मात्र गतार्थ झाले! देव संपुष्टात ठेवण्याची प्रथा काही संप्रदायात आज विद्यमान आहे तशीच ती मराठी भाषेच्या विकासकाळात वा तत्पूर्वीही अस्तित्वात असावी. या 'संचिता'वर हा वाक्प्रचार आधारलेला आहे.

सांस्कृतिक परंपरेप्रमाणेच जनसामान्यांचा अनुभवही काही वाक्प्रचारात दडलेला असतो. कोणत्याही एका भाषिक समाजाचा तो अनुभव नसतो तर ते अनेक पिढ्यांचे संचित असते. 'झाड तसे फळ', 'खाण तशी माती' यांसारख्या म्हणी हा एकाच भाषिक समाजाचा वारसा नसून तो भिन्न काळातील असा सार्वत्रिक अनुभव असतो; प्रत्येक पिढीने तो जपलेला असतो व भाषेच्या 'संचितात' तो भर घालीत असतो.

मानवी मन आणि सामाजिक जीवन यांचे प्रतिबिंब धारण करणारे वाक्प्रचार व म्हणी प्रत्येक भाषेत असतात. 'गुडघ्याला बाशिंग बांधणे' या म्हणीत असलेला वाच्यार्थ आज लोपला आहे. उतावळेपणा दर्शविण्यासाठी तिचा उपयोग आज होत असतो. लग्नासाठी उतावीळ झालेली व्यक्ती स्वतःच्या गुडघ्याएवढ्या मुलीशी देखील विवाहबद्ध होण्यास सिद्ध असते यावरून 'गुडघ्याला बाशिंग बांधणे' हा वाक्प्रचार रूढ झाला. वस्तुतः गुडघा हे बाशिंग बांधण्याचे स्थान नव्हे. येथे लक्षणेने जो अर्थ घ्यावयाचा तो अल्पवयीन कन्येस अनुलक्षून आहे. तोच प्रकार 'हळदीचा डाग लागणे' या वाक्प्रचाराचा. संसारसुखाची ओळख होण्यापूर्वी विधवा झालेल्या स्त्रीस अनुलक्षून हा वाक्प्रचार येतो. त्याच्या मुळाशी असलेली रूढी आजही पूर्णपणे अर्थहीन झालेली नाही.

सुबोधता आणि सार्वत्रिकता

अनेक पिढ्यांच्या व्यवहारज्ञानाचे फलित देखील वाक्प्रचारांनी जतन करून ठेवलेले असते. 'करावे तसे भरावे' ही म्हण महाभारतकाळीही प्रचलित होती. (करोति यादृशं कर्म तादृशं प्रतिपद्यते ॥ १२-२९०-२२). 'जशास तसे' या म्हणीच्या ऐवजी 'ये यथा मां प्रपद्यन्ते ताँस्तथैव भजाम्यहम्' ही गीतेतील उक्ती मूळ गीतेतला संदर्भ निराळा असूनही योजण्याची प्रथा आहे.

'उष्ट्या हाताने कावळा मारला नाही.' या वचनाचा उपयोग कंजूष माणसाच्या बाबतीत होत असतो. या वाक्प्रचाराच्या मुळाशी असलेली वृत्ती सहसा लक्षात घेतली जात नाही. कृपण माणूस उघड्यावर जेवत असताना कावळा जवळ आला तरी त्याला दूर सारण्याचा प्रयत्न करीत नाही. कारण, त्याचा हात उष्टा असतो. त्याला खाद्याचा भाग लागलेला असतो. कावळ्याला हाकलताना हाताला लागलेला अन्नांश खाली पडेल व आपला वाटा कमी होईल या भीतीने तो उष्ट्या हाताने कावळा मारीत नाही. ही मनोवृत्ती या वाक्प्रचाराच्या मुळाशी आहे. ही मनोवृत्ती सर्वकालीन समाजाच्या परिचयाची असल्याने वाक्प्रचारात या वचनास स्थान मिळाले.

लोककथांतून सहजगत्या येणारी काही वाक्येदेखील अशीच सार्वकालीन अनुभवांनी युक्त असतात. पुढे कथेचा संदर्भ तुटतो आणि अशी वाक्ये म्हणीदाखल योजण्यात येतात. 'आंब्याला आला पाड आणि कावळ्याला आला मुखरोग' ही म्हण आपल्या परिचयाची आहे. तत्पूर्वी दारिद्र्याचा भरपूर अनुभव घेतल्यावर वैभव आले असताना त्याचा उपभोग घेण्याची क्षमता न लाभलेल्या व्यक्तींच्या बाबतीत या म्हणीचा उपयोग होतो. एकाच आम्रवृक्षाच्या आश्रयाने राहणाऱ्या भाग्यवान व करंट्या (कावळा) पक्ष्यांच्या कथेतून ही म्हण रूढ झाली असणे असंभवनीय नाही. अभिजात साहित्यातील कित्येक वचनांचाही उपयोग म्हणीसारखा होत असतो. 'भगवंताच्या इच्छेने विषाचे अमृत आणि अमृताचे विष होते' या अर्थाच्या कालिदासाच्या वचनाने आज म्हणींचे रूप धारण केले आहे. 'राजशेखराच्या' कर्पूरमंजरी या नाटकात 'हातीच्या काकणांना आरसा कशाला?' हे वाक्य कथेच्या ओघात आले आहे. आज मात्र त्याचा उपयोग म्हणीप्रमाणे होतो. दखनी साहित्यातही 'हात कंगन करत आरसी क्या' (सुखांजन, १३३) ही म्हण प्रचलित आहे.

सुबोधता, सूत्रात्मकता आणि सार्वत्रिकता या गुणांमुळे वाक्प्रचार आणि म्हणी अशिक्षितांच्या तोंडी सहज बसतात. थोडक्या शब्दांत बरेच काही सांगू पाहणारा असंस्कृत समाज आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी वाक्प्रचार आणि म्हणी यांचा आश्रय मोठ्या प्रमाणात घेत असतात. लोककथांतही म्हणींचा वापर मोठ्या प्रमाणावर झालेला आढळतो.

दखनी भाषेतील वाक्प्रचार आणि म्हणी यांचा अभ्यास करताना ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक असते. दोन भाषांचा तुलनात्मक अभ्यास करताना पूर्वपरत्व लक्षात घेऊन पूर्ववर्ती भाषेचे कोणते विशेष उत्तरकालीन भाषेने स्वीकारले याचा निर्णय लावणे सोपे असते. म्हणी आणि वाक्प्रचार यांच्या बाबतीत मात्र असा निवडा करता येत नाही. समान म्हणी दोन भाषांत आढळल्या तरी त्यांची उसनवारीच झाली असेल असे निःशंकपणे सांगता येत नाही. कारण, वाक्प्रचार आणि म्हणी हा 'संचिताचा' आविष्कार असतो. अशा प्रकारचे 'संचित' प्रत्येक भाषेस स्वतंत्रपणे लाभू शकते त्यासाठी उसनवारीच केली पाहिजे असे नाही. दखनी-मराठीत समान असलेल्या म्हणी फारतर सामाजिक व सांस्कृतिक अनुभवांची समान भागीदारी सूचित करणाऱ्या ठरतील. पण, ती केवळ उसनवारी आहे असे निर्विवादपणे म्हणता येणार नाही. एवढे मात्र खरे की, या दोन्ही भाषांत समान वाक्प्रचार आणि म्हणी विपुल आहेत. अधिकांश दखनी वाक्प्रचारांत निखळ मराठी शब्दही आढळतात. त्यामुळे उसनवारी नसली तरी दखनी-मराठी या दोन्ही भाषांचे संचित समान होते एवढे तरी मान्य करणे क्रमप्राप्त ठरते.

समान सामाजिक अनुभव

युद्धविषयक वाक्प्रचारांत दखनी –मराठीचे साधर्म्य विशेषेकरून जाणवते. घोडा फेकना, चाल करना, पाय उतार होता, भांडी/तोप दगाना (डागने), दानाँ दान करना, धूलधान करना, नाव करना, मान का पान उठाना, मूं का पानी गंवाना, गरब गलना (गर्भगळित होणे), सर बांच्या तो मुंडासे हजार, झोंटधरनी यांसारखे कितीतरी वाक्प्रचार दखनी साहित्यात आढळतील तसेच ते बखरीत आणि प्राचीन कवींनी केलेल्या युध्दवर्णनांत योजण्यात आले आहेत. अशा दखनी वाक्प्रचारांत मराठी शब्दांना भरणा अधिक असतो हे विशेष.

असाच प्रकार स्त्रियांच्या तोंडी असलेल्या म्हणी- वाक्प्रचारांतदेखील आढळतो. 'भट पडो' आणि 'तळपट होवो' ही शापवाणी सामान्यपणे स्त्रियांच्या तोंडून बाहेर पडते. 'भट पडो' याचा शब्दशः अर्थ आहे 'किडे पडोत.' शिवीगाळ करताना ग्रामीण दखनीभाषी स्त्रिया 'तेरे कबर में किडे पडो' असा शाप देतात. त्याचप्रमाणे मराठी भाषी ग्रामीण महिला असत्य भाषण करणारांस अनुलक्षून 'मेल्याच्या तोंडात किडे पडोत' अशी शापवाणी उच्चारतात.'भट पडो' हा मराठी वाक्प्रचार याच अर्थाचा असून तो दोन्ही भाषांत रूढ आहे. होनाजीच्या एका कवनातही या वाक्प्रचार येतोः 'संसार भट पडो दोघांमधि आड पर्वत आले. 'तळपट होवो' – सर्वनाश अथवा अकल्याण होवो या अर्थाने येणारा हा वाक्प्रचार मराठीत फक्त स्त्रियांच्या तोंडी येतो. 'म्हणति आदित्याहि सख्या त्या मेल्याचें समूळ तळपट हो' – या पंक्तीत मोरोपंतांनी हा वाक्प्रचार स्त्रियांच्या तोंडी घातला आहे. दखनी भाषेत मात्र या वाक्प्रचाराच्या बाबतीत असा पंक्तिप्रपंच होत नाही! 'इलाही तूं दुश्मन कुं तळपट कर' (कुमु. १०८) या पंक्तीत तो पुरुष-कवीच्या मुखातून बाहेर पडला आहे.

'पाठराखणी' हा मुळात स्त्रियांशी संबंधित असलेला वाक्प्रचार प्राचीन सामाजिक परंपरेचा निदर्शक आहे. बालविवाह रूढ होते त्या काळात विवाहितेस प्रथमच सासरी पाठविताना पोक्त स्त्री 'पाठराखणीस'पाठविण्याची प्रथा असे. सासरच्या अपरिचित वातावरणात नवविवाहितेस सर्व प्रकारे सांभाळून घेण्याची जबाबदारी या पाठराखणीवर असे. पुढे केव्हा तरी पाठराखणीत असलेल्या भावार्थाचे सामान्यीकरण झाले आणि साथ देणे, संरक्षण करणे या अर्थाने हा वाक्प्रचार प्रचलित झाला. तो दखनी भाषेनेही उचलला.

‘खुदा तिस मदु होकर रखता है पीट’ (अली, १९६) या पंक्तीत परमेश्वर, इब्राहीम आदिलशाहाचे संरक्षण करीत आहे असा भाव आहे. समर्थांनीही याच अर्थाने तो योजला आहे’ – मग ते लोक पाठी राखिती। नाना प्रकारें ॥(दासबोध).

एका शब्दाभोवती गुंफलेले वाक्प्रचार

एकाच शब्दाभोवती गुंफलेले अनेक वाक्प्रचार दखनी – मराठीत समान आहेत. विशेष म्हणजे या वाक्प्रचारात दखनीने मूळ मराठी शब्द कायम ठेवले आहे. बाँट (मराठी-वाट) हा शब्द उदाहणादाखल घेऊ या. या शब्दांशी संबंधित असलेले पुढील वाक्प्रचार दखनी-मराठीत रूढ आहेत –

बाँट देखना (वाट पाहणे), बाँट काडना (वाट काढणे), बाँट पकडना (वाट धरणे), बाँट जाना (वाटी जाणे), बाँट पाडना ((नवी) वाट पाडणे), बाराबाँट होना (बारावाट होणे, विस्कळित/नष्ट होणे).
‘जीव’ या शब्दाशी निगडित असलेले असेच कित्येक वाक्प्रचार आहेत-

जीव न रह्यना (जीव न राहणे), जीव पों उटना (जिवावर उठणे), जीव पों खेलना (जिवावर/जिवाशी खेळणे), जीव लाना (जीव लावणे) इ.

- खेल्या है अपने जीव पों शतरंज – अली ११४
- नको जीव ला इस दगाबाज सों – कुमु. ६.

या दखनी वाक्प्रचारांतमराठी शब्दच योजलेले असल्याने ती मराठी भाषेची उसनवारी आहे यात शंका नसावी.

दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेले कितीतरी समान वाक्प्रचार दखनी – मराठीत रूढ आहेत.
इधर बाई उधर कुँवा (इकडे आड तिकडे विहीर), कान भरना (कान भरणे), गरब गलना (गर्भगळित होणे), नाँव छोडना (नाव सोडणे/टाकणे, संबंध तोडणे), साटे बुदऱ्हाटे (साठी बुद्धी नाठी),

समान सांस्कृतिक जीवनाचा वारसा

म्हणी आणि वाक्प्रचार यांच्या बाबत कोणी कोणाची उसनवारी केली याचा निवाडा करणे नेहमीच सुलभ असते असे नव्हे. तथापि, भाषोत्पत्तीचे पूर्वापरत्व आणि उभय भाषांचे साहचर्य या गमकांच्या आधारे थोडीफार दिशा मिळू शकते.शब्दसंग्रह आणि रुपसिद्धी यांच्या बाबतीत दखनी भाषेवर असलेला मराठीचा प्रभाव लक्षात घेता मराठी म्हणी व वाक्प्रचार यांचे प्रतिध्वनी दखनीत आढळतात असे मानणे अशास्त्रीय ठरू नये.विशेषतः मराठी शब्द असलेल्या वाक्प्रचारांच्या बाबतीत तर संशयाला जागा नसते.

म्हणी आणि वाक्प्रचार भाषेचे वैभव सूचित करतात त्याचप्रमाणे ते सांस्कृतिक व सामाजिक जीवनाचेही वाहक असतात. या दृष्टीकोनातून दखनी म्हणी व वाक्प्रचार यांचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की दखनी भाषा मराठीच्याच सांस्कृतिक व सामाजिक प्रांगणात नांदत होती. ‘अवतार पैदा करना’ हा वाक्प्रचार उदाहरणार्थ घेऊ. अवतार –कल्पना इस्लामी तत्त्वज्ञानात बसत नाही. तरीही हा

वाक्प्रचार दखनीत रूढ आहे. कारण, दखनी ज्या वातावरणात नांदत होती त्यास अवताराचे वावडे नव्हते.'हतेली में बेहेस्त (भिस्त) दिखाना' या वाक्प्रचारचे आणखी एक उदाहरण या संदर्भात देता येईल. 'तळहातात ब्रह्म दाखविणे' अथवा 'तळहातात स्वर्ग दाखविणे' या मराठी वाक्प्रचाराचा तो प्रतिध्वनी आहे. एखादा धूर्त माणूस आपल्या वाक्पाटवाने सत्याभास निर्माण करू लागला म्हणजे या म्हणीचा उपयोग होत असतो. वेदांतातील एका दृष्टांतात या वाक्प्रचाराचा उगम आहे. सद्गुरूने परब्रह्माचे अनुभवजन्य ज्ञान सत्शिष्यांस संक्रमित केले म्हणजे शिष्यास ब्रह्माचे सर्वांगीण दर्शन घडते, कसे तर तळहातावर ठेवलेला आवळा सर्व बाजूंनी पाहता येतो त्याप्रमाणे.

आता 'ब्रह्मा' ही संकल्पना इस्लामी परंपरेत न बसणारी आहे. हे लक्षात घेऊन दखनीत 'ब्रह्म'च्या जागी 'स्वर्गांस्त (बेहेस्त) प्रतिष्ठापना करण्यात आली एवढेच! – आणि 'तळहातात स्वर्ग दाखविणे' ही म्हण मराठीत रूढ आहेच.

'चुलीतले लाकूड चुलीतच जळावे' ही मराठी म्हण 'जिस चुले की लकडी उसीमेंच अच्छी जलती' या रूपात दखनीत आली आहे. विवाहोत्तर सासर सोडून दीर्घकाळ माहेरी राहणाऱ्यास स्त्री संबंधी ही म्हण आहे. माहेर कितीही संपन्न व जिव्हाळ्याचे असले तरी ते विवाहितेचे 'खरे घर' नसते, तिचा निभाव माहेरी लागत नसतो. सासर हेच तिचे योग्य स्थान होय. समान विचारांच्या एकाच सामाजिक परिघात दखनी – मराठी या दोन्ही भाषा नांदत असल्याकारणाने उपरोक्त मराठी म्हण दखनीत सहजगत्या रूढ होऊ शकली.

अशी किती तरी उदाहरणे देता येतील. जिज्ञासूंना अधिक अभ्यास करता यावा या हेतूने काही दखनी म्हणी आणि वाक्प्रचार सोबतच्या शब्दकोशात दिले आहेत. दखनी साहित्याची निर्मिती महाराष्ट्रात झाली तशीच ती महाराष्ट्राबाहेरही झाली. किंबहुना मराठी भाषेच्या क्षेत्राबाहेर निर्माण झालेल्या दखनी साहित्याचे प्रमाण अधिक आहे. त्याचप्रमाणे दखनी बोली महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही आज प्रचलित आहे. तथापि, दखनी साहित्याच्या भाषेने व बोलीनेही आपल्या माहेरचे मराठी वळण सोडलेले नाही याचा बोध या भाषेच्या इतर अंगोपांगांप्रमाणेच वाक्प्रचारांवरूनही सहजगत्या होईल.

१५. मऱ्हाटी संस्कृतीची राष्ट्रीय कामगिरी

महाराष्ट्राचे समग्र सांस्कृतिक जीवन आणि मराठी भाषा व साहित्य यांचे सर्वांगीण आकलन करून घेण्यासाठी केवळ महाराष्ट्राच्या भौगोलिक सीमेत अथवा मराठी भाषा व मराठी साहित्य यांच्या मर्यादेत केलेली शोधयात्रा अपुरी आणि अपर्याप्त ठरते. असे मी प्रारंभीच म्हटले आहे. महाराष्ट्र हा एका खंडतुल्य राष्ट्राचा एक भाग आहे. यामुळे राष्ट्रात अन्यत्र घडणाऱ्या ऐतिहासिक वा सामाजिक घडामोडींपासून तो अलिप्त राहू शकत नाही. देशातल्या वातावरणाचे पडसाद कमीअधीक प्रमाणावर महाराष्ट्रात आणि मराठी साहित्यात उमटणे अपरिहार्य असते. या देशात अनेक भाषा आहेत. या भाषांची मूळ कुळेही भिन्न आहेत. तरीही एका अदृश्य पण प्रत्ययकारी भावबंधाच्या योगाने भिन्न भाषा बोलणारे समाज परस्परांशी संबद्ध झालेले आहेत. भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेची जोपासना हे भावबंध सातत्याने करीत असतात. त्यामुळेच प्रादेशिक भेद आणि भाषांची भिन्नता जमेस धरूनही एका सांस्कृतिक परिघात भारतीय समाज नांदत असतो. भारताच्या सांस्कृतिक जीवनातील चढ – उतार आणि विभिन्न प्रवाह भिन्न प्रदेशांत व विभिन्न भाषांतील साहित्यात कालानुसार प्रतिबिंबित झालेले दिसतात. याचे कारण या देशातील सांस्कृतिक जीवनाची मूलभूत एकात्मता हे देता येईल. ही एकात्मता कधी सुप्त असते तर, कधी एखादे निमित्तकारण घडून मूळ रुपात अभिव्यक्त होते.

मराठी साहित्यातील प्रवाहांचा अनुबंध देशातल्या अन्य भाषांशी कुठे तरी जोडला गेलेला आहे. हे अनुबंध ध्यानात न घेता महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन आणि मराठी साहित्यातील प्रवाह यांच्यासंबंधी काढलेले निष्कर्ष एकांगी ठरण्याचा दाट संभव असतो. उलट, व्यापक राष्ट्रीय भूमिकेतून महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन आणि मराठी साहित्य यांचे परीक्षण झाल्यास एक वेगळे चित्र दिसू लागते. अनुत्तरित राहिलेले कितीतरी प्रश्न या भूमिकेतून सुटतात. इतकेच नव्हे तर आपल्या सांस्कृतिक जीवनाचे व साहित्याचे निराळेच स्वरूप या भूमिकेतून प्रत्ययास येते.

प्राचीन इतिहास लक्षात घेता असे आढळते की महाराष्ट्रातील वैचारिक व सामाजिक आंदोलने आणि साहित्य –निर्मिती यांना निरंतर राष्ट्रीय संदर्भ लाभलेला आहे. महाराष्ट्रात झालेला दखनी भाषेचा उद्भव देखील या व्यापक संदर्भाचाच एक अविष्कार आहे. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचे जे प्रकृतिधर्म या निमित्ताने अभिव्यक्त झाले ते लक्षात घेण्यासाठी महाराष्ट्राच्या चतुःसीमेच्या पलीकडे व मराठी साहित्याच्या क्षेत्रमर्यादा ओलांडून विचार करावा लागला. समग्र सांस्कृतिक प्रवाह अनेक भाषांतील साहित्य यांचा तुलनात्मक अभ्यास केला नसता तर दखनी भाषेच्या उद्भवाचा नेमका शोध लागला नसता आणि महाराष्ट्र व मराठी भाषा यांनी या संदर्भात बजावलेल्या थोर राष्ट्रीय कामगिरीचे आकलनही झाले नसते.

या शोधाला निमित्तकारण घडले ते अगदी सामान्य स्वरूपाचे वाटण्याचा संभव आहे. किंबहुना ते सामान्य आहे असाच समाज रूढ असल्याने दखनी भाषेच्या उद्भवाचा शोध योग्य दिशेने झाला नाही. हे सामान्य वाटणारे निमित्त म्हणजे 'मराठी संतांची हिंदी कविता.' प्राचीन मराठी साहित्याच्या अभ्यासकास अत्यंत परिचित असलेली ही बाब आहे. वारकरी संतांनी मराठी बरोबरच तथाकथित 'हिंदी' भाषेतून कवने रचली हे आधुनिक युगात संत साहित्याचे संकलन झाल्यापासून अभ्यासकांना ज्ञात आहे. 'संत नामदेव हे हिंदी भाषेचे पहिले कवी होत' असे हिंदी भाषेच्या विद्वानांच्या लेखातून आपण वाचतो तेव्हा आपली छाती अभिमानाने भरून येते हेही खरे आहे.

परंतु, हे का घडले? प्रश्नाने आपल्याला कधीच त्रस्त केले नाही. कारण, ही एक सामान्य घटना आहे असाच आजवर आपला समज होता. भारतातील सांस्कृतिक जीवनात आढळून येणारे प्रवाह आणि अन्य भाषांतील साहित्य यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर हा अगदी सामान्य वाटणारा प्रश्न महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कर्तृत्वाच्या दृष्टीने किती मोलाचा आहे याचा प्रत्यय येतो. मराठीच्या सीमेबाहेर जाऊन या प्रश्नाचा शोध लावला नसता तर मात्र 'मराठी संतांची हिंदी कविता' ही बाब केवळ अलंकरणात्मक म्हणून यापुढेही मराठी साहित्याच्या इतिहासात नोंदविण्यात आली असती.

'मराठी संतांची हिंदी कविता' ही अगदी सामान्य वाटणारी बाब केवढी थोर सांस्कृतिक परंपरा उराशी बाळगून आहे याचा उलगडा दखनी भाषेच्या उद्भवाचा शोध लावताना इथे करण्यात आलेला आहे. अगदी सामान्य वाटणाऱ्या मराठी संतांच्या 'हिंदी' कवितेने उत्तर भारतातील संत परंपरेस प्रेरणा दिलेली आहे हे अभिमानास्पद सत्य याच शोधातून प्रस्थापित झाले आहे. "साहित्यसेतू" या प्रस्तुत लेखकाच्या ग्रंथात सुमारे एक हजार वर्षांच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासातून हा शोध मांडलेला आहे. मराठी संत आणि महाराष्ट्रात नांदणारी संस्कृती यांचे समग्र भारताला मिळालेले योगदान या ग्रंथात विशद केले आहे.

तसे पहिले तर दखनी ही भारतीय भाषांपैकी एक भाषा आहे. या भाषेचे एवढे कौतुक करावे असे तिच्या ठिकाणी आहे तरी काय असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. भारतातल्या सर्वच भाषा आपापल्या परीने थोर आहेत. या भाषांपैकी प्रत्येक भाषेला स्वतःचे व्यक्तिमत्व आहे तशाच स्वतःच्या काही सांस्कृतिक व साहित्यिक परंपरा आहेत. दखनीच्याही ठिकाणी हे सर्व विशेष आहेतच. फरक एवढाच की अन्य भाषा स्वाभाविक क्रमातून पूर्ववर्ती भाषांतून उद्भवल्या. दखनीच्या बाबतीत तसे झाले नाही. विशिष्ट सांस्कृतिक निकडीतून ही भाषा महाराष्ट्रात उदयास आली.भिन्नभाषी समाजाचे प्रबोध करण्याची क्षमता राहील या हेतूने तिची जडण-घडण होत गेली. त्यायोगे सांस्कृतिक आदान-प्रदानाचे एक नवे व आवश्यक माध्यम संस्कृतीत उदयास आले आणि साधुसंतांच्या उपदेशाची भाषा असा गौरवही तिला लाभला. या नव्या भाषेचा उद्भव आणि विकासही महाराष्ट्रात झालेला असल्याने जन्मापासूनच तिला मराठी वळण लागले असले तरी भिन्न भाषी समाजाचे प्रबोधन करू शकणारे नवे माध्यम या नात्याने ऐतिहासिक दृष्टया दखनी भाषेस एक आगळेच महत्त्व आहे हे मान्य करावे लागते.

दखनी भाषेचे हे ऐतिहासिक महत्त्व आजवरच्या लेखनात अलक्षित राहिले म्हणून दखनी भाषेच्या उद्भवाचा विचार बराच विस्ताराने करावा लागला. भिन्न भाषा बोलणाऱ्या समाजास सहजगत्या बोध करू शकणाऱ्या समिश्र स्वरूपाच्या या भाषेतून मराठी संतानी कवने रचली ती अमराठी भाषिकांना देखील परमार्थबोध व्हावा या हेतूने. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे दखनी राष्ट्रभाषेचे रुप घेऊन जन्माला आली असेही म्हणता येईल. पंधराव्या शतकात दक्षिण भारतात सूफी संप्रदायाच्या विचारसरणीचा प्रसार करण्याची निकड सूफी-संताना भासली तेव्हा महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या या राष्ट्रभाषेचाच स्वीकार त्यांनी प्रसारमाध्यम या नात्याने केला. लेखनासाठी त्यांनी फारसी लिपीचा उपयोग केला एवढेच. पण फारसी लिपीतील दखनी साहित्याची निर्मिती होण्यापूर्वी किमान दोनशे वर्षे तरी दखनी भाषा अस्तित्वात होती. दखनी हे नाव या भाषेला नंतर मिळालेले असले तरी संत नामदेवांची तथाकथित हिंदी कवने हा दखनी भाषेचा प्रारंभकाळ ठरतो.

'साध्या विषयातदेखील कधी कधी मोठा आशय कवींना आढळतो' असे केशवसुत सांगतात. काव्याइतकेच साहित्य आणि संशोधन यांच्या बाबतीत देखील हे विधान सत्य मानता येईल. तसे नसते तर

'मराठी संतांची हिंदी कविता' या अगदी साध्या वाटणाऱ्या विषयातून या ग्रंथाची निर्मिती झाली नसती. या साध्या विषयाची उपेक्षा झाल्याने दखनी भाषेच्या उत्पत्तीसंबंधाने आजवर झालेली चर्चा एक तर वरवरची ठरते किंवा विशिष्ट अभिनिवेशातून ती झाली आहे असा अनुभव येतो. दखनी भाषेसंबंधी. चे संशोधन – लेखन उर्दू व हिंदी या भाषांच्या विद्वानांनी प्रामुख्याने केलेले आहे. उर्दू भाषेचे पंडित दखनीला 'कदीम उर्दू' ही संज्ञा देतात. त्यामुळे दखनीच्या उगमस्थानाचा शोध घेण्याची गरज त्यांना कधीच भासली नाही. तीच गोष्ट हिंदी भाषेच्या पंडितांची. दखनी ही हिंदीची प्रादेशिक बोली आहे असा या पंडितांचा गैरसमज झालेला असल्याने तिचे उगमस्थळ शोधणे त्यांना महत्त्वाचे वाटले नाही. या भाषेत मराठी शब्द विपुल प्रमाणात आढळतात याची नोंद उभय भाषांच्या पंडितांनी केलेली आहे. त्याचे कारण शोधण्याचा प्रयत्न मात्र त्यांनी केला नाही. तो केला असता तर आजवरच्या संशोधनास निराळे स्वरूप लाभले असते.

श्री. देविसिंग चौहान यांचा अपवाद वगळता मराठी भाषेच्या पंडितांनी दखनी भाषेची दखलच घेतलेली नाही. मराठी भाषेच्या सर्वांगीण अभ्यासास दखनीचे अध्ययन उपकारक ठरते हे श्री. चौहान यांचे मत मान्य होण्यासारखेच आहे. शब्दसंग्रहांव्यतिरिक्त दखनी भाषेच्या इतर अंगावरही मराठीची गडद छाया पसरलेली आहे याचे विवेचन त्यांनी निरनिराळ्या लेखांतून केले आहे. परंतु, या व्यासंगी विद्वानानेही दखनीचे फारसी लिपीतील साहित्य तेवढे जमेस धरले आहे. हे साहित्य पंधराव्या शतकापासून आढळते. तत्पूर्वी दखनी भाषा अस्तित्वात होती – नाव दखनी नव्हते, पण भाषा होती – इतकेच नव्हे तर या भाषेत साहित्य निर्मितीही झालेली होती. हे साहित्य नागरी लिपीतून लिहिण्यात आलेले होते. या वास्तवाची दखल श्री. चौहान यांच्या लेखनात आढळली नाही.

भाषा ही एक सामाजिक आणि जिवंत संस्था आहे. भाषाविज्ञान हे एक सामाजिक शास्त्र आहे. भाषाविज्ञानाच्या सर्वसामान्य नियमांप्रमाणे जगातल्या भाषांचा व्यवहार चालत असतो हे एक स्थूल सत्य आहे. तथापि, सामाजिक आणि सांस्कृतिक घडामोडींचा फार मोठा परिणाम भाषा व्यवहारावर होत असतो. भिन्न काळातील सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक उद्दिष्टे यांच्या प्रभावामुळे कित्येकदा भाषाविज्ञानाच्या सर्वसाधारण नियमांस वळसा घालून विशिष्ट परिस्थितीत एखादी भाषा आपला मार्ग काढत असते. सामाजिक आणि सांस्कृतिक उत्तरदायित्व पार पाडताना एखादी भाषा भाषाविज्ञानाचे सर्वच नियम पाळील याची शाश्वती देता येत नाही. या संदर्भात परभाषांतून उसनवारीने आलेल्या शब्दांचे उदाहरण देता येईल. सामान्य नियम असा की, कोणतीही भाषा परभाषेतील क्रियावाचक शब्दांची उसनवारी सहसा करीत नसते. मराठी भाषेतील शब्दांची उसनवारी करताना दखनी भाषेने हा नियम पाळलेला नाही. अनेक मराठी धातू दखनी भाषेत प्रचलित आहेत; ते बोलीत आहेत तसेच साहित्यातही. भाषाविज्ञानाच्या चौकटीत ही उसनवारी बसत नसली तरी दखनी भाषेत ती घडलेली आहे. याचे कारण नागरी व फारसी या दोन्ही लिप्यांतील साहित्य ज्या समाजासाठी रचण्यात आलेले होते त्या समाजास मराठी वळणाचे क्रियावाचक शब्द अधिक जवळचे वाटत असले पाहिजेत. समान सांस्कृतिक व सामाजिक परंपरांत दखनी व मराठी या दोन्ही भाषांची वाढ झालेली असल्याकारणाने दखनीच्या दृष्टीने मराठी ही 'परभाषा' राहिलेली नव्हती असाही या उसनवारीतून अर्थ निघू शकतो.

या संबंधीचे विवरण अगोदर येऊन गेलेले आहे. तरीही या स्थळी या विशेषाचा पुन्हा उल्लेख करण्याचा हेतू एवढाच की, दखनी भाषेशी संबंधित असलेले सर्वच प्रश्न भाषाविज्ञानाच्या राजमार्गाने प्रवास करून सुटतीलच असे नाही. काही प्रश्न ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांच्या आधाराने उलगडण्याची शक्यता असते. दखनी भाषेचा उगम शोधण्यासाठी तेच करावे लागेल. या प्रवासात दखनी

भाषेच्या उद्भवाचा तर शोध लागलाच. शिवाय, विशिष्ट सांस्कृतिक उत्तरदायित्व पार पाडता यावे या हेतूने महाराष्ट्रात 'राष्ट्र'भाषेचा उद्भव झाला हे ऐतिहासिक सत्य या निमित्ताने प्रस्थापित झाले. असेही म्हटले की दखनी भाषेचे मराठी वळण ही वरवर केलेली उसनवारी नसून कर्णाच्या कवचकुंडलांप्रमाणे दखनी भाषेत ते जन्मसिद्ध लेणे आहे. कारण, दखनी उत्पत्ती आणि विकास झाला आहे तो महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या सांस्कृतिक परंपरांतून.

दखनी भाषेचा उद्भव ही महाराष्ट्राने बजावलेली थोर राष्ट्रीय कामगिरी होय; इतकेच नव्हे तर दखनी भाषा हा मऱ्हाटी संस्कृतीचाच एक अभिमानास्पद असा आविष्कार आहे.

अनुक्रमणिका

परिशिष्ट १

गोरखनाथ वाणीतील आणि दखनी साहित्यातील क्रियापदे

(१) सिधे सिध मिघ्या रे अवधू बोघ्या अर बाधा.
(२) गर्ज भोत नाहिर बाताँ बोल्या हूं.
(३) बास वसंत तहाँ प्रगट्या षेनं.
(४) कह्या अपने लोगों कों मूं खोलबात
(५) बांध्या मोहा तो जगत चेला.
(६) आपस का आपस को पड्या हर किसे.
(७) विघ्र दस अवतार थाटया असाथि कंद्रप जती गोरख लध्या.
(८) लिख्या है बुरा औरोंतो का हरफ.

(वरील उताऱ्यापैंकी १,३,५,७, गोरखवाणीतून घेतले असून उर्वरित चार दखनी साहित्यातून उद्धृत करण्यात आले आहेत. कुतुबमुशंतरी, मैनासतवंती, सबरस आणि मैना संतवंती)

दखनीत रूढ असलेली मराठी क्रियापदे

(१) सुमन के रूप को तोले दो सूर्या के बटाँ घाले.
(२) सरिजन के चंदरमुख को देखते कों हिया तापे.
(३) अब कैसे सोसू मेरे रब.
(४) लहू तेल मैने तलती हुँ.
(५) दस्त छलाक ते दिसे सगळे कांगीगीर वसन.

(कुलियातेशाही या ग्रंथातून वरील उतारे उद्धृत करण्यात आले आहेत. पृष्ठे अनुक्रमे ५४, ५०, ७०, ७१ आणि २)

परिशिष्ट २
दखनी भाषेतील लयबद्ध गद्य

संत एकनाथांच्या 'बाजेगारी' या भारुडातला शेवटचा भाग आणि 'सबरस' या दखनी ग्रंथातील एक उतारा पुढे देण्यात येत आहे. गद्यशैलीच्या दृष्टीने दोहोंचा अभ्यास केला असता सोळाव्या-सतराव्या शतकात अशी शैली प्रचलित असावी असे अनुमान करता येते. संत एकनाथ १५९९ मध्ये समाधिस्थ झाले. 'सबरस' ची रचना १६३६ सालातली. त्यामुळे एकनाथांनी सबरसचे अनुसरण केले असे म्हणता येत नाही. अशा प्रकारची गद्यशैली हा तत्कालीन भाषेत रूढ असलेला एक प्रकार असावा. नाथांची भारुडे जवळपास याच शैलीत रचलेली आढळतील. मराठी बखरीच्या घाटावरही या शैलीचा परिणाम झालेला दिसतो. पहिला उतारा 'सबरस' मधील असून दुसरा एकनाथी भारुडातला आहे.

(१) 'झाड कूँ फूल होना और फूल कूँ बासं। जिस झाड कूँ फूल ना फल उस झाड (से) किसे क्या आस? वो झाड आपेच निरास। कौन आयेंगा उस झाड के पास ? वो झाड किसे नई भाता। सुकया तो जलाने

के काम आता । जिस हात में सखावत नई वो पात है न वो हात है । जिस दिल में हिंमत नई वोल गिल है, न वो दिल है । जिस नजर में असर नई सो पत्थर है, न वो नजर है... दिल कूँ दरिया कते और कतरा जोश नई खाता हात कूँ बादल कते होर बूंद भार नई आता । बात कूँ मोती कते होर कौडी का काम नई करती । वहीच बात मोती जो मोती का कीमत धरती ।' - सबरस, पृ.१०६

(२) *गाफल कहते मेरी माया । गुरुबोध ऐसा पाया । ऐसी हमारी शांती गावे जो क्रोध बाग कूँ खावे । अहंकार साप लडे न चडे । मुआ जैसा चीप का चीप पडे । पर, परका खबूतर, खबूतर का भी घर, ये बाताँ सब ही दूर कर । पंख बिना हौस किया ।... एका जनार्दनी जगसमस्त । इसके बाजी में भिस्त दस्त । देखो फरिश्ते अजिब बात ।पैगंबर कहे सदर आमात । येही तमाशा सिध देखे । जो देखे सो जुदा नई देखे । एका जनार्दनी बैसक बाजेगरी । 'अनलहक्' — एकनाथ गाथा, ३९७१*

परिशिष्ट ३
युगधर्म : सर्वधर्मी समानत्व

युगधर्मासंबंधीची चर्चा मूळ प्रकरणात येऊन गेली आहे. वर नाथांच्या भारूडातील उतारा या युगधर्माच्या दृष्टीनेही विचारात घेण्यासारखा आहे. या भारुडात 'पैगंबराने जे सांगितले त्याचा अनुभव सिद्धांनी घेतला आहे.' असा भाव असून सिद्ध आणि पैगंबर एकाच तत्त्वाचा उपदेश करतात हे ध्वनित केले आहे. शेवटी असलेला 'अनलहक्'हा शब्दप्रयोग विशेषेकरून ध्यान देण्यासारखा आहे. 'मी सत्य आहे' असा या संज्ञेचा अर्थ असून सूफी परंपरेतले ते ब्रीदवाक्य आहे.'सोऽहम्' या महावाक्याशी सुसंगत असा हा सिद्धांत असला तरी कर्मठ इस्लामी परंपरेत तो बसत नाही. 'मी सत्य आहे', 'मी परमात्मा आहे' अशा स्वरूपाचा उपदेश करणाऱ्या सूफींचा प्रारंभकाळात भरपूर छळ झाला. एका संताला तर या मतासाठी फासावर जावे लागले. तरीही सूफीपंथाने ही अंतिम धारणा सोडू दिली नाही. सूफींच्या दखनी साहित्यात येणारे मंगलाचरण हे अद्वैत वेदातांच्या परिभाषेत का मांडले जाते याचा उलगडा या संदर्भात होऊ शकतो.

मराठी संतांच्या दखनी कवनातून देखील या युगधर्माचा प्रसार नाथोत्तर काळात झाला आहे. समर्थांच्या काव्यात या विषयीची अनेक उदाहरणे आढळतील. 'कहत किताब कुराणा' हे पालुपद असलेली काही पदे समर्थांच्या गाथ्यात आहेत. पुढील दखनी पदात तोच आशय आला आहे :

रे भाई गैबी मर्द सो न्यारे । सोही अल्लामिया के प्यारे
देहरा तुटेगा मशीद तुटेगी । तुटेगा है सो
तूटत नाही फूटत नाही गैबी । सो कैसे रे भाई
हिंदू मुसलमान महजब चले । येक सरजनहारा
अव्वल येक आखिर येक । दोऊ नहीं रे भाई ॥
-समर्थांचा गाथा. क्र. १०, २२, पृ. ४२४

लौकिक धर्मभेद आणि संप्रदाय यांच्या सीमा ओलांडून एका व्यापक वैचारिक भूमिकेचा प्रसार सिद्धांच्या काळापासून होत आलेला आहे. गोरखनाथाचे पुढील वचन त्याची साक्ष देईल :

हिंदू ध्यावें देहुरा, मुसलमान मसीत

जोगी ध्यावें परमपद जहाँ देहुरा न मसीत
हिंदू आखै आलख की तहा राम आछै न खुदाई

संत नामदेवांच्या दखनी पदांत अशाच प्रकारचे विचार आले आहेत. नामदेवांची भाषिक व वैचारिक परंपरा संत कबीरांनी चालविली. गुरु नानकांचे स्फूर्तीस्थान नामदेवच होते. संत दादू त्याचा शिष्य परिवार यांच्या साहित्यातून याच भूमिकेचा प्रसार झाला आहे. वाणनगीदाखल काही अवतरणे पुढे देण्यात येत आहेत –

- *कबीर पुंगडा अलाह राम का सो गुरु पीर हमारा ॥ - कबीर*

- *यहु मसीति यहू देहुरा, सतगुरु दिया दिखाई*
  भीतरि सेवा बंदगी । बाहरि काहे जाई ॥ -संत दादू दयाल

- *हिन्दू पावेगा वही । वोही मुसलमान*
  रज्जब किणका रहम का । जिस कूँ दे रहमान ॥ -रज्जब साहेब

फारसी लिपीतून दखनी साहित्याची निर्मिती करणारे सूफी संत धर्माने भिन्न असले, त्यांचा संप्रदाय निराळा असला तरी त्यांचे साहित्य समकालीन व्यापक वैचारिक आणि सांस्कृतिक परंपरेशी संवादी होते असा निर्वाळा समग्र संत साहित्याचे आलोकन केले असताना देता येती.

परिशिष्ट ४
(अ) सिद्धांची कवने

सिद्ध साहित्यातील काही कवनांचे भावार्थ मूळ प्रकरणात दिले आहेत. भाषेचे स्वरूप लक्षात यावे या हेतूने मूळ कवने पुढे देण्यात येत आहेत.

(१) *एथु से सरसइ सोवणा, एथु से गङ्गासाअरु*
वाराणसि पआग एथु, से चान्द दिवाअरू ॥९६॥
खेत्त पिठ्ठ अपीठ्ठ, एथु मई भमिगअ समिठ्ठउ
देहा सरिस तित्थ, णइ सुणउ ण दिठ्ठउ ॥९७॥ -दोहाकोश, २२

(२) *पवण धरि आप्पाण म भिन्दह । कट्ठजोअ नासक्य म विन्दह ॥*
अरे षढ सहज गइ पर रज्जह । मा भव-गन्ध-बन्ध पडिवज्जह ॥९४॥
एहु निज मण सबल कातर सचल ।
मेलहि सहाव ड्डा अ वसइ दोस-निम्मल ॥९५॥
जव्वे मण अत्थामणु जाइ, तणु तुट्टइ बधण
तव्वे सम रसहि मज्झे, णउ सद्द णउ बाम्हण ॥ ९६॥ -दोहाकोश, २२

(३) *मन्तह मन्ते स्सान्ति ण होइ। पडिल भित्ति कि उड्डी होइ ॥*

अनुक्रमणिका

तरुफल दरिशणे णउ अग्थाइ । वेज्ज देक्खि कि रोग पसाइ ॥
जाव ण अप्पा जाणिज्जइ ताव ण सिस्स करेइ
अन्धै अन्ध कडाव तिस वेण वि कूव पडेइ ॥ -संक्षिप्त संतसुधासार, ३

(४) *जिम पडिबिम्ब-सहवता, तिम भाविज्जइ भाव*
सुण्ण निरंजन परमपउ, न तहि पुण्ण णउ पाव ॥१४३॥
पण्च कामगुण भोअणेहिं, णिचिन्त थियेहि
एब्बे लम्भण परमपउ, किम्बहु बोल्लिअ एहिं ॥१४४॥ - दोहाकोश, ३०

(आ) गोरखबानी आणि मराठी भाषा

१. गोरखबानीत मराठी वळणाचे शब्द शब्दांच्या सर्व जातींतून आले आहेत. **अव्ययः**नाहीतर (नाहीतर) मधे, मधि, हेला (लीलेने-हेलया) **नामः**उंद्र, चिरा, येमली (ठिगळ), पलाण (पालाण – खोगीर) पौलि (पौली- तळ्याचा काठ), फडिका (फडके), भांडै (भांडे), कावडि (कावड),नवरा, भेवा (भय, ग्रा. भेद) **विशेषणः** उजू, उमा, करडा, निराळा. **क्रियापदाची रूपे**: आलौ, करसि, जासि, देखिलै, पाइला, पुजिला, फिरै, फाइलै, रहिला (राहिला),फीटिला (फिटला), मांडै, बैस्या

● चिटी केरा नेत्र मैं, गजेन्द्र समाइला गोवा. १२९ ● तव भेटिलै निरंजन निराधारं
● इह ही रचिलैं तिनि त्रिलोक ● अवधू ईडा मारग चन्द्र भणिजै

विभक्त्यंत नामे

● **षष्ठी :** पाषाणांची देवळी पाषाणाचा देव (गोरखबानी, १३१)
● पापची करणी कैसे दूतर तरिला (गोरखबानी, १३१)
● देवलोकची देवकन्या मृत्यलोकची नारी

पाताळ लोकची नागकन्या गोरखबाला भारी (गोरखबानी, १४७)

● **सप्तमीः** आमावस कै धरि झिलिमिलि चंदा (गोरखबानी,४)
● सिवसक्ति लै निजधरि राहिल (गोरखबानी, १३०)
● कैसे बोलौ पंडिता देव कौने ठाइं (गोरखबानी, १३१)
● **सामान्य :** रूप देवां सिरि (गोरखबानी, १५८)

(इ) सिद्ध साहित्य ते नाथवाणी

कोणत्याही समाजात कोणत्याही काळात प्रचलित असलेली भाषा कालांतराने बदलत नव्या भाषेचे रूप धारण करीत असते. भाषेचा हा एक अंगभूत प्रकृतिधर्म आहे. तथापि, हा बदल किती काळाने घडावयाचा याला निश्चित नियम नाही. मुळातच एकाच काळात भाषेची भिन्न रूपे प्रचलित असतात : शिष्टांची आणि सामान्य जनसमूहाची बोली. साहित्यरचना शिष्टांच्या बोलीत होत असते. लोकांच्या बोलीच्या मानाने

साहित्यातली भाषा बरीच स्थिर आणि नियमबद्ध असते. तिच्या तुलनेने बोली बरीच लवचिक असते. लोकप्रबोधनाचे प्रयत्न समाजात होतात तेव्हा मात्र बोलीस महत्त्व प्राप्त होते व साहित्य –रचनाही बोलीतूनच होऊ लागते. वैचारिक आणि समाजिक आंदोलने समाजात होऊ लागली म्हणजे प्रस्थापित भाषेतून उत्पन्न झालेली नवी भाषा आपला संसार स्वतंत्रपणे मांडू लागते.

संस्कृत भाषेपासून उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या भाषांच्या उत्पत्तीस कारणीभूत ठरलेली वैचारिक आंदोलने मूळ प्रकरणात सांगण्यात आली आहेत. संस्कृत- प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांचा उदय कोणत्या वैचारिक आंदोलनापासून झाला याचे विवेचन अगोदर येऊन गेले आहे. या ठिकाणी सिद्ध साहित्य ते नाथवाणी पर्यंतच्या काळात भाषेत घडलेले बदल प्रत्यक्ष त्या त्या काळातील साहित्यातून घेतलेल्या अवतरणांच्या आधाराने समजून घ्यावयाचे आहेत.

संस्कृत भाषा ही आधुनिक आर्य भारतीय (New Indo-Aryan Languages) भाषांच्या मूलस्थानी आहे. या भाषेपासून प्रथम प्राकृत भाषा उदयास आल्या. प्रादेशिक भेदानुसार महाराष्ट्री, शैरसेनी, मागधी इत्यादी नावांनी त्या प्रचलित होत्या. या भाषांतून साहित्यनिर्मितीही झालेली आहे. विकासाचा पुढचा टप्पा म्हणजे अपभ्रंश भाषा. या भाषांच्या प्रादेशिक भेदातून आधुनिक भारतीय भाषा उदयास आल्या आहेत. या प्रक्रियेतून महाराष्ट्री प्राकृत्ताच्या अपभ्रंशापासून मराठी भाषा उत्पन्न झाली. इतर भारतीय आधुनिक भाषाही त्या त्या प्रदेशात रूढ असलेल्या अपभ्रंशाच्या भेदापासून उत्पन्न झाल्या. या दोहोंच्या दरम्यान एक प्रवाही आणि अस्थिर असलेली भाषा काही काळ सर्वच भाषिक प्रांतात प्रचलित होती. या संक्रमणकालीन भाषेला 'संधा भाषा' असे नाव विद्वानांनी दिले आहे. नाथसिद्धांच्या साहित्यात आढळून येते ती हीच 'संक्रमणकालीन' अथवा 'संधा भाषा' ही भाषा सिद्ध साहित्याच्या अपभ्रंश भाषेतून उत्पन्न झाली आहे. नाथसिद्धांनी सिद्धांची वैचारिक परंपरा चालविली तद्वत त्याच भाषेचे काळानुसार बदललेले स्वरूप आपल्या साहित्यात योजले.

हे संक्रमण अभ्यासण्यापूर्वी एक महत्त्वाचे सूत्र ध्यानी बाळगणे आवश्यक आहे. महाराष्ट्री, शैरसेनी, मागधी या प्राकृत भाषांत काही समान विशेष आढळून येत असले तरी या प्राकृतांना स्वतःचे असे पृथक् व्यक्तिमत्व होते. अपभ्रंशावस्थेत ही पृथगात्मता फारशी कायम राहिली नाही. निरनिराळ्या प्रांतांत रूढ असलेल्या अपभ्रंशात बरीच एकविधता दिसून येते. काही प्रादेशिक वैशिष्ट्ये वगळली तर साहित्यातील भाषेवरून हा निश्चित एका प्राकृताचा अपभ्रंश आहे असा निर्वाळा देणे अवघड होऊन बसते. त्यामुळे प्रादेशिक प्राकृतानंतर एक मध्यावधी अपभ्रंशावस्था कल्पावी लागते.

सिद्ध साहित्यातील अपभ्रंश भाषेचा अभ्यास करताना हा अनुभव येतो. त्यातून निरनिराळे सिद्ध भारतभर संचार करीत असल्याने त्याच्या वाणीत अनेक प्रांतात प्रचलित असलेल्या भाषेचे शब्द येणे अपरिहार्य होते. सिद्ध सरहपाच्या साहित्यात मराठी वळणाचे शब्द आढळतात हा उल्लेख पूर्वी येऊन गेला आहे. गुजराती, राजस्थानी, बंगाली आदी भाषांच्या पूर्वावस्थेस शोभून दिसणारे शब्द अभ्यासांती निवडून काढता येतील. तोच न्याय नाथसिद्धांच्या वाणीसही लागू पडतो. सिद्धांचा काळ अनेक विद्वानांनी दिलेल्या निर्णयानुसार इ. स. ८०० ते १२०० असा मानला पाहिजे. सिद्ध साहित्याची भाषा अपभ्रंश आहे यासंबधीही विद्वानात एकमत आहे. नंतरचा कालखंड पडतो तेराव्या शतकापर्यंतचा. हजारीप्रसाद त्रिवेदी यांनी अनेक नाथसिद्धांच्या साहित्याचे संपादन केले आहे. त्यांच्या मते तेराव्या शतकानंतर नाथसिद्धांच्या परंपरेत साहित्य-निर्मिती झाली नाही. म्हणून बारावे व तेरावे या दोन शतकांत प्रचलित असलेली सन्धा भाषा नाथसिद्धांच्या साहित्यात आढळते असे मानण्यास हरकत नसावी. नाथसिद्धांच्या संक्रमणकालीन वा 'सन्धा'

भाषेतून दखनी भाषा कशी उत्पन्न झाली याचा विचार पुढे आपल्याला करावयाचा आहे. या स्थळी सिद्ध सरहपा ते गोरखनाथ (अपभ्रंश ते संधा भाषा) यांच्या काळात भाषेत कोणत्या प्रकारची स्थित्यंतरे घडली जाणून घ्यावयाचे आहे.

उपलब्ध अपभ्रंश साहित्यपेक्षा सिद्ध सरहपाची भाषा थोडी फार भिन्न दिसून येते. सरहपाने तत्कालीन बोलीत साहित्य रचना केली असल्याने हा फरक पडला असावा. गोरखवाणी सरहपानंतरच्या सुमारे चार शतकांची. या वाणीत उच्चार सुलभतेच्या दृष्टीने जोडाक्षरे टाळण्याकडे आणि कठोर व्यंजनांचे मृदू व्यंजनात रुपांतर करण्याकडे अधिक कल दिसून येतो. त्यामुळे भाषेत स्थित्यंतर घडले असले तरी सिद्धांच्या कवनांतील भाषेतून परिणत झाली आहे हे सहजगत्या ध्यानात येते.

परिशिष्ट ५
नागरी लिपीतील दखनी भाषा

रामदासोत्तर काळात भाषेत घडलेल्या स्थित्यंतराची कल्पना यावी या हेतूने निरनिराळ्या कवींची काही कवने पुढे देण्यात येत आहेत.

संत वेणाबाई (जन्म इ. स. १६२७)

तेरे बरनपर बारी जाऊ रे राम ।।धृ।।
सोभा सरल रुचिर नागर सकल मंडल धाम
वेणी कहे तेरे बरन निको । देखे मन आराम ।।

रामसुतात्मज (सुमारे १६७२)

या कवीची काही मराठी आख्याने प्रसिद्ध आहेत. त्याचे ‘गोपीचंद-आख्यान’ हे काव्य अप्रकाशित आहे. तीन भाषांतून हे काव्य रचलेले आहे. काव्यभागाचा ओघ मात्र संस्कृत, मराठी व हिन्दी या तिन्ही भाषांतून केलेल्या रचनेत अखंडित राहिलेला आहे. या आख्यानात आलेले एक कडवे पुढे देण्यात येत आहे. दखनी भाषेचे संक्रमण ‘राष्ट्रभाषेच्या दिशेने कसे होत चालले होते’ हे पुढील अवतरणावरून ध्यानात येईल —

जहाँ उन्मनी मगन मंदाण ज्यागा
अलख सुन्य मैदान मों लाग लाग्या
तहाँ सिद्ध कानिफ पारा सँवारा
जिराया ज्याहाँ सुन्ये का फेर सारा
करे भूप आदेश चेला-गुरु को कू
पुछे सिद्ध जालंधर कौण है तू
कहे भूप मैं गोपिचंदाभिधानी
जलो खाक होये चलो नाथवाणी
पुछे नाथजी कौण है तूं गँवारा
कहे भूप मैं गौडबंगाल सारा ।।

(हस्तलिखित प्रतीवरून)

अनुक्रमणिका

शिवरामस्वामी (समाधी इ. स. १६२६)

दखनी भाषेचे राष्ट्रभाषेत क्रमाक्रमाने विसर्जन होत गेले आहे. पुढील उताऱ्यात मूळ दखनी भाषा व तिच्यावर अन्य भाषांचे झालेले संस्कार हे दोन्ही स्पष्टपणे दिसून येतील –

जिन आपकूँ जोया नहीं मन मैल कूँ धोया नहीं
अंगुल किया तो क्या हुआ ॥१॥
लालुच धरे दिल दाम की, ध्यास धरे बदकाम की
हिर्दे भरे सुद राम की, संध्या किया तो क्या हुआ ॥२॥
जो खुदा से मिला नही, माला लिया तो क्या हुआ ॥३॥
(हस्तलिखितावरून)

परिशिष्ट ६

साहित्यातील दखनी

१. *सटे वाटसारू जो भूइ पो पाँव*
मिले ना यक यक हप्ता बस्ती का गाँव ॥२४॥
जो उस से जिते फौजदारां लडे
लुटे गये उते या सँपड बंद पडे ॥२५॥
पन उस दिल में था खान का सखत धाक
किये थे जो यक बार उसे बी हलाक ॥२६॥
- तारीखे इस्कंदरी १-२४ ते २६

२. *जतन कर वो फिर छोड यूँ लर चले*
न था नीर वाँ लहू अपस भर चले
हुई लाल भूई यूँ वो काली सगट
विजापूरकने ज्युं कि जोगी का मट
नजर रन के मुर्दां कूँ देकत थकी
कहे तूँ कि पर्दा है यक नाटकी ॥
- तारीखे इस्कंदरी ५-१८ ते २०

पहिल्या उताऱ्यात पन्हाळ्याच्या लढाईच्या प्रसंगी शिवाजी महाराजांच्या सैन्याने दाखविलेल्या पराक्रमाचे वर्णन शत्रूपक्षाने केले आहे. या लढाईत मराठ्यांच्या सैन्यास अनेक मातबर सरदारांनी तोंड दिले होते. कवी सांगतो, या सामन्यात जे सरदार गेले ते एक तर मारले गेले, जे जिवंत राहिले ते लुटले गेले किंवा त्यांना बंदिवास भोगावा लागला.

दुसऱ्या उताऱ्यात रणभूमीचे वर्णन असून काळी जमीन रक्ताने लाल झाल्याचे वर्णन कवी करतो. प्रेतांचा खच एवढा होता की जणू रंगभूमीवर एखादा पडदा लावलेला असावा.

अनुक्रमणिका

परिशिष्ट ७.
विजापुरी बोली

आदिलशाही राजवटीत विजापूर हे साहित्य –निर्मितीचे फार मोठे केंद्र होते.तीन शतकापूर्वी आदिलशाही बुडाली व मोगलांची राजवट त्या ठिकाणी आली. इंग्रजांच्या राजवटीत हा भाग मुबई प्रांतात होता. स्वराज्यानंतर या भागाचा समावेश कर्नाटक प्रांतात झाला. एवढी स्थित्यंतरे पाहिलेल्या या भागात कन्नड भाषेच्या सहवासात दखनी भाषा नांदत आली आहे. या भागात प्रचलित असलेली दखनी बोली कोणत्या स्वरुपाची आहे हे जाणून घेण्याच्या उद्देशाने १९८० च्या नोव्हेंबर महिन्यात मी दखनी बोलीचे नमुने गोळा केले.

या भागात रचण्यात आलेल्या दखनी साहित्यात एकही कानडी शब्द मला आढळला नाही. साहित्यिक दखनी तीनशे वर्षापूर्वी कोणत्या प्रकारची होती याचा नमुना अगोदर दिला आहे. या भाषेवर कन्नड भाषेचा संस्कार नाही; त्याप्रमाणे सध्या प्रचलित असलेल्या दखनी बोलीवरही तो दिसून आला नाही. या परिसरातील बहुजन समाजाची भाषा कन्नड आहे. पांढरपेशा मुसलमान उर्दू भाषा आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत आहे. तथापि, सर्वसाधारण मुसलमान समाज मात्र दखनीतूनच भाषाव्यवहार करतो. या समाजाच्या बोलीत मराठी शब्दांचे प्रमाण बरेच मोठे आहे. भाषेचे स्वरूप व वाक्यरचना यांत, एवढा काळ लोटूनही फारसे अंतर पडले नाही. साहित्यिक दखनीपासून आजची बोली फार दुरावली आहे असे वाटत नाही. आश्चर्याचा धक्का देणारी एक बाब म्हणजे या बोलीत वापरले जाणारे संख्यावाचक शब्द शुद्ध मराठी आहेत, ‘सहा’, ‘पंचेचाळीस’, ‘शंभर’, ‘एकोणीसशे सत्तेचाळीस’ या सारखे शब्द सहज ऐकता येतात.

*निरनिराळ्या थरातील व्यक्तींशी केलेल्या संभाषणात वारंवार आलेले काही मराठी शब्द असे

अवकाळी, अहे, उटारेटा, उपराला, कलवा,कोथिंबीर, कोस, खोगीर, चोपडी, जतन, जुना, जुप्या(जुंपले), डागिने (दागिने), ताबडतोब, तोडगा, थट्टा, दुकळ (दुष्काळ –दुकळ हा शब्द प्राकृतातही येतो), देखिन्त, करन्त, नटना, नाँव, नीट, न्यारी (न्याहरी), पगार, परभारे, फडके, फाड (पहाड), फुलारी, फुंकनी, बाइकाँ, बाव (विहीर), डाग, भाइर, माहेर, मेजवान्याँ, रंग (रंगभूमी), सावकाश.

*बोलीत येणारी काही क्रियापदे ‘गोरखवाणी’च्या काळाइतकी पुरातन आहेत -

वंद्या, बंच्या,देख्या, राख्या, सांड्या, मिल्या इ.

विजापूरच्या परिसरात अनेक सूफी संतांचे दर्गे व स्थाने आहेत. या स्थानांचे सेवेकरी वंशपरंपरेने चालत आले आहेत. एकशे सात वयवर्षांच्या एका सेवेकऱ्याची मुलाखत घेतली असता त्याच्या तोंडून साहित्यिक दखनी ऐकता आली. फरक एवढाच की हा सेवेकरी ‘ण’ आणि ‘ळ’ या वर्णांचा स्पष्ट उच्चार आपल्या भाषणात करीत असे. फारसी लिपीत हे दोन्ही वर्ण नाहीत. मराठी शब्दांत असलेल्या या वर्णांचे रुपांतर अनुक्रमे ‘न’ आणि ‘ल’ या वर्णांत होते. त्यावरून असे अनुमान करावेसे वाटते की, ‘ण’ व ‘ळ’ हे वर्ण फारसी लिपीत नसले तरी प्रत्यक्ष व्यवहात ते दखनीत प्रचलित असावेत. हिंदी आणि उर्दू या दोन्ही भाषांत ‘ळ’ हा वर्ण नाही. ‘ण’ हिन्दीत आहे, उर्दूत नाही. दखनी भाषेने मराठी भाषेची ध्वनीव्यवस्था स्वीकारली आहे याचे हे प्रमाण आहे. बोलीतील ‘ण’ व ‘ळ’ उपोद्बलक पुरावा म्हणून लक्षात ठेवण्यासारखा आहे.

विजापूरच्या परिसरात आज प्रचलित असलेल्या दखनी बोलीचा नमुना अमीनुद्दीन या सेवेकऱ्याच्या मुलाखतीतला एक भाग म्हणून देण्यात येत आहे-

"अमीनुद्दीन मेरा नाम. वयस कायकी एक संबर होर सात (१०७) हत्तीयाँ पैले भोत अथे. माते [१] तो धांदल करते. हत्ती को मैं नवकर [२] रका था. लशमी बोलके हत्तीण ऱ्हती. उसके ऊपर लकडी लादकर लाता. क्या क्या मेजवानियाँ[३] ऱ्हती तो उसको निकालता, सजाता. हत्ती के उपरीच एक बार खुदबे का नमाज पड्या. अंबारी लगाके निकलता ऱ्हयता. उसके कारणे क्या क्या नइ कऱ्या, लशमी न्हई ऱ्हई... ये घराँ खाजासाब के बंदे.[४] सजावट क्या की याकूब हुसेन कऱ्या. खाजा पीराँ की शादी में आये. पीराँ के सगे खंधारवाले.[५] वाँ पैदा हये. खाजासाब पानी के ऊपर नमाज पडे. खाजासाब की शादी में मैं गया. सोब[६] क्या करी हत्ती पो बैटे. मैं क्या की दो बैलगाड्याँ करा. विजापूरसे गये. मंडवे बंदे. औरताँ क्या की गाने गाये. गाना अब बिसर गया. मेरे बचपन में चार रुपये जवार. घऊ[७] पिसाके लाते. न्यारी करते. अब्दुल्ला हुसेनी बाग नाचते. मोरम में मैं आल्विदा पडत हता. बैलाँ की पीटभर बैट को गाना गाता. गंमत करता.

परिशिष्ट ८
सातारा जिल्ह्यातील स्त्रीगीते

महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या प्रादेशिक बोलीचा एक प्रातिनिधिक नमुना दाखविण्यासाठी काही लोकगीते पुढे देण्यात येत आहेत. सातारा जिल्ह्यातील इस्लामपूरचे कै. वा. दा. मुंडले यांनी 'मुसलमानी स्त्रीगीते' या शीर्षकाखाली काही गीते भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक इतिवृत्तात (शके १८३५- इ.स. १९१३) प्रसिद्ध केली होती. त्यांपैकीच ही काही गीते आहेत –

१. *बडी बडी चक्की गेंद नक्को मारूजी*
सोती सनींद मी ॥
बडी मेरी चक्की छातीका छत्तहारू ।
घडाववाला कोरून काडी, डोंगर का पत्थहरू[८] ॥
दस्तगीर कू जाना कटोरीपर ऊदू
भाई करूंगी मेरा चांदु, नंगी पाँव का ईथु ॥
जुम्मा बी जुम्मीरातु मजी नतीयु येती यादु
पीराँकी दरगा मों नगारा[९] की नादु[१०] ॥
जिम्मी जिम्मी रातु, मजी नतीच मालूम
महम्मद मेरा चांदु, बाम वस्ताद जालिमु ॥
जिम्मी जिम्मी रातु, मैं पकाइ ती शक्करभातु
मलिंग सायब सब्जा बिछायती वाटू[११] वाटू ॥

२. *भाई लेता चोली भावजी[१२] आडी आली*
भाई मेरा बोलता नई मेरा तो दिल तोडी ॥
भावजी तेरा गंगा, मोती सटकु देखी
समुंदर का पानी डोंगा भावजी मेरी गंगा ॥
भाई लेता साडी, येक्या साडी कूँ मेरा मोती

भाई मेरे को दुआ देती ॥
अल्ला बी अल्ला ककू [१३] मैने पुकारी दसबारू
समान सुमान चिराग जलती उच्चा
भाई कहुंगी मेरा चांदु कुरान पडताय् मेरा बच्चा ॥

३. *समदीन [१४] चलती नंगी, पाँव चुपते कंकर*
गोरी तेरी नाक में नजर, तुजे देकताय् गुंजर ॥
शिव [१५] का दुला जी आया, संकल्या पिना कू गया
सँकल्याँ की महिमा बडी, गुलमेंदी रंग चडी ॥
सँकल्या मै पैनी,हिऱ्याँकी जोत चडी
तेरे नामपर सुआगन [१६] बनी ॥

या लोकगीतांतील भाषेचे साहित्यातील दखनी भाषेची असलेले नाते विशद करून सांगण्याची आवश्यकता नसावी. बोलीला असलेले मराठी वळण देखील स्पष्टीकरण न करता ध्यानात येण्यासारखे आहे. ही बोली उर्दू भाषेची ग्रामीण अवस्था आहे असे मानता येत नाही. दखनी भाषेचीच ती उत्तराधिकारी ठरते.

परिशिष्ट ९
दखनी भाषेचा विकासक्रम

संधा भाषा, दखनी, अवधी आणि राजस्थानी या चार भाषांतील पाच पदे पुढे देण्यात आली आहेत. या सर्व रचना भिन्न काळातल्या आहेत. रचनाकार संत भिन्नभिन्न प्रांतातले आहेत. त्याच्या उपदेशातील एकात्मता आणि भाषांतील वेगळेपणा यांच्यासंबंधी एकेका पदाच्या आधारावर मत बनविणे धाडसाचे ठरेल. तथापि, विचारप्रणाली आणि साधना यांच्या दृष्टीने त्यांचे आंतरिक नाते जाणवण्याइतके स्पष्ट आहे. विशेषतः विश्वात्मक आत्मतत्त्वाचा निर्देश 'राम' या संज्ञेने सर्वच संतांनी केला आहे ही बाब लक्षात ठेवण्यासारखी आहे. पुढील काळातील संतांनी नामदेवांच्या प्रेरणेने आपल्यापरीने वाटचाल केलेली आहे हे या पदांवरून स्पष्ट होईल.

१. गोरखनाथ

पढिलै संसवेद करीलै विधिनिषेद,
जाणीलै ससंवेद पूरिलै आसा उमेद
विषमि सन्धि माझारी संझया पांचै वखत करी
राहिला दसुवै दुवारी सोइबा परम निराकार
जाणीलै अजपाजप विचारिलै आपै आप
षुटिला सबै वियाप, लिपै नही तहो पुनि- पाप
अहोनिसी समाधान निरंतर रमैवा राम
कथै गोरखनाथ गियान, पाइया परम विधान ॥ - गोरखबानी

२. संत नामदेव

अणमंडिआ मंइलु बाजै बिन सावन घसहरू गाजै

अनुक्रमणिका

बादलु बिनुं बरखा होई, जउ तउ विचारै कोई
मोकउ मिलिउ राम सनेही जिह मिलिए देह सुदेही
मिलु पारस कांचनु होइआ
मुख मनसा रतना परोइआ
निज भाऊ भाइआ भ्रमु भागा
गुरु पूछे मन परिभागा
जल भीतरि कुंभ समानिआ
सबु रामु एकु करी जाणिआ
गुरु चेले के मन मानिआ
जन नामै ततु पछानिया ।।   *-नामदेव गाथा, ८४७*

३. संत कबीर

पारस के संग तांबा बिगरिओ । सो तांबा कांचन होइ निषरिओ
संतन संग कबीरा बिगरिओ
सो कबीर रामै होइ निषारंओ ओ
अब घटि प्रगट भयै रामराई
सोधि सरीर कनकन की नाई
कनक कसोटी जैसे कसि सुनारा
सोधि सरीर गयो तन सारा
बिन परचै तन कांच कथीरा
परचै कंचन भया कबीरा ।।   - सिद्धसाहित्य, ४३६

४. गुरुनानक

करम खण्ड की वाणी जोरू । तिथै होरू न कोई होरू
तिथै जोध महाबल सूर । तिनि महि रामु रहिमा भरपूर
ना ओहि मरहि न ठाणे जाहि । जिनकै राम बसै मनमाहि
तिथै भगत वसहि के लोआ। करही आनंदु सचा मनि सोइ
सचखंडी वैसै निरंकार । करि करि बेखै नदरि निहाल
बखै बिगसै करि बिचारू ।नानक कथना करडा सारू
-संत सुधासार, १४९.

५. संत दादू

ऐसा जनम अमोलिक भाई, जावै आई मिलै रामराई
जाथै प्राण प्रेमरस पीवै, सदा सुहाग सेज सुख जीवै
आतम आइ राम सौ राती,
अखिल अमर धन पावै थाती
परगट परसन दरसन पावै
परम पुरिख मिली माहि समावै
ऐसा जनम नही नर आवै

अनुक्रमणिका

सो क्युँ दादू रतन गँवावै ॥

- संक्षिप्त संत सुधासार, २६५.

परिशिष्ट १०
अरबी-फारसी शब्दांचे समान अपभ्रंश

पुढील सूचीत योजण्यात आलेले संक्षेपः अ अरबी, **फा** फारसी ; **भाऊ** भाऊसाहेबांची बखर; **राज** राजव्यवहार कोश; **सन** सनपुरीची बखर; **सप्त** सप्तकरणात्मक चरित्र; **सभा** सभासदाची बखर; **सिंध** सिंधखेडकर जाधवांची बखर.

अंदेशा (फा. अंदेशाह) सन १५, भाऊ १०५
अराबा/ आराबा (फा. आराबाह्) राज १२९, सभा. ४५.
असील/आसील (फा. –असील) सन १०
इजत/ईजत (फा. इज्ज़त) सभा ३६
इतबार (फा. एअतेबार) सभा ३७, भाऊ ३१, ३९.
इतमाम (फा. एलहतेमाम) भाऊ २, सन ९
उपराला (फा. सभा ३५,) भाऊ ५३.
कारखाना (फा. कारखानह) कार्यस्थानं तु कारखाना स्यात् :, राज. ५
किताब (फा. खिताब) सभा ३२, सप्त ३५, सन ३६.
कूच (फा. कूच) सभा. १०.
धाशत(फा. दहशत) सभा. ३६. भाऊ ४४.
बातमी (अ. बातीन) सन ३१.

ग्रंथाच्या अखेरीस दिलेल्या कोशात आणखी काहीअपभ्रंश आलेले आहेत. मूळ मुद्दा स्पष्ट करण्यासाठी या स्थळी काही उदाहरणे दिली.

परिशिष्ट ११
तृतीयेचा 'ने' प्रत्यय

दखनी भाषेतील तृतीया विभक्तीच्या 'ने' प्रत्ययासंबंधाने श्री. देविसिंग चौहान यांनी निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने बरीच चर्चा केलेली आहे. 'मराठी आणि दक्खिनी हिंदी' या लेखसंग्रहातील काही लेखांत हा विषय आला आहे तसेच 'इब्राहिम नामा' या त्यांनी संपादिलेल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेतदेखील 'ने' प्रत्यय चर्चिण्यात आलेला आहे. या प्रत्ययाला महत्त्व येण्याचे कारण म्हणजे तो मराठी भाषेत आहे. तसाच वर्तमान हिंदी भाषेतही योजिला जातो. मराठी भाषेतील 'ने'प्रत्यय बराच पुरातन आहे. तसा तो हिंदी भाषेत आढळत नाही. हिंदी भाषेच्या कोणत्याही प्रादेशिक बोलीत तो आढळत नाही. तो वर्तमान हिंदीने स्वीकारलेला असल्याने दखनीच्या संदर्भात हिंदी भाषेतील 'ने' प्रत्ययाचा विचार करण्याचे कारण नाही. दखनी भाषेच्या उद्भव काळात संत नामदेवांनी 'ने' प्रत्ययाचा प्रयोग आपल्या दखनी कवनांतून केलेला आहे. अर्थातच हा प्रत्यय मराठीतून दखनीने उचलला हे पुराव्यानिशी सिद्ध करण्याचा खटाटोप करण्याचे कारण नाही. स्वतः चौहान यांना 'हा प्रत्यय दखनीने मराठीतून घेतला आहे' हे मत मान्य आहे. 'हा प्रत्यय म्हणजे मराठीची

दखनीला ललामभूत देणगी आहे' असेही त्यांचे स्पष्ट मत आहे. 'खडी बोलीत ने प्रत्ययाचा प्रवेश करून देणारा नामदेव हाच प्रथम साहित्यिक आहे' असा निर्वाळा देखील श्री. चौहान यांनी दिला आहे. 'ने' प्रत्यय दखनी भाषेने मराठीतून उचलला यात वाद नाही. तथापि, "दखनी भाषेत 'ने' प्रत्ययाच्या प्रयोगाबाबत अराजक दिसून येते." हे श्री. चौहान यांचे मत मान्य होण्यासारखे नाही. दखनी भाषेत कर्तरी प्रयोगास प्राधान्य आहे. या भाषेत त्यामुळे 'ने'प्रत्यययांत कर्ता असूनही कर्तरी प्रयोग होतो.आपल्या स्वभावधर्मानुसार दखनी भाषा 'ने' प्रत्यययांत नामाचा प्रयोग करीत असते. प्रयोगविचारात या विशेषाची चर्चा झाली आहे.

अनुक्रमणिका

शब्दकोश

शब्दकोशाचा अभ्यास करण्यापूर्वी –

दखनी साहित्यात आणि बोलीत प्रचलित असलेल्या काही मराठी शब्दांचा हा कोश आहे. बोलीची सामग्री विजापूर आणि हैदराबाद यांच्या परिसरातून गोळा केलेली आहे. औरंगाबादच्या परिसरातील बोलीची पाहणी करताना असे निदर्शनास आले की, या भागातील बोलवर उत्तर कालीन उर्दू भाषेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात पडल्यामुळे दखनीचे मूळ स्वरूप या परिसरातील बोलीत सुरक्षित राहिले नाही. दखनी साहित्याच्या पडत्या काळात औरंगाबादच्या परिसरात काही दखनी कवी व लेखक होऊन गेलेले असले तरी बोलीवर कायम ठसा उटविण्याइतका त्यांचा प्रभाव पडलेला नाही.

विजापूर आणि गोवळकोंडा ही दखनी साहित्याच्या निर्मितीची दोन प्रधान केंद्रे. विजापूरच्या बोलीने आजही दखनी भाषा जतन करून ठेवली आहे. हैदराबादच्या परिसरात प्रचलित असलेल्या बोलीने दखनीची वैशिष्ट्ये सुरक्षित ठेवावीत हे वरकरणी आश्चर्यकारक वाटते. निजमाची राजधानी असलेल्या या शहरात दखनी प्रचलित राहण्याचे कारणही ऐतिहासिकच आहे. इथल्या सामाजिक जीवनात दखनी आणि बिगर दखनी हा भेद कधीच पुसला गेला नाही. म्हणून दखनी समाजाने आपली मातृभाषा/बोली प्रयत्नपूर्वक जतन केली. शिक्षणाच्या प्रसारामुळे या बोलीचे क्षेत्र मर्यादित होत असले तरी बाजार-हाटात आणि अंत:पुरात आजही दखनी बोली प्रचलीत आहे.

दखनी साहित्यातील आणि बोलीतील मराठी शब्दांचा हा समग्र कोश नाही. दखनी भाषेचे स्वरूप आणि विशेष समजून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकतील अशाच मराठी शब्दांची निवड हेतुतः केलेली आहे. वाक्प्रचार आणि म्हणीही या कोशात आढळतील. कोशात मूळ शब्द देण्याची प्रथा आहे. ही प्रथा पाळत असतानाही मराठी वळणाची, नामांची विभक्त्यंत आणि धातूंची आख्यात प्रत्यय लागून झालेली रुपेही देण्यात आलेली आहेत.

शब्दांची नोंद करताना पुढील क्रम पाळण्यात आलेला आहे.

१. शब्द/शब्दरूप/ वाक्प्रचार या मालिकेत बसणारे शब्द प्रथम दिले आहेत. काही शब्दांची अनेक वचनी रूपे आलेली आहेत. त्यांच्या पुढे (अ.व) असा संक्षेप दिला आहे. वाक्प्रचार असल्यास (वा.प्र.) असा संक्षेप दिलेला आहे.इतर शब्दांच्या बाबतीत : नामांची नोंद पुल्लिंगी/ स्त्रीलिंगी अशी प्रथम दिली आहे (दखनी भाषेत नपुंसकलिंग नाही याची चर्चा अगोदर येऊन गेली आहे) धातू/ क्रियापद यांचे सरळ अर्थ दिले आहेत. अव्ययादिकांची नोंदही शब्दानुसार करण्यात आली आहे.

२. शब्दांच्या सरळ मराठी अर्थ देण्यात आलेला असून एकापेक्षा अधिक अर्थ असल्यास १, २, ३... अशा पद्धतीने तो नोंदविलेला आहे.

३. शब्दार्थानंतर शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधाने नोंद केलेली आहे. परभाषेतील शब्दाचे मूळ चौकटी कंसात दिले आहे.

४. दखनी साहित्यातून घेतलेल्या शब्दांबाबत मूळ ग्रंथाचा संदर्भ आणि आवश्यक त्या स्थळी उदाहरणे दिली आहेत. मराठी साहित्यातील समांतर शब्दांचेही ग्रांथिक संदर्भ दिले आहेत.

५. उच्चारलेखन : मूळ दखनी साहित्य फारसी लिपीत निबद्ध आहे. नागरी वर्णमालेत नसलेले अनेक वर्ण फारसी वर्णमालेत आहेत, त्यांचे उच्चारही भिन्न होतात. परंतु देवनागरी वर्णमालेत नसलेले वर्णोच्चार, लिपी फारसी असूनही दखनीने स्वीकारलेले नाहीत. त्यामुळे वर्णोच्चाराचे लेखन देवनागरी लिपीतून करताना उच्चाराच्या लेखनाच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची तडजोड करण्याचे कारण पडले नाही.

६. इतर माहिती : मूळ शब्दात आढळून येणारे उच्चारविषयक अथवा सांस्कृतिक विशेष मराठी अर्थ दिल्यानंतर दिले आहेत.

७. वाक्प्रचार: वाक्प्रचारांचा सरळ मराठी अर्थ देण्यात आलेला असून आवश्यक त्या स्थळी वाक्प्रचारांची पूर्वापीठिकाही देण्यात आलेली आहे.

शब्दकोशात योजलेले संक्षेप

१. संक्षेपापुढे दिलेला आकडा पृष्ठांकाचा आहे. दोन आकडे जेथे दिले असतील त्या स्थळी प्रकरण क्रमांक आणि पृष्ठांक असा अनुक्रम समजावा. उदा. १. २९

२. लीळाचरित्राचे संदर्भ देताना पूर्वार्ध (पू) व उत्तरार्ध (उ) असे देऊन आलेला आकडा लीळेचा क्रमांक समजावा. असे उल्लेख नसलेल्या स्थळी पृष्ठांक आहे असे गृहीत धरावे.

३. पुढे दिलेल्या ग्रंथांचे संदर्भ संक्षेपाने कोशात आले आहेत. संक्षेपात नसलेले ग्रंथ आले आहेत ते त्या ग्रंथाच्या संपूर्ण नावासह.

अ	अव्यय.
अब्दुल	कुलियात अब्दुल्ला कुतुबशहा
अर	अरबी भाषा
इब्रा	इब्राहीमनामा, अब्दुल्ला कुतुबशाहकृत
कश	कशफुल् वजूद
किता	किताबे नवरस, इब्राहीम आदिलशहाकृत
किस्से	किस्से बेनजीर
कुमु	कुतुब मुश्तरी
क्रिया	क्रियापद
कुली	कुलियाते महम्मद कुली कुतुबशहा
खुश	खुशनामा

ग्रा	ग्रामीण मराठी बोली
गुल	गुलशने इश्क
गोवा	गोरखवाणी
चंद्र	चंद्रवदन और मोहियार
तारी	तारीखे इस्कंदरी, नुस्रतीकृत
तोती	तोतीनामा
धा	धातू
पु	पुल्लिंग
प्रा	प्राकृत
फा	फारसी
फूल	फूलबन
मन	मनलगन
मना	मनसमझावन, शाहतुराबकृत
मैना	मैना और सतवंती
रिज्वा	रिज्वाने शाह और रुहे अफजा
रुस्व	रुक्मिणी स्वयंवर, नरेंद्रकृत
लीळा	लीळाचरित्र, कोलते प्रत
लैला	लैला-मजनू
वाप्र	वाक्प्रचार
वि	विशेषण
शिला	शिलालेख (मराठी)
शिशु	शिशुपालवध, भास्करभट्ट बोरीकर कृत
सब	सबरस
सभा	सभासदाची वखर
सं	संस्कृत
सुख	सुखांजन
सैफु	सैफुल्मुहल्क व बदिउज्ज्मा
हिं	हिंदी
ज्ञा	ज्ञानेश्वरी (राजवाडे प्रत)

दखनी भाषेतील काही मराठी शब्द

अई	(अ)	स्त्रियांच्या तोंडी असलेला आश्चर्योद्गार. ग्रामीण मराठी स्त्रीच्या बोलीतही तो आढळतो.
अक्खड	(वि)	क्रव्याद (स्त्री)
अगत	(स्त्री)	अगत्य, आस्था, इब्रा. ३००, मराठी आगत-स्वागत.
अगला/आगला	(वि)	आगळा; ज्ञा. १.३७; १८.१४४६. तज्ञली दिये आगळा चंद्रसूर ते। कुमु. ५
अगाऊ		अगोदर
अंग	(पु)	शरीर.
अंग धूना	(वाप्र)	स्नान करणे.
आगीठी	(स्त्री)	अगटी, शेकोटी, ज्ञा. १३-१०३१
अंगनगाडी	(स्त्री)	आगगाडी (अग्नीचा अपभ्रंश अंगन)
अंग/आंगे	(अ)	स्वतः, सभा ३३, ३५
अचपल	(वि)	चपल (विरुद्धार्थत्व) 'अपचल मन माझे नावरे आवरीता' मनाचे श्लोक; न रह थीर अपचल हो तेजी फिरे। इब्रा, ३०७ अचंबक किते भांत अचपल तुरंगा अली, २७८
अचानक	(अ)	अचानक
अचंबा	(पु)	आश्चर्य. कुली, १-११५
आछरियाँ	(स्त्री)	अप्सरा; आसरा (ग्रा.) कुली, १. ४९
अछे	(क्रि)	प्रा. अच्छई. असे
अछती		असते
अछो		असो, गुल ४
अछेगा		असेल
अछना/आछना		असणे
अजमास	(पु)	अंदाज
अजूँ/अजनूँ/अझूँ	(अ)	अद्याप, अझून; प्रा. अज्झऊण, अजुई ज्ञा. २- १७ (आझुइं) ज्ञा. ७-७९ (अझूं) ज्ञा. ११-१०५ (अझुनि) झरी लहू की अजुनु उमलती है वां। कुमु, १२. अझूँ दीस बाकी है यक सितारा। सैफ, २५
अतां/अता	(अ)	आता

अनजानता	(अ)	अजाणता
अबोला पकडना	(वाप्र)	अबोला धरणे.
अपना सुंदर, दुसरों का क्या की जंगली सुवर	(वाप्र)	आपला तो बाळ्या दुसऱ्याचं ते कारटं
अप्रूप	(वि)	अपरूप, प्रिय, अपूर्व. ये जवानी सकी तेरी अप्रूप है । - मैना, १३९
अभाल/ आभाल	(पु)	१. आकाश; 'जैसी आभाळाची बुंथी । करूनि राहे गभास्ति' – ज्ञा. ६-२५१; २. ढग; ज्ञा. १८-१२२५; 'वरसने को अमरित अभाल होके आये । अली ९; ग्रामीण मराठी बोलीत 'आभाळ येणे' हा शब्दप्रयोग 'आकाश ढगांनी भरून आले' या अर्थाने रूढ आहे. फूल. ७९; कुलि, २-१०५; ८५
अलादी/आलादी	(अ)	अल्हाद; हळूवारपणे.
अल्लड	(वि)	अल्लड; 'के है सखा अल्लड होर नादाँ तूं' –तोती,५६
अवकाली	(क्रि)	१. अकाली पडणारा (पाऊस) ग्रा. अवकाली. लीळा १९८; 'पडी बिजली अवकाली मुजधर ऊपर'- लैला, १२० २. अवकळा,वाईट अवस्था.
अवगड	(वि)	अवघड; ज्ञा. १७-६७, १८.६४३. लिया आया जो पन्नाले का चडके अवगड गड को' अली, ५५
अवचट	(अ)	अचानक, एकाएकी
अवतार पैदा हुआ	(वाप्र)	अवतार धारण केला.
आवले – जावले	(वि)	जुळे; ग्रा. आवळ-जावळे
अवल्याद	(स्त्री)	मूळ फारसी; अवलाद –संतती; ग्रा. अवल्याद.
अवदसा /अवदासा	(स्त्री)	१. दुर्बुद्धी; ग्रा. अवदसा २. दुःस्थिती; 'तर अवदसा सुँ कदा जायेगा । मैना, १२७
अवसान	(पु)	बल, धैर्य, अली, ९३, १९९.
अवासवा	(अ)	अवाच्या सवा, भलतेच, अतिरंजित. ज्ञा. १३-७३१ (अव्हासवा)
अस्कारा/आश्कारा	(पु)	लौकिक; ख्याती ; 'हुआ अश्कारा हर दिल ब दिल' –लैला, ६१
असुध/ अशुध	(पु)	१. रक्त. पाहाः 'पोतुके भिजउनि श्रीमुखीचे असुध पुसीले । लीळा, (पू.) २४ २. अशुद्ध

असच	(वि)	असाच; असंच
असीवर	(पु)	घोडेस्वार, ज्ञा. ९-१७२
अस्तुरी	(स्त्री)	ग्रा. अस्तुरी, स्त्री.
अहे/अहें/आहे/ आसी/असवा/आसे	(क्रि)	आहे. 'इश्क नाम जिसका बिरहा क्या आहे.' —लैला ५१; 'तूं अवल, तू आखर तू कदिर अहे' —कुपु. १; चंद्र ७९; अब्दु २२, अली १०२
आखाडा	(पु)	ग्रा. आखाड, आषाढ महिना.
आगाऊ	(अ)	१. प्रथम, अगोदर; २. (वि) आगाऊ, अतिचलाख
आगाऊ बोल्या	(वाप्र)	१. अगोदर सांगितले, पूर्वसूचना दिली. २. उणे — अधिक (नको ते) बोलला.
आगीटी	(स्त्री)	शेकोटी; ग्रा. अगटी, तारी ३-३९
आट	(वि)	आठ; ग्रा. अट्टु.
आड आना :		आड येणे — १) अडथळा करणे; २) मध्यस्थी करणे; ३) संरक्षण देणे. 'ऐसा देवता उभयाचिये क्रियेचा निर्वाळा देखौनि आड घातिलै —लीळा. (उ.) ५१२.
आड घेणे	(वाप्र)	१. आश्रय घेणे, मध्यस्थी करणे, संरक्षण करणे; अली ५५; तारी ४.३ २. (येणे) विरोध करणे, परावृत्त करणे. ३. आड-विहीर.
आडौ	(वि)	आढाऊ, आडदांड; ग्रा. आडाऊ.
आती	(क्रि)	आहे. सं. अस्ति; लीळा (पू) : १११.
आदार	(पु)	आधार; ग्रा. आदार.
आदी	(अ)	आधी; ग्रा. आदार
आणा	(क्रि)	१. आण;
	(स्त्री)	२. आण, शपथ; ज्ञा. १२-१९६; १८-१३५९.
आनना	(क्रि)	आणणे
आपटना	(धा)	आपटणे
आपसे आपे	(अ)	आपोआप; ज्ञा. १-१८५ (आपैसें)
आपस का आपस पडना		प्रत्येकाला आपलेच पडते ! 'आपस का आपस 'पड्या हर किसे' कुमु. ८०

आंब	(पु)	आंबा.
आये जाये करना	(वाप्र)	ये-जा-करणे.
आरडावता	(क्रि)	ओरडतो, ग्रा. आरडणे; ज्ञा. १६.५ (आरडणे).
आरत	(स्त्री)	इच्छा, तळमळ; 'पाहे पां शंभूची प्रसन्नता । उपमन्युचिया आर्ता । काय क्षिराब्धि दूधभाता । देइजेचिना । - ज्ञा. ५.११; लीळा (उ.) ५००.
आरसी	(स्त्री)	आरसा; ज्ञा. ११-१५७; १८-९७० (आरिसा)
आलापाला	(पु)	झाडांचा पाला (समाहार द्वंद्व समास) लीळा (उ.) ४८०
आवा	(पु)	मडकी भाजण्यासाठी असलेली भट्टी.
आँसू	(पु)	अश्रू; प्रा. आस ७-११.
आसे	(क्रि)	१. असे; २. होते.
आभाल तूट पडना	(वाप्र)	आकाश कोसळणे. सब ११२
आमना धरना	(क्रि)	अभिलाषा बाळगणे. कुमु ७५. ग्रा. आमना धरणे.
इधर बाई/बाबी, उधर कुँवा	(वाप्र)	इकडे आड तिकडे विहीर; बाबी/बाई सं.वापि, मराठी ग्रा. बावी.
इराखत	(स्त्री)	फा. इराखत: लघ्वी; ग्रा. इराकत
उकलना	(धा)	उकळणे.
उंगलना	(धा)	उल्लंघणे, ओलांडणे.
उचा	(क्रि)	१. उचलला; मोती ६५. २. उंचावला; कुली १-२७.
उजल	(वि)	उजळ, सं. उज्वल, ग्रा. उज्ञल.
उजागर	(वि)	उजागर, प्रगट
उजु	(वि)	१. सरळ – सं. ऋजु, ग्रा. उजु; लीळा (पू.) २९; २. उजवा, श्रेष्ठ.
ऊट/उठ	(क्रि)	ऊठ; अली ९५.
उटारेटा	(स्त्री)	ग्रा. दगदग, धावपळ, परिश्रम, नसती उठाठेव.
उडवा	(पु)	ग्रा. उडवा. शेणाने लिंपलेल्या तुऱ्हाट्याच्या मांडवात भरलेला गोवऱ्याचा ढीग.
उडी	(स्त्री)	उडी, अली २६७
उतरता	(क्रि)	उतरतो

उतराई	(वि)	उतराई; ऋण फेडणे; ज्ञा. १७-२७५; लीळा २७२ 'अगर खिदमत में अपना जनम खोयेगा तो माँ- बाप का क्या उतराई होएगा' सब ९६.
उताना	(वि)	१. उताणा. २. अहंकारी – 'तैसा विद्यावयमाने । उताणा चाले ॥ ज्ञा. १३. ७१४.
उतारू	(पु)	उतारू, प्रवासी.
उतारा	(पु)	१. उतारा (विषावर, ओषधावर) २. वापरलेला कपडा (दान देतात तो).
उतना	(धातु)	उतणे, मातणे.
उतावल	(वि)	उतावीळ; उतावला ना करना, भोत धीर अछना । सब, ९६
उतपन	(पु)	उत्पन्न, प्राप्ती, निपज.
उदासी	(वि)	उदासवाणे
उधलना	(धा)	उधळणे
उपजना	(धा)	उपजणे, उत्पन्न होणे.
उपटना	(धा)	उपटणे. अली १०६.
उपराटा	(वि)	उफराटा ग्रा. उरफाटा.
उपराल	(वि)	वरचा, श्रेष्ठ.
उपराला	(पु)	उपराळा, लष्करी कुमक, सभा ५५, अली ६७.
उपाशी	(वि)	उपाशी
उमस/उमज	(स्त्री)	१. जाणीव; साचोकारे नि वस्तु विचारें । कैंचे एकासि मन दुसरें। जे भिन्नभिन्न व्यवहारें। उमसिजै ॥ ज्ञा. १५-३०३; 'सो खुदा बेनिहायत हो पाया उमस ॥ सैफु. १२८ २. विसावा; तारी ५.३७; तोती १७१; गुल्श.१२८ रिज्वा ३७.
उलना	(धा)	उलणे, तडकणे. 'जमीं पिंड होकर उली दो सरीर' – इब्रा. १९९.
उलंगना	(धा)	उल्लंघणे – तोती २०८.
उलेंडना	(धा)	ओलांडणे.
उलाल	(वि)	ग्रा. उलाल, उल्हाल ; मागच्या बाजूस ओझे जास्त आल्याने बैलगाडी समोरून उंचावते व बैलांच्या गळ्यास फास बसतो, तेव्हा गाडी उलाल झाली असे म्हणतात. कुली १९८.
उसासाँ	(पु)	(अ.व.) उसासे, उच्छ्वास; तोती १६३.
ऊंट	(पु)	उटणे (शरीरास लावण्याचे सुगंधी द्रव्य.)
ऊद बालना	(धा)	ग्रा. ऊद बाळणे; धूप घालणे.

ऊसर	(वि)	ऊसर (जमीन), नापीक जमीन
ए	(स)	हे, प्रा. ए
ऐलाड	(अ)	ऐलाड, अलीकडे; ज्ञा. ६-१९१ (ऐलाडि) 'तो लोरक ते ऐलाड है सब नाम' मैना १६३.
ओडाओड	(अ)	ओढाओढ
ओतना	(धा)	ओतणे; ज्ञा. ६-२४९; तारी ६.
ओसनते	(क्रि)	ओसणतात; बरळतात; ज्ञा ८-६.
कचकचाना	(धा)	कचकच करणे; जाच करणे
कंचन के उत्तम वरन को क्या काम टंकनखार का?	(वाप्र)	जातीच्या सुंदराला शृंगार कशाला? (टंकनखार नावाचे द्रव्य सोन्याला झळाळी आणण्यासाठी योजतात. शंभर नंबरी सोन्याला त्याची गरज नसते.)
कटक	(पु)	१. सैन्य;ज्ञा. ११-१९६; १८-१६१४; लीळा ७४. २. आक्रमण ; लीळा २३७ (कटकै); अली ६७, १०२
कटकटा!	(अ)	उद्‌गारवाचक अव्यय. प्राचीन मराठीत दुःखोद्‌गार या अर्थाने रूढ. कटकटा धातेया/ काय केले संसारा ह्या – उद्धवगीता
कडना	(धा)	(एखाद्याच्या नावाने) कढणे, दोषारोप करणे.
कड	(पु)	काठ; ज्ञा. १८-१८३; तोती २३६
कडबा	(पु)	कडबा, लीळा (पु.) ९६. ज्वारीच्या ताटांची वैरण.
कडब/कडबू	(पु)	कडबू; पुरण घालून केलेली करंजी.
कंत	(पु)	कांत, प्रियकर, प्रा. कंत करकण्डुचरित्र ५७५-२. लीलावई १०५६; लीळा ३-४८७ (लोकगीतात आणि लावणीत कंत हा शब्द वारंवार येतो)
कंथा	(स्त्री)	कंथा, गोधडी. 'तीनसौ साटां थेगलि कंथा' – गोवा. १११-४; 'कंथा अवदसा का लाया खेलने' सैफु. ११३; गुल १०३, कुली १-२०.
कदमद	(अ)	कधीमधी; 'ये जंगल मे कदमद को आती हूँ मैं । - रिज्वा ३३.
कदां/कदीं/ कधीं	(अ)	कदा, कधी; 'कधी रात हो दे कधी दीस' – कुमु. ३; तोती १२१; फूल. १२
कंदूरी	(स्त्री)	ग्रा. कंदूरी; नवस फेडण्याच्या निमित्ताने दिलेले सामिष भोजन सैफु. १६८.
कदूरत	(पु.)	कद्रूपणा, तोती १५८.
कनोले/कानोले	(पु)	कानोले.
कमंद	(पु)	कबंध; शिरविरहित धड; किस्से ३९
करडा	(वि)	१. करडा रंग; 'पठाणां के सौंदल में करडी कमान' अली २५६.

		२. कठोर; 'काया है बली करडा बोलै' गोवा ६८.
कलकलाट	(पु)	कलकलाट, गोंगाट.
कलकलाना	(धा)	कलकल करणे, कोलाहल माजविणे.
कलाना	(धा)	१. कालविणे. इब्रा. ३३३. २. बोलणे, बोलावणे (कहलाना)
कलाकर	(अ)	कालवून. कुली १-१९६.
कलावंत	(पु)	१. नर्तक, गायक. 'कलावंत नाचे किते ताज सो' लैला- ५८ २. वेश्यापुत्र; ग्रा. कळवात (गायिका वा नर्तिका यांची संतती. धर्माने मुसलमान असूनही अन्य धर्मियांशी त्यांचे सामाजिक नाते असते.) मराठवाड्याच्या काही भागात हा समाज आढळतो. दखनी साहित्यात याच जमातीस उद्देशून (अन्य संदर्भ नसल्यास) कलावंत हा शब्द योजण्यात आलेला आहे.
कलिंगड	(पु)	कलिंगड.
कलोल	(पु)	कल्लोळ. 'पड्या तो दो दल के दर्म्या ने समाया शोर कलोल का' अली १६९.
कवतिक/कुतुक	(पु)	कवतिक, कौतुक, 'आइकै कवतिक होये कैसे' ज्ञा. ६-४४० तोती. २९५.
कस	(पु)	कस; शक्ती, सामर्थ्य; अली ५७.
कसब	(पु)	कसब; कौशल्य. अली ११६.
काकलूत	(स्त्री)	काकूळती येणे, दीन होणे. 'काकलूत ते जो दिल मुएगा तो बिचारा क्या करेगा' सब ५४; 'जैसी जात्यंधा पलाणी पावे। मग ते काकुलती सैरा धावे' — ज्ञा. २-३२६.
काग	(पु)	काग, कावळा, लीळा (उ.) ३०३, 'कोवे को सो हंस होर हंस को सो काग' कुमु. ३.
कांगडे	(पु)	कलिंगड.
काज	(पु)	काज, कार्य; लीळा (पू.) ३२४.
काट	(पु)	ग्रा. काटुक; सं. काष्ट.
काटक	(वि)	काटक, सशक्त.
काँटा करना	(धा)	वजन करणे, काटा कारणे.
काटाकाट	(अ)	काटाकाट.
काडना	(धा)	काढणे.
कात	(पु)	कात (हिंदी : कत्था).
कान भरना	(वाप्र)	कान भरणे.
कापड	(पु)	कापड (हिंदी: कपडा)

कापडी	(पु)	यात्रेकरू
कारणे	(अ)	तृतीया व चतुर्थी या विभक्तींच्या प्रत्ययांच्या ऐवजी येणारे अव्यय.'इया कारणे' — ज्ञा. १३.३०९; 'मज कारणें' ज्ञा. — १०. १३४९. 'दिया जीव शेरीन के कारने' कुमु ४५.'जो तुज कारने जगत सब किया' — लैला. ५१
कालवा	(पु)	कालवा — अली २६७.
कास	(स्त्री)	कास, आश्रय. इब्रा. २७०
कासव-झोप	(वाप्र)	कासव झोप; सावध निद्रा.
किताब	(पु)	पदवी, किताब. मूळ अरबी खिताब. दखनी — मराठीत समान अपभ्रंश.
किती	(वि)	किती. किस्से १०८
कितेक	(वि)	कित्येक. कुली. १-१४
किली	(स्त्री)	किल्ली, चावी. 'खजाँ कुपुल कीता है किली बाहर' कुमु. ३; 'सबूरी किली है जिस्की' सब १३१.
कुचुकुचु करना	(वाप्र)	कुचुकुचु करणे; हळू आवाजात निंदा —नालस्ती करणे.
कुनबट	(वि)	कुणबिकीशी संबंधित; ज्ञा. १३. २१०.
कुबल	(वि)	समर्थ, कठीण, वजनदार, 'काम भोत कुबल' सब ९८ तारी. १.१०; सभा १४ (मराठी बखरीत हा शब्द वारंवार येतो)
कुसल	(पु)	कुसळ. 'हरेक कुसळ बरचा बना, काटा सो हरके खंजीर' अली १०२
कूच	(धा)	कूच करणे. अली ९७.
कूड	(वि)	कुडे, खोटे, वाईट. लीळा (पू.) ७८; ज्ञा. २-२६ (कुडें) सब. १०
केंस/केस	(पु)	केस. तोती. २१, कुली. १.९३ (मराठी शुद्धलेखनाच्या जुन्या नियमाप्रमाणे या शब्दातील 'के' सानुस्वार असे — 'केंस' दखनीने त्याच स्वरूपात हा शब्द घेतला असून साहित्यात 'केंस' असा रूढ आहें. अनुस्वार मात्र पूर्णपणे उच्चारित आहे. बोलीत मात्र तो सानुस्वार नाही.)
केहुरा	(वि)	केव्हडा, केवढा.
कैरी	(स्त्री)	कैरी. इब्रा ५४.
कोट	(पु)	गडकोट, प्रकार, तटबंदी. अली ८२.
कोड	(पु)	कोडकौतुक; लीळा (उ.) १५०.
कोंडना	(धा)	कोंडणे. अली ६३; तोती १९९
कोंडबार	(पु)	कोंडवाडा. कुली २. १४८

कोथिंबीर	(स्त्री)	कोथिंबीर.
कोंदन	(पु)	कोंदण. अली १००.
कोनते	(क्रि)	कोंडतात.
कोम	(पु)	ग्रा. कोम, कोंभ. 'परम तपसों कुँवला कँवला ततका कोम-' — लैला ११४
कोरड	(वि)	१. कोरडा. 'कोई कोई कोरड रह गया यों भाषै गोरखनाथ ।' गोवा ७०-२११.
	(स्त्री)	२. कोरडवाहू जमीन.
कोरडा/कोरडे	(पु)	कोरडा (बैलाला मारण्यासाठी योजतात तो.)
कोलती	(स्त्री)	ग्रा. कोलती; कोलीत.
कोला	(पु)	कोल्हा.
कोलाटी	(पु)	कोल्हाटी. कसरतीचे खेळ करून दाखविणारी भटकी जमात. ज्ञा. १८.६० (कोल्हाटी)
कौटाल	(पु)	ग्रा. कौटाल. जादूटोणा; ढोंगधत्तुरा, मायती प्रेम मैना १८३.
खजीना	(पु)	(अ.) खजाना (दखनी-मराठीत समान अपभ्रंश) अली. २५७. सभा १५
खट्टू	(वि)	खट्टू, नाराज.
खडक	(पु)	खडक; ज्ञा. १२. १६०; अली १३०.
खडतल	(वि)	खडतर (र् व ल् यांची परस्पर अदलाबदल इतरही अनेक शब्दांत आढळते.)
खट्टा	(वि)	१. अंबट;
	(पु)	२. खड्डा.
खटखट करना	(वाप्र)	कटकटी निर्माण करणे. नसत्या अडचणींचा पाढा वाचणे.
खंड	(पु)	विभाग, तुकडा, खंड.
खंड/खांडा/खांड	(पु)	खांडे, खड्ग.
खंड्यांती	(वि)	खंड्यांशी,खंडोगणती. (पुरातन गणना पद्धतीनुसार वीस मणांची खंडी होते. पुष्कळ, विपुल हा भाव)
खबर धारणा	(वाप्र)	मागावर असणे, समाचार घेणे, विचारपूस करणे.
खरग	(पु)	खड्ग; कुली १. २४
खलबलाट	(अ)	खळबळ; इब्रा ४३३.
खलाल	(पु)	खळाळ; उताराची जागा; 'सबद था हर खलालते । रकत बहने के खलखल का' ॥ अली १७१.
खाँतक	(अ)	कहाँतक, कोठवर (महाप्राणाचे स्थलांतर)

खांदा	(पु)	खांदा; 'जो खांदे चवाला चिलोटी है सिर' — मैना २२७, तोती १६४; अब्दुल ५. ज्ञा. १६-२९१.
खान	(स्त्री)	खाण; कुली १-२०; अब्दुल ३०.
खांब	(पु)	खांब; स्तंभ; इब्रा ३४१, ६२२.
खिजना	(क्रि)	खिजणे, खिजाविणे.
खोड	(स्त्री)	खोड, सवय
खोडिल	(वि)	खोडिल, खट्याळ, अब्दुल ७४.
खोंचना	(क्रि)	खोंचणे; शस्त्र शरीरात घुसणे.
खोप	(पु)	खोपा; अंबाडा; कुली १-२०५
गंगाल	(पु)	गंगाळ, ग्रा. घंगाळ
गंज	(वि)	पुष्कळ, ग्रा. गंज-पुरेसे; फा. गंज —ढीग सब १३.
गड/गडकोट	(पु)	गडकोट, किल्ला; तोती १६५; गुल १२.
गदडा/गधडा	(वि)	१. लक्षणेने गाढव, मूर्ख.
	(पु)	२. गाढव प्राणी (तुच्छतादर्शक)
गमना	(क्रि)	१. सुखाने कालक्रमणा करणे, करमणे; ज्ञा. १८-२४७; २-७०; लीळा (पू.) ५५. 'अकेली तुजे क्या गमेगा याँ'- रिज्वा १२०; 'तिल तुजबिगर मंज न गमे' — अब्दुल ४, अली २२३. २. वेळ घालविणे, गमणे. 'गमे रात दिन हमन संग तूँ' कुतु २; 'न गमना देखत वखत अपना कही' सैफु. ७९ ३. वाटणे.
गम से चूर	(वाप्र)	दुखाःत चूर 'पीटता होता गम से चूर' — सुखांजन, १३२
गम्मत	(स्त्री)	मौज, थट्टा, मनोरंजन; ('गम्मत खाना', 'गम्मत गाह' असे सामासिक शब्दही प्रचलित आहेत) 'गम्मत की बात अछो, याँ ते वो किस्सा काम का बोलूँ' अली १५२. २. लहान मुलांसाठी रहस्यमय गोष्ट.
गरब गलना	(वाप्र)	गर्भगळित होणे, धास्तावणे. कुमु. ८७.
गलना	(क्रि)	गळणे.
गलसेरी	(स्त्री)	गरसुळी; स्त्रियांचा एक अलंकार.
गवंडी	(पु)	गवंडी, बांधकाम करणारा.
गाजना	(क्रि)	गाजणे.
गांट बांदना	(वाप्र)	खून-गाठ बांधणे.
गादीवाला	(वि)	गादीवर आलेला. वारस.
गाब	(पु)	गर्भ; ग्रा. गाभ/गाब.

गाबिन	(स्त्री)	गरोदर, सं. गर्भिणी; ग्रा. गाभण
गाय कसाबीच कुँ पतियावे	(वाप्र)	कसायला गाय धार्जिण (शब्दशः अर्थ गाईचा कसायावरच विश्वास असतो)
गाल	(क्रि)	१. गाळणे, प्रा. गाल-सावयधम्मदोहा २६; ज्ञा. १८-१३२०. 'पानी किया गाला मेरारा सरीर' सैफु. ११८ २. घालणे (महाप्राणलोप) ३. (पु) गाल.
गिरगुट की दौड वाडीलगत		सरड्याची धाव कुंपणापर्यंत.
गिरान	(वाप्र)	ग्रहण, ग्रा.गिरान; 'के जो चांद को पकड्या गिरान' – मैना.१४२.
गिराहक	(पु)	ग्राहक ; ग्रा. गिऱ्हाईक.लैला १२०
गिलावा	(पु)	गिलावा,लैला ८१
गुटी	(स्त्री)	गुटी,ग्रा.घुटी
गुडगा	(स्त्रि)	गुडघा; (अंती महाप्राणाचा लोप)
गुरगुराना	(क्रि)	गुरगुरणे.
गुदगुली	(स्त्री)	गुदगुली.
गोट	(पु)	गोठ. स्त्रियांचा हातात घालण्याचा सुवर्णालंकार.
गोत	(पु)	गणगोत; 'गोतिया' लीळा. २७ सैफु. १७०.
गोदडी	(स्त्री)	गोधडी; गुदडी-गोवा.
गोरीतगट	(स्त्री)	गोरीतगट.
घड	(पु)	घड (फळांचा), इब्रा ५३६.
घडना	(क्रि)	घडणे, घडविणे; 'पानी तें मोती घड्या' सब २१.
घडमोड	(स्त्री)	घडामोड, अली १४०.
घरघालू	(वि)	घरबुडव्या; ग्रा. घरघालू.
घर कूँ दिवा के मशीद कूं दिवा	(वाप्र)	आधी प्रपंच, मग परमार्थ
घरेघर	(वाप्र)	घरोघर.
घाबरा	(वि)	घाबरलेला. 'हुवा घाबरा शादमानी सय्या' सैफु. ५८.
घारगी	(स्त्री)	घारगे, एक पक्वान्न
घाल	(क्रि)	घालणे; घल्लक- सावय्यधम्मदोहा १६९; 'आपस कुँ कुफ्र में घाल्या' सब ४६; तोती ८.

घालमेल	(अ)	घालमेल – 'करे यक जो मर्दाने यों जीव पे खेला। जमे ये सो बाजे हुए घालमेल ॥ अली २०८
घाला	(अ)	घाला; संकट.
घेरना	(क्रि)	घेरणे.
घेरी	(स्त्री)	घेरी, चक्कर.
घोंगडी	(स्त्री)	घोंगडी, मैना १४२.
घोडा फेकना	(वाप्र)	घोडा फेकणे.
घोर	(पु)	घोर, चिंता; अली २९४.
च	(अ)	दखनी आणि मराठी या सहोदरा भाषा आहेत हे सिद्ध करण्यास 'च' या अव्ययाचा एकमेव आधार पुरेसा ठरावा. आधुनिक भारतीय भाषांत मराठी खेरीज अन्य कोणत्याही भाषेत या अव्ययाच्या प्रयोग होत नाही. त्यामुळे दखनी भाषेतील 'च' मराठीतूनच उसनवारीने आलेला आहे या विषयी शंका बाळगण्याचे कारण नाही. 'नाँव सुनतेच दिल हुआ बेताब। बाँस आतेच में चड्या यूं शराब' –सब ३१.
चकमक	(स्त्री)	चकमक (उडणे), संघर्ष.
चकतियाँ	(स्त्री)	चकत्या.
चकोट/चखोट/चोखट	(वि)	चोखट, चांगले. ज्ञा. २. २१३ (चोखट)
चट	(स्त्री)	चटक, आसक्ती, ग्रा. चट इब्रा. ५१०.
चट करना	(क्रि)	चट्टामट्टा करणे, खावून टाकणे.
चड	(वि)	अधिक, श्रेष्ठ.
चपलाई	(वि)	चपळाई.
चरगटपणा	(वि)	चारगटपणा.
चरफरना/ चडफडना	(क्रि)	चडफडणे.
चलनी	(स्त्री)	चाळणी. 'चलनी गगन की हात ले निस कि है मोतीशार आज' अली १०८.
चवतालिसवाँ	(वि)	चव्वेचाळीसावा; ग्रा. चवताळीसावा .
चवाळा	(पु)	चवाळे. (गोणपाट उसवून एक वा अधिक गोणपाट एकत्र शिवून त्याचा अंथरुणासाठी उपयोग करतात ते) 'की बेबहा पाटोला की कमबहा चंवाला' (मौल्यवान रेशमी वस्त्र असो की कमी किंमतीचे चवाळे – वाक्प्रचार)
चलावल	(स्त्री)	चळवळ.

चाईमाई	(पु)	चाऊमाऊ, १. लहान मुलांचा एक खेळ. घोळक्यात वर्तुळाकार बसून लहान मुले एकमेकांचा कान धरून 'चाऊमाऊ पत्राळीचे पाणी पिऊ' असे तोंडाने म्हणतात. २. अगदी हलकासा फराळ. सब १७७.
चाकनी	(स्त्री)	चाखणी (महाप्राणलोप).
चाकरी	(स्त्री)	चाकरी, सेवा 'आया कमरबंद आस्माँ करने जमी की चाकरी' अली ११५ (कमरेला पट्टा बांधून आकाश पृथ्वीच्या सेवेस उतरले)
चाड	(स्त्री)	चाड. ज्ञा. १८-७८; लीळा (पू.) २७०. मोती ७७
चाडी	(स्त्री)	चहाडी (शब्दांतील महाप्राणाचा लोप. 'किया है कई लोकाँ चाडी ये काम' तोती २३.
चाडखोर	(पु)	चहाडखोर
चापना	(क्रि)	चापणे, दम भरणे.
चाबना	(क्रि)	चावणे.
चाबूक	(पु)	चाबूक. 'अबर तुरंग जइचंद नवी । चाबुक सुरंग तिस बिजली'—कुली ९.३; अली १०२.
चारा	(पु)	चारा; ज्ञा. १३.६६८.
चाल करना	(क्रि)	चाल करणे, आक्रमण करणे.
चाले करना	(वाप्र)	चाळे करणे, वेडाचार करणे.
चितारी	(पु)	चित्रकार. ज्ञा. १४.२६०
चितार्‍या	(क्रि)	चितारणे; चंद्र ८५; कुली १.१०८
चिंत्या	(क्रि)	चिंतिले, विचार केला, (सं. चिन्तयामास) सब ७
चिंते में पड्या	(वाप्र)	चिंतेत पडला. (चिंता या नामास विभक्ती प्रत्यय लागण्यापूर्वी त्याचे मराठी प्रमाणेच सामान्यरूप झाले आहे.)
चिंदी/चिंदडी/ चिंदोटी/चिंधोटी	(स्त्री)	ज्ञा. १८.९११ (चिंधी), लीळा ७९. (चिंधिया) 'सखियाँ क्या चिंदडियाँ रंग सट्या' अली — १०८. 'सदा कंबर को बस यक चिंधोटी तुजे' तोती. ८६ प्रा. चिंधिय — करकण्डु — चरित्र १.१.८
चिरा/चीरा	(पु)	घडविलेला दगड. लीळा पू. ३८. 'चीरा बग तीनसो साटी' गोवा १६५.
चीज करना	(वाप्र)	चीज करणे, सार्थक करणे. 'करो चीज मेरी मशक्कत तुमे' कुमु ७४.
चीर	(स्त्री)	१. चीर, सांद. 'सांद कोई भांग दर्म्यान यो मांग चीर' — इब्रा ६१०.

		२. वस्त्र; विशेषत: लुगडे. लीळा (पू.) २१७ (चीरचोळी)
चुकामूक	(अ)	चुकामूक. तोती २५४.
चुक/चूक	(स्त्री)	'देखो चूक याराँ सो राखोना बोल' — मैना १९४.
चुक्या	(क्रि)	चुकला. ज्ञा. १८-१३० (चुके), कुली १.४७; चंद्र.७७ तोती १५९; सबरस १५१.
चुटपुट/चुटपुटी	(अ)	चुटपुट; 'मुझे चुटपुटी इस के है ख्याल में 'रिज्वी ७२, तोती १२७. अब्दुल २९.
चुरमुराना	(क्रि)	चुरमुरत बसणे, हात चोळीत बसणे.
चुलबुलाना	(क्रि)	चुळबूळ करणे; रिज्वा. ४५.
चुँटी को निकले पर	(वाप्र)	मुंगीला पंख फुटले; विनाशकाल ओढवला.
चेटक	(पु)	चेटूक.
चोंच	(स्त्री)	चोंच
चोर की बोंबडी चावडी तलक	(वाप्र)	सरड्याची धाव कुंपणापर्यंत. (शब्दशः) चोराची बोंब चावडीपर्यंत.
चोज	(पु)	चोज, कौतुक, लीळा (उ.) १९० प्रा. चोज्ज. सावयधम्मदोहा २००
चोपडी	(स्त्री)	चोपडी, पुस्तक, वही.
चोली	(स्त्री)	चोळी; 'ओ जोबन सो चोली के दो हात में। जिवं अमृत के फळ छिप रहे पात में ॥ -तबई (हस्तलिखितावरून)
चौक	(पु)	चौक; इब्रा ३२०.
चौफेर	(अ)	चौफेर. इब्रा. १४८.
छकडा	(पु)	छकडा (सं. शकट) संस्कृत भाषेतील 'श' या वर्णाचे प्राकृतात 'छ' मध्ये रुपांतर हाते. दखनी भाषेत संस्कृत आणि अरबी-फारसी भाषांतील 'श'चे 'छ' मध्ये परिवर्तन होते (छबीना-समारंभाची मिरवणूक, फा. शबीनाहू)
छलना	(क्रि)	छळणे.
छानछोक	(पु)	छानछोक; फा. शानोशौकत.
छावनी	(स्त्री)	छावणी, फा. शामियाना, अली १४७.
छावा	(पु)	छावा; सं. शावक, इब्रा. ४३१.
जंगल	(पु)	जंगल; रान/शेत या अर्थानेही या शब्दाचा उपयोग होतो; लक्षणेने बहिर्दिशेला जाणे हा अर्थ ही दर्शविला जातो.

जतन	(पु)	जतन; ज्ञा. १३-५०२; १८. १४६७; तारी. ५-१८; कुली १-९८. 'जिसका जोत तुज ध्यान केरा रतन । मरे मन के संदूक में रक जतन ॥ - सैफू. ३
जदीं/जधीं	(अ)	जेधवां/ जेव्हा
जत्रा	(स्त्री)	जत्रा, यात्रा
जनावर	(पु)	जनावर, प्राणी, फा. जानवर. दखनी —मराठीत समान अपभ्रंश. 'जनावर निकल आये दर्या के भार'—सैफू. ६४.'जनावर देखे आग, गये भार भाग' — लैला ७०
जप	(क्रि)	१. जपणे, २. (पु) जप; जप करणे.
जमदर	(पु)	जमदड, एक हत्यार सं. यमदंष्ट्रा.
जलते ऊपर तेल सटना	(वाप्र)	आगीत तेल ओतणे.
जलो	(क्रि)	जलो, आग लागे; 'कही भागवंती, जलो मेरा भाग' मैंना १४१.
जँवई	(पु)	जावाई, सं, जामात; प्रा. जावाय, महापुराण ३३-४-१६
जागना	(क्रि)	जागणे.
जागा	(स्त्री)	जागा. फा. जगह; दखनी —मराठी समान अपभ्रंश.
जागाजागा	(अ)	जागोजाग; मराठी बखरीत 'जागाजागा' हा प्रयोग येतो. सब ११.
जाच	(पु)	जाच;
	(क्रि)	जाच करणे. 'तेरा जाचना अबलग मैं सही' —मैना ८९.
जामना	(क्रि)	जामणे, दम भरणे.
जालना	(क्रि)	जाळणे. 'के यकदम सो जाल्या है सालीम कुफार' — कुमु १२. फल. १२५, तारी ४-१२; अली २७.
जासों	(क्रि)	जाशील, जावो; चंद्र १०३. प्राचीन मराठीत 'जाइजसु', 'येइजसु' अशी रूपे येतात. भविष्यकाली व विध्यर्थी ही रूपे दखनीत प्रचलित आहेत. मराठी आख्यातरुपेही दखनीने उचलली आहेत त्याचे हे एक उदाहरण.
जितना	(क्रि)	जिंतणे, जिंकणे. ज्ञा. १-२०० (जिंतिला)कुली १-१८५.
जिस चूले की कोलती उसी मेंच अच्छी जलती	(वाप्र)	चुलीतले लाकूड चुलीतच जळते!
जिसे नेट नई उसे भेट नई	(वाप्र)	कष्टावाचून कैचे फळ ।कष्ट नाहीं ते निर्फळ.

जीना	(पु)	जिना, पायऱ्या.
जीब	(स्त्री)	जीभ, महाप्राणलोप- ग्रामीण मराठीची प्रवृत्ती. 'मेरी जीब को कर शकरबार जम' सैफु ४, अली २९.
जीव	(पु)	जीव.
जीव न रहना	(वाप्र)	जीव राहात नाही. तळमळणे. अस्वस्थ होणे, 'रह्या नई मंज जीव तो फिर आई मैं' मैना १२४.
जीव लाना	(वाप्र)	जीव लावणे; प्रेम करणे. कुमु. ६.
जीव पर उटना	(वाप्र)	जिवावर उठणे 'दाउद इस खातिर जीव पर उटे' –सब ४६
जीवखेणी	(वि)	जीवघेणी. तोती ११९
जीवता	(वि)	जिवंत, तोती ९८.
जीव देना	(वाप्र)	१. जीव टाकणे; (क्रि) २. आत्महत्या करणे.
जीव पों खेलना	(वाप्र)	जिवावर/जीवाशी खेळणे; खेल्या है अपने जीव पों शतरंज अली ११४.
जीव पों होड लगाना	(वाप्र)	जिवाची होड/बाजी लावणे.
जीव होठों पे आना	(वाप्र)	प्राण कंठाशी येणे.
जीव लाना	(वाप्र)	जीव लावणे. 'नको जीव ला इस दगाबाज सें' – कुमु.६
जीव हात में लेना	(वाप्र)	जीव मुठीत धरणे. अली, १६४
जीवाँ मारना	(वाप्र)	जीवे मारणे. वध करणे.
जुझ	(पु)	झुंज, युद्ध, (यादवकालीन मराठी-जुझ) लिळा- ३४१, ज्ञा १. १७२, सं. युद्ध, प्रा. जुज्झ.
जुना/ झुना	(पु)	झुणा, रंगीत परकर
जुप्या	(क्रि)	जुंपले.
जूना	(वि)	जुने.
जे (अ) –की जेब में नई खल्लीकी डल्ली, छैला फिरे गली गली	(वाप्र)	खिशात नाही अडका, बाजारा निघाला धडका
जैसा सूत वैसी फेंटी, जैसी माँ वैसी बेटी	(वाप्र)	खाण तशी माती (शब्दशः अर्थ –जसे सूत तशी पेटी (गुंडाळलेली), जशी माय तशी बेटी)
जैसे झाडाँ लगावेंगे, वैसे फल पावेंगे	(वाप्र)	कराल तसे भराल. सब, १२६.

जोडना	(क्रि)	जोडणे.
जौ	(अ)	जंव, जोंवर. तारी १.८
ज्यास्ती	(वि)	जास्त, अधिक. 'देखनी कहने से ज्यास्ती है' —सब १९ किस्ते ८२, तोती ५९
झडना	(क्रि)	झडणे. तारी २-१९; अली ९८.
झरे/झिरी	(पु)	झरा; ग्रा. झिरा; ज्ञा. ६-२८६ (झरी) 'तरे लब में दिसते है अमरित झरे' मैना-२०० (झरे अ.व). 'दोनों दो आबे हयात के झिरे' सब — १४१.
झलकना	(क्रि)	झळकणे.
झाँकना	(क्रि)	झाकणे.
झाँप	(पु)	झापा.
झुज	(पु)	झुंज, युद्ध; ज्ञा. २३१ (झुज); तोती १६७, अली २६४.
झुंजुरके/ झंझुरके	(अ)	अगदी प्रातःकाली ; ग्रा. झुंझुरके; लीळा (पू.) २६ (झुंझुरके) 'हुई जब सबा तो झुंजुरकेच ऊठ' — तोती १०६.
झूजना	(क्रि)	झुंजणे, लढणे; अली १०२.
झूटे हात से कोए को न मारना	(वाप्र)	उष्ट्या हाताने कावळा न मारणे.
झोंट धरना	(वाप्र)	झौट धरणे; युद्धात अगदी समोरासमोर शत्रूचे केस ओढून झुंजणे. 'करे पीरत केरे या बाज्या झोंट धरसी अंग' — नवरस ८५.
झोडाझोड	(अ)	मारझोड; 'लगे झोंट घरने झोडाझोड हुई'- अली २६५.
टट्टू को टोमणी, तेजी को इशारा	(वाप्र)	शहाण्याला शब्दांचा मार — सब ११२. (शब्दशः अर्थ. तट्टू वेगाने चालावा यासाठी लाकडी काठीच्या टोकाला लोखंडाची अरी बसविलेली असते. परंतु, तापट घोड्याला वेग घेण्यास केवळ शब्दांचा इशारा पुरेसा होतो.)
टिला/टिलक	(पु)	टिळा, टिळक. (संस्कृत शब्दातील दन्त्यवर्णांचे मूर्धन्यात रुपांतर करण्याची मराठी भाषेची प्रवृत्ती दखनीतही आढळते.)
टुक	(अ)	क्षणभर; ग्रा. टुक
टेकडी	(स्त्री)	टेकडी.
टोपण	(पु)	टोपण.
टोमणी	(स्त्री)	१. टोचणी, २. टोमणा.

ठाव/ठाँव/ठाऊ	(पु)	ठाव, स्थान; ज्ञा. २-१०; ११-१४६ (ठावो) तूं किसका है जागा, तेरा ठाव कौन' – सैफू ८५. इब्रा २१८ (ठाऊ)
ठावे ठाँव	(अ)	ठाई ठाई; सब १
डग	(स्त्री)	डग (दोन चालत्या पावलांतील अंतर – 'एका डगात घर जवळ करणे) अली ७६; तोती १२३.
डगमगा	(क्रि)	१. डगमगली, २. (स्त्री) डगमग.
डंड	(पु)	दंड, बाहू; अली ६६.
डंडलाने लगा/ डंडलाना	(क्रि)	धक्का बसल्याने डळमळणे. ज्ञा. १-१५५ (डंडलित); लीळा (उ) ३७ (डंडलविणे) अली ६७.
डलमलना	(क्रि)	डळमळणे; 'ऊपर इसके चडन्ने यो डलमले' रिज्वा-८०
डाग-डागिने	(पु)	दागदागिने; ग्रा. डाग-डागिने; डाग; अलंकार, अली ३.
डावा	(वि)	डावा.
डोंगर	(पु)	डोंगर, शिला (शके १२१०); ज्ञा. १५-२७१; तारी २-१३; अली ५६.
डोंगर खोद चुआ मारना	(वाप्र)	डोंगर पोखरून उंदीर काढणे; अली ५६.
डोलका	(फ)	ढोलके (महाप्राण लोप)
डोह	(पु)	डोह; ग्रा. ढव. अली ८४.
डौरा/ढवा	(पु)	१. ढवारा, ढव्हार (नवे पीक आल्यानंतर शेतात देण्यात येणारी सामिष मेजवानी.) २. हल्ला (ढवा-ग्रा.) आक्रमण; अली २६९; तारी ४-२१.
ढग	(पु)	ढग, मेघ
ढाळ	(पु)	१. ढाळ – पाण्याचा उतार. ज्ञा. १३-९८० (ढाळ) २. शैली, पद्धती, प्रकार, ओतीव. कुली १-१०८
ढिगार/ढिगाड/ढीग	(पु)	ढीग; अली ८५ (ढिगार) सब ६१ (ढीग)
ढेप	(स्त्री)	१. ढेप (गुळाची) अली १०४. २. निश्चल बसणे, गर्भगळीत होणे.
तकवा	(पु)	धैर्य, सामर्थ्य; सब २४.
तगट	(पु)	१. भरजरी वस्त्र; २. सुवर्णालंकार, अली ३२७.
तगमग/तगमगी	(अ)	तगमग, अली ५१.
तगदा	(पु)	तागादा, फा. तकाजा, दखनी मराठी समान अपभ्रंश

तट	(पु)	तट, किनारा.
तटना	(क्रि)	१. तटणे, समर्थपणे सामना करणे. अली. २७३ २. अडून बसणे.
तंटाले	(पु)	तांटाले-ज्वारी-बाजरीची ताटे; तारी २-३६.
तंटा तूटना	(वाप्र)	१. भांडण मिटणे; २. नाते-संबंध तुटणे. 'बदी की के अब तुज सो तंटा तुट्या' - रिज्वा ४७.
तटूवाँ	(पु)	तट्टू (अ.व).
तडकना	(क्रि)	१. तडकणे; तारी ४.३३ २. रागावणे.
तधाँ/तधी	(अ)	तेधवा, तदा, तेव्हा, ज्ञा. १८. १०९० (तेधवां)
तफास	(पु)	तपास, फा. तफतिश, दखनी मराठीत समान अपभ्रंश
तंबू	(पु)	तंबू.
तडतडना	(क्रि)	तडतडणे.
तरफर/तडफड	(स्त्री)	तडफड.
तरवार	(स्त्री)	तरवार, हिंदी-उर्दू; ग्रा. – तल्वार
तरी	(अ)	तरी
तलना	(क्रि)	तळणे.
तलमलाना	(क्रि)	तळमळणे.
तळपट कर	(वाप्र)	तळपट होवो! 'इलाही तू दुश्मन को तळपट कर' कुमु. ५३२.
तलवा	(पु)	तळवा; 'खडे जोड तलवा जो आपट्यां के झाड' इब्रा १६८ (आपट्याच्या झाडाप्रमाणे तळवे जोडून उभे)
तवा	(पु)	तवा, अली ३२६
ताडना	(क्रि)	ताडणे, अनुमान बांधणे.
ताने/तान्हे	(पु)	तान्हे (मूल);
ताबडतोब	(अ)	ताबडतोब.
ताव	(पु)	१. उष्णता. २. आवेश (मिशांवर ताव देणे) ३. अन्नावर ताव मारणे. तारी ३-६
तास	(पु)	तास, घंटा.
तुरवार	(पु)	तुरखार, घोडा.
तुरंग	(पु)	तुरंग, घोडा; ज्ञा. १८-१६५३ (तुरंग). 'वाजा सूर अब दिसका चड तुरंग' – मैना १८३;

		अली २३, फूल ६५; तारी २-६
तुलाई	(स्त्री)	तुळई.
तूटना	(क्रि)	तुटणे, ज्ञा. १६.७४ (तूटि) अली ६१. तोती १०६.
तूरत	(अ)	तूर्त, सैफू २०.
तेजी	(पु)	घोडा. सब ११२.
तेल गडवा गाना	(वाप्र)	लग्न समारंभात तेलवणाची गाणी गाणे.
तोड	(स्त्री)	१. तोड (तोडीस तोड –बरोबरी); २. उपाय; तारी ३.३६
तोडगा	(पु)	१. उपाय; २. सोडवणूक
तोडा	(पु)	पायात घालण्याचा एक अलंकार. तोडा. तारी ४.३६
थकना	(क्रि)	थकणे.
थट्टा	(स्त्री)	थट्टा, मस्करी.
थडी	(स्त्री)	थडी, किनारा, काठ; ज्ञा. ७-९४; लीळा (पू) १, कुली २-११.
थंडी	(स्त्री)	थंडी (हिंदी-उर्दू मध्ये ठंडी असे रूप येते).
थमना	(क्रि)	थांबणे.
थर	(पु)	थर; सं. स्तर.
थरथरी	(स्त्री)	थरथर, 'पैदा हुई तिस घाक ते तन में सूरज की थरथरी' अली १०४.
थवा /थोवा	(पु)	थवा, समुदाय; शिशु ८७६ (थवा) तारी ३.१५, अली २३१.
थाट	(पु)	थाट; ज्ञा. १०-३८९ (हिंदी-उर्दूत ठाट) 'चालिया लाट का थाट संगात लाके' –सैफू. १५५.
थाप	(स्त्री)	थाप.
थांब	(पु)	खांब (सं. स्तंभ) ग्रा. थांब; 'थमने घरत लंगट है और को थांब आधार का' –अली ५९.
थमना/थांबना	(क्रि)	थांबणे, थांबविणे, सब. ११३.
थिजना	(क्रि)	१. थिजणे, घट्ट होणे. २. स्तंभित होणे.
थीर	(वि)	स्थिर, ग्रा. थीर.
थोपना	(क्रि)	थोपणे, तारी ४-३४.
दगाना	(क्रि)	डागणे (तोफ), तारी ५-३२.
दचकना	(क्रि)	दचकणे; 'कँही डर छाँव का दचकना आहे'

दंटाला	(पु)	ताटाळे(ज्वारी-बाजरीची ताटे असलेले शेत) तारी ४-३३.
दडना	(क्रि)	दडून बसणे.
दंड/डंड	(पु)	बाहू; अली ६६.
दंडम्	(पु)	दंडवत, अली १३२.
दडी मारना	(क्रि)	दडी मारणे, लपून बसणे.
दंद/दंदी	(पु)	शत्रू; सं. द्वंदी; ज्ञा. १३-५००; रुस्व ७३०, लीळा (उ.) २५८ 'दंदी देख तुज मुख आँखिया नोचता' — अली २५.
दमना	(क्रि)	दमणे, थकणे, फा. दम, श्वास; इब्रा. ३२५.
दम कोंडना	(क्रि)	श्वास कोंडणे. ग्रा. दम कोंडणे.
दमामा	(पु)	१. रणभेरी; २. तोफेचा एक प्रकार; फा. दमदमह्- तोफ चढविण्यासाठी बांधलेला चौथरा. दमामे गगनमे त्यों गरजने लगे'- तबई (हस्त)
दरोडा सटना	(वाप्र)	दरोडा पडणे; सटना : पडणे.
दलिदर	(पु)	दारिद्र्य; (वि) दरिद्री, करंटा; ग्रा. दलिद्दर, दालिंदर, तोती १६४.
दशी	(स्त्री)	(सुताची) दशी.
दाई	(स्त्री)	दाई, सं. धात्री, फा. दायह् 'मैं हूँ दाई तरी मुंज प्यार कर' मैना १३२.
दाट	(वि)	घनदाट; अली १५९; इब्रा ४४५.
दाटन	(स्त्री)	दाटणी, गर्दी; 'पेड है यक रुखन ते आको दाटन दाट झाडाँ की' - अली ५५९.
दाट्या	(क्रि)	दाटले; ज्ञा. ६-२०७ (दाटे) लीळा (पू.) २. तोती १२९.
दाड	(वि)	द्वाड; ग्रा. दाड.
दाडिम	(पु)	दाडिंब; ग्रा. दाळिंब.
दातों में बोट पकडना	(वाप्र)	तोंडात बोट घालणे, आश्चर्य व्यक्त करणे 'पकड्या अपने दांतो में हैरत सुँ बोट'- अली १८५
दानाँ दान करना	(वाप्र)	दाणादाण करणे, उध्वस्त करणे.
दाबना	(क्रि)	दाबणे. सैफू, ५३; अली १७०
दार	(पु)	दार, (सं-द्वार); ज्ञा. १३-१६९; 'हती तरे दरबार के पहाड सब, छडीदार तुज दार के झाड सब' सैफू १; कुली १-३७.
दारू	(स्त्री)	दारू, मद्य.
दावन	(स्त्री)	दावण; गुरांना बांधण्याची जागा; 'हरयक बैल सों पाँव दावन दिसे' — अली १९४.

दिपना	(क्रि)	दिपणे, चकित होणे, कवी १.१८
दिरंग	(क्रि)	उशीर; फा. –देर, ग्रा. – दिरंग
दिलगीर	(वि)	उदास, दिलगीर, फा. दिल्गीर तोती ९४.
दिलासा	(पु)	धीर. सभा ३६; 'होर तिस दिलासे का सबद मरहम है दिल अंगार को' – अली १२५.
दिवटी	(स्त्री)	दिवटी.
दिवा	(पु)	दिवा; ज्ञा. १४-५५; चंद्र ८९.
दिसे	(क्रि)	दिसे; ज्ञा. २-५६; कुली १-२०.
दीट	(स्त्री)	१. दीठ, दृष्टी; लीळा (उ) ३१५ (दिठी)
	(स्त्री)	२. दिसणे.
दीस	(पु)	दिवस; ग्रा. दीस, ज्ञा. ११-५ (दिसी) 'दुनिया दो दीस की है', सब ८३
दुकान मांडना	(वाप्र)	१. दुकान लावणे. २. व्याप वाढविणे.
दुकाळ	(पु)	दुष्काळ; प्रा. दुकळ, ग्रा. दुकाळ
दुगदुगी	(स्त्री)	धुगधुगी; ग्रा. दुगदुगी
दुफार	(स्त्री)	दुपार, ग्रा. दुफार
दुशाला	(पु)	शाल, ग्रा. दुशाळा
दूद का जल्या छाँस फूंक पीता	(वाप्र)	दुधाने तोंड पोळले म्हणजे माणूस ताक फुंकून पितो.
देखत	(अ)	देखत, समक्ष ; तुझ्या देखत, माझ्या देखत इ. ज्ञा. ६-१७०; कुली १-४२
देवहारा	(पु)	१. देव्हारा, मैना ५३. २. देणारा, मैना १५३
दोरा	(पु)	१. दोरा; २. मनगटाभोवती बांधण्याचा एक दागिना –लीळा (उ) ३६२.
दौलत	(स्त्री)	१. धन २. राज्य, जहागीर
धई	(स्त्री)	दही, ग्रा. धई
धग	(स्त्री)	धग, उष्णता, ज्ञा. १६-२९२; चंद्र १०६.
धगड	(पु)	जार,ग्रा. धगड
धटी	(स्त्री)	नेसण्याचे रेशमी वस्त्र.
धड	(पु)	१. न फाटलेला

		२. शिरविरहित शरीर; शिशु ८४०; तारी ५-९
		धडधडना (क्रि) धडधडणे, ज्ञा १३-५१४, तारी ५-९
धडपडना	(क्रि)	धडपडणे
धत्तुरा	(पु)	मराठी भाषेत ढोंगधतुरा असा सामासिक शब्द वापरतात, दखनीत केवळ 'धत्तुरा' त्याच अर्थाने योजला जातो. धोतऱ्याचे बीज / मूळ मादक असते. त्याचा रस प्याल्याने माणूस नशेत वेडाचार करू लागतो. ढोंगी माणूस प्रसंगी नशेचे नाटक करतो. त्यास अनुलक्षून ढोंगधत्तुरा हा सामासिक शब्द रूढ झाला. 'धत्तुरा दिसे मुजको दीवाना करो' —सैफु १३३.
धनुक	(पु)	धनुष्य; ज्ञा. ११-५९३; तारी ४-४५.
धरना	(क्रि)	धरणे, पकडणे.
धरती	(क्रि)	१. धरणे; २. धारण करणे. 'वहीच बात मोती जो मोती की किंमत धरती' — सब १०६. 'धरता है अहलेबेत सूँ आखलास मारुसी सहा' —अली १२९
धवलार	(पु)	धवळार, प्रासाद, ज्ञा. ५-११३; फूल १२७
धसना	(क्रि)	घुसणे, प्रवेश करणे. ज्ञा. १०-२९६; शिशु २६७ तारी ३१२६
धाक	(पु)	धाक, दरारा, वचक; सब १६-२६०. 'हुआ दर्द दुश्मन के जम धाक तुज' —अली २५. कुली १६८; इब्रा २०६; तारी ४-४१.
धांदल/धांदली	(स्त्री)	घाई, धांदल.
धामनी	(स्त्री)	धामीण.
धारकरी	(वि)	धारकरी, शस्त्रधारी.
धाशत	(स्त्री)	दहशत, सभा २७; फा. — दहशत, ग्रामीण मराठी व बखरीत 'धाशत' — दखनी-मराठी समान ध्वनिपरिवर्तन.
धिंगाना	(पु)	धिंगाणा, अली १९३ 'बादशहाके घरों में दायम धिंगाना अछता' सब १९९.
धिटाई	(वि)	धिटाई
धीट	(वि)	धीट; ज्ञा. १३-५०४; तोती १२७ 'बडा धीट हो गया बदशगल'— मैना १२८.
धुंडत	(क्रि)	धुंडीत; हिंदी —उर्दू- ढूंडत (या शब्दातील दखनी —मराठीत येणारा 'ध' हिंदी व उर्दू भाषेत 'ढ' च्या रूपाने येतो. मराठी —दखनीत येणारे काही शब्दातील तालव्य वर्ण हिंदी —उर्दूत मूर्धन्य बनतात.)
धूर	(पु)	नेता, धुरीण; ज्ञा. ९-९६, लीळा (पू)-२८. शिशु २६७, तारी ४-२८

धूँर/धूँया	(पु)	धूर, सं. धुम्र, ज्ञा. १८-५७१ (धूँ)
धुलारा	(पु)	धुरळा; धूळ; लीळा (पू). २, ११८ (धुलिरा) 'उडता दिल के ददम ते धुलारा बडा' अली- १०८
धुलधानी करना	(क्रि)	धुळधाण करणे. उध्वस्त करणे.
धोतरा	(पु)	धोतरा- मादक व विषारी वनस्पती. 'धोतरा न पिवो रे अवधू, भंग न खावे भाई'-गोवा ७६-२४१,
धोतर	(पु)	धोतर, 'फिर बांद धोतर बजा शंख धर कर' — मन ४२
नक	(पु)	नख
नको /नक्को	(अ)	'च' या अव्ययाप्रमाणेच 'नको'चा उपयोग दखनीत मोठ्या प्रमाणावर होतो. ज्ञा. १८.१०५; फूल. १०३; अली १४१; 'तू गाफिल नको अछ मेरे हाल ते' कुमु. ५
नग	(पु)	अलंकार ; फा. नग
नजिक/नजीक	(अ)	नजिक, जवळ, फा. नजदीक दखनी-मराठीत समान अपभ्रंश; 'नजिक है तो लस्कर में फितना उटे' सैफू. २१
नटवा	(पु)	नट, नर्तक. 'टुक येक खोच पकडे खो यक पग उचावे । न उसगत लिख्या कोई नटवा नचावे ॥' अब्दुल १६५.
नटवे	(क्रि)	नटविणे, सजविणे, ज्ञा. १३.८०६; कुली २.३२
ननंद	(स्त्री)	नणंद.
नरडी	(स्त्री)	नरडे, गळा; अली ४१६.
नवरा	(पु)	नवरा. 'अवधू जागर करै पाणी हारी, गवरी कंधे नवरा' गोवा ११७.१.
नवल	(पु)	१. नवल. आश्चर्य; ज्ञा. १-४२; ६-१३३, अली ११९, २. नाना प्रकारचे 'गुंद्या फूल बैलाँ के हाराँ नवल' अली ४१.
नवा/नवे	(वि)	नवा, ज्ञा. १८-११९१; किस्से ६७.
नवस	(पु)	नवस, प्रा. वज्जलग्ग ५६१.
नहनपन	(पु)	लहानपण, ग्रा. नहानपन, लैला ८९.
नांगर	(पु)	नांगर.
नाटाँ	(स्त्री)	लाकडी नाट. तुळई
नाडना	(क्रि)	नाडणे, अडचणीत टाकणे.
नांदना	(क्रि)	नांदणे, ज्ञा. ९-५७; 'के तुज साथ मिलकर वो नांद्या अहे' कुल ८६; तारी ५-५.
नांदनूक	(स्त्री)	नांदणूक. 'तरी नांदनूक शाह है धात धात' कुमु ८६
नाचन	(स्त्री)	नर्तिका; ज्ञा. ९-३२० (नाचणी) लीळा (पू.) १; कुली १-१३१.

नाजुकी	(स्त्री)	नाजुकपण; (विशेषणास 'ई' प्रत्यय लावून भाववाचक नाम बनविण्याची फारसी भाषेतील प्रवृत्ती) तोती १९५.
नाँव	(पु)	नाव; ज्ञा. ३-१५७ (नांव), शिला (शके ११५०, अंबे येथील खोलेश्वराचा) 'हुआ नज्म यों नाँव से तमाम' मैना १९४; चंद्र ७६; कुली १-५१.
नाँव करना/काडना	(वाप्र)	नाव करणे, कीर्ती संपादन करणे. 'भले मर्दा को अचता है गर्ज एक नाँव मे' अली १७४.
नाँव छोडना	(वाप्र)	नाव टाकणे, संबंध तोडणे. 'दिया लोरक छोड तुज नाँव को' मैना १९८
नाँव न रहे	(वाप्र)	नाव न राहणे, नष्ट होणे; अली १२२
नावेक	(अ)	नावेक, क्षणभर. ज्ञा. ४.३०, लीळा (पू.) १
निगरगट/निगरघट	(वि)	निगरगट्ट, कोडगा; कठीण; 'यता क्युं तेरा दिल निगरघट हुआ'– मैना १४६.
निछल	(वि)	नितळ, ग्रा. निथळ, तोती ६६, कुली १-१४९
निदान	(अ)	शेवट; ज्ञा. ३. ३८ (निदानी)
निपट	(वि)	निपट, संपूर्ण, सर्वस्वी, सैफु ५९; अब्दुल ३२.
निपजना	(क्रि)	निपजणे, उत्पन्न होणे.
निपातर	(वि)	निकृष्ट, ग्रा. निपत्तर, सब ६१
निशान	(पु)	१. निशाण, रणवाद्य, ज्ञा. १-१३३ 'हुकुम शाह सुनते जो गर्जे निशान' – इब्रा १०६, २. ध्वज, ३. चिन्ह
निस्तारना	(क्रि)	निस्तारणे.
नीका /निके	(वि)	निके,चांगले;ज्ञा.९-३३६.तोती २०६; कुली १-१४९.
नीट	(वि)	नीट;ज्ञा.७-२०१,अली ४१२
नींद कहते सो मीत से कम नई	(वाप्र)	निद्रेसारखा सखा नाही;सब १२४
नेट	(पु)	परिश्रम ; नेट ; सब १२०
नेमानेम	(पु)	नेमानेम.
न्यारा	(वि)	निराळा,ग्रा.न्यारा
न्यारी/निहारी	(स्त्री)	न्याहारी,ग्रा.न्यारी
न्याव	(पु)	न्याय, ग्रा. न्याव ज्ञा.१८.४५२ (न्याओ) 'चार आशिकों मिल हमारा उसका करेंगे न्याव' सब १८३; तोती ६०.
न्याव निवडना	(क्रि)	न्याय निवाडा करणे. ग्रा.न्याव-निवाडा

न्हवे/नव्हे	(अ)	नव्हे, तारी ३.३
पकड्या	(क्रि)	धरले, पकड्या; तारी १-३०.
पके फल को झाडसे क्या वास्ता?	(वाप्र)	फळ पिकले,झाड सुटले.
पगार	(पु)	पगार.
पछंडे	(पु)	पाचुंदा-एका कवेत येणारा चारा.तोती ८६
पझर	(पु)	पाझर
पटाया/पठाया	(क्रि)	१. पटविले. २. पाठविले.
पडदा	(पु)	पडदा फा.पर्दाह दखनी –मराठी समान अपभ्रंश.
पतोला	(पु)	पाटोळे,रेशमी वस्त्र.
पतियाना	(क्रि)	पातेजणे;विश्वास ठेवणे; ज्ञा १७-५१(पातिजो) 'आस्ति कहूँ तो कोई न पतिजे' गोवा १०४.
पन	(अ)	१. पुन्हा –शिशू ७४ २. पण, परंतु;तरी १-२६.
पनाले	(पु)	(अ.व) पन्हाळ.
पन्नास	(वि)	पन्नास (५०)
पयली	(वि)	पहिली, ग्रा.पैली,पयली; तारी ५-३३.
परभारे	(अ)	परस्पर
परागंदा	(अ)	परागंदा होणे.देश सोडून जाणे,फा.परागंदाह्,
परात	(स्त्री)	परात.
पसऱ्या	(क्रि)	पसरले. 'पसऱ्या भर, ना सत, अपना पत सब हऱ्या' सब ११८.
पसारा	(पु)	पसारा
पाइक	(पु)	पाइक,शिपाई; लीळा (उ.)१२६; ज्ञा.१-१४३ (पाइकु)
पाखर	(स्त्री)	पाखर,कवच,आच्छादन; ज्ञा. ६-२११; तारी २-३३.
पाखराँ	(पु)	पाखरे; अली ३५८.
पाट	(पु)	१. पाण्याचा पाट, 'फिरंग है हर अजल की नदी का है पाट' अली २७३, २. बसण्याचा लाकडी पाट. ३. विधवेशी होणारे लग्न / गांधर्व विधीने होणारा विवाह.
पाटल्या	(स्त्री)	एक सुवर्णालंकार, पाटल्या.
पाडे	(पु)	१. पाढे. २. गाइ-म्हशीचे बछडे

पाडता	(क्रि)	पाडतो. 'सूरज ते गरम धूप तू पाडता' -सैफू २; तोती १५६.
पांडरा	(वि)	पांढरा.
पात	(स्त्री)	१. पात, पान; २. पत, विश्वास.
पातराँ	(स्त्री)	(अ.व) वेश्या, नर्तकी.लीळा (उ.) ६०४; ज्ञा. १७-२९६ (पात्र) 'सद्र बिछा के नाचे, रंभा, उर्वसी, मेनका पातराँ आकर नाचे' —सब २०२, 'कही पातराँ आ खड्या द्वारपर! हर यक जिन्स हर रुप आया संबल'-अब्दुल १०५.
पान	(पु)	पान (झाडाचे) 'तूँ झाडों के कपडे दिया सब्ज़ पान'-कुमु २.
पांदी	(स्त्री)	फांदी
पायदल	(पु)	पायदळ. अली ४२.
पायराँ	(स्त्री)	(अ.व) पायऱ्या.
पाया	(पु)	पाया (इमारतीचा)
पार	(पु)	प्रहर, ग्रा. पार/पार,तोती ५७ (तिसरे पार)
पारंबी	(स्त्री)	पारंबी (वडाची)
पारा	(पु)	पहारा, रखवाली, ग्रा. पारा अली ७२. 'जो अपना किया दीस पारा तमाम' — तोती ५५.
पाल	(स्त्री)	१. पाल, राहुटी, लहान तंबू. २. पाळू, तळ्याचा काठ, 'हौजे को पाल तुटे तो यकायक बांदी जाती है —सब ११२.
पालना	(पु)	पाळणा.
पालान	(पु)	पालाण, खोगीर; लीळा (पू.) ७५ 'सहज पलाण जवन करि घोडा लै लगाम चित्त चबका' —गोवा १०३.
पांव उतारा	(वाप्र)	पाय उतारा, वाहन सोडून पायीच युद्धात सामील होणे/ वाहन सोडून पायी चालणे (मराठी बखरीत दोन्ही अर्थांनी हा शब्दप्रयोग येतो.)
पांव पडना	(वाप्र)	पाया पडणे. (हिंदी/उर्दूत 'पांव छूना' प्रचलित असून 'पांव पडना' हा वाक्प्रचार' पाय धरणे' या अर्थाने येतो). 'पड्या पांव जाके अवतार के' — मैना १८०.
पावलाँ	(पु)	पाउले; ज्ञा. ६-३५० (पाउलि); अली ७२ शिला, श. ११०६-पाऊलें
पावे	(क्रि)	प्राप्त होणे, पावणे, पोचणे, शिला (श. १२३३, पंढरपूर पावे)
पावते	(क्रि)	प्राप्त होते, ज्ञा. १३-१०१ (पावतु) 'वचन थे मुरादाँ जगत पावते' — सैफू १२.

पावने	(पु)	(अ.व) पाहुणे, ग्रा. पावेन
पाशानी	(स्त्री)	पाषाणी, पाथरवटाची हातोडी.
पिरथिमी	(स्त्री)	पृथ्वी; ग्रा. पिरथिमी
पिंजना	(क्रि)	पिंजणे.
पिंड	(पु)	पिंड, प्रकृतिधर्म
पीट रखना	(वाप्र)	पाठराखणी करणे, संरक्षण देणे. 'रखी पीट मेरी तूं क्या करके पुन' —अली २१८
पीलखाना	(पु)	पीलखाना, गजशाळा. फा. फील-हत्ती
पीतांबर / पितंबर	(पु)	पितांबर, रेशमी वस्त्र
पुंगडे	(वि)	पौगंड अवस्थेतील तरुण-तरुणी; तोती ४२.
पुरना	(क्रि)	१. पुरणे- पुरेसे होणे. २. पुरणे- जमिनीत गाडणे.
पूत	(पु)	पूत, सं. पुत्र, 'बुरा पूत उप ज्या भला इसते बांज'लैला ६२; सैफु ३३.
पूर	(पु)	पूर.
पेखना	(क्रि)	पाहणे, सं. प्रेक्ष्
पेखनी	(वि)	प्रेक्षणीय
पेट पकडको हसना	(वाप्र)	पोट धरून हसणे.
पेरता	(क्रि)	पेरतो. बीजारोपण करतो.
पैका	(पु)	पैका. पैसा. लीळा(उ.) ३३१ (पइका) कुमी. २५
पैटना / पैठना	(क्रि)	बसणे. ज्ञा. १८-८९२; (पैठा) 'पैठे रंग की भूमपर वो सो जाए' — इब्रा ६४९, तोती ९२, अब्दुल ८८
पैंतन	(पु)	पायताण.
पैलाड / पैलार	(अ)	पलीकडे; ग्रा. पैलाड, ज्ञा. ६-२६ (पैलाड); 'नइ दिसता युँ अकल ते पैलाड आहे' सब ३६, तोती २०८
पैस	(पु)	प्रवेश; 'नसे पैस जांलग पस्त कुँ मजाल' — तारी १.१९
पैसना	(क्रि)	प्रवेश करणे. ज्ञा. १७.२७
पोकल	(वि)	पोकळ. अली १५९
पोंचना	(क्रि)	पोहोंचणे, पोचणे.
पोत	(पु)	पोत; देवीचे भुते चिंध्यांचा काकडा करून तो देवीपुढे प्रज्वलित करतात. तारी ३१२.
पोती	(स्त्री)	पोथी. मन ४७
पोलाद	(पु)	पोलाद, फा. फौलाद दखनी-मराठी समान अपभ्रंश

पोली	(स्त्री)	पौळी, तळ्याचा काठ; ज्ञा. १२-५१८.
पोलियाँ (अ.व)	(स्त्री)	मधाचे पोळे.
फकडी	(स्त्री)	पाकळी, ग्रा. फकडी
फुजिती	(स्त्री)	फजिती, अ. फजिहत
फडके / फडिका	(पु)	१. फडके. २. परकरावर घ्यावयाचे वस्त्र.
फळी	(स्त्री)	फळी, तटंबदी (सैनिकांची)
फाँका	(क्रि)	फाकणे; ज्ञा. ६-१४ (फाँक); ज्ञा. ६-२०९ (फांके); तोती १०८
फाट	(क्रि)	१. फाटणे. 'गये कपडे अंग के पार फाट' – सैफू ६२. (नाम) २. पहाट, ग्रा. फाट
फाँटी	(स्त्री)	फांदी, ग्रा. फान्टी 'सजन बिन मुझे फूल काँटे दिसे । के काँटियाँ को कई फाँटे दिसे' –मैना १४५.
फाँटी मारना	(वाप्र)	अडथळा करणे, विश्वासघात करणे (ग्रामीण मराठीत हा वाक्प्रचार प्रचलीत)
फाड	(पु)	पहाड, ग्रा.फाड
फाल्याँ	(स्त्री)	(अ.व.) फळ्या, ग्रा. फाळ्या
फिटना	(क्रि)	फिटणे.
फिरंग	(स्त्री)	तरवारीचा एक प्रकार, फा. फिरंग
फुकनी	(स्त्री)	दारिद्र्य, ग्रा. फुकणी पडणे. दारिद्र्य येणे
फुग्या	(क्रि)	फुगले, ज्ञा. १३-७२३ (फुगता), तोती ९३
फुटाफाट	(अ)	फाटाफूट; तारी पृ. १८.
फेडना	(क्रि)	(वस्त्र/ कर्ज) फेडणे.
फेऱ्याँ	(स्त्री)	(अ.व) फेऱ्या, प्रदक्षिणा
फोडना	(क्रि)	फोडणे, तारी ४-४४.
बंक	(पु)	चौकी, पाहारा; तोती १३०
वटवट करना	(वाप्र)	वटवट करणे.
बडबडाना	(क्रि)	बडबडणे.
बदाम	(पु)	बदाम, फा. बादाम, दखनी-मराठी समान अपभ्रंश. कुली २-१७२.
बदक	(पु)	बदक, फा. बतख, दखनी –मराठी समान अपभ्रंश
बदरा	(पु)	पैशाची थैली, ग्रा. बद्री; अली ७१.
बजा आनना	(क्रि)	बजावणे (कामगिरी)
बजरीटीक	(स्त्री)	वज्रीटीक, वज्रटीक एक सुवर्णालंकार गळ्यात घालण्याचा.

बरी/बरे	(अ)	बरे.
बसना	(क्रि)	बसणे.
बस्ता	(स्त्री)	चीजवस्तू, अलंकार, ग्रा. बस्ता, अली ७७
बहुतेक/ भोतेक	(अ)	बहुतेक, कुली १-९;
बाई	(क्रि)	घातली; लीळा (पू) ३०२; ज्ञा. ११-५५७ (बाइली) कुली १-२१४.
बाइकाँ	(स्त्री)	(अ.व)बायका; लीळा (उ) ४११ (बाइको)
बाक/ बाग	(पु)	वाघ; सं-व्याघ्र, कुली १-१२०.
बागदानी	(पु)	ढाण्या वाघ. अली २३५.
बांगड्याँ	(स्त्री)	(अ.व) बांगड्या
बाँचना	(क्रि)	१. वाचणे, जिवंत राहणे. ज्ञा. १-२३७ (वाचिजे) 'तूँ जीव वाँचते का मुंज दे सबक' — किस्से ८३, चंद्र. ७५ २. (पुस्तक) वाचणे, अली १७२
बाजना	(क्रि)	वाजणे.
बाँझ	(स्त्री)	वांझ; लैला ६२.
बाँट/वाट	(स्त्री)	वाट, सैफु २.
बाँट काडे	(वाप्र)	वाट काढणे, उपाय शोधणे
बाँट देखना	(वाप्र)	वाट पाहणे, प्रतीक्षा करणे,
बाँट पाड्या	(वाप्र)	वाट पाडली, नवा मार्ग रूढ केला.
बाँट में पडना	(वाप्र)	वाटेत पडणे, सहज प्राप्त होणे. 'काम के लोकां क्या बाँट मे पडे है?' सब, १०८
बाँट पकडना		वाट धरणे, आपल्या मार्गाने जाणे. 'नको हो दीवानी पकड अपनी बाँट' —मैना. १८५.
बाँट पाडना		वाट पाडणे; नवा मार्ग काढणे; 'इता नवी बाँट पाड्या' —सब.
बाँट जाना	(वाप्र)	वाटी जाणे, छेडणे.
बाँटमाऱ्या	(पु)	वाटमारी करणारा.
बाँटसरु/ बाँटसारु	(पु)	वाटसरु; तारी १-२४
बाँटे	(पु)	(अव) वाटा, भाग
बाडा	(पु)	वाडा; तोती १९; अली १७७
बात घट होना	(वाप्र)	बोलणी पक्की होणे.
बांदी मुट्ठी का भरम	(वाप्र)	झाकली मूठ सव्वा लाखाची
बामनाँ	(पु)	(अ.व) ब्राह्मण, ग्रा. बामन
बार	(पु)	बहर, ग्रा. बार

बारवाट/बाराबाँट होना	(वाप्र)	बारावाट होणे, उध्वस्त होणे. 'यक बाँट गये होंगी अजन, पन जीव बारबाँट है' — मन
बारा/बारे	(पु)	वारा; अली ३२५, किस्से ९०.
बाली	(स्त्री)	बाळी, कानात घालण्याचा एक अलंकार
बालू	(स्त्री)	वाळू; तोती २२६.
बाँव	(पु)	वाव, दोन्ही हात सरळ ठेवल्यानंतर होणारे अंतर (मोजमाप); लीळा (उ.) २२६
बाव/बावी/ बाई	(स्त्री)	बावी, विहीर (सं-वापी) लिळा (श. ११९५- पंढरपूर) लीळा उ. ४३२; अली २२६
बावना	(पु)	व्रात्य, ग्रा. बावना
बावरा/बावला/बावल	(वि)	बावळा, वेडसर; कुली १-११
बास	(पु)	वास, सुगंध. कुली १-११
बिक	(पु)	शोभा, सामर्थ्य, ज्ञा. १-१८
बिचकना	(क्रि)	बिचकणे; 'बिचकते है देक अपनी छाँव' तारी ५-२५
बिनसना	(क्रि)	बिनसणे.
बिसरना	(क्रि)	विसरणे, कुली २.१९४ सैफू-८९
बिसलाना.	(क्रि)	बसविणे.
बी	(अ)	ही,ग्रा. बी, 'हमना तो बी अंग थे सो उनोका कुच बी तमीज न करें' — सब ७
बुरा वकत क्या पुछकर आता?	(वाप्र)	वेळ सांगून येत नसते; सब १०८
बुझना	(क्रि)	समजणे; ज्ञा. १३. ८२९; १४-१५५; कुली १-१२,
बुडना	(क्रि)	बुडणे.
बेगडी	(वि)	दिखाऊ, बेगडी. तारी ४-२४
बेगमी	(स्त्री)	पुरवठा (आवश्यक वस्तूचा आगाऊ पुरवठा करणे) फा. बीगमी, दखनी-मराठी समान अपभ्रंश
बेग/बेगी	(अ)	लवकर,ग्रा. बेगी/बिगीन, ज्ञा. १५-८५ 'अव्वल बेग जा पाऊँ पडते तई' —कुमु १०; अली ४१४; इब्रा ११९
बेगी घर लेगी	(वाप्र)	घाई कर, बुडव घर.
बेल मंडवे पे चड्या	(वाप्र)	वेल मांडवाला गेला, विस्तार होणे.
बेस	(स्त्री)	वेस; गावाचे/नगराचे प्रवेशद्वार
बैस गया	(क्रि)	१. बसला; ज्ञा. ११-२२२ (बैसला); चंद्र. १०४ २. निराश झाला.

बैस गई कमर	(वाप्र)	कमर खचली; निराश झाला/ झाली. 'कमर बैस गई होर लगी तगबगी' – सैफु ४६.
बैसक	(स्त्री)	बैठक, बसण्याची जागा; ज्ञा. १५-११२ (बैसका)
बोचरा/बोचडा	(वि)	बोचरा, दंतविहीन
बोट/बोंट	(पु)	बोट; 'यों दो बोट की लंगोटी तुजे' तोती ४६
बोडकी	(स्त्री)	बोडखी, विधवा; 'तेरी चोटी काट करू बोडकी' रिज्वा १३४
बोकडाँ	(पु)	(अ.व) बोकड
बोताटी	(स्त्री)	बोथाटी
बोंब	(स्त्री)	बोंब.
बोंबी	(स्त्री)	बेंबी, ग्रा. बोंबी
बोल रखना	(वाप्र)	बोल ठेवणे, दोष लावणे.
बोल लावना	(वाप्र)	बोल लावणे, दोषी ठरवणे.
ब्याल	(पु)	व्याल, महासर्प
भईन	(स्त्री)	बहीण, सं. भगिनी; प्रा. भइणि; ग्रा. भईन
भट परो	(वाप्र)	भट पडो, जळो, नाश होवो; कुली १-३०६ 'हार नव्हता साहत मधि, कसे आग संकट वडवले । संसार भट पडो, दोघामधि, आड पर्वत आले । -होनाजी बाळा
भरड्या	(क्रि)	भरडले.
भराडी	(पु)	धार्मिक कथा गोंधळ्यांसारखी एक जमात.
भरोसे की म्हैंस कूडा जनी	(वाप्र)	भरवशाच्या म्हशीला टोणगा
भाऊजी	(पु)	भाऊजी/भावजी (बहिणीचे यजमान अथवा नवऱ्याचा भाऊ यांच्यासाठी योजण्यात येणारे संबोधन)
भांगार/भिंगार	(पु)	सोने; ज्ञा. १०-५०; लीळा (पू.) २१७; मैना १५०
भांडा	(पु)	भांडे
भांडी /भांडे	(पु)	तोफ; रची तट पो हिंमत की भांडी तमाम । भरी गगन की दारू व गोली तमाम ॥- मैना २; तारी ५-१२
भांडे घासना	(क्रि)	भांडी घासणे.
भान	(स्त्री)	बहीण; ग्रा. भान, भाईन, भैन सब १४१.
भाना	(स्त्री)	१. वाहणे, २. भावणे.

भार	(अ)	१. बाहेर; ग्रा. भार, भाईर 'उनकी अकलसूँ निकल भार आव' मैना ११५
	(पु)	२. सैन्य; भाराँ- अनेकवचन ; ज्ञा. १२-३९० (भार); अली ६३
भाले	(पु)	(अव) भाला; तारी ४-३३
भालेकर	(पु)	भाला धारण करणारे सैनिक; 'न जाने कि भालेकर उनके है भार'—तारी ४-२४
भाव	(पु)	भाव, मूल्य
भावे	(क्रि)	भावले, वाटले; कुली १.१३
भिजना	(क्रि)	भिजणे; इब्रा ४२४
भिजभिज	(अ)	भिजून भिजून; अली १०४
भिरकावना	(क्रि)	भिरकावणे
भूँयाराँ	(पु)	(अ.व) भुयार, अली १२७; १७९
भुई/भुवी/भोई		भूमी; ग्रा. भोय, भुई, ज्ञा. १८-९५० (भोए), लीळा, (पू.) १५ (भुइ); अली ४१३, किस्से ३६
भोंदू	(पु)	भोंदू
भ्याव	(पु)	भीती; ग्रा. भेव/भ्याव
मट	(पु)	मठ; तारी ५-१९
मटकू बैट जातो	(वाप्र)	मटकन् बसतो
मडना	(क्रि)	मढणे/मढविणे
मंडना	(क्रि)	मांडणे
मत्ता	(स्त्री)	मालमत्ता; अ. मत्तह, 'मेरे पस धन माल है लई मत्ता' —मैना १२५
मदत	(स्त्री)	मदत, साहाय्य; अ- मदद; दखनी-मराठी समान अपभ्रंश
मया	(स्त्री)	१. माया, प्रेम, लळा; ग्रा. मया 'मया सब पे यकरंग धरनहार तूँ- कुमु ४, तुज याद में जन मोहिया है जग ऊपर तरा मया' -३-९; सब ५८; २. मोह (माया)
मयाळू	(वि)	मायाळू, ग्रा. मयाळू
मरना मरना कोई चूकेना, ऐसा मरना जो कोई थुकेना		मरावे परी कीर्तिरूपे उरावे.
मलूल	(वि)	कोमेजलेले
महाल	(पु)	महाल; १. राजवाडा,

		२. प्रांत (अ-महल-दखनी-मराठी समान अपभ्रंश)
माऊली	(स्त्री)	माऊली, आई
माकड	(पु)	माकड, प्रा. मक्कड
माग	(पु)	शोध, तपास
माँट	(पु)	माठ, मृत्तिका घट; अली २८९
माटी	(स्त्री)	माती; तारी ३-११ (हिंदी/उर्दू- मिट्टी)
मांडना	(क्रि)	मांडणे.
मांडी	(स्त्री)	मांडी; 'मंडी अपनी मांडिपो लेकर सिलाई' –रिज्वा ५५
मात	(स्त्री)	गोष्ट, हकीकत, वार्ता; ज्ञा. १-२५ (मातू) 'दुनिया के अरसे के शहान् शाह मात सुन सारे रहे' –अली १३४
माते	(क्रि)	१. मावतो, समाविष्ट होतो. २. मातततो, उन्मत्त होतो. ज्ञा. १६-१९० कुली २-१०३.
मान	(पु)	मान, प्रतिष्ठा; 'बढाया है जन में सिपाही का नाम' –अली २५८
मान का पान देना	(वाप्र)	मानाचे पान देणे. 'नजर में येक यक तिन तो लिये रख मान' अली २५८
माप	(पु)	माप
माय	(स्त्री)	आई, ग्रा. माय, शिला परळ शके ११०८
माया	(स्त्री)	१. धन-द्रव्य; अब्दुल ८५ २. प्रेम; ३. आभास
मायेंगे	(क्रि)	मावेल; तोती १५६
मारामारी	(अ)	मारामारी; सब ६७
माव	(स्त्री)	माव, कपट, कृत्रिमता, ज्ञा. १३-७०६ इब्रा ११
मास	(पु)	मांस, ग्रा. मास ज्ञा. १७-२५७ (मास) 'मेरा मास गल जा रहा तन पो पोस्त' – तोती ६२; किस्से ६०
माहेर	(पु)	माहेर; सं. मातृगृह, प्रा. माहिएर, लीळा उ. ७६ (माहिएर)
मिठी	(स्त्री)	मिठी
मिरवना	(क्रि)	मिरविणे
मुंगी	(स्त्री)	मुंगी
मुटकुले	(पु)	मुटकुळे, एक खाद्यपदार्थ
मुंडासा	(पु)	फेटा, ग्रा. मुंडासा 'मुंडासा फिरा बांद यों लग्या' –तोती १०, अली १६६; 'मुंडासा पछाडे अंगे सब के सब' –कुतु १२०
मुंडना	(क्रि)	मुंडन करणे

मुंडी	(स्त्री)	मुंडी, मान (गळ्यासह डोक्याचा भाग)
मुसळ	(पु)	मुसळ
मूस	(स्त्री)	मूस
मूँ का पानी गँवाना	(वाप्र)	तोंडचे पाणी पळणे
मेख	(स्त्री)	मेख; इब्रा ४३७
मेजवान्याँ	(स्त्री)	(अ.व) मेजवानी, मिष्टान्न भोजन, फा. मेजबानी
मोकला	(वि)	मोकळा, इब्रा २२४
मोट	(स्त्री)	मोट (विहिरीतून पाणी काढण्यासाठी तयार केलेली चामड्याची वस्तू)
मोड	(पु)	पराभव, तारी ४-११
मोप	(वि)	पुष्कळ, ग्रा. मोप
मोहिया	(क्रि)	मोहिला
म्हइना	(पु)	महिना, ग्रा. म्हइना – (महाप्राणाचे स्थलांतर)
म्हइती	(स्त्री)	माहिती, ग्रा. म्हाइती – (महाप्रणाचे स्थलांतर)
म्हाडी	(स्त्री)	माडी, ग्रा. म्हडी- (अकारण), महाप्राण तोती ५-४७; 'दिलकू बेखबर, बेहोशकर म्हाडिया ल्यावे' सब १७३
यकंदर /यकंधर	(अ)	एकंदर-अब्दुल ५, ग्रा. येकंधर (अकारण) महाप्राण
यखादा	(वि)	एखादा, ग्रा. यखादा, अली ४४
येकट/येकला/येकला	(वि)	एकटा; ग्रा. येकटा/येकला, 'यकट शहजादा सो था हुशियार' –सैफु ३५ ज्ञा. १०-३० (येकला); कुली २-२५
येकंग	(अ)	एकांगी
येकमूट	(वि)	एका मुठीने
येकती	(वि)	एकटी
येकधात	(वि)	एकाच प्रकारचा
येकस येक		एकाला एक (सोबत असणे)
येकसरिकी	(वि)	एकसारखी
येक काडी नई हलती	(वाप्र)	एक काडी (इकडची तिकडे) हलत नाही. एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण नियंत्रण असणे
येकोविसावाँ	(वि)	एकोणविसावा
येडका	(पु)	बोकड
येलाँ	(स्त्री)	वेळ, सं. वेला; ग्रा. येळ

रखनहार	(पु)	रक्षण करणारा; 'वही सत रखनहार है बेमिसाल' —मैना ११९
रट्टा	(पु)	बाहू
रनखांब	(पु)	रणखांब
रगत	(पु)	रक्त; ग्रा. रंगत/ रघत
रलियाँ	(स्त्री)	(अ.व) खेळ, थट्टा; ज्ञा. ११-५६७ (रली) लीळा (पु) ४९६ (रळी) 'अकद बांद करते खुशियाँ सो रलियाँ' – लैला ८८; कुली १-११९
रहवास	(पु)	रहिवास, वास्तव्य
राऊत/ रावत/ रावताँ	(पु)	(अ.व) घोडेस्वार; शिला, राणेबेन्नूर, शके ११७४ ज्ञा. ९-३२३; लीळा (उ.) ५००, फूल १२८, अली १५७; अब्दुल ७१
राकेस	(पु)	राक्षस, ग्रा. राकेस
राजकारन	(पु)	राजकारण; 'निकाले नई राजकारन की बात' —तारी २-८
राजना	(क्रि)	राजणे, शोभणे
राजमान	(वि)	राजमान्य
राजवट	(स्त्री)	राजवट; सब १५४
रान	(पु)	शेत, ग्रा. रान, सं. अरण्य, ज्ञा. ११-६५४
रानना	(क्रि)	राज्य करणे, राणीव करणे; ज्ञा. ६-२७२
राब	(क्रि)	राबणे, कष्ट करणे, ज्ञा. १२-२९ कुली १-१३
राय/रावो	(पु)	राजा (प्राचीन मराठी राय, रावो) इब्रा ३०१
रास	(स्त्री)	१. रास, ढीग; ज्ञा. ३-१४० (रासी) इब्रा ३३९ २. प्रकार
रिकाबी	(स्त्री)	घोड्याच्या जिनाच्या दोन्ही बाजूस पाय अडकविण्यासाठी असलेली कडी (अ-रिकाब) म. रिकाबी
रिझाना	(क्रि)	रिझविणे; अली १११
रुक/रुख/रुखन	(पु)	(अ.व) वृक्ष, सं. वृक्ष; प्रा. रुख, ज्ञा. ४-९६ (रुख) लीळा (पू.) ३२९; अदिक छाँव का रुक था शहरियार'– सैफु १९; 'पके फल को क्या काम है रुक सों- लैला २९; अली १५९ (रुखन)
रुसना	(क्रि)	रुसणे; ज्ञा. १८-१६३ (रुसो); तोती १६३, अब्दुल ७६
रेलछेल	(स्त्री)	रेलचेल, समृद्धी
रोप	(पु)	रोप, इब्रा ५२२
लई	(वि)	पुष्कळ, ग्रा. लई 'लगती है दिल को लई हैरानगी' —सैफु ४० 'शेर गरचे लई लोक जोडते अहाँ- कुमु १५

लकाकना	(क्रि)	चमकणे
लगलग करना	(वाप्र)	लगलग करणे, धावपळ करणे
लगा देना	(वाप्र)	(भांडण) लावून देणे
लजाळू	(वि)	लाजाळू
लड	(स्त्री)	लड; इब्रा ६३१
लपोटाँ	(वि)	(अ.व) लपोट, लबाड. ग्रा-लपोट
लंबर	(पु)	शेत, ग्रा. लंबर/नंबर
लव्हार	(पु)	लोहार, ग्रा. लव्हार,
लहनपन	(पु)	लहानपण
लहना	(क्रि)	लाहणे, प्राप्त होणे.
लाज	(स्त्री)	१. लाज; 'लाज सट को मँगता मँगनहार' —सब २८. 'लाज के आदमी को भोत आती लाज' —सब ३८ २. लाजणे, ज्ञा. १८-१२ (लाजे) कुली १-९१
लाड	(पु)	लाड
लाडकी	(स्त्री)	लाडकी
लांडगे	(पु)	(अ.व) लांडगे. अली ३२६
लात	(स्त्री)	लाथ, ग्रा. लात (महाप्राण लोप) इब्रा. १०९
लायकियत	(स्त्री)	लायकी, फा-लियाकत
लिखतधनी	(पु)	ललाट —लेख लिहिणारा (ब्रह्मदेव)
लुंचना	(क्रि)	लुंचणे, उपटणे
लुबाडना	(क्रि)	लुबाडणे
लेना	(क्रि)	लेणे, धारण करणे, शिला, खोलेश्वर, शक ११२१ 'कौस्तुभवरी ले सारंगपाणी' – धवले ५९
लेखीं/लेखें	(अ)	लेखी, गणती; ज्ञा. १८-१०२९ (लेखी) 'गनत मत तुम गनियाँ की देखो तुमें। हजाराँच अपस यक को लेखो तुमें। तारी ५-६
लोखंड	(पु)	लोखंड, अली १८५
लोट	(पु)	(पाण्याचा) लोट; प्रवाह, तारी ४-४८; अली ९३
लोटे	(क्रि)	(स्वतःस) लोटून दिले; लोटांगण घातले.
वटवट करना	(वाप्र)	वटवट करणे.
वर/वरे	(अ)	वर
वरकस	(वि)	श्रेष्ठ, आक्रमक,ग्रा. वरकस
वरदली	(स्त्री)	वरदळ
वरदशना	(स्त्री)	वर- दक्षिणा ('क्ष'चे 'श'त रुपांतर)

वाँ खाना खा, याँ पानी पी	(वाप्र)	तेथे जेवत असशील तर येथे हात धुवायला ये; तातडी दर्शविण्यासाठी योजण्यात येणारा वाक्प्रचार
वाँचना	(क्रि)	वाचणे
वाट	(स्त्री)	वाट
वाँटा	(पु)	वाटा, हिस्सा, शिला –उनकदेव शके १२०१
वानर	(पु)	वानर; अली १३२
वायला होना	(क्रि)	वेगळे होणे, ग्रा. वायला, वेगळा
विचारे	(क्रि)	१. विचारले, पुसले २. विचार केला
वीलेवार	(अ)	पद्धतशीर, फा. विलेह्, ग्रा. येलिवार
वेस	(पु)	१. वेष
	(स्त्री)	२. वेस, नगराचे प्रवेशद्वार
वैताग	(पु)	वैताग. 'मुज कु ये वैताग हुए आदिक' –रिज्वा ४६
शाने	(वि)	(अ.व) शहाणे, ग्रा. शाना
शार/शहार	(पु)	शहर, ग्रा. शार/शहर
शेंगा	(स्त्री)	(अ.व) शेंगा
शेजारी	(पु)	शेजारी
शेरा/शेला	(पु)	शेला
शोभे	(क्रि)	शोभते
शोभेदार	(वि)	शोभिवंत
सईन/ सैन्य	(पु)	सैन्य, प्र. सइन्नं, कुमारपालचरितम् १-१५१
संकल्या	(स्त्री)	(अ.व) साखळ्या
संगत	(स्त्री)	साथ
सगल/ ला/ ली/ ले	(वि)	(अ.व) सगळा, सर्व, ज्ञा. ११-४२६ (सगळा) 'तकदीर तो सगला हुआ' – सब १८८; चंद्र. ८१; सैफु-७७; अब्दुल ५८
संघाती/सांगाती	(वि)	सांगाती, सोबती, लीळा २७२ (सांघाती) 'हिम्मत मर्दा का सांघाती'
सचोटी	(स्त्री)	सचोटी
सजगुरा	(पु)	बाजरी, ग्रा. सजगुरा, तारी ४-३६
सजना/साजे	(क्रि)	साजणे, शोभून दिसणे; ज्ञा. १३-६०७ (साजे)
सटना	(क्रि)	१. सांडणे, २. हरवणे, ३. सोडणे; ज्ञा. १५-३३२; १८-७३९ (संडी)

अनुक्रमणिका

संपडे/संपड्या	(क्रि)	सापडे/ सापडले. ज्ञा. १-२०१; १०-७६ (सांपडे) कुली १-१०९; अब्दुल २९
सपत घालना	(वाप्र)	शपथ घालणे. 'दोनों जो सपत घाल यारी करें' कुमु. ९७
सबजने	(पु)	(अ.व) सर्वजण, किस्से ३२
समई	(स्त्री)	समई
समसार	(पु)	संसार; ग्रा. सवसार; कुली २-१२१
समा ना सके म्यान में दो फिरंग	(वाप्र)	एका म्यानात दोन तलवारी राहात नाहीत.
समूदा	(वि)	सर्व; ग्रा. समदे
सर/ सरी	(अ)	१. बरोबरी; ज्ञा. १३-३२९; लिळा (पू.) ३३६ 'रत्न खचितें रम्यें । सरी न पावती मेरू शिखरें । -धवले. १६; कुली १-२०३
	(स्त्री)	२.पावसाची सर.
सर बाँच्या तो मुंडासे हजार	(वाप्र)	सर सलामत पगडी पचास; 'मुंडासा गँवाना भला सर के ठार। के बाँच्या तो यक सर मुंडासे हजार' अली २१७
सरना	(क्रि)	सरणे, संपणे; प्रा. वज्जलांग २१७ 'जिता उस खरचते तो सरतां नई' सैफु ११
सरप	(पु)	सर्प; ग्रा. सरप
सराप	(पु)	शाप; ग्रा. सराप
सरीका/सारिका/सारका	(वि)	१. सारखा; ज्ञा. ४-१८१ (सारिखी)
	(अ)	२. सतत
सरोवर	(पु)	सरोवर, अली ९०
सल	(पु)	सळ, सं. शल्य; अली १४४
सले	(क्रि)	सलतो; ज्ञा. १८-६१५ (सले) 'दकन में सलता है मरे यह सोज' — रिज्वा १३४; अब्दुल ६
सवत	(स्त्री)	सवत
सवरात	(पु)	सोस, हव्यास, ग्रा. स्वैरात, सवरात 'इस दुनिया रहेगी सो बात है, बाकी दो दिन का सवरात है' —सब ८; रिज्वा १०१; फूल १२७; अब्दुल ४६
ससा	(पु)	ससा
सांगना	(क्रि)	सांगणे; फूल ९७
सान्चं	(अ)	सायंकाळी; ग्रा. सांच —सांजचं
सांज	(स्त्री)	सायंकाळ, ज्ञा. ९-७२ (सांज) 'देवे बाज अंधारॉं अछे, घर में सांज' — लैला ६२; तोती २४७

साजना	(क्रि)	साजणे, शोभून दिसणे.
सांदना/सांधना	(क्रि)	सांधणे; ग्रा. सांदणे, ज्ञा. १३-१०९३ (सांधे) चंद्र ८३; तारी ३-१
साटे बुद न्हाटे	(वाप्र)	साठी बुद्धी नाठी; कुमु ६
साडू	(पु)	साडू; बायकोच्या बहिणीचा नवरा; तोती ७९
सारका/सारिका	(वि)	सारखा; पाहाः 'सारिका'; 'तेरे चांदनी सारके झलकते तन की सौं' —सब १०२
सारना	(क्रि)	१. सारणे, दूर करणे; २. एखादा उपचार पूर्ण करणे; 'सके कोन तेरा शुकर सारने' — कुमु ८; 'लग उसके पीछे तुम दिन सारना' —अली ५६
साव	(वि)	सभ्य, प्रतिष्ठित; ज्ञा. ८-१४५, तारी २-३३
सावकास	(अ)	सावकाश
सावचित	(वि)	सावध
सावज	(पु)	सावज ; ज्ञा. १२-१४
सासरा	(पु)	सासरा
सासुरवास	(पु)	सासुरवास
सासुरवाडी/सासुरवडी	(स्त्री)	सासुरवाडी
सिताबी	(स्त्री)	चपळाई, फा. शिताबी
सिपाही जो समजे सिपाही की कदर		शूर मर्दाचा पवाडा शूर मर्दाने ऐकावा. गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुण: ।
सिबंदी	(स्त्री)	शिबंदी; फा. सिद्बंटी
सीका	(पु)	शिंके
सीन	(पु)	वय, ग्रा. सीन; सिनकरी, समवयस्व । सब ७२
सिवार	(पु)	शिवार; ग्रामाच्या सीमेत येणारा प्रदेश. ग्रा. सिवार
सीस	(पु)	सीस, डोके, सं. शीर्ष, लीळा (उ.) १५६ (सीस) कुमी २-३
सुकी अपना जीव तो सारा जहाँ	(वाप्र)	आपसुखी तर जग सुखी; कुमु १४५
सुपली	(स्त्री)	लहान सूप.
सुपारी	(स्त्री)	सुपारी; तोती १२०
सूकना	(क्रि)	सुकणे
सूप	(पु)	सूप
सेकना	(क्रि)	शेकणे

सेज	(स्त्री)	शय्या; ज्ञा. १३-५३ (सेज) ग्रा. शेज, तोती २११
सेरा	(पु)	शेला
सेरी	(स्त्री)	शेरी- इनाम असलेली शेतजमीन
सेवट	(अ)	शेवट; ज्ञा. ९-१२३ (सेवटु) १५-२०९ (सेवट); अली ३२७; तारी ४-३१
सेवाळ	(पु)	शेवाळ, सं. शैवालम्, ज्ञा. १६ -६६९ (सेवाळ)
सोंग भरना	(क्रि)	सोंग-संपादणी करणे, नाटक करणे.
सोट/सोट्या	(पु)	१. झाडाच्या बुंध्यापासून सरळ वाढलेले फांद्या नसलेले लाकूड. २. (लक्षणेने) आगापीछा नसलेला उनाड, ग्रा. सोट्या
सोस	(पु)	सोस, हव्यास, ज्ञा. ११-३; तारी ४-३०
सोसना	(क्रि)	सोसणे, सहन करणे; 'जैसा किया वैसा सोसे बाज' — सब ४; 'लगा सोसने गम-ब-गम दुख-ब-दुख' — सैफु ७८; चंद्र १०९
सोहना	(क्रि)	शोभणे
हंकाट	(पु)	हाकाटी; अली ४१५
हंगन	(पु)	अंगण (अकारण महाप्राण)
हटकना	(क्रि)	हटकणे. आव्हान देणे 'चलने में हँस कूँ हटकती' —सब ६.
हडकी	(स्त्री)	हडकुळी, रोड
हतखंडा	(पु)	हातखंडा, अली ४८२
हतेली में बेहेस्त दिखाना	(वाप्र)	तळ हातात स्वर्ग/ ब्रह्म दाखविणे; अशक्य गोष्टी शक्य असल्याचे भासविणे.
हत्यार/हतियार	(पु)	हत्यार. लीळा (पू.) १९८ (हातीएर); अली ६२
हदरना	(क्रि)	हादरणे. कुमु १२; अली १५७
हम-तुम होना	(वाप्र)	हमरी-तुमरीवर येणे; कुमु १२
हरबरे	(पु)	(अ.व) हरभरे; ग्रा. हरबरे
हल	(पु)	हलकल्लोळ, कोलाहल
हलगी	(स्त्री)	हलगी, एक चर्मवाद्य
हलना	(क्रि)	हलणे, 'जमीं सुस्त हुई यों जो हलती गई' —कुमु २; तारी ४-२; फूल १२६
हलूँ/ हलूँहलूँ	(अ)	हळू; ज्ञा. १३-२५५ (हळू) 'हलूँ शाहजादे के आया नजीक' — सैफू ४२
हाँक	(स्त्री)	१. हाक; सरज ते भरे अदल के साथ हाँक थी' — सैफु २२; अली २५

		२. ओरड; अली १३६
हाँक/ हाँकाँ मारना	(वाप्र)	तक्रार करणे, दोषारोप करणे, सब २
हाट	(पु)	हाट, बाजार; शिला, शके ११५० सोमेश्वर, लीळा (उ.) २८; ज्ञा. ९-४९२; 'कह्या यक जना शहर के हाट में' –सैफु २.
हाड	(पु)	हाड
हात	(पु)	हात (हिंदी- उर्दूत 'हाथ') कुली १-३९
हात कंगन करत अरसी क्या?	(वाप्र)	हातच्या काकणाला आरसा कशाला? –सुखा १३३
हातेहात	(अ)	हातोहात
हात चूरना	(वाप्र)	हात चोळत बसणे.
हात देना	(वाप्र)	१) आधार देणे. २) धोका देणे.
हात धोना	(वाप्र)	सोडणे, त्याग करणे; 'अरे संसारसे तो हात धोना है आखिर' मन १५
हात-पाँव पडना	(वाप्र)	हातापाया पडणे.
हावरा	(वि)	हावरा, अतृप्त
हिंडे	(क्रि)	हिंडतो, फिरतो, प्र. करकण्डुचरिऊ – हिंडीअ ८-१-८१ ज्ञा. १३-६८९
हिया/हिये	(पु)	हृदय; ज्ञा. २-२१९ (हिये) 'लगी मोज गम की तो फोडे हिया'–लैला ७७; कुली १-३२
हुंकारना	(क्रि)	हुंकारणे
हुच	(वि)	वेडा, ग्रा. हुच्च, 'दिसे यक यो गम किया हुच मजे' सैफु – २२; तोती ९४; रिज्वा १७
हुंडा	(पु)	हुंडा
हुत	(पु)	वारुळ (अरे मराठी बोली –हुत) 'बच्चे साप के हुत में बेशुमार'– अली २३४
हुलमुक	(पु)	हुडा, बुरुज (हुलमुख) 'दिसे तास हुलमुक सूँ मिल रुप यूँ' – इब्रा १४९
होलग	(अ)	होईपर्यंत
होड	(स्त्री)	पैज; ज्ञा ६-५६; १३-२१०; लीळा पू-५१. (होड); मिल उनसो लग्या खेलने होड बांद' –तोती ५१; फूल १०९; सब ११३
होडी	(स्त्री)	होडी; 'किये यक होडी मुस्तएद इस्तवार' सैफू १३
होरेदार	(पु)	अधिकारी, फा. ओहरेदार, (अकारण महाप्राण) ग्रा. होदेदार, दखनी-ग्रामीण मराठी समान अपभ्रंश

हौस (स्त्री) हौस; 'मुजे घोंगडी ओडने की हौस —मैना १४६; इब्रा ७०६

संदर्भ सूची

(अ) दखनी भाषेतील ग्रंथ

१. अकबरुद्दीन सिद्दीकी (सं.) सय्यद शाह दावलकृत **कशफुल्वजूद**, हैदराबाद
२. अब्दुल मजीद सिद्दीकी (सं.) मुल्ला नुस्रतीकृत **अलीनामा** (१९५९) हैदराबाद
३. अब्दुल हक मौलवी सय्यद (सं.) वजीही विरचित **सबरस** (१९३२) औरंगाबाद
४. अब्दुल हक मौलवी सय्यद (सं.) वजीही विरचित **कुतुब मुश्तरी** (१९३९), दिल्ली
५. अब्दुल हक मौलवी सय्यद (सं.)खाजा बंदेनवाज विरचित **मेराजुल् आशकीन** (१९३३), औरंगाबाद
६. गुलाम उमरखान (सं.) अजिजकृत **लैला मजनू** (१९६७) हैदराबाद
७. गुलाम उमरखान (सं.) गब्बासीकृत **मैना और सतवंती** (१९६५)हैदराबाद
८. चौहान, देविसिंग (स.) मुल्ला नुस्रतीकृत **तारीखे इस्कंदरी** (श. १८९०)पुणे (नागरी लिपीत)
९. चौहान, देविसिंग (स.) अब्दुलकृत **इब्राहीमनामा** (१९७३) मुंबई (नागरी लिपीत)
१०. जीनत साजेदा (स.) **कुलियाते शाही** (१९६२) हैदराबाद
११. तबईकृत मस्नवी **सैफुलमुलक व बदीउज्ज़माल** (अप्रकाशित)
१२. नुस्रतीकृत **गुलशने इष्क** (आदी-अंतीची पाने गहाळ)
१३. मिर्झा सय्यद महम्मद सखावत (सं.) काजी महम्मद बुहरी विरचित मसनवी **मनलगन** (१९५५) कराची
१४. मीर सादत अली रजवी (स.) गवासीकृत **तोतीनामा** (१९३९)हैदराबाद
१५. मुकीमीकृत **चंद्रवदन और मोहियार** (आदी- अंतीची पाने गहाळ)
१६. शर्मा, श्रीराम (सं.) वजीहीकृत **सबरस** (१९५५) हैदराबाद (नागरी लिपीत)
१७. सईदा जाफर (सं.) शाह तुराब विरचित **मनसमझावन** (१९६५) हैदराबाद
१८. सय्यद महम्मद (सं.) सुलतान अब्दुल कुतुबशाहकृत **कुलियात** (१९५९) हैदराबाद
१९. सय्यद महमूद (सं.) फायजकृत **रिज्वानेशाह और रुहे अफजा** (१९५६) हैदराबाद
२०. सय्यद मोहिउद्दीन कादरी 'जोर' (सं.)कुली कुतुबशाहकृत **कुलियात** (१९४०) हैदराबाद
२१. सरवरी सय्यद महम्मद (सं.) इब्ने निशातीकृत **अलीनामा** (१९५९)हैदराबाद

(ब) अन्य संदर्भग्रंथ

१. उपाध्याय, नगेंद्र, **तांत्रिक बौद्ध-साधना और साहित्य** (सं. २०१५), काशी नागरी प्रचारिणी सभा
२. उपाध्याय, बलदेव प्रसाद (सं) वररुचिकृत **प्राकृतप्रकाश** (१९७२), वाराणसी, संस्कृत विद्यालय
३. कादरी सय्यद शमसुल्ला, **तारीख जबाने उर्दू-ए-कदीम**, हैदराबाद, ताज प्रेस.
४. कोछड, हरिवंश, **अपभ्रंश साहित्य** (सं. २००३), दिल्ली भारती साहित्य भंडार.
५. कोलते, वि.भि (सं.) **लीळाचरित्र** (१९७८), मुंबई, साहित्य संस्कृती मंडळ
६. गुप्त, माताप्रसाद (सं.) **कुतुबशतक और उसकी हिंदुई**, (१९६६) अलाहाबाद, ज्ञानपीठ प्रकाशन.
७. गुप्त, माताप्रसाद, **राउलबेल और उसकी भाषा** (१९६२), अलाहाबाद. मित्र प्रकाशन.
८. चटर्जी, सुनीतिकुमार, **'हिन्दी और बंगला भाषा का तुलनात्मक अध्ययन'** (१९७४), दिल्ली, शब्दकार.
९. चटर्जी, सुनीतिकुमार, **भारतीय आर्य भाषा और हिंदी** (१९५७) दिल्ली, राजकमल प्रकाशन.

१०. चतुर्वेदी, परशुराम, **उत्तर भारत की संत –परंपरा** (सं २००८), अलाहाबाद, भारती पुस्तक भांडार.
११. जैन, देवेंद्रकुमार, **अपभ्रंश भाषा और साहित्य**, (१९६५) कलकत्ता, ज्ञानपीठ प्रकाशन
१२. जोशी, शं.प., **पंजाबातील नामदेव** (१९४०), मुंबई, केशव भिकाजी ढवळे.
१३. तिवारी, उदयनारायण, **भोजपुरी भाषा और साहित्य,** (१९५४) पटना, बिहार राष्ट्रभाषासभा
१४. तिवारी उदयनारायण, **हिन्दी भाषा का उद्भव और विकास** (१९६५) प्रयाग, भारती प्रकाशन
१५. तुळपुळे, श. गो. (सं.), **लीळाचरित्र**, नागपूर, सुविचार प्रकाशन.
१६. तुळपुळे, शं.गो.(सं.) **मराठी भाषेचा तंजावरी कोश** (१९६३) पुणे, पुणे विद्यापीठ प्रकाशन.
१७. तुळपुळे, शं.गो.(सं.) राम विकृत **भाषाप्रकाश** (१९६२), पुणे, पुणे विद्यापीठ प्रकाशन.
१८. तुळपुळे, शं.गो.**यादवकालीन मराठी भाषा** (१९७३) पुणे, व्हीनस प्रकाशन, द्वितीय आवृत्ती
१९. तुळपुळे, शं.गो.(सं.) राजवाडेकृत **ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण** (१९७९) मुंबई, साहित्य संस्कृति मंडळ.
२०. तुळपुळे, शं.गो. **प्राचीन मराठी कोरीव लेख** (१९६३) पुणे, पुणे विद्यापीठ प्रकाशन.
२१. तेलंग, भालचंद्र **हिन्दी बनाम दक्खिनी** (१९७५) औरंगाबाद, पत्रकार अनुसंधानशास्त्र.
२२. त्रिगुणायात, गोविन्द (सं.) **कबीर ग्रंथावली** (१९८५), दिल्ली, अशोक प्रकाशन.
२३. द्विवेदी, हजारीप्रसाद, **नाथसंप्रदाय** (१९६०), अलाहाबाद, लोकभारती प्रकाशन.
२४. द्विवेदी, हजारीप्रसाद (सं) **अध्दमाण विरचित सन्देश रासक**, (१९६०) मुबई, हिन्दी ग्रंथरत्नाकर
२५. धर्मवीर भारती, **सिद्धसाहित्य** (१९५५), अलाहाबाद, किताबमहल.
२६. धीरेंद्र वर्मा तथा वज्रेश्वरी वर्मा (सं.) **हिन्दी साहित्य** (१९५९) प्रयाग, भारतीय हिन्दी परिषद.
२७. **नामदेव महाराजांचा गाथा** (१९७०) मुंबई, महाराष्ट्र शासन प्रत.
२८. नामवर सिंह, **हिन्दी के विकास में अपभ्रंश का योग** (१९६४), अलाहाबाद, लोकभारती प्रकाशन.
२९. पीतांबरदत्त बडथ्वाल (सं.), **गोरखवाणी** (सं.२००३) प्रयाग, हिन्दी साहित्यसम्मेलन.
३०. भटनागर, रामरतन, **हिन्दी भक्तिकाव्य** (१९४२) अलाहाबाद, किताबमहल
३१. भावे, वि.ल. **महाराष्ट्र सारस्वत** (१९६४- पाचवी आवृत्ती), पुणे, विश्वकर्मा प्रकाशन.
३२. भावे. शिवाजी नरहर, **श्री ज्ञानेश्वरी पद्कोश** (१९७४), धुळे, राजवाडे संशोधन मंडळ
३३. मसूद हुसेन, **तारीख जबाने उर्दू**, दिल्ली, हाली पब्लिशिंग हाऊस
३४. महम्मद नइमुर रहमान, **चंद दकनी पहेलियाँ** (१९३६) अलाहाबाद, हिन्दुस्तानी अकादमी.
३५. मिश्र, भगीरथ, **पृथ्वीराज रासो के दो समर** (सं. १९९९), लखनऊ, गंगा प्रकाशन.
३६. रांगेय राघव, **गोरखनाथ और उनका युग** (१९६३) दिल्ली, आत्माराम अँड सन्स.
३७. राजवाडे, वि. का. (सं), **ज्ञानेश्वरी** (श. १८३१), धुळे, सत्कार्योत्तेजक सभा.
३८. **राम शर्माकृत प्राकृत कल्पतरू** (१९५४) कलकत्ता, एशियाटिक सोसायटी.
३९. **राहुल सांकृत्यायन (सं.) सरहपाकृत दोहाकोश** (१९५७) पटना, बिहार राष्ट्रभाषासभा
४०. **राहुल सांकृत्यायन (सं.) हिन्दी साहित्य का बृहद् इतिहास** (सं. २०१७), काशी, नागरी प्रचारिणी सभा.
४१. राहुल सांकृत्यायन, **पुरातत्त्वनिबंधावली** (१९३७) अलाहाबाद, इंडियन प्रेस.
४२. वियोगी हरि (सं.) **संक्षिप्त संतसुधासार** (१९५२) दिल्ली, सत् साहित्य प्रकाशन.
४३. शर्मा, श्रीराम, **दक्खिनी हिन्दी का उद्भव और विकास** (१९६४), प्रयाग हिन्दी साहित्य- संमेलन.
४४. शर्मा, श्रीराम, **दक्खिनी हिन्दी का साहित्य** (१९७२), हैदराबाद, दक्षिण प्रकाशन.
४५. शर्मा, विनयमोहन, **हिन्दी को मराठी सन्तों की देन** (१९५५) पटना, बिहार राष्ट्रभाषा परिषद
४६. शास्त्री, परमशिव **सूत्रशैली और प्राकृत व्याकरण** (१९६७) वाराणसी, नागरी प्रचारिणी सभा.

४७. शुक्ल, **रामचंद्र हिन्दी साहित्य का इतिहास** (सं. २००६), काशी, नागरी प्रचारिणी सभा
४८.श्याम सुन्दरदास (सं.) **कबीर ग्रंथावली** (१९६५) सत्पम् संस्करण) वाराणसी, नागरी प्रचारिणी सभा.
४९. सक्सेना, बाबूराम, **दक्खिनी हिन्दी** (१९५२) अलाहाबाद, हिन्दुस्तानी अकादमी.
५०. सिन्हा मंगलबिहारी, **सिद्धो की सन्धा भाषा** (१९७३) पटना, बिहार हिन्दी ग्रंथ अकादमी
५१. Blumfield Leonard, Language (1963 rehrit) Delhi, Motilal Banarasidas.
५२. Chatterji Sunitikumar (Ed) The Heritage of India (1978) Calcutta, Ramkrishna Mission.
५३. Dell Hymes (Ed) Language, Culture and society (1964), Newyourk, Harper Co.
५४. Greenbarg Joseph, language, Culture and Communication (1971), Standard printing press
५५. Greenbarg, Language in Social groups (1971) Standard printing press
५६. Sen Sakumar, A comparitive grammar of middle Indo-Aryan (1960), Pune Linguistic Society of India.
५७. Wriel Weiu reich, Language in contact, tendings and problems (1964) the heaguo, Muler & co.
५८. Vaidya P.L., Prakrit grammar of Hemchandra, (1958) Bombay Sanskrit series.
५९. Weinand M. Callewart (Ed), Early Hindi Devotional Literature In Current Research (1980) Review kantholike University
६०. Weinand M. Callewert, the Hindi Padavali of Namdev (1990), Delhi, Motilal Banarasidas.

दखनी भाषेशी संबंधित असलेले सर्व प्रश्न भाषाविज्ञानाच्या राजमार्गाने प्रवास करून सुटतीलच असे नाही. काही प्रश्न ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांच्या आधाराने उलगडण्याची शक्यता आहे. दखनी भाषेचा उगम शोधण्यासाठी तेच करावे लागले.

या प्रवासात दखनी भाषेच्या उद्भावाचा तर शोध लागलाच, शिवाय विशिष्ट सांस्कृतिक उत्तरदायित्व पार पाडता यावे म्हणून साधुसंतांकडून महाराष्ट्रात राष्ट्रभाषेचा उद्भव झाला हे ऐतिहासिक सत्य त्यातून प्रस्थापित करता आले.

दखनी भाषेचे मराठी वळण ही तिने मराठीची वरवर केलेली उसनवारी नसून कर्णाच्या कवचकुंडलांप्रमाणे ते तिचे जन्मसिद्ध लेणेच आहे.

- श्री. रं. कुलकर्णी

अनुक्रमणिका